Jawahirul Hadees
in Marathi Language

# जवाहिरुल हदीस

# جواہرالحدیث


संकलन व स्पष्टीकरणः

**शम्स पीरज़ादा**

मराठी अनुवादः

**मुहम्मद शफ़ी अन्सारी**



**इदारा दअ्वतुल क़ुर्आन**

५९-मुहम्मद अली रोड, मुंबई-४०००० ३
फोन ; 23465005

......2 nd Edition, March. 2008
...... 2,000

Price Rs.65/-

اُعْطِيتُ جَوَامِعَ الْكَلِمُ ـ(مسلم)

**''मला सर्वकष वचने प्रदान केली गेली आहेत '' (मुस्लिम)**





# अनुक्रमणिका


| पृ.क्र. | शिर्षक |
|---|---|
| ३. | अनुक्रमणिका |
| ६. | प्रकाशकाचे मनोगत |
| | **(१)** |
| **११.** | **पवित्र जीवनाच्या काही छटा** |
| १३. | शुभ स्वरूप |
| १७. | इस्लाम-प्रेषित (स.) यांचे सदाचरण व रोमच्या कैसरचे प्रभावित होणे. |
| २०. | प्रशंसनीय गुण-प्रेषितत्वापूर्वी |
| २१. | उच्चतम चारित्र्य |
| २२. | शत्रूंशी सद्व्यवहार |
| २३. | वाईट-पणाचे प्रत्युत्तर भलेपणाने |
| २५. | बंदीजनांशी वर्तणूक |
| २७. | सत्य विरोधक व अनेकेश्वरवाद्यांशी व्यवहार |
| २९. | सर्व सामान्य माणसा सारखे राहणीमान |
| ३०. | लज्जा संकोच स्वरूप |
| ३०. | चारित्र्याची विशालता |
| ३१. | मनाचा मोठेपणा |
| ३२. | व्यय आणि विशाल हृदयता |
| ३४. | अत्याधिक उपासना |
| ३५. | अपशब्द बोलण्या बाबत संयम |
| ३६. | ईश्वरावर विश्वास |
| ३७. | पैगंबर (स.) यांचे साधे जीवन |
| ३८. | अल्पाहार व साध्या खाद्यावर पर्याप्तता |
| ३९. | जेवणात दोष न काढणे |
| ४०. | सुख-विलासा बाबत विरक्ति |
| ४१. | कुटुंबियांची सेवा |
| ४२. | ईश्वरासमोर साक्ष देण्याची जाणीव |
| ४३. | पैगंबर (स.) यांनी कोणत्या स्थितीत जगाचा निरोप घेतला |
| ४४. | पैगंबर (स.) यांची अंतिम वचने |
| | **(२)** |
| | **चारित्र्य उभारणी** |
| ४६. | इस्लाम मध्ये चारित्र्या चे स्थान |
| ४७. | ईश भय आणि सदाचार |
| ४८. | माणसाचे चांगले आणि वाईट असण्याचे स्तर |
| ४९. | खरेपणा |
| ५०. | ईश निर्मितीवर दया |
| ५२. | मानवी सहानुभूति |
| ५४. | अनाथांचे संगोपन |
| ५५. | कोणत्याहि स्थितीत तकवा |
| ५६. | मार्गातील त्रास दायक वस्तू हटविणे |
| ५७. | सहानुभूति व दु:ख निवारण |
| ५८. | प्राण वित्त-प्रतिष्टा (शेवटच्या हज्ज प्रसंगीचे प्रवचन) |
| ६१. | हृदय-धन |
| ६३. | दान पुण्य |
| ६४. | स्त्रीयांशी सद्व्यवहार |
| ६५. | मानाने उपजिविका प्राप्त करणे |
| ६६. | मजूराचा हक्काधिकार |
| ६७. | प्राण्यांशी वर्तन |
| ६८. | बुद्धिमानांची आचरण पद्धति |
| ६९. | ईमानाच्या निकडी |
| ७०. | व्यावहारिक जीवनावर ईमानाचा |

प्रभाव

७१. संबंध-विच्छेदाच्या प्रत्युत्तरात स्नेह संबंध

७२. माता पित्याशी चांगली वागणूक

७३. क्रोधावस्थेत आत्म-नियंत्रण राखणे

७४. व्यवहारात मृदुता व संपन्नता अंगिकारणे

(३)

**७५. बिघाड निर्माण करणाऱ्या गोष्टी**

७६. अत्याचार व अतिरेक

८०. दुसऱ्याच्या जमीनीवर बलपूर्वक . कब्ज़ा

८१. संबंध विच्छेद

८१. धन लालसा

८२. निषिद्ध वस्तू खाणे

८६. कृपणता

८७. दांभिकतेची गुणवैशिष्टये

८८. शेजाऱ्यास त्रास देणे

८९. इच्छा भक्ति

९०. वंश पूजा

९१. नग्नता

९२. स्त्रीयांशी एकरूपता

९३. परस्पर संबंध बिघडविणाऱ्य गोष्टी

९४. जेव्हा लज्जा लोप पावते

९५. अत्याचारीस न रोखण्याचा परिणाम

९६. व्यापारात दुराचार

९७. साठे बाजी

(४)

**९८. राजनिती व शासन**

९९. जबाबदारीची जाणीव

१००. सत्ताधिकार,अयोग्य असलेल्यांच्या हाती सोपवणे

१०१. सर्वात वाईट शासक

१०२. अत्याचार पिडीताच्या तळतळाटापासून स्वत: ला वाचविणे

१०३. मुस्लिमेतर करार-कर्त्यास ठार करणे महापाप

१०४. वचन भंग

१०५. लाचखाऊ वृत्ती

(५)

**१०६. जगाची पात्रता**

१०७. आखिरतच्या तुलनेने इहलोकाची वास्तविकता

१०९. जग हसण्याचे स्थान नव्हे

११०. 'मजल' कडे

१११. इहलोक सुख विलासाचे स्थान नव्हे

(६)

**११३. शिर्क आणि बिदअत**

११४. सर्वात मोठे पाप

११६. ''शिर्क'' नाशिवंत

११८. कबर पूजा

(७)

**१२२. तौहीद (ऐकेश्वरवाद)**

१२३. इस्लामचा आधार

१२५. खरा बादशहा

१२६. स्वाभाविक धर्म

१२७. ईश्वरास संतती असण्याची कल्पना

१२९. एकेश्वर वादाची स्विकृति आणि दास्यत्वाची जाणीव

(८)

**१३०. ह.मुहम्मद यांचे प्रेषितत्व**

१३१. विश्वव्यापी प्रेषितत्व

१३३. विश्वाचा मुक्तिदाता

१३६. मुक्तिकरीता ह. मुहम्मद यांच्या प्रेषितत्वावर ईमान आणणे अत्यावश्यक

१३७. प्रेषिताचे आज्ञापालन

१३८. पैगंबर (स.) यांची खास वैशिष्टये

१४०. ज्ञान व विज्ञानाची वर्षा







१४२. अंतिम प्रेषित

(९)

**१४४. कुर्आन**

१४५. जाती समूहांच्या उत्कर्ष व ऱ्हासाचे कारण

१४६. ''वही'' चे अवतरण

१४८. सर्वोत्कृष्ट वाणी

१४९. सर्वोत्कृष्ट ज्ञान

(१०)

**१५०. मरणोत्तर जीवन**

१५१. मय्यतीसह कोणती गोष्ट स्थानांतरित होते?

१५२. मृत्युनंतराची अवस्था

१५४. आलमे बर्जख

१५५. हश्रचे मैदान

१५६. 'हश्र' कशा प्रकारे होईल?

१५७. खरे जीवन

१५८. खरे सुख-शांती

१५९. जन्नतच्या देणग्या कल्पनेहून उच्चतर

(११)

**१६०. इस्लाम स्विकृतिच्या काही घटना**

१६२. एका दिवसात संपूर्ण कबिला (टोळी) मुसलमान

१६५. इस्लाम स्विकृतीचे सरळरित्या आमंत्रण

१६६. पैगंबर (स.) यांना पाहता क्षणीच हृदयात इस्लाम अवतरणे

# प्रकाशकाचे मनोगत

इस्लाम सर्व मानवजातीसाठी जसा शाश्वत धर्म आहे तसेच प्रेषित मुहम्मद (स.) सर्व मानवजातीसाठी मार्गदर्शक बनवून पाठविले गेले आहेत. सर्व धर्मग्रंथांमध्ये प्रेषितांचा उल्लेख आलेला आहे. तसेच प्राचीन पुराणांमध्येही त्यांचा उल्लेख आलेला आहे. 'कलकी अवतार' मध्ये विस्ताराने प्रेषितांना पाठविण्याविषयी भविष्यवाणी आलेली आहे. अशा व्यक्तीविषयी माहिती करून घेणे व ती इतरांपर्यंत पोहोचविणे अत्यंत गरजेचे आहे. मुस्लिमेतरांना याची माहिती देणे आमची जबाबदारी आहे.

हे उद्दिष्ट समोर ठेवून मौलाना शम्स पीरज़ादा यांनी 'जवाहिरुल हदीस' या हदीससंग्रहाचे संकलन केले. या ग्रंथाचे उर्दूव्यतिरिक्त,मराठी, गुजराती, तेलुगू , कानडी व इंग्रजी भाषांमध्येही प्रकाशन झाले आहे.

'इदारा दावतुल कुरआन' द्वारा पवित्र कुरआन तसेच प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या शिकवणी साऱ्या मानवांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न होत आहेत. पवित्र कुरआनचे तीन खंडांमध्ये उर्दू , मराठी, गुजराती, हिंदी आणि इंग्रजीमध्ये भाषांतर झालेले आहे.

आता 'जवाहिरुल हदीस' या हदीससंग्रहाचे मराठी भाषांतराची दुसरी आवृत्ती प्रकाशित करत आहोत. या मराठी भाषांतरात चुका राहू नयेत याची तसदी घेतली गेली असली तरी आमच्या हातून राहून गेलेल्या चुका आमच्या नजरेस आणून द्याव्यात, ही विनंती.

हे ग्रंथ मुस्लिमेतर बांधवांपर्यंत पोहोचविण्यासाठी आमचे सहकार्य करावे, अशी सर्वांकडून अपेक्षा आहे.

**शहाब बाणकोटी**
सचिव
**इदारा दावतूल कुरआन**





بسم الله الرحمن الرحيم

# अनुवादकातर्फे दोन शब्द

सर्व प्रथम मी त्या सर्वोच्च व सर्वश्रेष्ट अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त करतो ज्याने मला या पवित्र व सर्वकष वचनांचा अनुवाद करण्याचा अवसर दिला.

इस्लाम संबंधी अजूनहि बऱ्याच लोकांच्या मनात गैरसमज आहे. केवळ काही मोजक्या लोकांच्या आचरणाचे अवलोकन करून इस्लाम विषयी वाटेल ती कल्पना करणे सयुक्तिक ठरणार नाही. याकरिता स्वच्छ शुद्ध मनोभावाने इस्लाम चा अभ्यास करण्याची गरज आहे: पर्यायाने ही काळाची गरज आहे.

इतिहासात अजरामर झालेल्या महापुरूषांच्या कथनांना, त्यांच्या अमूल्य वचनांना मनुष्य कल्पनातीत महत्व देतो. पण कालचक्रात ही वचने, सोसाटयाच्या वादळात पाला पाचोळा उडून जावा तशी नाहीशी होतात. त्यांच्या वचनांचा माणसाच्या मनावर प्रसंगानुरूप परिणाम होतो पण तोहि तात्पुरता. आयुष्यभर त्यांची महत्तता जणवत नाही.

इस्लामचे अंतिम प्रेषित पैगंबर सल्लल्लाहु अलैहि वसल्लम आज आमच्या दरम्यान अस्तित्वात नाहीत पण सुमारे १४०० वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरहि त्यांची वचने त्यांचे आदेश आजहि हयात आहेत. त्यांच्या शुभ मुखातुन निघालेला शब्द न शब्द आज देखील सुरक्षित आहे. अगदी विचार करण्यां सारखी गोष्ट आहे की पैगंबरांच्या वचनांना आदेशांना किंबहुना त्यांच्या कृतकर्मांना आज देखील महत्वपुर्ण व प्राणप्रिय का मानले जाते: वस्तुत: काळ बदलला आहे. भौतिक प्रगतीत माणसाने मोठी मजल मारली आहे. ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात कल्पनातीत प्रगती साधली आहे. राहणीमान आधुनिक काळास साजेळ असे आहे. तात्पर्य चौदाशे वर्षापुर्वी जे मनुष्य-स्थिती होती, जे ज्ञान होते. व जे राहणीमान होते त्यात आणि आजच्या स्थितीत जमीन अस्मानाचे अंतर आहे. दोन युगात एवढी मोठी तफावत असतानाहि आजच्या काळात पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम)यांच्या पवित्र वचनांना, आदेशांना व कृतकर्मांना एवढे महत्व का आहे ? खरोखर मोठया गंभीरतेने विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आणि याचे उत्तर, प्रेषित आचारणाचा त्यांच्या वचनांचा व आदेशांचा मन: पुर्वक अभ्यास केल्याने सहज लाभेल.

नि:संशय पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) अल्लाहचे प्रेषित होत. आणि म्हणुनच त्यांच्या वाणीत ते तेज आहे. जे दिव्य प्रकाश आहे तो जगाच्या कुठल्याहि व कोणत्याहि महापुरूषाच्या दीर्घ प्रवचनात नाही. अर्थात पैगंबरांच्या वचनांची ही अमुल्य रत्ने आज संकलीत रूपाने तुम्हा आम्हास उपलब्ध आहेत. पण या रत्नांचा शोध घेणाऱ्या काही ज्ञानवेडयानी आपले संपुर्ण आयुष्य वेचले आहे व प्रेषित-वचन सप्रमाण लाभावे म्हणून

मैलोगणती पायी जाउन ते साध्य केले आहे. खरोखर त्या विद्वानांनी तुम्हा आम्हावर हा फार मोठा अनुग्रह केला आहे.

प्रेषित आचरणाचा, प्रामुख्याने त्यांच्या वचनांचा मुक्त मनाने अभ्यास करा. तुमच्या मनातील अज्ञानाचा अंध:कार, विनाशभुत गोष्टीचे निरर्थक भय, दुष्टप्रवृत्ती नाहीशा होउ लागतील प्रस्तुत पुस्तक, जनाब शम्स पीरज़ादा लिखित ''जवाहिरूल हदीस'' या मुळ उर्दू पुस्तकाची मराठी रूपांतर होय. मूळ ग्रंथात शम्स पीरज़ादा साहेबांनी प्रत्येक हदीस वर ज्या स्पष्टीकरणात्मक टीपा दिल्या आहेत. त्या खरोखर सुविद्य मनाला चालना देणाऱ्या व इस्लामचे यथार्थ व सत्य दर्शन घडविणाऱ्या आहेत. भाषांतर करतांना हाच प्रयास कायम राखण्याचा मी प्रयत्न केला आहे.

''जवाहिरूल हदीस'' चे हे भेषांतर मराठी जाणणाऱ्या मुस्लिम व मुस्लिमेतर दोघांनाही अगदी लाभदायक असे आहे नि:संशय या पुस्तकावरून एक गोष्ट आपल्या लक्षात निश्चितपणे. येईल की पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचे प्रेषितत्व त्यांचे मार्गदर्शन केवळ मुस्लिम जनसमूहाकरिता नव्हे तर समस्त मानव-जाती करिता आहे. मानवाने आपले मृत्यु जीवन न मरणोत्तर जीवन ईश-आदेशानुसा कसे सुख शांती मय व यशस्वी बनवावे याचा पैगंबरांना आयुष्यभर ध्यास होता. प्रत्येक मानव जहन्नसच्या महा भयानक आगी पासून वाचविला जावा या गोष्टीची त्यांना विलक्षण तळमळ होती. आणि या तळमळीनेच त्यांनी प्रत्येक शब्द आपल्या शुभ मुखातून बाहेर काढला.

मुंबई
दीनांक १० मार्च १९८४

मुहम्मद शफी अन्सारी





بِسۡمِ اللّٰهِ الرَّحۡمٰنِ الرَّحِيۡمِ

अत्यंत दयाशील व अत्यंत कृपाशील अल्लाहच्या नावाने

# प्रस्तावना

हदीस म्हण्जे अल्लाहचे पैगंबर हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची वचनें आचार विचार होय. हदीस वचने वस्तुत: क़ुरआनाच्या आदेशांची स्पष्टता व त्यांच्या विवरण, ज्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्या निष्ठावंत सहकाऱ्यांनी अत्यंत जबाबदारी पुर्वक वर्णन केले आहे व नंतरचे निवेदनकार मोठी सावधगिरी बाळगून उल्लेखित राहिले. येथपावेतो की ही हदीस वचने ग्राथांत सुरक्षित झाली ज्यांची नावे बुखारी, मुस्लिम, तिर्मिज़ी, अबु दाऊद, नसाई, इब्नेमाजा, अहमद इ. आहेत. यात प्रमाणाधाराच्या दृष्टीने सही बुखारी व सही मुस्लिम यांचा दर्जा सर्वाधिक उच्च आहे.

पैगंबर वचनांच्या या अनमोल खजिन्यातून आम्ही काही अशी रत्ने निवडली आहेत जी मानव जातीच्या मार्गदर्शनाच्या दृष्टीने. शिक्षण व संगोपनाच्या दृष्टीने, तसेच वैचारीक व आचरणीय सुधारणेच्या दृष्टीने इतकी मूल्यवान व लाभप्रद आहेत की कोणत्याही मनुष्याने शुद्ध बुद्धीने यांचा अभ्यास केल्यास तो हे मान्य केल्याशिवाय राहणार नाही की याना सादर करणारे व्यक्तिमत्व अत्यंत उच्च कोटिचे व्यक्तिमत्व आहे. आणि या रत्नांनी जे महाल (धर्म) रचला गेला आहे तो केवळ अनुपमेयच नाही तर समस्त मानवतेकरिता खरोखर शरणस्थान व सर्वोत्कृष्ट शांतीस्थळ आहे.

निवडत हदीसचा हा संग्रह ''जवाहिरुल हदीस'' या नावाने सादर केला जात आहे.

पुस्तकाचा आरंभ ''पवित्र जीवनाच्या काही छटा'' या शिर्षकान्वये प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची हदीस वचने सादर केली गेली आहेत. ज्याद्वारे प्रषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या व्यक्तिमत्वाची महानता स्पष्ट होते आणि त्यांच्या आदर्श चारित्र्याची व स्तुत्य गुणवैशिष्टयाची बाजू उज्वल झालेली दिसून येते ''चारित्र्य घडण'' व बिघाड निर्माण करणाऱ्या गोष्टी' या शिर्षकान्वये अशी हदीस वचने सादर केली गेली आहेत ज्यात चारित्र्य व नितिमत्ता वाढीस लावाणाऱ्या, जीवनाला सुसंस्कृत बनविणाऱ्या मानवते चे सत्व निर्माण करणाऱ्या व चारित्र्य आणि कर्म दुषित करणाऱ्या गोष्टीपासून स्वत:ला वाचविण्याची शिकवण दिली आहे.'' राजनिती व शासन'' या शिर्षकान्वये काही हदीस वचनांचा उल्लेख केला गेला आहे, ज्या योग हे स्पष्ट व्हावे की इस्लाम केवळ व्यक्तिगत जीवन धर्म नव्हे किंबहुना सामूहिक जीवन-धर्म देखील आहे आणि तो राजनिती व शासन संदर्भात मार्गदर्शन करतो. '' जगाची योग्यता'' या प्रकरणात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या पवित्र वचनांद्वारे जगासंबंधी इस्लामचा दृष्टीकोन काहिहिं कमी अधिक न करता वर्णन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे ज्यायोग ऐहिक भक्ति वर कठोर प्रहार व्हावा व आखिरत (मरणोत्तर जीवना) ला ध्येय बनविण्याचा अधिकार निर्माण व्हावा. ''शिर्क व बिदअत'' शिर्षकान्वये हदीस वचनांच्या

माध्यमाने ''शिर्क'' (अल्लाहचा अन्य सहभागी ठरविणे) स्पष्ट केले आहे त्या सोबतच कबीरीची आराधना बिदअत (धर्मात नव्य बाबीचा प्रादुर्भाव) असल्याचे स्पष्ट केले गेले आहे. या उद्देशास्तव की मुस्लिमेतरांना हे स्पष्टत: कळावे की, ''इस्लाम'' तो नव्हे जो दरगा व मजारीच्या आराधना रुपाने आढळून यातो, किंबहुना इस्लाम तो आहे जो तौहीदच्या स्वरूपात पवित्र कुरआन व प्रेषित आचरणात सुक्षित आहे. ''तौहीद'' या प्रकरणात अल्लाहच्या एकत्वाचा प्रमाण पैलू सादर केला गेला आहे स्वाभाविक धर्म व इस्लामच्या आधारभूत गोष्टींवर प्रकाश टाकला गेला आहे. पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे प्रेषितत्व या शिर्षकान्वये अशा हदीस वचनांची निवड केली गेली आहे ज्या द्वारे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे विश्वव्यापी प्रेषितत्व आणि मानव जाती करिता ते मुक्तिदाता असल्याचे स्पष्ट होते, तसेच त्यांची विशिष्ट वैशिष्टये दर्शविली आहेत ''कुरआन'' या प्रकरणात ''वही-अवतरणाचे'' स्पष्टीकरण केले गेले आहे तव्दतच पवित्र कुरआन मार्गदर्शक असणे व जाती जमातीच्या उत्थान व पतानाचे कारण असणे हेही स्पष्ट केले गेले आहे ''मरणोत्तर जीवन'' या बाबीवर मृत्योत्तर अवस्था, आलमे बर्ज़ख हश्र चे मैदान व आख़िरतचे जीवन इ. प्रकरणात हदीस वचने दिली गेली आहेत आणि मुस्लिमेतरांना आकलन होईल अशा स्वरूपाचे स्पष्टिकरण केले गेले आहे शेवटी प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या आवाहनाचा परिणाम म्हणून इस्लाम स्विकृतिचे काही प्रसंग सादर करुन मुस्लिमेतारांना विचार-चिंतनाचे आमंत्रण दिले आहे.

हदीस वचनांच्या निवडीत या गोष्टीची पूरेपूरे जाणीव राखणीव राखली आहे की केवळ तीच हदीस वचने सादर केले जावीत जी सप्रमाण असावीत या उद्दिष्टा करीता अधिकांश ''सहीह बुखारी'' व सहीह मुस्लिम'' या संग्रहा मधील हदीस वचनांची निवड केली गेली आहे. मात्र या व्यतिरिक्तच्य हदीस संग्रहातून उद्धृत केलेल्य हदीस वचनांच्या प्रामाण्या विषयी समाधान झाल्या नंतरच प्रस्तुत संग्रहात त्यांचा समावेश केला आहे.

हदीस निवडी बाबत आम्ही उच्च पातळी ठेवली आहे या गोष्टीचा पूरेपूरे प्रयत्न केला आहे की कोणतीही असमर्थनीय (ज़ईफ़) हदीस यात समाविष्ट न व्हावी, अशासाठी की प्रेषित वचनाच्या नावाने ज्या गोष्टी आम्ही मुस्लिमेतरांसमोर मांडाव्यात त्या प्रमाण असण्या संबंधी कसल्याहि शंका-संशयास वाव न रहावा.

या पूर्वी ''जवाहिरूल हदीस'' हे पुस्तक उर्दू भाषेंत प्रसिद्ध करण्यात आले होते आता त्याचा मराठी अनुवाद प्रसिद्ध केला जात आहे जो आमचे स्नेही जनाब मुहम्मद शफी अन्सारी यांनी केला आहे. त्यांनी मुळ ग्रंथास मराठी चे उत्कृष्ट स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्या या प्रयत्नास यशस्वी करो आणि तयांना मंगल-मोबदला प्रदान करो.

शम्स पीरज़ादा
मुंबई
१२ मार्च १९८४





# (१) पवित्र जीवनाच्या कांही छटा

# حديث

عَنِ الْحَسَنِ بْنِ عَلِيٍّ قَالَ سَأَلْتُ خَالِيْ هِنْدَ بْنَ اَبِىْ هَالَةَ وَكَانَ وَصَّافاً عَنْ حُلْيَةِ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ وَ أَنَا اَشْتَهِىْ اَنْ يَّصِفَ اِلَىَّ شَيْئًا، يَتَعَلَّقُ بِهِ فَقَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ فَخْمًا مُفَخَّمًا، يَتَلَأْلَؤُ وَجْهُهُ تَلَالُؤَ الْقَمَرِ لَيْلَةَالْبَدْرِ ، اَطْوَلَ مِنَ الْمَرْبُوْعِ وَأَقْصَرَ مِنَ الْمُشَذَّبِ ، عَظِيْمَ الْهَامَةِ، رَجْلَ الشَّعْرِ اِنِ انْفَرَقَتْ عَقِيْقَتُهُ فَرَّقَ وَ اِلَّا فَلَا۔ يُجَاوِزُشَعْرُهُ شَحْمَةَ اُذُنَيْهِ اِذَاهُوَ وَفَّرَهُ، اَزْهَرَ اللَّوْنِ، وَاسِعَ الْجَبِيْنِ اَزَجَّ الْحَوَاجِبِ سَوَابِغَ مِنْ غَيْرِ قَرْنٍ بَيْنَهُمَا عِرْقٌ يُدِرُّهُ الْغَضَبُ، اَقْنَى الْعِرْنِيْنَ،لَهُ نُوْرٌ يَعْلُوْهُ يَحْسَبُهُ مَنْ لَمْ يَتَامَّلْهُ اَشَمَّ، كَثَّ اللِّحْيَةِ، سَهَلَ الْخَدَّيْنِ، ضَلِيْعَ الْفَمِ، مُفَلَّجَ الْاَسْنَانِ، دَقِيْقَ الْمَسْرَبَةِ، كَأَنَّ عُنُقَهُ جِيْدُ دُمْيَةٍ فِىْ صَفَاءِ الْفِضَّةِ، مُعْتَدِلَ الْخَلْقِ ، بَادِناً مُتَمَا سِكاً سَوَاءَ الْبَطْنِ وَالصَّدْرِ، عَرِيْضَ الصَّدْرِ، بُعَيْدَ مَا بَيْنَ مَنْكَبَيْنِ، ضَخْمَ الْكَرَادِيْسَ، اَنْوَرَ الْمُتَجَرِّدِ، مَوْصُوْلَ مَا بَيْنَ اللُّبَّةِ وَ السُّرَّةِ بِشَعْرٍ يَجْرِى كَالْخَطِّ عَارِىَ الثَّدْيَيْنِ وَالْبَطْنِ مِمَّا سِوَى ذٰلِكَ، اَشْعَرَالذِرَا عَيْنِ وَالْمَنْكَبَيْنِ وَاَعَالِىَ الصَّدْرِ، طَوِيْلَ الزَّنْدَيْنِ، رَحْبَ الرَّاحَةِ شَثِنَ الْكَفَّيْنِ وَالْقَدَمَيْنِ، سَائِلَ الْاَطْرَافِ أَو قَالَ شَائِلَ الْاَطْرَافِ،خَمْصَانِ الاَخْمَصَيْنِ، مَسِيْحَ الْقَدَمَيْنِ يَنْبُؤُ عَنْهُمَا الْمَاءُ،اِذَا زَالَ زَالَ قَلْعاً، يَخْطُوْ تَكَفِّيًاوَيَمْشِىْ هَوْناً، ذَرِيْعَ الْمَشْيَةِ اِذَامَشَى كَاَنَّمَايَنْحَطُّ مِنْ صَبَبٍ وَاِذَا اِلْتَفَتَ اِلْتَفَتَ جَمِيْعًا فَاخِضَ الطَّرْفِ، نَظْرُهُ اِلَى الْاَرْضِ اَكْثَرُ مِنْ نَظْرِهِ اِلَى السَّمَاءِ جُلُّ نَظْرِهِ الْمُلَاحَظَةُ ، يَسُوْقُ اَصْحَابَهُ وَيَبْدَءُ مَنْ لَقِيَ بِالسَّلَامِ۔

( شمائل الترمذى )





# शुभ स्वरूप

## हदीस

**हसन इब्ने अली फर्मावितात की मी आपले मामा हिंदा अबी हाला यांना पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांच्या शुभ व्यक्तित्वा संबंधी विचारले कारण ते मोठया कुशलतेने प्रेषितांचे व्यक्तित्व वर्णन करीत आणि त्यांनी मला ते वर्णन सांगावे अशी माझी इच्छा होती. अशासाठी की मी ते स्मरणात ठेवावे, यास्तव त्यांनी प्रेषित (स.) यांच्या व्यक्तित्वाचे अशा प्रकार वर्णन केले.**

**प्रेषित मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम प्रतिष्ठित व रुबाबदार व्यक्तिमत्वाचे स्वामी होते त्यांचा चेहरा इतका चमकत असे जसा पोर्णिमेचा चंद्र, उंची चांगली पण फार जास्त नव्हती. डोके मोठे केस काही से कुरळे, भांग जर अपो आप निघे तर राहु देत अन्यथा नाही. केस जेव्हा वाढवित तर कानाच्या पाळी खाली येत. रंग अगदी साफ व उघड होता. कपाळ विस्तीर्ण, भ्रुकुट्या वक्र, बारीक दाट व वेगवेगळया यांच्य दरम्यानची नस रागाच्या भरात रक्तमय होइ. नाक उंच व त्यावर तेज दिसे. जो कोणी एकदा पाहत असे, मनात उच्च विचार बाळगी, दाढी भरगच्च, गाल मांसल, मुख विशाल न जोडलेले दंत, छातीवर पातळ केस, मान (अशी) उंच की एखाद्या पुतळयाची मान असल्याचा भास व्हावा. चांदी सारखी साफ व स्वच्छ अवयव समतोल शरीर सौष्ठपुष्ट व कसलेले. छाती व पोट समान, छाती विशाल, खांद्यामाध्ये अंतर, सांधे मोठे शरीराचा उघडा भाग अति सुंदर, छातीपासून नाभी पर्यंत, केश-रेषा, दोन्ही वक्ष व पोट केश विरहती हात खांदे व छातीच्या उंचवटयावर केस, विस्तीर्ण मनगटे, पंजा विशाल, हाताचे दोन्ही तळवे व पाय भर भक्कम, बोटे लांब, तळवे सखोल, पाय इतके समांतर की पाणी साचने अशक्य चालातांना भक्कम पाय उचलत. पुढे थोडेसे वाकून पाऊल ठेवीत व नम्रतेने आणि इतक्या वेगाने चालत की जणू उंचीवरून उताराकडे उतरत असावेत. जेव्हा एखादयाकडे लक्ष देत असत तर पूर्णत: लक्ष केंद्रित करीत . दृष्टि खाली व आकाशा ऐवजी जमीनीकडे अधिक असे. डोळयांच्या कोपऱ्यातून पाहत आपल्या सहवासीयांना पुढे राखीत व जो कोणी भेटेल त्याला स्वत: सलाम करीत.**

**(शमाईल तिर्मिज़ी)**

# स्पष्टीकरण

पैगंबर हज़रत मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांची छबी जरी जगात अस्तित्वात नाही तरी शब्दांच्या शैली द्वारे जे चित्र रेखांकित केले गेले आहे त्यातून एका महान व्यक्तिमत्वाची एक झलक दृष्टीस पडते. उत्तम स्वभावा सोबत उत्तम चेहरा आणि उत्तम अंतरंगा सोबत उत्तम व्यक्त गुण जणू दुधात साखर पडल्या सारखे झाले आहे. पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांच्या महानतेला व प्रेषित्वची शान नजरे समोर ठेवुन त्यांच्या एकनिष्ठ सहवासीयांनी केवल त्यांच्या कथन व कर्मांना सुरक्षित ठेवले नाही किंबहुना त्यांच्या प्रत्येक कृतिचे वर्णन केले, अशासाठी की, प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या संदेशासह त्यांच्या व्यक्तिमत्वाशी लोकांना चांगल्या प्रकारे परिचित केले जावे आणि अनामतदारीचा हक्क अदा व्हावा.

सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्यांना मानव जातिकरिता सर्वोत्तम आदर्श बनविले होते आणि अल्लाहचा हा फार मोठा उपकार होय की त्याने इश्वराच्या या निकटवर्ती सर्व गुणसंपन्न मनुष्य व इतिहास घडविणाऱ्या व्यक्तिच्या समस्त पदचिन्हांना इतिहासाच्या पृष्ठावर अंकित करण्याची अशा प्रकारे व्यवस्था फर्माविली की चौदाशे वर्षे लोटयानंतरहि, आज देखील अनुभूती होते की जणू पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आमच्या दरम्यान हजर आहेत व मार्ग दर्शनाचा सूर्य पूर्ण तेजासह आपल्या किरणांना पसरवित आहे परंतु या प्रकाशात चालण्याचे सद्भाग्या अशाच लोकांना लाभते जे आपल्या डोळयांना उघडे ठेवतात.





# حديث

عَنْ اِبْنِ عَبَّاس(رض) اَنَّ اَبَا سُفْيَانَ بْنِ حَرْبٍ اَخْبَرَهُ اَنَّ هِرَقْلَ اَرْسَلَ اِلَيْهِ ................

ثُـمَّ كَـانَ اَوَّلَ مَا سَئَلَنِيْ عَنْهُ اَنْ قَالَ كَيْفَ نَسَبُهُ فِيْكُمْ قُلْتُ هُوَ فِيْنَا ذُوْنَسَبٍ قَالَ فَهَلْ قَالَ هَـذَا الـقَـوْلَ مِـنْكُمْ اَحَدٌ قَطُّ قَبْلَهُ قُلْتُ لَا قَالَ فَهَلْ كَانَ مِنْ آبَائِهِ مِنْ مَلِكٍ قُلْتُ لَا، قَالَ فَـاَشْـرَافُ الـنَّاسِ يَتَّبِعُوْنَهُ اَمْ ضُعَفَاؤُهُمْ قُلْتُ بَلْ ضُعَفَاؤُهُمْ قَالَ اَيَزِيْدُوْنَ اَمْ يَنْقُصُوْنَ قُلْتُ بَـلْ يَـزِيْـدُوْنَ قَـالَ فَهَـلْ يَرْتَدُّ اَحَدٌمِّنْهُمْ سَخْطَةً لِدِيْنِهِ بَعْدَ اَنْ يَدْخُلَ فِيْهِ قُلْتُ لَا قَالَ فَهَلْ كُنْتُمْ تَتَّهِمُوْنَهُ بِالْكِذْبِ قَبْلَ اَنْ يَّقُوْلَ مَا قَالَ قُلْتُ لَا قَالَ فَهَلْ يَغْدِرُ قُلْتُ لَا وَ نَحْنُ مِنْهُ فِيْ مُـدَّةٍ لَا نَـدْرِىْ مَـاهُـوَ فَاعِلٌ فِيْهَا قَالَ وَلَمْ تُمْكِنِّيْ كَلِمَةٌاُدْخِلُ فِيْهَا شَيْئًا غَيْرَ هَذِهِ الْكَلِمَةِ قَـالَ فَهَلْ قَاتَلْتُمُوْهُ قُلْتُ نَعَمْ قَالَ فَكَيْفَ كَانَ قِتَالُكُمْ اِيَّاهُ قُلْتُ الْحَرْبُ بَيْنَنَا وَ بَيْنَهُ سِجَالٌ يَـنَـالُ مِـنَّـا وَنَـنَالُ مِنْهُ،قَالَ مَاذَا يَامُرُكُمْ قُلْتُ يَقُوْلُ اعْبُدُوْاللّٰهَ وَحْدَهُ وَلَا تُشْرِكُوْا بِهِ شَيْئًا وَاتْرُكُوْ امَا يَقُوْلُ اٰبَائُكُمْ وَيَامُرُنَا بِالصَّلَاةِ وَالصِّدْقِ وَالْعَفَافِ وَالصِّلَةِ فَقَالَ لِلتَّرْجُمَانِ قُلْ لَـهُ سَـاَلْتُكَ عَـنْ نَسَبِـهِ فَـذَكَـرْتَ اَنَّـهُ فِيْكُمْ ذُوْنَسَبٍ فَكَذٰلِكَ الرُّسُلُ تُبْعَثُ فِيْ نَسَبِ قَـوْمِهَـا ـ وَسَأَلْتُكَ هَلْ قَالَ اَحَدٌ مِّنْكُم هَذَا الْقَوْلَ فَذَكَرْتَ اَنْ لَّا فَقُلْتُ لَوْ كَانَ اَحَدٌ قَالَ هَـذَا الْـقَـوْلَ قَبْـلَـهُ لَـقُـلْـتُ رَجُلٌ يَّا تَسِى بِقَوْلٍ قِيْلَ قَبْلَهُ وَسَاَلْتُكَ هَلْ كَانَ مِنْ آبَائِهِ مِنْ مَـلِكٍ فَـذَكَـرْتَ اَنْ لَّاقُـلْـتُ فَلَوْ كَانَ مِنْ آبَائِهِ مِنْ مَّلِكٍ قُلْتُ رَجُلٌ يَّطْلُبُ مُلْكَ اَبِيْهِ وَسَاَلْتُكَ هَلْ كُنْتُمْ تَتَّهِمُوْنَهُ بِالْكِذْبِ قَبْلَ اَنْ يَّقُوْلَ مَا قَالَ فَذَكَرْتَ اَنْ لَّا فَقَدْ اَعْرِفُ اَنَّهُ لَمْ يَكُنْ لِيَـــذَرَالْكَذِبَ عَلَى النَّاسِ وَيَكْذِبَ عَلَى اللّٰهِ وَسَاَلْتُكَ اَشْرَافُ النَّاسِ اتَّبَعُوْهُ اَمْ ضُـعَـفَاءُ هُمْ فَذَكَرْتَ اَنْ ضُعَفَاءُ هُمْ اتَّبَعُوْهُ وَهُمْ اَتْبَاعُ الرُّسُلِ وَسَاَلْتُكَ اَيَزِيْدُوْنَ اَمْ يَنْقُصُوْنَ فَـذَكَرْتَ اَنَّهُمْ يَزِيْدُوْنَ وَكَذٰلِكَ اَمْرُ الْاِيْمَانِ حَتَّى يَتِمَّ وَ سَأَلْتُكَ اَيَرْتَدُّ اَحَدٌ سَخْطَةً لِـدِيْنِهِ بَـعْدَ اَنْ يَّدْخُلَ فِيْهِ فَذَكَرْتَ اَنْ لَّا وَكَذٰلِكَ الْاِيْمَانُ حِيْنَ تُخَالِطُ بَشَاشَتُهُ الْقُلُوْبَ وَسَأَلْتُكَ هَـلْ يَـغْـدِرُفَـذَكَـرْتَ اَنْ لَّا وَكَـذٰلِكَ الـرُّسُـلُ لَا تَغْدِرُ وَسَأَلْتُكَ بِمَا يَامُرُكُمْ فَذَكَرْتَ اَنَّهُ يَـامُـرُكُـمْ اَنْ تَـعْبُـدُوْا اللّٰهَ وَلَا تُشْرِكُوْا بِهِ شَيْأً وَيَنْهَاكُمْ عَنْ عِبَادَةِ الْاَوْثَانِ وَيَامُرُكُمْ بِالصَّلَاةِ

وَالصِّدْقِ وَالْعَفَافِ فَاِنْ كَانَ مَا تَقُوْلُ حَقًّا فَسَيَمْلِكُ مَوْضِعَ قَدَمَيَّ هَاتَيْنِ وَقَدْ كُنْتُ اَعْلَمُ اَنَّهُ خَارِجٌ لَمْ اَكُنْ اَظُنُّ اَنَّهُ مِنْكُمْ فَلَوْ اَنِّيْ اَعْلَمُ اَنِّيْ اَخْلُصُ اِلَيْهِ لَتَجَشَّمْتُ لِقَاءَ هُ وَلَوْ كُنْتُ عِنْدَهُ لَغَسَلْتُ عَنْ قَدَمِهٖ ثُمَّ دَعَا بِكِتَابِ رَسُوْلِ اللّٰهِ صلى الله عليه وسلم الَّذِيْ بَعَثَ بِهٖ دِحْيَةُ اِلَى عَظِيْمِ بُصْرَى فَدَفَعَهُ اِلَى هِرَقْلَ فَقَرَاَهُ فَاِذَا فِيْهِ:

"بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ ○ مِنْ مُّحَمَّدٍ عَبْدِاللّٰهِ وَرَسُوْلِهٖ اِلَى هِرَقْلَ عَظِيْمِ الرُّوْمِ سَلَامٌ عَلَى مَنِ اتَّبَعَ الْهُدَى اَمَّابَعْدُ فَاِنِّيْ اَدْعُوْكَ بِدِعَايَةِ الْاِسْلَامِ اَسْلِمْ تَسْلَمْ يُؤْتِكَ اللّٰهُ اَجْرَكَ مَرَّتَيْنِ فَاِنْ تَوَلَّيْتَ فَاِنَّ عَلَيْكَ اِثْمَ الْاَرِيْسِيِّيْنَ وَيَا اَهْلَ الْكِتَابِ تَعَالَوْ اِلَى كَلِمَةٍ سَوَاءٍ بَيْنَنَا وَ بَيْنَكُمْ اَنْ لَّا نَعْبُدَ اِلَّا اللّٰهَ وَلَا نُشْرِكَ بِهٖ شَيْئًا وَلَا يَتَّخِذُ بَعْضُنَا بَعْضاً اَرْبَابًا مِّنْ دُوْنِ اللّٰهِ فَاِنْ تَوَلَّوْا فَقُوْلُوْا اشْهَدُوْا بِاَنَّا مُسْلِمُوْنَ"

قَالَ اَبُوْ سُفْيَانَ فَلَمَّا قَالَ مَا قَالَ وَفَرَغَ مِنْ قِرَاءَ ةِ الْكِتَابِ كَثُرَ عِنْدَهُ الصَّخَبُ وَارْتَفَعَتِ الْاَصْوَاتُ وَاُخْرِجْنَا فَقُلْتُ لِاَصْحَابِيْ حِيْنَ اُخْرِجْنَا لَقَدْ اَمِرَ اَمْرُ اِبْنِ اَبِيْ كَبْشَةَ اَنَّهُ يَخَافُهُ مَلِكُ بَنِي الْاَصْفَرِ فَمَازِلْتُ مُوْقِنًا اَنَّهُ سَيَظْهَرُ حَتَّى اَدْخَلَ اللّٰهُ عَلَيَّ الْاِسْلَامَ ۔

(البخاری بدء الوحی)





# इस्लाम-प्रेषित (स.)यांचे सदाचरणा व रोमच्या कैसर चे प्रभावित होणे

## हदीस

हज़रत इब्ने अब्बास (रज़ि.) फर्मावितात अबु सुफियान ने मला हे कथन केले की (रोम सम्राट हिरकल ने मला आपल्या दरबारी बोलाविले व पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम बाबत विचारले) हिरकल चे पहिला प्रशन हा होता की त्या व्यक्तिचा वंश कसा आहे ? मी म्हणालो तो अत्यंत सूक्ष्म व कुलीन घराण्याशी संबंधित आहे त्याने विचारले, काय तुमच्यापैकी कोणी यापूर्वी प्रेषितत्वाचा दावा केला होता? मी म्हणालो, 'नाही' त्याने विचारले, काय याच्या पूर्वजापैकी कोणी बादशाह होऊन गेला? मी उत्तर दिले, 'नाही' त्याने पृच्छा कोली काय याचे अनुसरण करणारे प्रभावशाली लोक आहेत कि दुर्बल? मी उत्तर दिले, 'दुर्बल' त्याने प्रश्न केला, त्याच्या अनुयायीमध्ये वाढ होत आहे कि ते घटत आहेत?' मी उत्तर दिले, वाढ होत आहे. त्याने विचारले, त्यांच्या अनुयायांपैकी असा कोणी आहे काय जो त्याच्या धर्माला वैतागून परावृत्त झाला असावा? मी म्हाणालो,'नाही' त्याने विचारले, प्रेषितत्वाचा दावा केला जाण्यापूर्वी तुम्ही कधी त्याच्यावर खोटेपणाचा आरोप ठेवला होता? मी म्हणालो, नव्हे त्याने विचारले, तो वचन भंग करतो काय? मी म्हणालो नव्हे-तथापि जो तहकरार त्याच्याशी झाला आहे त्यावर तो क़ायम राहतो किंवा नाही ते पाहू अबु सुफ़ियान म्हणतात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) बाबत एका गोष्टी खेरीज अन्य कोणतीही गोष्ट मी आपल्या तर्फे समाविष्ट करु 'शकलो नाही. त्याने विचारले, कोय तुमचे त्याच्याशी कधी युद्ध झाले आहे? मी उत्तर दिले 'होय' त्याने विचारले युद्धाची परिणिती काय झाली? मी म्हणालो, युद्धात कधी त्याचे पारडे जड राहिले तर कधी आमचे, त्याने विचारले, तो कोणत्या गोष्टीचा आदेश देतो? मी म्हणालो, तो म्हणतो केवल अल्लाहची उपासना करा व त्या बरोबर कोणालाहि सहभागी करू नका. पुर्वजंच्या गोष्टी (अर्थात अज्ञान काळाच्या गोष्टी) सोडा. तो आम्हाला नमाज़ पढण्याचा, सत्य बोलण्याचा सच्छिलता पत्करण्याचा व आपल्या नातेवाइकांशी चांगले वर्तन ठेवण्याचा आदेश देतो.

या चर्चेनंतर हिरकल दुभाष्यास म्हणाला, अबु सुफ़ियानला सांगा मी तुम्हाला त्याच्या वंशा बाबत विचारले तेव्हा तो अत्यंत सभ्य वंशाचा असल्याचे तुम्ही सांगितले आणि प्रेषित नेहमी सभ्य व कुलीन घराण्यातच पाठविले जातात. मी विचारले. काय त्या व्यक्तिपूर्वी तुमच्यापैकी एखाद्याने प्रेषितत्वाचा दावा केला होता काय? तुम्ही उत्तर दिले, 'नाही' जर यापूर्वी तुमच्यापैकी एखाद्याने हा दावा केला असता तर हा त्या दाव्याचा प्रभाव होय हेच मी समजलो असतो. मी विचारले, त्याच्या पुर्वजापैकी कोणी बादशहा होऊन गेला? तेव्हा तुम्ही 'नाही' असे उत्तर दिले. आणि जर असे असते तर तो आपल्या पूर्वजांच्या) साम्राज्यास पुन्हा प्राप्त करू इच्छितो असे मी समजलो असतो. मी तुम्हाला हे विचारले की प्रेषितत्वाच्या दाव्या आधी तुम्ही त्याच्यावर खोटेपणाचा आरोप ठेवला होता? तुम्ही उत्तर दिले 'नाही' तेव्हा जी व्यक्ति लोकांशी खोटे बोलत नाही ती ईश्वरसंबंधात असत्य बोलेल असे मला नाही वाटत. तसेच मी हो प्रश्न केला की त्याच्या

अनुयायांमध्ये प्रभावशाली लोक आहेत की दुर्बल? तेव्हा तुम्ही उत्तर दिले 'दुर्बल लोक' अर्थात प्रेषितांचे अनुयायी. अशाच प्रकारचे लोक असतात. मी विचारले यांच्या अनुयायांमध्ये वाढ होत आहे कि कमी? तेव्हा वाढ होत असल्याचे तुम्ही सांगितले आणि हीच स्थिती इमानाची असते. ते वृद्धिंगत होत असते. येथपावेतो की ते पुर्णतेस पोहचते. मी तुम्हाला विचारले की एखाद्याने त्याचा धर्म स्वीकारल्यानंतर त्याला वैतागून विमुख झाला आहे काय? तुम्ही उत्तर दिले, नाही अर्थात हीच स्थिती इमानची आहे. ते एकदा हृदयात शिरल्यावर पुन्हा बाहेर निघत नाही मी विचारले, तो कधी वचनाविरूद्ध गेला आहे काय? तुम्ही सांगितले 'नाही' अर्थात प्रेषितांचे चारित्र्य हे असेच असते. ते कधीहि वचन भंग करीत नाही. मी तुम्हाला हे विचारले तो कोणत्या गोष्टीची शिकवण देतो? तुम्ही सांगितले की तो एका अल्लाहची उपासना करण्याचे व त्यासह अन्य कोणालाही सहभागी न करण्याचे शिक्षण देतो मूर्तिपूजेला विरोध करतो. आणि नमाज़ पढण्याचा खरे बोलण्याचा, व सच्छिलता पत्करण्याचा आदेश देतो. जर तुमच्या या गोष्टी खऱ्या आहेत तर एक दिवस असा येइल की त्याचे वर्चस्व माइया या पायांच्या जागी असेल. लवकरच एक प्रेषित उदयास येणार आहे हे मला माहित होते पण तो तुमच्या पैकीच असेल मला वाटले नव्हते. जर या प्रेषिताच्या सेवेत उपस्थित होणे मला शक्य प्राय असते तर मी अडचणीना तोंड देऊन त्याची भेट घेतली असती आणि जर मी हजर असतो तर त्याचे (शुभ) पद धुण्याचे सद्‌भाग्य प्राप्त केले असते.

या चर्चेनंतर हिरकल ने प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा शुभ संदेश विचारला जो देह्‌या (रजि.) यांनी हाकीम बसरा मार्फत पाठविला होता तो वाचण्यात आला.त्यातील आशय असा होता : 'अत्यंत दयाशील व अत्यंत कृपाशील अल्लाहच्या नावाने. मुहम्मद कडून जो अल्लाहचा दास पैग़ंबर आहे रोमचा शासक हिरकल यांच्या नावे आहे. मार्गदर्शनाचे अनुसरण करणाऱ्यावर सलाम (शांती) असो. मी तुम्हाला इस्लामचे आमंत्रण देतो. तुम्ही इस्लाम क़बूल करा. सरक्षित रहाल आणि अल्लाह तुम्हाला दुप्पट फळ देइल. परंतु जर तुम्ही नकार दर्शविला तर देशवासीयांचा अपराध तुमच्या माथी असेल. हे ग्रंथ धारका अशा गोष्टीकडे या जी आमच्या दरम्यान सामाइक आहे.अर्थात ही की आम्ही अल्लाह खेरीज अन्य कोणाचीही उपासना करू नये व कोणासहि त्याचा सहभागी ठरवू नये आणि आमच्यापैकी कोणीहि कोणास अल्लाह खेरीज स्वामी (रब्ब) बनवू नये. जर हे लोक अमान्य करतील तर स्पष्ट सांगा, 'साक्षी रहा. आम्ही मुस्लिम आहोत'.

अबु सुफियान म्हणतात, जेव्हा हिरकल ने आपली ने गोष्ट पुर्ण केली व प्रेषित नामा वाचून पुर्ण केला तेव्हा त्याच्या दरबारात गोंधळ व गोंगाट माजला व आम्हा लोकांना बाहेर काढले गेले. बाहेर आल्यानंतर मी आपल्या सहकाऱ्यांना म्हणालो की इब्ने अबी कब्शा (अर्थात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)) यांचा मामला तर वाढतच जात आहे. येथपावेतो की आता रोम सम्राट देखील त्याला घाबरू लागला आहे. या घटने नंतर मला विश्वास झाला की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना लवकरच वर्चस्व प्राप्त होइल येथपावेतो की अल्लाह ने मला इस्लाम ग्रहण करण्याची सुबुद्धि प्रदान केली. (बुखारी)





# स्पष्टीकरण

हाच तो पंरावा जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सत्शीलता व सदाचाराविषयी रोम सम्राट दरबारात एका अशा व्यक्तिने सादर केला जो इस्लामचा कट्टर वैरी व क़ुरैशी कबिल्याचा सरदार होता. त्याने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची सत्यता व चरित्र्य व स्वभावातील निर्मळता इ. गोष्टीना सर्वांसमक्ष मान्य केले. तो एखाद्या आक्षेपाइ गोष्टीकडे निर्देश करू शकला नाही. सोने ते जे आगीत राहूनहि काळवंडत नाही उलट अधिक निखरते. अबू सुफ़ियान त्यावेळी इस्लामते शत्रु होते. मात्र नंतर म्हणजे मक्का विजयाच्या प्रसंगी त्यांनी इस्लाम क़बूल केला.

रोम सम्राट हिरकल खिश्चन होता म्हणून बायबल ची भविष्यवाणी व ईश्वरी आदेशांनुसार एका नव्या प्रेषित आगमनाची प्रतिक्षा होती जेव्हा त्याला हे माहित झाले की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) प्रेषितत्वाचा दावा करीत आहेत, तेव्हा त्यास ही जिज्ञासा झाली की प्रेषितांच्या अंगी जी लक्षणे व गुण वैशिष्टये असतात ती मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या अंगी आहेत किंवा नाहीत, जेव्हा त्याला हे समाधान झाले की प्रेषितत्वाची लक्षणे व गुणवैशिष्टये मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या अंगी दिसून येतात तेव्हा मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे प्रेषितत्व मान्य करणयात त्याला किंचितहि दुष्करता जाणवली नाही तथापि हे मान्य करुनहि तो मुसलमान झाला नाही कारण राज्य शासन व सत्ताधिकाराची गरज बाधक बनली होती.

अशा प्रकारे कित्येक लोकंना सत्याचे साक्षात्कार घडतो. परंतु कोणत्या ना कोणत्या रितीने ऐहिकहित संबंधास्तव, आणि आपल्या वडिलोपार्जित धर्माचा त्याग केल्याने 'संकटांना तोड द्यावे लागेल या विचाराने इस्लाम ग्रहण करण्या करीता तयार होत नाहीत. परिणामत: ईश्वराचे मार्गदर्शन व मरणेत्तर जीवनाची यशास्विता, या गोष्टीना ते वंचित होतात.

इस्लाम सर्वश्रेष्ठ अल्लाहने अवतरीत केलेला धर्म आहे. व संपुर्ण मानव जातीच्या मार्गदर्शनाकरिता अवतरला आहे. आणि म्हणूनच त्याचे आमंत्रण राजा पासून रंकापर्यत सर्वांना आहे. यास्तव प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी हिजरी सन ६ (इ.स.६२८) मध्ये कैसर व किसरा आणि इतर बादशहांना आमंत्रण पत्रें पाठविली होती हिरकल हा रोमचा बादशाह होता (तत्कालीन रोम सम्राटांचा कैसर हा खिताब होता) जो त्यावेळी अेल्यामध्यें होता. शाम (सिरिया) देश देखील त्याच्या आधिपत्याखाली होता आणि शामची राजधानी बुसरा होती. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा शुभसंदेश त्यांचे अनुयायी देह्‌या कल्बीने बुसराच्या शासक नेऊन पोहचविला आणि त्याने कैसर कडे पाठविला होता. त्याचवेळी अबु सुफ़ियान व्यापार निमित्ताने एका काफल्यासह सिरीया देशात गेले होते तेव्हा कैसरने त्यांना आपल्या दरबारी बोलाविले व त्यांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) बाबत पृच्छा केली ज्याचे विवरणात्मक वर्णन अबुसुफ़ियान यांनी इस्लाम स्वीकारल्या नंतर केले.

# حديث

**عَنْ عَائِشَةَ أُمِّ الْمُؤْمِنِيْنَ اَنَّهَا قَالَتْ ............ فَرَجَعَ بِهَا رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَرْجُفُ فُؤَادُهُ فَدَخَلَ عَلٰى خَدِيْجَةَ فَقَالَ زَمِّلُوْنِيْ زَمِّلُوْنِيْ فَزَمَّلُوْهُ حَتّٰى ذَهَبَ عَنْهُ الرَّوْعُ فَقَالَ لِخَدِيْجَةَ وَاَخْبَرَهَا الْخَبَرَ لَقَدْ خَشِيْتُ عَلٰى نَفْسِيْ فَقَالَتْ خَدِيْجَةُ كَلَّا وَاللّٰهِ لَا يُخْزِيْكَ اللّٰهُ اَبَداً اِنَّكَ لَتَصِلُ الرَّحِمَ وَتَحْمِلُ الْكَلَّ وَتَكْسِبُ الْمَعْدُوْمَ وَتَقْرِى الضَّيْفَ وَتُعِيْنُ عَلٰى نَوَائِبِ الْحَقِّ ۔**

(البخاری بدء الوحی)

# प्रशंसनीय गुण—प्रेषितत्वा पूर्वी

## हदीस

**मोमीनांची माता हज़रत आयशा (रज़ी.) फार्मावितात की,..... नंतर प्रेषित (स.)हिरा नामक गुहेकडून) घरी परतले. त्यांचा थरकाप होत होता. हज़रत खदीजा जवळ त्यांनी शुभागमन केले व फ़र्माविले की मजवर पांघरुन घाल. तेव्हा त्यांच्यावर पांघरुण घातले गेले व जेव्हा भिती नाहीशी झाली तेव्हा त्यांनी खदीजास सारा वृत्तांत ऐकविला व फर्माविले. मला आपल्या जीवाचा धोका वाटत आहे. खदीजाने म्हटले, मुळीच नव्हे अल्लाह शपथ, अल्लाह आपणास कदापी अपमानित करणार नाही. आपण स्नेह संबंध जोडता. इतरांचा भार वाहता दीन दुबळयाच्या कामी येता, पाहूणचार करता आणि सत्यमार्गाच्या संकटामध्ये मदत करतात.** (बुख़ारी बदउल वही)

## स्पष्टीकरण

प्रेषित (स.) यांच्यावर जेव्हा ''वही'' अवतरती तेव्हा फ़िरिश्तयास पाहण्याचा हा पहीलाच प्रसंग होता म्हणून प्रेषित स्वभाविकपणे भयभीत झाले व घरी पोहचून हज़रत खदीजास सर्व वृत्तांत ऐकविला. हज़रत खदीजा त्यांच्या कृपाळू नितिमत्तेविषयी चांगल्या प्रकारे जाणून होती म्हणून त्यांनी आपला हा विचार प्रकट केला की एक अत्युच्च पुण्यशील व महान व्यक्तिमत्वावर सैतानाचा प्रभाव पडू शकत नाही, तेव्हा अल्लाह कडून चांगली गोष्ट अवतरित झाली असावी. प्रेषित (स.) यांचे चारित्र्य व नितिमत्ता या विषयी हज़रत खदीजा चे हे कथन ह्या गोष्टी पुरावा होय की प्रेषितत्वापूर्वीहि त्यांचे जीवन अत्यंत पवित्र जीवन राहिले आहे. व ते चारित्र्याच्या अत्युच्च स्थानी विराजमान होते.





# حديث

**عَنْ اَنَسٍ بْنِ مَالِكٍ قَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَحْسَنَ النَّاسِ خُلُقاً.**

(مسلم کتاب الفضائل)

# उच्चतम चारित्र्य

## हदीस

**''हज़रत अनस बिन मालीक फ़र्मावितात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम चारित्र्याच्या दृष्टीने जनसामान्यत: सर्वाधिक श्रेष्ठ होते.''**

(मुस्लिम किताबुल फ़ज़ाईल)

## स्पष्टीकरण

पैगंबराचे व्यक्तिमत्व, चारित्र्य व आचारण दृष्टीने अत्यंत महान असते आणि हे त्याच्या सत्यतेचे स्पष्ट प्रमाण असते. म्हणूनच त्याला ओळखण्यात कसलीच अडचण राहत नाही. प्रेषित मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या श्रेष्ठ आदर्श चारित्र्या विषयी बोलावयाचे झाल्यास पवित्र क़ुरआनने स्वत: ही साक्ष दीली आहे की ।

**اِنَّکَ لَعَلٰی خُلُقٍ عَظِیْمٍ** (القلم:۴)

''हे पैगंबर, नि:संशय तुम्ही चारित्र्याच्या अत्यूच्च पदावर आहात''(अल्-कलम-४)

तसेच हदीसच्या ग्रंथ मध्ये प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या उच्च नितीमतेचा व प्रशंसनीय गुणवैशिष्टयांचा उल्लेख या विवरणासह आला आहे की इतिहासात यासारखे दुसरे उदाहरण उपलब्ध नाही. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या पवित्र आचरणाचे जोकोणी दोषविरहित बुद्धिने अध्ययन करील तो हे मान्य केल्याखेरीज राहू शकत नाही की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) चारित्र्याच्या ज्या अत्युच्च पदावर विराजमान होते, संपूर्ण विश्व त्या सारखे उदाहरण सादर करण्यास असमर्थ आहे.

## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَنْ دَخَلَ دَارَ اَبِیْ سُفْيَانَ فَهُوَ آمِنٌ وَمَنْ اَلْقَى السَّلَاحَ فَهُوَ آمِنٌ وَمَنْ اَغْلَقَ بَابَهُ فَهُوَ آمِنٌ۔**

**( مسلم كتاب الجهاد)**

# शत्रूंशी सद्व्यवहार

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फ़रर्मावितात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी (मक्का विजयाच्या प्रसंगी) फ़र्मविले , जो माणूस अबु सुफ़ियान च्या घरात प्रवेश करील त्याला संरक्षण लाभेल. जो शस्त्र टाकील त्याला देखील संरक्षण लाभेल आणि जो आपले द्वारा बंद करील त्यालाही संरक्षण लाभेल.**

(मुस्लिम किताबुल जिहाद)

## स्पष्टीकरण

ही घोषणा प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी मक्का विजयाचा प्रसंगी दिली होती. अबु सुफ़ियान प्रेषितांचा कट्टर वैरी कुरेश कबिल्याचा सरदार व काफ़ीर सैन्याचे आधिपत्य बाळगणारा होता. उहदच्या युद्धा प्रसंगी तो प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या प्राणामागे लागला होता. परंतु जेव्हा प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यानी मक्केवर विजय प्राप्त केला तेव्हा त्याचे डोळे उघडले व तो इस्लाम ग्रहण करुन सन्मानित झाला प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी त्यास केवळ माफ़ केले नाही किंबाहुना त्याला हा सन्मानहि प्रदान केला की त्याच्या घरात जो कोणी प्रवेश करील त्याच्याकारिता संरक्षण आहे. तसेच मक्केत आणखी काही प्रेषित-शत्रु होते ज्यांनी प्रेषितांशी युद्ध केले. परंतु प्रेषित (स.) नी सार्वजनिक माफ़ीची घोषणा करीत फ़र्माविले.

**لَا تَثْرِيْبَ عَلَيْكُمُ الْيَوْمَ اِذْهَبُوا اَنْتُمُ الطُّلَقَاءُ۔**

''आज तुमच्यावर कोणताही आक्षेप नाही, जा, तुम्ही सर्व स्वतंत्र आहात.''





## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ : كُنْتُ اَدْعُوْ اُمِّیْ اِلَى الاِسْلَامِ وَهِيَ مُشْرِكَةٌ ، فَدَعَوْتُهَا يَوْمًا فَاَسْمَعَتْنِيْ فِیْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ : مَا اَكْرَهُ . فَاَتَيْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ وَاَنَا اَبْكِيْ. قُلْتُ : يَا رَسُوْلَ اللّٰهِ ! اِنِّيْ كُنْتُ اَدْعُوْ اُمِّی اِلَى الْاِسْلَامِ فَتَابَى عَلَيَّ . فَدَعَوْتُهَا الْيَوْمَ فَاَسْمَعَتْنِیْ فِيْکَ مَا اَكْرَهُ. فَادْعُ اللّٰهَ اَنْ يَهْدِیَ اُمَّ اَبِیْ هُرَيْرَةَ . فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ ( اَللّٰهُمَّ ! اِهْدِ اُمَّ اَبِیْ هُرَيْرَةَ). فَخَرَجْتُ مُسْتَبْشِرًا بِدَعْوَةِ نَبِيِّ اللّٰهِ ﷺ . فَلَمَّا جِئْتُ فَصِرْتُ اِلَى الْبَابِ. فَاِذَا هُوَ مُجَافٌ. فَسَمِعَتْ اُمِّیْ خَشْفَ قَدَمَيَّ ۔۔ فَقَالَتْ: مَكَانَکَ ! يَا اَبَا هُرَيْرَةَ ! وَ سَمِعْتُ خَضْخَضَةَ الْمَاءِ. قَالَ فَاغْتَسَلَتْ وَلَبِسَتْ دِرْعَهَا وَعَجِلَتْ عَنْ خِمَارِهَا. فَتَحَتِ الْبَابَ. ثُمَّ قَالَتْ: يَا اَبَا هُرَيْرَةَ : اَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَ اَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ. قَالَ فَرَجَعْتُ اِلَى رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ فَاَتَيْتُهُ وَاَنَا اَبْكِیْ مِنَ الْفَرَحِ . قَالَ قُلْتُ : يَا رَسُوْلَ اللّٰهِ ! اَبْشِرْ قَدِ اسْتَجَابَ اللّٰهُ دَعْوَتَکَ وَ هَدَى اُمَّ اَبِیْ هُرَيْرَةَ. فَحَمِدَ اللّٰهَ وَاَثْنَى عَلَيْهِ وَقَالَ خَيْرًا .**

**( مسلم كتابُ فضائل الصحابة)**

# वाईट–पणाचे प्रत्त्युत्तर भलेपणाने

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ि.)फ़र्मावितात की माझी आई अनेकश्वरवादी होती आणि मी तिला इस्लामचे आमंत्रण देत राही. एके दिवशी जेव्हा मी तिच्यासमोर इस्लाम स्वीकृतिचा प्रस्ताव मांडला तेव्हा तिने माला प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) विषयी अशा गोष्टी ऐकविल्या ज्या ऐकून घेणे मला असहय झाले. मी प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत रडत रडत हजर झालो व म्हणालो, हे अल्लाहचे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) मी आपल्या मातेला इस्लामच्या दिशेने बोलावितो तर ती नकार दर्शविते. आज मी तिच्यासमोर इस्लाम स्वीकारण्याचे आवाहान मांडले तेव्हा तिने आपणासंबंधी अशा गोष्टी ऐकविल्या ज्या मी एकू इच्छित नव्हतो आपण अल्लाहशी प्रार्थना करा की त्याने (अल्लाहने) अबु हुरैराच्या मातेला मार्गदर्शन करावे. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी प्रार्थना केली, हे अल्लाह अबु हुरैराच्या मातेला सन्मार्ग प्रदान कर, प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या या प्रार्थनेने आनंदित होऊन मी**

**निघालो आणि घरी जाऊन पोहचले पाहतो तर दार बंद. माझ्या आईने माझ्या पावलाची चाहूल ऐकून म्हटली, ''अबु हुरैरा थांबा''! नंतर मी पाणी सांडण्याचा आवाज ऐकला. तिने स्नान आटोपून कुर्ता (अंगरखा) परिधान केला व घाइन ओढणी सुद्धा घेतली नाही, दरवाजा उघंडला व उत्स्फ़ूर्ततेने म्हणाली,''अबु हुरैरा,**

(اَشْهَدُ اَنْ لَّااِلٰهَ اِلَّااللّٰهُ وَ اَشْهَدُاَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهٗ وَرَسُوْلُهٗ)

**''अश् हदु अल् लाइलाहा इल्लल्लाहु व अशहदु अन्ना मुहम्मदन अब्दुहु व रसुलुहु'' (अर्थात मी साक्ष देते की अल्लाह खेरीज कोणीही उपासनीय नाही आणि मी साक्ष देते की मुहम्मद त्याचे दास व प्रेषित आहेत) हे ऐकून मी प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत अशा स्थितीत हजर झालो की डाळयातून आनंदातिरेकाने अश्रू वाहत होते. मी प्रेषिताना म्हणालो हे अल्लाह चे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आनंद विभोर व्हा कारण अल्लाह ने आपली प्रार्थना क़बूल केली आणि अबु हुरैराच्या मातेस मार्गदर्शन केले.प्रेषितांनी हे ऐकून अल्लाहशी कृतज्ञता व्यक्त केली. अल्लाहची स्तुति केली व मुखाने शुभ वचने काढली.**

(मुस्लिम)

## स्पष्टीकरण

या घटनेचा सर्वाधिक उज्वल पैलू म्हणजे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे हे चारित्र्य होय की एक स्त्री त्यांच्या प्रतिष्ठेला कलंकित करते तरी देखील प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) मनाला लावून न घेता तिच्या सन्मार्ग प्राप्ती साठी प्रार्थना करतात चारित्र्याची हीच ती महानता जिने लोकांना त्यांचे आसक्त बनविले होते. आणि आज देखील त्या घटना वाचून सत्यशील जिव्हा त्यांच्यावर दरूद व सलाम पाठवतात .

''सलाम उस पर के जिस ने गालियां सुनकर दुआयें दी.''

(सलाम त्यावर की ज्याने दुर्वचने श्रवुनि, त्यांचे शुभहित वाछिले:)

नादान लोक असे समजतात की इस्लाम तलवारीच्या बळावर पसराला वस्तुत: इस्लामच्या प्रसाराचे रहस्य प्रेषितांचा आदर्शव उदात्त स्वभाव आणि सत्याचे निमंत्रण यात दडलेले आहे.

घटनाचे दुसरा पैलू प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या प्रार्थने ची स्वीकृति होय. बघता बघता एक अनेकेश्वरवादी स्त्री मोमीन स्त्री झाली. तीसरा पैलू हा की एक पुत्र आपल्या मातेसमोर इस्लाम स्वीकारण्याचा प्रस्ताव मांडतो व तिला सन्मार्ग लाभावा म्हाणुन बेचैन राहतो अणि चौथा पैलू हा आहे की आवाहकाला जेव्हा आपल्या आवाहनात यश लाभते तेव्हा तयांच्या नेत्रातून आनंदाश्रु वाहु लागतात. आणि तो अल्लाहशी कृतज्ञशील होतो.





# حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ (رض) قَالَ بَعَثَ النَّبِیُّ ﷺ خَيْلاً قِبَلَ نَجْدٍ فَجَاءَ تْ بِرَجُلٍ مِنْ بَنِیْ حَنِيْفَةَ يُقَالُ لَهٗ ثُمَامَةُ بْنُ اُثَالٍ،فَرَبَطُوْهُ بِسَارِيَةٍ مِّنْ سَوَارِیْ الْمَسْجِدِ فَخَرَجَ اِلَيْهِ النَّبِیُّ ﷺ فَقَالَ مَا عِنْدَکَ يَاثُمَامَةُ ؟ فَقَالَ عِنْدِیْ خَيْرٌ يَا مُحَمَّدُ اِنْ تَقْتُلْنِیْ تَقْتُلْ ذَادَمٍ ، وَاِنْ تُنْعِمْ تُنْعِمْ عَلٰی شَاکِرٍ وَاِنْ کُنْتَ تُرِيْدُ الْمَالَ فَسَلْ مِنْهُ مَا شِئْتَ فَتَرَکَ حَتّٰی کَانَ الْغَدُ ثُمَّ قَالَ لَهٗ مَا عِنْدَکَ يَا ثُمَامَةُ؟ قَالَ مَا قُلْتُ لَکَ اِنْ تُنْعِمْ تُنْعِمْ عَلٰی شَاکِرٍ۔ فَتَرَکَهٗ حَتّٰی کَانَ بَعْدَ الْغَدِ فَقَالَ مَا عِنْدَکَ يَا ثُمَامَةُ؟ فَقَالَ عِنْدِی مَا قُلْتُ لَکَ فَقَالَ اَطْلِقُوْا ثُمَامَةَ فَانْطَلَقَ اِلٰی نَخْلٍ قَرِيْبٍ مِّنَ الْمَسْجِدِ، فَاغْتَسَلَ ثُمَّ دَخَلَ الْمَسْجِدَ فَقَالَ اَشْهَدُاَنْ لَّااِلٰهَ اِلَّااللّٰهُ وَاَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا رَّسُوْلُ اللّٰهِ۔ وَاللّٰهِ مَاکَانَ عَلَی الْاَرْضِ وَجْهٌ اَبْغَضَ اِلَیَّ مِنْ وَجْهِکَ فَقَدْ اَصْبَحَ وَجْهُکَ اَحَبَّ الْوُجُوْهِ اِلَیَّ، وَاللّٰهِ مَا کَانَ مِنْ دِيْنٍ اَبْغَضُ اِلَیَّ مِنْ دِيْنِکَ فَاَصْبَحَ دِيْنُکَ اَحَبَّ الدِّيْنِ اِلَیَّ، وَاللّٰهِ مَاکَانَ مِنْ بَلَدٍ اَبْغَضُ اِلَیَّ مِنْ بَلَدِکَ فَاَصْبَحَ بَلَدُکَ اَحَبَّ الْبِلَادِ اِلَیَّ۔ (البخاری کتاب المغازی)

## बंदीजनाशी वर्तणूक

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी) फ़र्मावितातः प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी घोडेस्वांराचे एक सैन्य 'नज्द कडे पाठविले. ह्या स्वारानी बनी हनीफ़ा च्या सुमामा बिन उसाल या व्यक्तिस पकडून आणले व त्यास मसजिदीच्या एका खांबाला बांधले, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी त्याच्याजवळ शुभागमन केले व विचारले सुमामा ! तुम्हाला काय अपेक्षित आहे? तो म्हाणला, माझी अपेक्षा चांगली आहे. हे मुहम्मद ! जर आपण मला ठार कराल तर एका ठार करणाऱ्यास पात्र असलेल्यास ठार कराल आणि जर उपकार कराल तर कृतज्ञशील वर उपकार आणि जर फीदिया ची रक्कम इच्छित असाल चर वाटेल तेवढी मागू शकता. परंतु प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी त्याला त्याच स्थितीत सोडून दिले. दुसऱ्या दिवशी पुन्हा शुभागमन केले. विचारले,सुमामा! तुम्ही कशी अपेक्षा बाळगता?तो म्हणाला तिच अपेक्षा जी मी सादर केली आहे**

**की जर आपण उपकार कराल तर एक कृतज्ञशील वर उपकार कराल. प्रेषितांनी त्या दिवशीहि त्याला त्याच अवस्थेत सोडले.**

**तिसऱ्य दिवशी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी पुन्हा शुभागमन केले व विचारले, सुमामा ! तुम्ही कशी अपेक्षा बाळगता? तो म्हणाला तिच अपेक्षा, जी मी सादर करुन चुकलो. हे उत्तर एकून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी त्यास मुक्त करण्याचा आदेश दिला सुमाम (स्वतंत्र होताच) मस्जिदी जवळ एका खजुर वृक्षाजवळ गेला आणि (त्याच्या आडोशाने) आंघोळ केली. स्नान आटोपल्यानंतर तो मस्जिदीत आला आणि कलिमह् (पवित्र वचन) पढला.**

**(اَشْهَدُ اَنْ لَّا اِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَ اَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا رَّسُوْلُ اللّٰه)**

**''मी साक्ष देतो की अल्लाह शिवाय कोणीहि उपास्या नाही आणि मी साक्ष देतो की मुहम्मद अल्लाहचे प्रेषित आहेत'' आणि निवेदन केले, हे मुहम्मद ! अल्लाह शपथ माझ्या नजरेत पृथ्वीतलावर तुमच्या चेहऱ्यापेक्षा अधिक तिरस्करणीय असा कोणताही चेहरा नव्हता परंतु आता माझ्या दृष्टीत आपला चेहरा सर्वधिक प्रिय आहे. अल्लाह शपथ, माझ्या नजरेत कोणताही धर्म तुमच्या धर्मापेक्षा अधिक तिरस्करणीय नव्हता, परंतु आता आपला धर्म मला सर्वाधिक प्रिय आहे. अल्लाह शपथ, तुमच्या शहराहून अधिक नावडते असे कोणतेही शहर नव्हते परंतु आज आपले शहर मला सर्व शहरांपेक्षा अधिक आवडते आहे.**

(बुखारी, किताबुल मग़ाज़ी)

## स्पष्टीकरण

बनी हनीफ़ा एक शक्तिशाली कबीला होता. हा क़बीला यमन जवळ यमामा मध्ये राहत होता. सुमामा या क़बिल्याचा सरदार होता. जेव्हा तो बंदिस्त होऊन मदीना आला तेव्हा त्या वातावरणात त्याला इस्लाम ची उपासना पद्धति व इस्लामी समाजास पाहण्याचा व समजून घेण्याचा अवसर लाभता आणि प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या उत्कृष्ट वागणूकीने तो इतका प्रभावित झाला की. मुक्त होताच त्याने आपण मुसलमान झाल्याचे घोषित केले. आता त्याचा दृष्टीकोन बदलला होता व त्याच्यात एक नवी वैचारिक क्रान्ति आली होती जे व्यक्तित्व त्याच्या नजरेत सर्वाधिक तिरस्करंणीय होते तेच आता त्याच्या नजरेत सर्वाधिक प्रिय झाले होते. आणि ज्या धर्मविषयी त्याने एक पक्षपाती ग्रह क़ायम केला होता आता तोच धर्म त्याल आवडता धर्म बनला.

सुमामा ला त्या वर्तणूकीमुळे ईमान ची देणगी लाभली. आणि वस्तुस्थिती ही आहे की जीवनातील ठोकर अंतर्मानवाला जगविण्यास प्रेरक ठरतात. मात्र या अटीवर की त्याचा विवेक अगदीच मृत झालेला नसावा.





## حديث

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ ضَافَهُ ضَيْفٌ كَافِرٌ فَاَمَرَ لَهُ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ بِشَاةٍ فَحُلِبَتْ فَشَرِبَ ثُمَّ اُخْرَى فَشَرِبَهُ ثُمَّ اُخْرَى فَشَرِبَهُ ثُمَّ اُخْرَى حَتّٰى شَرِبَ حِلَابَ سَبْعِ شِيَاةٍ ثُمَّ اَصْبَحَ مِنَ الْغَدِ فَاَسْلَمَ فَاَمَرَ لَهُ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ بِشَاةٍ فَحُلِبَتْ فَشَرِبَ حِلَابَهَا ثُمَّ اَمَرَ لَهُ بِاُخْرَى فَلَمْ يَسْتَتِمَّهَا فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اَلْمُؤْمِنُ يَشْرَبُ فِى مِعًى وَاحِدٍ وَالْكَافِرُ يَشْرَبُ فِىْ سَبْعَةِ اَمْعَاءٍ .

( ترمذى -- ابوابُ الاطعمة)

# सत्यविरोधक व अनेकेश्वरद्यांशी व्यवहार

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी) फर्मावितात एका रात्री एक काफ़ीर (सत्याचा इन्कार करणारा) अतिथी, प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्याकडे आला. प्रेषितांनी शेळीच्यां दुधाने त्याचे पाहूणचार करण्यास फर्माविले यास्तव एका शेळीचे दूध काढले गेले व त्याच्या सेवेत सादर केले गेले तेहि तो प्याला, मग दुसऱ्या शेळीचे दूध सादर केले गेले तेहि तो प्याला, नंतर तिसऱ्या शेळीचे दूध सादर केले गेले तेहि तो प्याला. अशा प्रकारे तो सात शेळीचे दूध प्याला. प्रातः काळ होताच त्याने इस्लाम ग्रहण केला. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी त्याच्या सेवेत (पुनश्च) शेळीचे दूध सादर करण्यास फर्माविले यास्तव दूध काढले गेले व त्याच्या सेवेत सादर केले गेले ते तो प्याला प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)नी फर्माविले की दुसऱ्या शेळीचे दूध द्या पण ते तो पूर्णतः प्याला नाही (हे पाहुन) प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी फर्माविले, मोमीन (ईमान धारक) एक आंतडी पितो काफीर (सत्याचा इन्कार करणारा) सात आंतडी पितो.** (तिरमिज़ी अबुवाबुल अतअिमह)

## स्पष्टीकरण

असा होता प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा आपल्या काफ़ीर अतिथिंशी व्यवहार आणि ह्या व्यवहाराने त्याला इतके प्रभावित केले की तो मुसलमान झाला. काफीर वयक्ति चे सात आतडयात पिणे यांचा अर्थ तो आपल्या ऐहिक सुखाभिलाषी वृत्तीमुळे खाण्यापिण्याबाबत अधाशी असतो. याउलट मोमीन (अल्लाहचा एकनिष्ठ दास) आपल्या मोमीन वृत्तीमुळे खाण्यापिण्याबाबत संयमप्रिय असतो.

२८

# حديث

**عَنْ اَسْمَاءِ اِبْنَةِ اَبِی بَکرٍ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُمَا قَالَتْ اَ تَتْنِی اُمِّی رَاغِبَةً فِی عَهْدِ النَّبِیِّ ﷺ ، فَسَالَتُ النَّبِیَّ ﷺ أَ اَصِلُهَا ؟ قَالَ نَعَمْ، قَالَ بْنُ عُيَيْنَةَ فَاَنْزَلَ اللّٰهُ تَعَالیٰ فِيْهَا: لَا يَنْهَا كُمُ اللّٰهُ عَنِ الَّذِيْنَ لَمْ يُقَاتِلُوْكُمْ فِی الدِّيْنِ .** (بخاری کتاب الادب)

# हदीस

**हज़रत अस्मा बिन्ते अबु बकर (रज़ी.) फ़र्मावितात कि प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या काळात माझी आई (जी अनेकेश्वरवादी होती) सद्व्यवहाराच्या अभिलाषेने मजजवल (मदीना) आली. मी प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना विचारले, मी आपल्या माताशी सद्व्यवहार करू काय?प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, हो तिच्याशी चांगली वागणूक कर.**

**रावी (निवेदनकार) इब्ने उयैना म्हणतात की सर्व श्रेष्ठ अल्लाह ने या संदर्भात**

**لا ينها كم الله عن الذين لم يقاتلوكم فی الدين**

**''ला यनहाकुमुल्लाहु अनिल्लज्जीन लम युकातिलुकुम फीद्दीन. ही आयत उतरविली.**

(बुख़ारी किताबुल अदब)

# स्पष्टीकरण

हज़रत असमा (रज़ी) ना आपल्या आईशा सद्व्यावहार करण्यात एवढयासाठीच संकोच होत होता की ती अनेकेश्वरवादी होती. परंतु प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी त्याना तशी अनुज्ञा दिली.अन्य उल्लेखातील विवरणानुसार ही घटना हुदैबिया तहाच्या काळात घडली.

निवेदनकाराने हदीस मध्ये अनेकेश्वरवाद्यांशी सद्व्यवहार करण्याच्या समर्थनार्थ सुरह मुम्तहिनाची जी आयत सादर केली आहे तिचा अर्थ असा ''अल्लाह तुम्हाला त्या लोकांशी सद्व्यवहार करण्यास व न्याय करण्यास प्रतिबंध घालीत नाही ज्यांनी धर्मसंबंधात तुमच्याशी युद्ध केले नाही कि तुम्हाला घरातून बाहेर घालविले नाही. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो.''

यावरून हे स्पष्ट होते की इस्लाम सर्व सामान्य अनेकेशवर वाद्यांशी माणुसकीचे व सत्यशीलतेचे वर्तन करण्यावर प्रतिबंध घालत नाही, यास्तव अशा आदेशांना जे लढण्यास तयार असलेल्या अनेकेश्वरवादी जाती समुहांच्या संदर्भात दिले गेले आहेत ते सर्वसामान्य अनेकेश्वरवादी किंवा मुस्लिमेतरांवर लादणे उचित नाही.



२९

# حديث

**عَنْ اَنَسِ بْنِ مَالِكٍ قَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَعُوْدُ الْمَرِيْضَ وَيَشْهَدُ الْجَنَازَةَ وَ يَرْكَبُ الْحِمَارَ وَيُجِيْبُ دَعْوَةَ اَلْعَبْدِ .** (شمائل الترمذی)

# सर्व सामान्य माणसा सारखे राहणीमान

# हदीस

**हज़रत अनस बिन मालीक फ़र्मावितात की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आजारी इसमाची विचारपूस करीत, जनाज़ा (मुसलमानाच्या प्रेतासाठीच्या प्रार्थने) मध्य सामील होत, गाढवावर स्वार होत व गुलामाची आमत्रंण स्वीकारीत.** (शमाईल तिर्मिज़ी)

# स्पष्टीकरण

अर्थात जगातील अत्युच्च व्यक्तिमत्व असतनाही प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) एक सामान्य माणसा प्रमाणे होते. गर्व आणि (व्यर्थ) संकोचादि दुर्गुणांपासून अगदी पवित्र होते. म्हणून ते आजऱ्याची विचारपूस करण्यासाठी स्वत: जात व आपल्या बांधवांच्या प्रेत यात्रेतहि सहभागी होत. त्याकाळी गाढव हे सर्व सामान्य वाहन होते म्हणून अगदी नि:संकोचपणे प्रेषित या वाहनाचा उपयोग करीत कधीही एखाद्या गुलामाचे निमंत्रण स्वीकारण्यात ते टाळाटाळ करीत नसत.

# حديث

**عَنْ اَنَسٍ قَالَ لَمْ يَكُنْ شَخَصٌ اَحَبَّ اِلَيْهِمْ مِنْ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ قَالَ وَ كَانُوْا اِذَا رَاَوْهُ لَمْ يَقُوْمُوْا لِمَا يَعْلَمُوْنَ مِنْ كَرَاهِيَّتِهِ لِذَٰلِكَ .** (شمائل الترمذی)

# हदीस

**हज़रत अनस फ़र्मावितात की सहानुयायींच्या जवळ प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) हून अधिक प्रिय कोणीहि नव्हता तरी देखील त्यांना पाहताच ते उठून उभे राहत नसत कारण त्यांना हे माहित होते की ही पद्धत प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) ना नापसंत आहे.** (शमाईल तिर्मिज़ी)

# स्पष्टीकरण

प्रेषित (स.) यांचा आदरा प्रित्यर्थ त्यांच्या सान्निध्यात असलेले अनुयायी उठून उभे राहात नसत कारण ही पद्धत त्यांना पसंत नव्हती. हा त्यांच्या महानतेचा पुरावा होय अन्यथा तुच्छ मनुष्य ही इच्छा बाळगतो की लोकांनी त्यांच्या आदरा प्रित्यर्थ उठून उभे रहावे ह्याचे दर्शन आम्हाले आपल्या वातावरणात घडते.

حديث

عَنْ اَبِیْ سَعِيد الخُدرِیْ قال: کَانَ النَّبِیُّ ﷺ اَشَدَّ حَیَاءً مِنَ الْعَذْرَاءِ فِیْ خِدْرِهَا. (بخاری کتاب احادیث الانبیاء)

## लज्जा संकोच स्वरुप

### हदीस

**अबू सईद खुदरी फ़र्मावितात की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) पडद्यात राहणाऱ्या अविवाहित मुली पेक्षा अधिक लज्जाशील होते. (बुखारी किताब अहादीसुल अंबिया)**

### स्पष्टीकरण

लज्जा संकोच हे उच्च नैतिक मुल्य आहे. ज्या माणसात हा गुण असेल त्याला दुष्कृत्याबद्दल संकोच वाटू लागतो. वा तो पाहणेहि पसंत करीत नाही.

म्हणून हे गुण त्याच्या मान प्रेतिष्ठाचा संरक्षक बनतो. आणि स्त्रीयांमध्ये तर हा गुण शोभादायक बनतो. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या अंगी हा गुण अत्यधिक प्रमाणात होता जणू ते साक्षात लज्जाच होते. यास्तव जेव्हा एखादी गोष्ट त्यांना अप्रिय होत असे तेव्हा त्याचा परिणाम तत्क्षणीच चेहऱ्यांवरून व्यक्त होइ आणि एखाद्या समोर किंवा सभात अशी गोष्ट करीत नसत जी अप्रिय वाटावी. सत्शीलतेचे व संकोच वृत्तीचे हे उदाहरण किती उतकृष्ट आहे !

حديث

عَنْ اَنَسٍ قَالَ خَدَمْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ عَشْرَ سِنِیْنَ فَمَا قَالَ لِیْ اُفٍّ قَطُّ وَمَا قَالَ لِشَیْءٍ صَنَعْتُهُ لِمَ صَنَعْتَهُ ؟ وَلَا لِشَیْءٍ تَرَکْتُهُ لِمَ تَرَکْتَهُ. (ترمذی ابواب الصلۃ)

## चारित्र्याची विशालता

### हदीस

**हज़रत अनस (रज़ी.) फ़र्मावितात की मी दहा वर्षे प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची सेवा केली. त्यांनी मला कधी ''हू'' सुद्धा केले नाही व एखाद्या कामाबाबत 'हे का केले?' असे फ़र्माविले नाही व एखादे काम न केल्यास 'हे कां नाही केलेस' असेहि फ़र्माविले नाही.** (तिर्मिज़ी अब्वाबुस- सिलह)

### स्पष्टीकरण

प्रेषित (स.) यांच्या विशाल चारित्र्याची ही साक्ष होय. आणि ती देखील अशा व्यक्तिची जिने त्यांच्या सेवेत दहा वर्षे काढली यावरून हे अनुमान निघते की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आपल्या व्यक्तिगत व्यवहारातहि अत्यंत गंभीर व आनंदी वृत्तीचे होते आणि भूल चुकी बद्दल जाब विचारीत नसत.





حديث

عَنْ جَابِرٍ قَالَ مَا سُئِلَ النَّبِیُّ ﷺ عَنْ شَیْءٍ قَطُّ فَقَالَ لَا. (بخاری کتاب الادب)

## मनाचा मोठेपणा

### हदीस

**हज़रत जाबीर फर्मावितात की, पैग़ंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांच्या कडे एखादी वस्तु मागितली गेली असावी व त्यांनी देण्यास नकार दिला असेल असे कधीही घडले नाही.**

(बुख़ारी किताबुल अदब)

### स्पष्टीकरण

यावरून प्रेषिताच्या मनाचा मोठेपण, दानशुरता आणि नैतिक उच्चतेचे अनुमान होते. ज्या व्यक्तिच्या मुखातून कधी एखाद्या वस्तूची याचना झाल्यावर ''नाही'' हा शब्द निघाता नाही ती असामान्य चारित्र्याची स्वामी असू शकते.

حديث

عَنْ اَبی هريرة قال قال رسول الله : لَوْ کَانَ لِیْ مِثْلُ اُحُدٍ ذَهَباً مَا یَسُرُّنِیْ أن لَا یَمُرَّ عَلَیَّ ثَلَاثٌ وَ عِنْدِی مِنْهُ شَیْءٌ اِلَّاشَیْءٌ أَرْصِدُهُ لِدَیْنٍ ۔ (بخاری کتاب الاقراض)

### हदीस

**अबु हुरैरा फ़र्मावितात की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फ़र्माविले की जर मजजवळ उहद (पहाडा) इतके सोने असेल तरी मी हे पसंत करणार नाही की तीन रात्री अशा स्थितीत व्यतीत व्हाव्यात की मजजवळ कर्ज़ फेडीसाठी जे राखून ठेवले आहे त्या व्यतिरिक्त काही शिल्लक रहावे.**

## حديث

عَنْ ابْنِ عَبَّاسٍ (رض) قَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَجْوَدَ النَّاسِ وَكَانَ اَجْوَدُ مَا يَكُوْنُ فِیْ رَمَضَانَ حِيْنَ يَلْقَاهُ جِبْرِيْلُ وَكَانَ يَلْقَاهُ فِیْ كُلِّ لَيْلَةٍ مِنْ رَمَضَانَ فَيُدَارِسُهُ الْقُرْآنَ فَلَرَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَجْوَدُ بِالْخَيْرِ مِنَ الرِّيْحِ الْمُرْسَلَةِ.(بخاری بدءالوحی)

# व्यय आणि विशाल हृदयता

## हदीस

**हज़रत इब्ने अब्बास (रज़ी) फर्मावितात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) सर्वाधिक उदार होते अणि आपली उदारता रमज़ान महिन्यात आणखी जास्त असे, त्यावेळी जिब्रील (अलै.)रमज़ानचा प्रत्येक रात्री त्यांची भेट घेत व पवित्र क़ुरआनाचे एकत्र मिळून पठण करीत. या दिवसात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची दान शूरता सोसाटयाच्या वाऱ्याहूनहि अधिक वेगवान होई.(बुख़ारी)**

## स्पष्टीकरण

उदारता व दानशुरता तर प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या व्यक्तिमत्वातच सामील होती. परंतु रमज़ान महिन्यात हा गुण कमलीच्या पातळीस पोहचत असे कारण या महिन्यात प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) दर रोज़ रात्री जिबरील या फ़िरिश्त्यासह पवित्र क़ुरआनाचे फेरवाचन करीत. जणू कृपा व साहयादि भावनांचा उद्रेक होणे व पुण्य आणि भलाईच्या कामात व्यस्त होणे क़ुरआन पठणाचा सरळ परिणाम व लाभ आहे.

## حديث

عَنْ عَائِشَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهَا اَنَّهُمْ ذَبَحُوْا شَاةً فَقَالَ النَّبِیُّ ﷺ مَابَقِيَ مِنْهَا؟ قَالَتْ مَا بَقِيَ مِنْهَا اِلَّا كَتِفُهَا، قَالَ بَقِيَ كُلُّهَا غَيْرُ كَتِفِهَا۔ (ترمذی)

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी) द्वारे उल्लिखित आहे की लोकांनी एक बकरी कापली. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी विचारले 'काय शिल्लक राहीले ?मी म्हणालो' 'हाता' खेरीज काहीच शिल्लक राहीले नाहीं. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी फ़र्माविले, हाता खेरीज इतर काही शिल्लक राहीले (तिर्मिज़ी)**





## स्पष्टीकरण

बकरी कापल्यानंतर तिचे मांस दान केले गेले व फ़क्त हाताचे मांस शिल्लक राहीले होते या प्रसंग प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी त्या वस्तुस्थितीकडे सकेंत केला की जो माल अल्लाह साठी दान केला जाईल तो बाकी राहणार आहे कारण आख़िरतच्या बँकेत तो सर्व जमा होतो अणि क़ियामातीच्या दिवशी याचा पूरेपूर मोबदला दान–कर्त्यास मिळेल, परंतु माणसाने जे काही येथे खाऊन पिऊन संपविले ते खचितच संपले म्हणून जे लोक जगात संपत्ति एकत्र करतात ते खऱ्या अर्थाने जमा करीत नाहीत किंबहूना गमवितात याउलट जे लोक अल्लाहच्या मार्गात खर्च करतात ते (आपले धन) घालवून बसत नाहीत किंबहुना आगामी जगात (आख़िरत मध्ये) आपल्या करिता संग्रह करतात.

## حديث

عَنْ اَبِی هُرَيْـــرَةَ (رض) اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ : مَا نَقَصَتْ صَدَقَةٌ مِنْ مَالٍ ، وَمَا زَادَ اللّٰهُ عَبْدًا بِعَفْوٍ اِلَّا عِزًّا وَمَا تَوَاضَعَ اَحَدٌ لِلّٰهِ اِلَّا رَفَعَهُ اللّٰهُ عَزَّ وَجَلَّ ۔ (مسلم)

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी) द्वारे उल्लिखित आहे की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) नी फ़र्माविले दान माल मत्तेस घटवित नाही आणि जो दास क्षमा शीलतेने काम घेतो सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याच्या मानप्रतिष्ठेत वृद्धि करतो आणि जो अल्लाहकरिता नम्रता पत्करतो, सर्वश्रेष्ठ अल्लाह, त्याला उच्चता प्रदान करतो.**

## حديث

عَنِ الْمُغِيْرَةِ بْنِ شُعْبَةَ اَنَّ النَّبِیَّ ﷺ صَلّٰی حَتّٰی اِنْتَفَخَتْ قَدَمَاهُ فَقِيْلَ لَهُ اَتَكَلَّفُ هٰذَا وَقَدْ غَفَرَ اللّٰهُ لَکَ مَا تَقَدَّمَ مِنْ ذَنْبِکَ وَمَا تَأَخَّرَ فَقَالَ اَفَلَا اَكُوْنَ عَبْداً شَكُوْرًا ۔ (مسلم کتاب صفۃ القیامۃ)

# अत्याधिक उपासना

## हदीस

**हज़रत मुग़ीरा बिन शोअबा फ़र्मावितात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम (फार मोठया प्रमाणात) नमाज़ पढत असत, येथपावेतो की त्यांच्या पायाना सूज आली. कोणी म्हणाले आपण इतके कष्ट झेलता वास्तविक आपले मागचे पुढचे सर्व अपराध माफ़ केले गेले आहेत. फ़र्माविले काय मी कृतज्ञ दास न व्हावे?** (मुस्लिम किताब सिफ़्तुल कियामत)

## स्पष्टीकरण

या हदीसद्वारे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या शुभ स्वभावाचा हा पैलू समोर येतो की त्यांना उपासनेची अत्याधिक आवड होती. येथपावतो की नवाफील (गौन उपासने) च्या अधिकतेमूळे त्यांच्या पायांना सूज येई. रात्रीचा बराच वेळ उपासनेत घाळविणे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा नित्यक्रम होता. आणि या रात्रीच्या जागण्यामागे व रात्रभर उपासनेत बसण्यामागे जी भावना कार्यरत होती ती दासयत्व व कृतज्ञशीलतेची होती. ही भावना माणसात जेवढी जास्त असेल तितक्या जास्त प्रमाणात तो अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करू शकेल.





## حديث

عَنْ اَبِیْ عَبْدِاللّٰهِ الْجَدْلِیْ قَالَ سَأَلْتُ عَائِشَةَ عَنْ خُلُقِ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ فَقَالَتْ لَمْ يَكُنْ فَاحِشاً وَلَا مُتَفَحِّشاً وَلَا صَخَّاباً فِیْ الْاَسْوَاقِ وَلَا يَجزِی بِالسَّيِّئَةِ اَلسَّيِّئَةَ وَلٰكِنْ يَعْفُوْ وَيَصْفَحُ ۔ (ترمذی ابواب الصلۃ)

# अपशब्द बोलण्या बाबत संयम

## हदीस

**अबु अब्दुल्लाह जदली फ़र्मावितात की मी हज़रत आयशा (रज़ी.) ना प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या चारित्र्या विषयी विचारले तेव्हा त्यांनी फ़र्माविले प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) अपशब्द बोलणारे नव्हते व अश्लिल बोलणारे नव्हते. बाजारात ते आरडा ओरड करीत नसत व कधीही त्यांनी दुष्कृत्याचे उत्तर दुष्कृत्यांने दिले नाही किंबहुना ते क्षमा करीत व क्षमा शीलतेने काम घेत.** (तिर्मिज़ी अबवाबुस-सिला)

## स्पष्टीकरण

शिवीगाळ व दुर्वाच्यता चारित्र्य आणि सभ्यतेच्या विरुद्ध आहे निर्लज्जतेच्या गोष्टी जिभेवर आणल्याने वातावरणावर दुष्परिणाम होतो. यापासुन संयम पाळणे आवश्यक आहे. प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) तर लज्जाशीलतेचे साक्षात स्वरूप होते ! म्हणून त्यांच्या शुभ जिव्हावर पवित्र्यशील गोष्टी असत आणि बाजारातहि ते गांभीर्य व प्रेतिष्ठेची कांस बाळगत.

## حديث

عَنْ اَنَسٍ قَالَ لَمْ يَكُنِ النَّبِیُّ ﷺ سَبَّابًا وَلَا فَحَّاشاً وَلَا لَعَّاناً كَانَ يَقُوْلُ عِنْدَ الْمَعْتَبَةِ مَالَهُ تَرِبَ جَبِيْنُهُ ۔ (بخاری کتاب الادب)

## हदीस

**हज़रत अनस (रज़ी.) फ़र्मावितात की प्रेषित (स.)यांची जिव्हा शिवीगाळ, दुर्वाच्यता व शिव्या शापा पासून पवित्र होती. एखाद्यावर क्रोधित होत तेव्हा फक्त एवेढच म्हणत, याला झाले तरी काय, याचे कपाळ मातीत भरो.**

(बुखारी किताबुल अदब)

## حديث

عَنْ جَابِرِبْنِ عَبْدِاللّٰهِ اَنَّهُ غَزَا مَعَ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ قِبَلَ نَجْدٍ فَلَمَّا قَفَلَ رَسُوْلُ ﷺ قَفَلَ مَعَهُ فَاَدْرَكَتْهُمُ الْقَائِلَةُ فِىْ وَادٍ كَثِيْرِ الْعُضَاةِ فَنَزَلَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ وَتَفَرَّقَ النَّاسُ فِىْ الْعِضَاةِ يَتَظَلَّلُوْنَ بِالشَّجَرِ ، وَنَزَلَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ تَحْتَ سَمُرَةٍ فَعَلَّقَ بِهَا سَيْفَهُ فَنِمْنَا نَوْمَةً ثُمَّ اِذَا رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَدْعُوْنَا فَجِئْنَاهُ. فَاِذَا عِنْدَهُ اَعْرَابِىٌّ جَالِسٌ فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِنَّ هٰذَا اخْتَرَطَ سَيْفِىْ وَاَنَا نَائِمٌ فَاسْتَيْقَظْتُ وَهُوَ فِىْ يَدِهٖ صَلْتاً. فَقَالَ لِىْ مَنْ يَّمْنَعُكَ مِنِّىْ. قُلْتُ : اَللّٰهُ فَهَا هُوَ ذَا جَالِسٌ ثُمَّ لَمْ يُعَاقِبْهُ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ . (بخاری کتاب المغازی)

## ईश्वरावर विश्वास

### हदीस

**हज़रत जाबीर बिन अब्दुल्लाह द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (स.)यांनी धर्मयुद्ध–संबंधात नज्द कडे एक प्रवास केला.ज्यात ते देखील सहभागी होते. हज़रत जाबीर असे वर्णन करतात की जेव्हा पैगंबर (स.)परत रवाना झाले तेव्हा मी देखिल त्यांच्यासह प्रवासात होतो. प्रवासात वामकुक्षीच्या गरजेने एका दरीत जिथे झाऊची असंख्या झाडे होती, उतरले, सहवासात असलेले इतर अनुयायी झाडीमध्ये इतस्ततः वृक्षाच्या सावलीत चालत गेले.प्रेषित (स.)देखील एका केकर-वृक्षाखाली आराम घेऊ लागले.पैगंबर (स.)यांनी आपली तलवार झाडाला टांगून ठेवली होती, आम्ही सर्व थोडा वेळ पर्यंत झोपी गेली.अचानक पैगंबर (स.)यांचा आवाज ऐकू आला ते आम्हाला बोलावित होते. जेव्हा आम्ही त्यांच्या सेवेत हजर झालो व पाहतो तर त्यांच्याजवळ एक ग्रामीण बसला आहे. पैगंबर (स.)यांनी फर्माविले, मी झोपेत होतो तेवढयात या इसमाने माझी तलवार खेचून घेतली, तत्क्षणी मी जागा झालो व पाहतो तर यांच्या हातात तलवार म्यान विरहित आहे व म्हणत आहे की तुम्हाला माझ्यापासून कोण वाचवील? मी म्हणालो,''अल्लाह !''(हे ऐकताच त्याच्या हातून तलवार खाली पडली आणि मी ती उचलली) तर पहा हा (तोच माणूस आहे जो) समोर बसला आहे. यानंतर प्रेषित (स.)नी त्याचा बदला घेतला नाही.** (बुख़ारी किताबुल मग़ाज़ी)

### स्पष्टीकरण

दृढविश्वास व अटळ धैयांचे केवढे उच्च उदाहरण आहे! त्या धोकादायक स्थितीतहि पैगंबर (स.) चिंतित झाले नाहीत किंबहुना अगदी स्वस्थपणे उत्तर दिले की मला केवळ 'अल्लाह' वाचवील आणि खरोखर सर्वश्रेष्ठ अल्लाह ने त्यांना वाचविले, या प्रसंगी पैगंबर (स.) यांच्या आदर्श चारित्र्याचा आणखी एक पैलू प्रकाशित झाला व तो हा की पैगंबर (स.) यांनी आपल्या प्राणांच्या वैरीवर नियंत्रण प्राप्त केल्यानंतर त्याचा सुड घेतला नाही. निःसंशय नितिमत्तेची हीच ती उच्चता जिने चारित्र्याशील लोकांना निर्माण केले.





## حديث

عَنْ مَالِكِ بْنِ دِيْنَارٍ: مَا شَبِعَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ مِنْ خُبْزٍ قَطُّ وَلَا لَحْمٍ اِلَّا عَلٰى ضَفَفٍ.(شمائل الترمذی)

## पैगंबर (स.) यांचे साधे जीवन

### हदीस

**हज़रत मालिक बिन दीनार फर्मावितात की पैगंबर (स.) यांनी भाखरी किंवा मांस अगदी पोट भरून खाल्ले नाही याखेरीजकी ते लोकांसह भोजन घेत असावेत.** (शमाईल तिरमीज़ी)

## حديث

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ قَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَبِيْتُ اللَّيَالِىَ الْمُتَتَابِعَةَ طَاوِيًا هُوَ وَاَهْلُهُ لَا يَجِدُوْنَ عَشَاءً وَكَانَ اَكْثَرُ خُبْزِهِمْ خُبْزَ الشَّعِيْرِ . (شمائل الترمذی)

### हदीस

**हज़रत इब्ने अब्बास (रज़ी.) फर्मावितात कि पैगंबर (स.) सतत अनेक रात्री भूकेल्या अवस्थेत व्यतीत. पैगंबर (स.) यांच्या कुटुंबियांना रात्री जेवण लाभत नसे वस्तुतः जी भाकरी ते खात ती सामान्यतः जवाची भाकरी राहत असे. (शमाईल तिरमीज़ी)**

## حديث

عَنْ اَبِىْ مُوْسىٰ الْاَشْعَرِى قَالَ: اَخْرَجَتْ لَنَا عَائِشَةُ (رض) كِسَاءً وَّ اِزَارًا غَلِيْظًا. قَالَتْ قُبِضَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ فِىْ هٰذَيْنِ . ( بخاری)

### हदीस

**हज़रत अबु मूसा अशअरी (रज़ी.) फ़र्मावितात की हज़रत आयशा (रज़ी.) यांनी आम्हाला एक चादर व एक जाडी भरडी लुंगी काढून दाखविली व फर्माविले, पैगंबर (स.) यांनी या दोन कापडात जीवन यात्रा संपविली.**

**(बुख़ारी)**

**حديث**

**عَنۡ عَائِشَةَ (رض) قَالَتۡ اِنَّمَا كَانَ فِرَاشُ رَسُوۡلِ اللّٰهِ ﷺ الَّذِىۡ يَنَامُ عَلَيۡهِ مِنۡ اَدَمٍ حَشۡوُهٗ لِيۡفٌ.**

(شمائل الترمذی، بخاری)

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी) फर्मावितात की पैगंबर (स.) यांचा बिछाना जो ते झोपण्याकरीता वापरीत तो चामडयाचा असे. ज्यात खजुराचे तात भरलेले असत. (शमाईल तिर्मिज़ी, बुखारी)**

## स्पष्टीकरण

ही आहे त्या महान व्यक्तिच्या साध्या जीवनाची एक झळक, जिने बादशाहीतहि फ़कीरा सारखे जीवन व्यतीत केले. खाणे पिणे, पोषाख, राहणीमान तात्पर्य प्रेत्येक व्यवहारात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) साधेपणा व नि: संकोचता पसंत करीत. अणि जे काही उपलब्ध होई त्यावरच समाधन मानीत. आणि अशा स्थितीतही उदारतेने वागत. यास्तव त्यांनी स्वत: साठी धनसम्पत्तिचा कधीहि संचय केला नाही. जेवणात साधारण वस्तु उदा. जव (बार्ली) ची भाकरी व खजूरी असत. कधी तर ह्या वस्तु देखील उपलब्ध नसत. आणि रात्री उपाशी पोटीच झोपी जात पोषाख अगदी साधारण असे आणि तत्कालीन रीती रिवाजनुसार एक लुंगी व एक चादर त्याचप्रमाणे त्यांचा बिछाना देखील खसूरीच्या तातनीचा बनलेला होता. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी जगाचा निरोप घेतांना आपल्या मागे कसल्याही प्रकारचा माल सोडला नाही किंबहुना त्यांचे एक चिलखत एका यहुदीजवळ गहाण ठेवले होते. साधेपणा नि:संकोच वृत्ती, अल्पसंतोषी वृत्ती व निस्पृहतेचा हा किती उतकृष्ट नमुना आहे! तसेच मरणोत्तर जीवनास इहलोकीय जीवनावर प्राधान्य देण्याचे किती चांगले उदाहरण आहे.

**حديث**

**عَنۡ عَائِشَةَ قَالَتۡ لَقَدۡ مَاتَ رَسُوۡلُ اللّٰهِ ﷺ وَمَا شَبِعَ مِنۡ خُبۡزٍ وَزَيۡتٍ فِىۡ يَوۡمٍ وَاحِدٍ مَرَّتَيۡنِ.**

(مسلم کتابُ الزہد)

## अल्पाहार व साध्या खाद्यावर पर्याप्तता

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी) फ़र्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी अशा स्थितीत जगाचा निरोप घेतला कि त्यांनी कधी दिवसभरात दोन वेळा तृप्त होऊन पोटभर भाकरी व भाजी खाल्ली नाही.**

**(मुस्लिम किताबुज-जुहद)**





**حديث**

**عَـنۡ عَـائِشَـةَ قَـالَـتۡ اِنَّـا كُـنَّا آلَ مُـحَـمَّـدٍ ﷺ لَـنَـمۡـكُـثُ شَهَـرًا مَا نَسۡتَوۡقِدُ بِنَارٍ. اِنۡ هُوَ اِلَّا التَّمۡرُ وَالۡمَاءُ.**

( مسلم كتابُ الزهد)

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी.) फर्मावितात की आम्ही मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांचे कुटुंबिया एकेक महिना या अवस्थेत काढत की आग प्रज्वलीत केली जात नसे. आमचा उदारनिर्वाह केवळ खजुर व पाण्यावर होत असे.** (मुस्लिम किताबुज-जुहद)

**حديث**

**عَـنۡ اَبِـىۡ هُـرَيۡرَةَ قَالَ مَا عَابَ النَّبِىُّ ﷺ طَعَامًا قَطُّ اِنِ اشۡـتَـهَاهُ اَكَـلَـهٗ وَاِلَّا تَرَكَهٗ.**

( البخارى كتاب احاديث الانبياء )

## जेवणात दोष न काढणे

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) जेवणात कधीहि दोष काढीत नसत. पसंत असल्यास खात व पीत अन्यथा सोडून देत.** (बुखारी, किताबु अहादीसिल अंबिया)

## स्पष्टीकरण

जेवणात दोष काढल्याने ईश्वरीय देणग्यांचा अवमान होतो. आणि घरच्या माणसांनाहि ते असह्य होते. म्हणून जर एखादी वस्तु मनासारखी नसेल तर तिचे दोष न दाखवता तिला तसेच सोडून देणे भोजनाच्या शिष्टाचारा पैकी आहे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी परिपूर्णतः इस्लामी जीवन व्यतीत करण्याच्या पद्धतिची शिकवण दिली आहे. येथपावेतो की त्यांनी खाण्यपिण्या. चे निति-नियमहि शिकविले आहेत.

### حديث

**عَنْ عَبدِ اللّٰه بن مَسْعُوْدٍ قَالَ نَامَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ عَلَى حَصِيْرٍ فقامَ وَقَدْ اَثَّرَ فِیْ جَنْبِهِ، فَقُلْنَا يَا رَسُوْلَ اللّٰهِ لَوِ اتَّخَذْنَا لَکَ وِطَاءً ، فَقَالَ مَالِي وَلِلدُّنْيَا ، مَا اَنَا فِیْ الدُّنْيَا اِلَّا کَرَاکِبٍ اسْتَظَلَّ تَحْتَ شَجَرَةٍ ، ثُمَّ رَاحَ وَ تَرَكَهَا.** ( ترمذی ابواب الزهد)

# सुख–विलासा बाबत विरक्ति

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद फर्माविताात की (एकदा) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) चटाईवर झोपी गेले होते. जेव्हा उठले तेव्हा त्यांच्या अंगावर व्रण उमटले होते. हे पाहुन आम्ही विनंति केली, हे अल्लाहचे प्रेषित, आम्ही आपणाकरिता मऊ बिछाना उपलब्ध करुन दिल्यास काय हरकत आहे? फर्माविले, मला जगाशी काहीहि कर्तव्य नाही जगाशी माझा संबंध तेवढाच आहे ज्याप्रमाणे एखादा स्वार (प्रवासी) एखाद्या झाडाच्या सावलीत (थोडा वेळ) थांबावा व नंतर त्याला सोडून चालता व्हावा.**

(तिरमिज़ी अबवाबुज-जुहद)

## स्पष्टीकरण

माणूस जेव्हा सुखाभिलाषी बनतो तेव्हा ऐहिकता त्यांच्या मानगुटीवर बसते. मग तो आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्या बाबत कर्तव्य निष्ठतेचा पुरावा दण्याऐवजी सहज सोपी वृत्ती पत्करतो. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) स्वभावत: कष्ट सहन करणारे होते. व त्यांचे जीवन कष्टमय जीवन होते. राहणीमाना बाबत जे काही उपलब्ध होत असे त्यावरच समाधान मानत. आणि कसल्याही प्रकारचा संकोच ते पसंत करीत नसत. जगात वास्तव्य करण्याचे जे उदाहरण त्यांनी सांगितले आहे ती एक उघड वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती जर माणसाच्या चांगल्या प्रकारे लक्षात आली तर तो ऐहिक सुखविलासामागे धावण्या ऐवजी अल्पसंतोषी व कर्तव्य–निष्ठ होईल.





### حديث

**عَنِ الْاَسْوَدِ قَالَ سَاَ لْتُ عَائِشَةَ مَاكَانَ النَّبِیُّ ﷺ يَصْنَعُ فِیْ اَهْلِهِ ؟ قَالَتْ كَانَ فِیْ مِهْنَةِ اَهْلِهِ فَاِذَا حَضَرَتِ الصَّلٰوةُ قَامَ اِلَى الصَّلٰوةِ .** (بخاری کتاب الادب)

# कुटुंबियांची सेवा

## हदीस

**असवद कथन करतात की मी हज़रत आयशा (रज़ी.)यांना विचारले, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) घरात काय करीत असत? त्यांनी फर्माविले, पैग़ंबर कुटुंबियांच्या सेवेत लागून रहात. आणि जेव्हा नमाज़ ची वेळ होत असे तेव्हा नमाज़ करीता उठून उभे रहात.**

(बुख़ारी किताबुल् अदब)

## स्पष्टीकरण

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्यापेक्षा उच्चस्थान कोणाचे असू शकते? परंतु एवढया उच्च पदाचा माणूस आपल्या कुटुंबियांची सेवा करण्यात त्यांना कसलाच भीड संकोच वाटत नव्हता. वस्तुथिती ही आहे की ''सेवा'' माणसाचा दर्जा घटवत नसते किंबहुना अधिक उंच करते. यात अशाव लोकांना लाज वाटते ज्यांच्या अंतर्यामी आपल्या मोठे पणाची भावना असते. नरम स्वभावाचा माणूस आपल्यासह असलेल्यांची सेवा करून त्यांचे मन आकर्षित करतो.

आपल्या कुटुंबियांच्या सेवा–संदर्भात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची आचरण–निति एक उत्कृष्ट आदर्श आहे. या संदर्भात विचार करण्या जोगा गोष्टीही आहे की घरातील व्यस्तता नमाज़ला बाधक ठरू नये किंबहुना नमाज़ची वेळ होताच माणसाने नमाज़करीता तत्काळ उठून उभे रहावे कारण ईशवरोपासना प्रत्येक प्रकारच्या मानव–सेवेहुन उच्चतम व श्रेष्ठ आहे.

## حديث

عَنْ عَبْدِ اللهِ ابْنِ مَسْعُوْدٍ قَالَ قَالَ لِی رَسُوْلُ اللهِ ﷺ اِقْرَأْ عَلَیَّ فَقُلْتُ يَا رَسُوْلَ اللهِ اَقْرَأُ عَلَيْکَ وَ عَلَيْکَ اُنْزِلَ قَالَ اِنِّیْ اُحِبُّ اَنْ اَسْمَعَهُ مِنْ غَيْرِیْ فَقَرَأْتُ سُوْرَةَ النِّسَاءِ حَتّٰی بَلَغْتُ وَجِئْنَابِکَ عَلٰی هٰؤُلَاءِ شَهِيْدًا قَالَ فَرَاَيْتُ عَيْنَي النَّبِیِّ ﷺ تَهْمِلَانِ . ( شمائل الترمذی )

## ईश्वरासमोर साक्ष देण्याची जाणीव

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद फर्मावितात कि मला पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम )यांनी असे फर्माविले, मला क़ुर्आन ऐकवा' मी विनविले, हे अल्लाहचे प्रेषित मी आपणास क़ुर्आन ऐकवू वस्तुत: क़ुर्आन आपणावर अवतरित झाले आहे ! फर्माविले, मला इतरांकडून क़ुर्आन ऐकणे पसंत आहे पैगंबरांचे हे म्हणणे ऐकुन मी सूरह निसा ऐकाविण्यास सुरवात केली आणि जेव्हा.**

وَجِئْنَابِکَ عَلٰی هٰؤُلَاءِ شَهِيْدًا

**आणि हे पैगंबर, आम्ही तुम्हाला तया लोकांवर ''साक्ष'' बनवून उभे करू या आयतीवर पोहचलो तेव्हा चाहतो तर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांच्या डोळयातून अश्रू वाहत होते .**(शमाईल तिर्मिज़ी)

## स्पष्टीकरण

''ज्यावेळी हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद (रज़ी.) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना क़ुर्आन ऐकवित असताना (निसा-४०) या आयतीवर पोहचले तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) अत्याधिक परिणामाने सजल नयन झाले कारण ही आयत एक अर्थाने पैगंबरांकरिता सन्मान कारक आहे तर दुसऱ्या अर्थाने ती त्यांच्यावर एक महान जाबाबदारी सुद्धा टाकते. कियामती दिवशी सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात प्रत्येक पैगंबरला ही साक्ष द्यावी लागेल का त्याने अल्लाहचा धर्म काहीही कमी अधिक न करता लोकांपर्यंत पोहचविला होता ज्यांच्याकडे त्यांस ''पैगंबर'' म्हणून पाठविले गेले होते. आणि हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना देखील साक्ष द्यावी लागेल. क़ुर्आन असे स्पष्टीकरण करतो की पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना जगातील समस्त जाती-समूहांकरिता पाठविले गेले आहे. आणि ते अंतिम-प्रेषित होत. म्हणून त्यांच्या प्रेषित्वाचा कालावधी क़ियामती पर्यंतचा आहे.''

(दअवतुल क़ुर्आन-पृ.२८२)





## حديث

عَنْ عَائِشَةَ قَالَتْ تُوُفِّیَ النَّبِیُّ ﷺ وَدِرْعُهُ مَرْهُوْنَةٌ عِنْدَ يَهُوْدِیٍّ بِثَلَاثِيْنَ يَعْنِیْ صَاعًا مِنْ شَعِيْرٍ ۔ (بخاری کتاب المغازی)

## पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी कोणत्या स्थितीत जगाचा निरोप घेतले

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी.) फ़र्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे अशा स्थितीत निधन झाले की त्यांचे चिलखत एका यहुदी जवळ तीस साअ (एक माप) जवा करिता गहाण ठेवलेले होती.**

(बुखारी किताबुल मग़ाज़ी)

## حديث

عَنْ عَائِشَةَ قَالَتْ تُوُفِّیَ رَسُوْلُ اللهِ ﷺ وَمَا فِیْ رَفِّیْ مِنْ شَیْءٍ يَأْكُلُهُ ذُوْكَبِدٍ اِلَّا شَطْرُ شَعِيْرٍ فِیْ رَفٍّ لِیْ فَأَكَلْتُ مِنْهُ حَتّٰی طَالَ عَلَیَّ فَكِلْتُهُ فَفَنِیَ. ( مسلم کتاب الزهد)

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे अशा स्थितीत निधन झाले की माझ्या कपाटात अशी एकही वस्तु नव्हती जिला एखादा सजीव प्राणी खाऊ शकला असता, अगदी थोडया जवा खेरीज जे माझ्या कपाटात ठेवले होते. मी त्यातून बऱ्याच दिवसापर्यंत खात राहिले येथेपावेतो की ते मी (एके दिवशी) माप मोजले. त्यानंतर ते संपले.**(मुस्लिम किताबुज-जुहद)

## स्पष्टीकरण

पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांचे ज्यावेळी निधन झाले संपुर्ण अरब देश त्यांच्या अधिपत्याखाली होता आणि त्यांचा सहवास लाभलेले अनुयायी त्यांच्यावर सर्व काही अर्पण करण्याकरिता सज्ज होते. परंतु त्यांची अल्पसंतोषी वृत्ती, निश्चिंतता व उदारतेचे एवढे विशाल स्वरूप होते कि ते स्वत: साठी काहीहि राखून ठेवत नसत येथपावेतो की जेव्हा त्यांनी या जगाचा निरोप घेतला तेव्हा घरात थोडयाशा जव (बाली) खेरीज काहीच नव्हते, व त्यांचे चिलखत हि गहाण ठेवलेले होते. हज़रत आयशा (रज़ी.) चे कथन आहे की, पैगंबरांच्या निधनानंतर या जवामध्ये जे अगदी अल्प प्रमाणात होते इतकी बरकत झाली की ते बऱ्याच दिवसा पर्यंत चालले.

حديث

عَنْ عَائِشَةَ قَالَتْ فَكَانَتْ آخِرُ كَلِمَةٍ تَكَلَّمَ بِهَا
اَللّٰهُمَّ الرَّفِيْقَ الْاَ عْلیٰ . (بخاری کتاب المغازی)

# पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची अंतिन वचने

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी) फ़र्मावितात की, अंतिम वचने जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या मुखद्वारे निघालीत ती ही होती : ''अल्लाह तु सर्वश्रेष्ठ मित्रा आहेस'' बुखारीच्या दुसऱ्या कथनात हे शब्द आहेत.**

(बुख़ारी किताबुल् मग़ाज़ी)

فِی الرفیق الاعلی

**'' सर्वात श्रेष्ट मित्र जवळ''**

## स्पष्टीकरण

हे ते शब्द जे जगाचा निरोप घेतांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या शुभ जिवहाद्वारे अदा झालेत. यावरून अनुमान निघते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आपल्या ईशवराशी भेटण्या करिता किती तळमळत होते. केवळ अल्लाह सर्वात श्रेष्ठ मित्र आहे व त्याच्याजवळ पोहचण्याची इच्छाच खऱ्या अर्थाने माणसाचा अंतिम उद्देश्य होय.





# (२) चारित्र्य उभारणी

## حديث

**عَنُ عَبُدُ اللّٰهُ بُنِ عمرٍ و قَالَ قَالَ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ اِنَّ مِنُ خِيَارِ كُمُ اَحَا سِنَكُمُ اَخُلَاقًا.** (مسلم كتاب الفضائل)

# इस्लाम मध्ये चारित्र्याचे स्थान

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन अमर असे म्हणतात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी असे फ़र्मावीले, ''तुमच्या सर्वाधिक चांगले लोक ते आहेत ज्यांचे चरित्र सर्वाधिक चांगले आहे.''**

(मुस्लिम–किताबुल् फ़ज़ाइल)

## स्पष्टीकरण

इस्लामने चारित्र्याला जे स्थान प्रदान केले आहे. त्याची कल्पना करण्याकरिता ही एक हदीस पुरेशी आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, माणसाचा खराखुरा दर्जा त्याच्या चारित्र्या वरुनच निर्धारीत होते व माणसांना पारखण्यासाठी ''चारित्र्य'' हीच खरी कसोटी होय.

भौतिक वादाच्या या काळात नैतिक अध: पतन सीमेला जाऊन पोहचले आहे. म्हणून चारित्र्याची कदर जाणणारे क्वाचितच मिळतील परंतु दुर्लभ असले तरी सोने शेवटी सोनेच आहे.

## حديث

**عَنُ اَبِى هُرَيُرَةَ قَالَ قَالَ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ : اَ كُمَلُ الْمُؤْمِنِيُنَ اِيُمَانًا اَحُسَنُهُمُ خُلُقًا.** (ابوداؤد كتابُ السنة)

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्मावीले, ईमान –धारकांमध्ये परिपूर्ण ईमान बाळगणारे ते लोक आहेत जे चारित्र्यात अधिक चांगले आहेत. (अबुदाऊद किताबुस-सुन्नह)**

## स्पष्टीकरण

यावरून हे स्पष्ट झाले की ईमान व चारित्र्याच्या दरम्यान गाढ नाते आहे. ज्याचे ईमान पूर्ण असेल त्याचे चारित्र्यहि अपरिहार्यत: चांगले असेल. अर्थात चारित्र्य तो मापदंड आहे ज्या वरुन ईमानाचा दर्जा निर्धारित होतो.





## حديث

**عَنُ اَبِى هُرَيُرَةَ قَالَ سُئِلَ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ عَنُ اَكُثَرِ مَا يُدُخِلُ النَّاسَ الُجَنَّةَ ؟ قَالَ تَقُوَى اللّٰهِ وَحُسُنَ الُخُلُقِ. وَسُئِلَ عَنُ اَكُثَرِ مَايُدُخِلُ النَّاسَ النَّارَ؟ قَالَ الُفَمُ وَالُفَرُجُ.** (ترمذى ابواب الصلة)

# ईश भय आणि सदाचार

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम )यांना एकाने विचारले, अधिकतर कोणती गोष्ट लोकांना जन्नतचा हक्कदार बनवते? फ़र्मावीले, अल्लाहचे भय आणि सदाचार, प्रश्नकर्त्याने विचारले आणि अधिकतर कोणत्या गोष्टी लोकांना जहन्नमचा हक्कदार बनवितात? फर्मावीले, तोंड आणि लज्जास्थान.**

(तिरमिज़ी अबवाबुस सिलह)

## स्पष्टीकरण

या हदीसमध्ये जन्नत आणि जहन्नमचा, हक़्क़दार बनविणाऱ्या गोष्टीना सर्वांगपुर्ण शैलीत वर्णिले गेले आहे. अल्लाह चे भय (तकवा) माणसाला केवळ दुराचारा पासूनच वाचवित नाही तर मंगल गोष्टीचा मार्ग पत्करण्यास प्रवृत्त करते आणि सदाचारण, अल्लाहच्या दासांचे हक्क अदा करण्यास व त्यांच्यावाशी चांगली वागणुक करण्यास प्रोत्साहित करते. यास्तव ज्या माणसाच्या अंगी हे दोन्ही गुण असतील तो जन्नती लोकांसारखे काम करील व या आधारे जन्नतचा हक्कदार ठरेल. तव्दतच जहन्नमचा हकदार असा माणूस बनतो जो जहन्नमी लोकंसारखी कामे करतो आणि जहन्नमी लोकांसारखी कामे करण्यास प्रवृत करणाऱ्या गोष्टी तोंड आणि लज्जास्थान आहेत. जर माणसाने या दोघांवर नियंत्रण ठेवले नाही तर तोंडाने माणूस वाईट गोष्टी बाहेर काढतो व हरामचे घास गिळून आपले पोट सुद्धा भरतो त्याचप्रमाणे लज्जास्थाना बाबत जर माणसाने संयम पाळला नाही तर स्वाद आसक्ति त्याला हीन दर्जाची निर्मिती बनवते यास्तव जो माणूस आपले तोड व लज्जा स्थान यावर नियंत्रण करु इच्छितो त्याने तकवा आणि सदाचार हे दोन गुण अपल्या अंगी निर्माण करावेत.

## حديث

**عَنْ اَبِی هُرَيْـرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اِنَّ اللّٰهَ لَا يَنْظُرُ اِلٰی صُوَرِكُمْ وَ اَمْوَالِكُمْ وَلَكِنْ يَنْظُرُ اِلٰی قُلُوْبِكُمْ وَ اَعْمَالِكُمْ .** (مسلم كتاب البر)

# माणसाचे चांगले आणि वाईट असण्याचे स्तर

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) यांनी असे फर्माविले, अल्लाह तुमच्या चेहऱ्यांना व तुमच्या मालमत्तेला पहात नाही, किंबहुना तुमच्या हृदयांना व तुमच्या आचरणास पाहतो.**

(मुस्लिम किताबुल बिर)

## स्पष्टीकरण

याचा अर्थ असा कि एखाद्याचे चांगले आणि वाईट असण्याचे स्तर त्याचा चेहरा मोहरा व त्याची मालमत्ता नसते किंबहुना त्याच्या मनाची कैफियत व आचरण स्थिती असते. एखाद्याचे आपल्या गौर वर्णावर किंवा धनसंपदेवर अभिमान करणे व्यर्थ आहे ते तर त्यांच्या आचरणात आहे, आणि त्याचे खरे स्थान त्याच्या साम्पत्तिक स्थिती वरुन नव्हे तर त्याच्या आचरण स्थिती वरुन निर्धारीत होते.

सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ कदर करण्यायोग्य तोच ठरेल जे अंत:करणाची शुद्धता व आचरणाची सुंदरता हे दोन सद्‌गुण आपल्या अंगी बाळगत असेल ज्या व्यक्तिने हे सद्‌गुण आपल्या अंगी निर्माण केले नसतील तर मग तो कितीही सुंदर व कितीही धनवान का असेना अल्लाहजवळ किंचितही क़दर करण्यास पात्र ठरणार नाही.





## حديث

**عَنْ عَبْدُ اللّٰهِ ابْنِ مَسْعُوْدٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : عَلَيْكُمْ بِالصِّدقِ فَاِنَّ الصِّدْقَ يَهْدِیْ اِلٰی الْبِرِّ وَ اِنَّ الْبِرَّيَهْدِیْ اِلٰی الْجَنَّةِ وَمَا يَزَالُ الرُّجُلُ يَصْدُقُ وَيَتَحَرَّی الصِّدْقَ حَتّٰی يُكْتَبَ عِنْدَ اللّٰهِ صِدِّيْقًا وَاِيَّاكُمْ وَالْكَذِبَ فَاِنَّ الْكَذِبَ يَهْدِیْ اِلٰی الْفُجُوْرِ وَاِنَّ الْفُجُوْرَ يَهْدِیْ اِلَی النَّارِ وَمَا يَزَالُ الرُّجُلُ يَكْذِبُ وَيَتَحَرَّی الْكَذِبَ حَتّٰی يُكْتَبَ عِنْدَاللّٰهِ كَذَّابًا.** (مسلم كتاب البر)

# खरीपणा

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले खरेपणा पत्करा कारण खरेपणा सत्कर्माकडे नेतो आणि सत्कर्म जन्नतकडे. माणूस सत्य बोलत राहतो आणि सत्याचाच अंगिकार करतो येथपावेतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहजवळ ''सिद्दीक़''(महान सत्यशील) लिहिला जातो. खोटेपणा पासून स्वत:ला वाचवा कारण खोटेपणा दुष्कर्माकडे नेतो व दुष्कर्म जहन्नमकडे. माणूस खोटे बोलत राहतो आणि खोटेपणाचाच अंगिकार करतो येथपावेतो की सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या येथे ''कज़्ज़ाब''(मोठा खोटारडा) लिहिला जातो.** (मुस्लिम किताबुल बिर)

## स्पष्टीकरण

इस्लामी नितिमत्तेत सर्वप्रथम महत्व बाळादणारी गोष्ट म्हणजे खरेपणा होय जी चरित्र्याच्या उभारणी करीता पाया स्वरुप असेत. जी व्यक्ति सदैव सत्य बोलत असते आणि प्रत्येक सत्य गोष्टीस मान्य करणयाकरिता तयार असते ती स्वत:ला खऱ्या दिशेवर टाकते परिणामत: तिचे चरित्र सत्यतेच्या साच्यात आकारबद्ध होते आणि जीवन सुशोभित होते. असा माणूस सर्व श्रेष्ठ अल्लाहकडून आलेल्या सत्याचा स्वयंस्फूर्त होऊन स्वीकार करतो. कारण ज्या माणसाने आपल्या अंगी सत्यतेचा गुण निर्माण केला असेल तो सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या मार्गदर्शनास जो सत्याचा मूलस्त्रोत आहे. कशाप्रकारे खोटे ठरवू शकेल?

तात्पर्य सत्य कथन माणसाला सद्वर्तनास प्रवृत करते आणि तो यामुळे जन्नत मध्ये पोहचतो जीवनात कधी कधी असे नाजुक प्रसंग येतात जेव्हा माणसाच्या सत्यशीलतेची परीक्षा होते परंतु जो माणूस अल्लाहच्या प्रसन्नते खातर हानी सहन करण्याकरीता तयार होतो आणि सत्यतेवर कायम राहण्याकरीता प्रत्येक प्रकारचे बलिदान देतो तो साक्षात सत्याचे मूर्त स्वरूप धारण करतो. सत्यतेच हे स्थान माणसाच्या उत्कर्षाचा अंतिम टप्पा होय.

याउलट जो माणुस खोटे बोलतो तो स्वत:ला चुकीच्या मार्गावर सोडतो, परिणामत: चुकिच्या विचार प्रणालीचे संर्वधन होते व ती त्याला दुराचारी बनवून सोडते व शेवटी त्याचा परिणाम असा होईल की त्याला जहन्नमची शिक्षा भोगावी लागले. हे देखील खरे आहे की माणूस खोटे बोलायला लागला की हळू हळू खोट बोलणे हा त्याचा स्वभाव धर्मच होऊन बसतो मग ही सवय एवढी निर्ढावते की तो जबरदस्त खोटारडा माणूस बनून राहतो.

## حديث

**عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَنْ لَا يَرْحَمُ لَا يُرحَمُ .** ( بخارى كتاب الادب )

# ईश निर्मितीवर दया

## हदीस

**अबु हुरैरा कथन करतात की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी असे फर्मावीले की जो दया करीत नाही त्यावर दया केली जाणार नाही.**

(बुख़ारी- किताबुल अदब )

## حديث

**عَـنْ جَـرِيْـرِبْـنِ عبـدِاللّٰه قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : لَا يَرْحَمُ اللّٰهُ مَنْ لَا يَرْحَمُ النَّاسَ .** ( بخارى كتاب التوحيد )

## हदीस

**जरीर बिन अब्दुल्लाह म्हणतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्मावीले, अल्लाह त्या फर्मावितात नाही जी लोकांवर दया करीत नाही.**

(बुखारी किताबुल तौहीद )

## स्पष्टीकरण

या वचनांमध्ये अत्यंत प्रभावी शैलीत ईश निर्मितीवर दया करण्यास व माणसांशी स्नेह कृपेचे वर्तन करण्यास प्रोत्साहन दिले गेले आहे. ही इस्लामची सार्वत्रिक कृपा होय जिची शिकवण रहमतुल्लिल आलमीन अर्थात पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी दिली आहे. माणुस या नात्याने सहानुभुतीचा हक्कदार आहे मग तो कोणत्याही जाती धर्माशी संबंधित असो. आणि ईश्वराच्या कृपेचे तेच लोक हक्कादार ठरतात जे त्याच्या निर्मिती संबंधात मेहरबान असतात. परंतु ईश-निर्मितीशी ज्यांचे वर्तन अत्याचार पुर्वक असते ते हे सिद्ध करुन दाखवितात की ते अल्लाहच्या कृपेचे हक्कदार नाहीत.





## حديث

**عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عَمْرٍ و قالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اَلرَّاحِمُوْنَ يَرْحَمُهُمُ الرَّحْمٰنُ اِرْحَمُوْا مَنْ فِى الاَرْضِ يَرْ حَمْكُمْ مَنْ فِى السَّمَاءِ. اَلرَّحِمُ شِجْنَةٌ مِنَ الرَّحْمٰنِ فَمَنْ وَصَلَهَا وَصَلَهُ اللّٰهُ وَمَنْ قَطَعَهَا قَطَعَهُ اللّٰهُ.** (ترمذى )

## हदीस

**अब्दुल्लाह बिन अम्र कथन करतात की पैग़ंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्मावीले दया करणाऱ्यांवर रहमान (परमदयाळू) फर्मावील. ज़मीन वाल्यांवर दया करा तर आकाश वाला तुमाच्यावर दया करील. रहम हा शब्द रहमान पासून निघतो म्हणून जो याला जोडील अल्लाह त्याला जोडील आणि जो याला तोडील अल्लाह त्याला तोडील.** (तिरमिज़ी)

## स्पष्टीकरण

''रहम'' हा शब्द रहमान या शब्दापासून बनला आहे. ही शाब्दिक समानता या गोष्टीची निकड भासवते की माणसाने ईश निर्मितीवर दयावंत असावे म्हणून जे लोक माणुसकीच्या नात्यास जोडतील तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्याशी आपले दयेचे नाते जोडील परंतु जे लोक माणुसकिच्या नात्यास तोडीतील तर सर्वश्रेष्ठ अल्लाह त्यांच्याशी आपले दयेचे नाते तोडील. माणसाचे जसे आचरण असेल तसाच परिणाम त्याच्या समोर येइल.

## حديث

**عَنْ ابى هُرَيْرَةَ قَالَ سَمِعَتُ اَبَا الْقَاسِمِ ﷺ يَقُوْلُ: لَا تُنْزَعُ الرَّحْمَةُ اِلَّا مِنْ شَقِيٍّ.( ترمذى )**

## हदीस

**अबु हुरैरा (रज़ी.) यांचे कथन आहे की मी अबुल कासिम (पैगंबर महम्मद) सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांना हे फ़र्मावीताना ऐकले दया अशाच व्यक्तिच्या हृदयातून काढली जाते जी दुर्दैवी असावी.**(तिर्मिज़ी)

## स्पष्टीकरण

यांचा अर्थ असा की ज्याच्या अंत: करणात दया भाव नसावा तो मंगल गोष्टीपासून वंचित आहे. असा माणूस मानवतेबाबत अपायकारक सिद्ध होतो. म्हाणून आख़िरत मध्ये त्याचा शेवट मोठा–वाईट होइल.

# حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ (رض): قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِنَّ اللّٰهَ عَزَّوَجَلَّ يَقُوْلُ، يَوْمَ الْقِيَامَةِ يَا ابْنَ آدَمَ ! مَرِضْتُ فَلَمْ تَعُدْنِیْ قَالَ: يَا رَبِّ ! كَيْفَ اَعُوْدُکَ وَ اَنْتَ رَبُّ الْعَالَمِيْنَ قَالَ: اَمَا عَلِمْتَ اَنَّ عَبْدِیْ فُلَاناً مَرِضَ فَلَمْ تَعُدْهُ اَمَا عَلِمْتَ اَنَّکَ لَوْ عُدْتَّهُ لَوَجَدْتَنِیْ عِنْدَهُ يَا ابْنَ آدَمَ اِسْتَطْعَمْتُکَ فَلَمْ تُطْعِمْنِیْ قَالَ يَا رَبِّ وَكَيْفَ اُطْعِمُکَ وَاَنْتَ رَبُّ الْعٰلَمِيْنَ. قَالَ اَمَا عَلِمْتَ اَنَّهُ اِسْتَطْعَمَکَ عَبْدِیْ فُلَانٌ فَلَمْ تُطْعِمْهُ اَمَا عَلِمْتَ اِنَّکَ لَوْ اَطْعَمْتَهُ لَوَجَدْتَّ ذٰلِکَ عِنْدِیْ يَا ابْنَ آدَمَ اِسْتَسْقَيْتُکَ فَلَمْ تَسْقِنِیْ قَالَ يَا رَبِّ! كَيْفَ اَسْقِيْکَ وَاَنْتَ رَبُّ الْعٰلَمِيْنَ. قَالَ: اِسْتَسْقَاکَ عَبْدِیْ فُلَانٌ فَلَمْ تَسْقِهِ اَمَا اَنَّکَ لَوْسَقَيْتَهُ وَجَدْتَّ ذٰلِکَ عِنْدِیْ. ( مسلم كتاب البِرّ)

## मानवी सहानुभूति

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) कथन करतात की, पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांनी असे फर्माविले, सर्वोच्च व सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी फ़र्माविल, मी आजारी पडलो तेव्हा तू माझी विचारपूस केली नाहीस, तो म्हणेल, हे माझ्या पालनकर्त्या, मी तुझी कशाप्रकारे विचारपुस करु, वस्तुतः तूच सृष्टीचा स्वामी आहेस, अल्लाह फ़र्माविल, तुला नाही माहित माझा अमुक दास आजारी पडला होता परंतु तू त्याची विचारपूस केली नाहीस, काय तू हे जाणात नव्हता की जर तू त्याची विचारपूस केली असती तर त्याच्या जवळ मी आढळलो असतो. हे आदम पुत्र, मी तुझ्याजवळ जेवण मागितले होते परंतु तू मला जेऊ घातले नाहीस, तो म्हणेल हे अल्लाह, मी तुला कसे जेऊ घातले असते, वस्तुतः तूच विश्व वासीयांचा पालनकर्ता आहेस. फर्माविल, तुला माहीत माझ्या अमुक दासाने तुझ्या जवळ जेवण मागितले होते परंतु तू त्याला जेऊ घातले नाहीस. जर तू त्याला जेऊ घातले असते तर आज तुला माझ्याजवळ आढळले असते. हे आदम पुत्र !मी तुझ्याजवळ पाणी मागितले होते परंतु तू मला पाणी पाजले नाहीस. तो महणेल मी**





**तुला कसे बरे पाणी पाजले असते, वस्तुतः तु सर्व प्राणा मात्रांचा पालक आहेस. फर्माविल माझ्या अमूक दासाने तुझ्या जवळ पाणी मागितले होते परंतु तू त्याला पाजले नाहीस जर तु त्याला पाजले असते तर आज ते सत्कर्म तुला माझ्याजवल आढळले असते. (मुस्लिम, किताबुल बिर)**

## स्पष्टीकरण

ही हदीस क़ुदसी आहे. ज्यात सर्वश्रेष्ठ अल्लाहने आजारी व्यक्तिची विचारपूस करण्या विषयी व गरजवंताना खाऊ पिऊ घालण्याविषयी उत्तम शैलीद्वारे प्रोतसाहन दिले आहे. यास्तव आजाऱ्याची विचारपूस करण्यास सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपली विचारपूस व गरजवंताच्या सहाय्यास आपले सहाय्य असा अर्थ फर्माविला आहे. ही अलंकार युक्त शैली उक्ती प्रभावाच्या हेतुने अंगिकारली गेली आहे. अन्यथा ही वस्तुस्थिती अगदी स्पष्ट आहे कि सर्वश्रेष्ठ अल्लाहला ना एखादा रोग स्पर्श करतो व ना भूक तहान लागते तो प्रत्येक प्रकारच्या दोष उणीवा पासून मुक्त आहे आणि सर्व गरजाबद्दल नि:स्पृह आहे. या शैलीची उदाहरणे पवित्र क़ुरआनातहि आहेत. यास्तव दीन (धर्मा) च्या मदतीस सर्वश्रेष्ठ अल्लाह ने स्वत:ची मदत अभिप्रेत घेतली आहे.

या हदीस द्वारे गोष्टीवर प्रकाशझोत पडतो की पुण्याची ही कामे ज्यांचा उल्लेख भव्य रित्या केला गेला आहे. अल्लाहच्या नजरेत अत्यंत स्तुत्य कार्य आहे. ज्याद्वारे अल्लाहचे सान्निध्य व त्याची प्रसन्नता प्राप्त होते. म्हणूच दासांनी देखील अशा कामांना प्रिय जाणावे व केवळ त्याच्याच कडून फलप्राप्तीची अपेक्षा बाळगत सेवा पार पाडावी.

आजाऱ्याची विचारपूस व चोकशी मानवी सहानुभूतिचे काम आहे. तव्दतच भूकेल्यांना व तहानलेल्यांना खाऊ पिऊ घालणे माणुसकीचे व जनसेवेचे कार्य आहे. परंतु ही कामे केवळ एक प्रथा म्हणून वा प्रदर्शन म्हाणून पार पाडली गेली नसावीत किंबहुना यामागे अल्लाहची प्रसन्नता व आख़िरतच्या मोबदल्याची भावना कार्यरत असावी. तरच ही कामे खऱ्या अर्थाने पुण्याची कामे व ज़बरदस्त मोबदल्यास कारणीभूत ठरतात.

## حديث

عَنْ سَهْلِ بْنِ سَعْدٍ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ: اَنَا وَ كَافِلُ الْيَتِيْمِ فِي الْجَنَّةِ هٰكَذَا وَقَالَ بِاِصْبَعَيْهِ السَّبَّابَةِ وَالْوُسْطٰى. (بخاری کتاب الادب)

# अनाथांचे संगोपन

## हदीस

**सुहेल बिन सईद द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, मी आणि अनाथाचे संगोपन करणारा असे प्रकार जन्नत मध्ये असतील पैगंबरांनी आपले तर्जनीचे बोट व मधल्या बोटाने इशारा करीत फर्माविले. (बुख़ारी–किताबुल अदब)**

## स्पष्टीकरण

ज्याच्या पित्याचे अगदी बालपणातच निधन झाले असावे अशा बालकाला अनाथ म्हणतात. अशी बालके असहाय्य असतात आणि सर्व साधारणत: संगोपनाचे गरजू असतात. त्यांचे संगोपन करणे म्हणजे समाजाच्या सर्वात जास्त दुर्बल वर्गाचे संगोपन करणे होय. म्हणून याचा मोबदला देखील फार मोठा आहे पवित्र क़ुरआनाने अनाथांचे हक्क अदा करण्याची सक्त ताकीद केली आहे व त्यांना मदत करण्यासंबंधी मोठया प्रभावी शैलीत प्रोत्साहन दिले आहे आणि पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांची तर ही उपाधी आहे. अनाथांचा वाली गुलामांचा मौला.

या हदीस मध्य पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी अनाथाचे संगोपन करणाऱ्यास जन्नत ची शुभवार्ता ऐकविली आहे की ज्या प्रमाणे तर्जनी व मधले बोट परस्परांनी मिळून आहेत तव्दतच अनाथाचे संगोपन व विचारपुस करणाऱ्यास जन्नतमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे साहचर्य लाभेल.

हे लक्षात घ्यावे कि ही शुभवार्ता केवळ अशाच लोकांकरिता आहे जे ईमान व सदाचरणाने युक्त असावेत, काफ़िर आणि दुराचारी केवळ एखाद्या अनाथाचे संगोपन करण्याच्या आधारावर जन्नतचे हक्कदार होऊ शकत नाही. ही गोष्ट क़ुरआन व हदीसच्या सनदशीर आदेशांद्वारे स्पष्ट आहे म्हणून प्रत्येक प्रसंगी हिची पुनरावृत्ति केली गेली आहे. एखाद्या अलंकार युक्त वचंनात शर्ती अभिप्रेत असतात ज्यांना प्रत्येक जण समजू शकतो मात्र या अटीवर की याने सामान्य बुद्धि ने काम घ्यावे.





## حديث

عَنْ اَبِي ذَرٍّ قَالَ قَالَ لِي. رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ: اِتَّقِ اللّٰهَ حَيْثُ مَا كُنْتَ، وَاَتْبِعِ السَّيِّئَةَ الْحَسَنَةَ تَمْحُهَا، وَ خَالِقِ النَّاسَ بِخُلُقٍ حَسَنٍ. (الترمذی ابواب البر)

# कोणत्याही स्थितीत तक़्वा

## हदीस

**हज़रत अबु ज़र फ़र्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी मला असे फर्माविले कोठेहि असा, अल्लाहचे भय बाळगा. दुष्कर्म करा की त्यास मिटवील आणि लोकांश चांगल्या चारित्र्याने वागा.**(तिर्मिज़ी–अबवाबुल बिर)

## स्पष्टीकरण

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविलेला हा मोठा महत्वाचा व सर्वागपुर्ण उपदेश आहे. तुम्ही कोठीहि असा व कोणात्याहि स्थितीत असा. अल्लाहचे भय बाळगा अर्थात तुम्ही कोणत्याहि भूभागात व कोणत्याहि देशात असा. शुष्क भागात असा किंवा ओल्या भागात. ज़मीनीवर चालत असा किंवा आकाशात उडत असा, एकांतात असा समुहात. घरात असा किंवा बाजारात. मस्जिदीत असा अथवा राजकारणाच्या मैदानात. दारीद्रच्यावस्थेत असा किंवा संपन्नावस्थेत तारुण्यावस्था असो कि वृद्धावस्था प्रत्येक ठिकाणी. प्रत्येक वेळी व प्रत्येक स्थितीत तुम्ही ईश-भय बाळगले पाहिजे. व असे कोणतेही काम करता कामा नये जे ईश्वराच्या नाराज होण्यास व गुन्हा ठरण्यास कारणीभूत व्हावे.

आचरणा संबंधी एवढी सावर्धगिरी बाळगूनहि जर तुमच्या हातून एखादे दुष्कृत्य कळत न कळत घडले तर त्यापाठोपाठ एखादे सत्यकर्म व पुण्याचे काम जरूर करा. यासाठी की त्या दुष्कृत्या चे दुष्परिणाम मिटावेत. पवित्र क़ुरआनात हा आदेश आहे की.

اِنَّ الْحَسَنَاتِ يُذْهِبْنَ السَّيِّئَاتِ ‘‘ सतकर्मे दुष्कर्मास दूर करतात’’ (हूद)

‘‘ आणि लोकांशी चांगल्या आचारणाने वागा’’ या आदेशात तक़्वा (ईश-भय) व धर्मनिष्ठतेचे मूल स्वरूप दगोचर होते. असे की जेथे खऱ्या अर्थाने ईश-भय असेल तेथे सद् चारित्र्य देखील असेल जी व्यक्ति अल्लाहचे जितके जास्त भय बाळगणारी असेल तितका ती दासांच्या संबंधात जास्त चांगली सिद्ध होईल.

## حديث

**عَنْ اَبِیْ ھُرَیْرَۃَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰہ ﷺ قال : بَیْنَمَا رَجُلٌ یَمْشِیْ بِطَرِیْقٍ ، وَجَدَ غُصْنَ شَوْکٍ عَلَی الطَّرِیْقِ ، فَاَخَّرَہُ فَشَکَرَ اللّٰہُ لَہُ فَغَفَرَلَہُ .** ( مسلم کتاب البر)

# मार्गतील त्रास दायक वस्तु हटविणे

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) चे कथन आहे कि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फ़र्माविले एक माणूस रस्तयाने जात होता की त्याला एक काटेरी फांदी रस्तयात पडलेली दिसली. त्याने ती हटविली. अल्लाहने त्यांच्या या कर्माची कदर केली व त्याचे अपराध माफ़ केलेत.**

## स्पष्टीकरण

ही आहे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची शिकवण, की मार्गतील त्रासदायक वस्तु दूर करा अशासाठी की मार्गस्थ लोक त्यापासून सुरक्षित रहावेत ही अशी वारवाणण्याजोगी नेकी (पुण्य-कर्म) आहे जी माणसाला अल्लाहच्या क्षमा-दानाचा हक्कदार बनविते. कारण हे सत्कर्म जे बाहयत: मामुली वाटते, आंतरिक दृष्टया मोठया योग्यतेचे व ईशदासांशी खऱ्या सहानुभुतिची उत्कट भावना असलेले आहे. आणि या दोन्ही गोष्टी धर्माचा मूल आत्मा आहे.

परंतु जेथे हया भावना नसतात तेथे याच्या अगदी उलट स्थिती असते. यास्तव आज रस्तयांवर प्रत्येक प्रकारच्या त्रासदायक वस्तु विखुरलेल्या दिसून येतात. एखादा रस्तयाच्या मधोमधच कळीची साले टाकतो व टाकतांना एवढा सुद्धा विचार करीत नाही की एखाद्याचा पाय त्यामूळे घसरुन तो जखमी देखील होऊ शकतो. एखादा माणुस घाणेरडया व दुर्गंध निर्माण करणाऱ्या वस्तूंना रस्तयावरच फेकतो आणि हे करतांना त्याची अनुभूति जणू मृत होते की येणाऱ्या जाणाऱ्यांना किळस येईल व त्याच्या दुर्गंधाने त्यांना त्राम पोहचेल. एखादा माणूस रस्तयवरच लोखंडी खिळे टाकतो. आणि हा विचार करण्याचा त्रास घेत नाही की एखाद्याच्या पायात बोचून तो ''टेटनिस'' ला बळी पडू शकतो. व त्यामुळे त्याचे जीवन धोक्यात पडू शकतो. ही काही उदाहरणे होत या गोष्टीची की माणूस किती जबाबदारी शुन्य व बेपर्वा झाला आहे. याच्या उलट पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची शिकवण माणसाला किती जबाबदार व माणुसकी इच्छिणारा बनवते.





## حديث

**عَنْ اَبِیْ مُوْسیٰ الْاَشْعَرِیْ قَالَ قَالَ رسُوْلُ اللّٰہِ ﷺ : اَطْعِمُوْا الْجَائِعَ وَعُوْدُوا الْمَرِیْضَ وَفُکُّوْا الْعَانِیْ.** ( بخاری کتاب المرضیٰ )

# सहानुभूति व दु:ख निवारण

## हदीस

**हज़रत अबु मूसा अशअरी चे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) यांनी असे फ़र्माविले भुकेल्यास जेऊ घाला, आजाऱ्याची विचार पूस करा आणि कैद्याला सोडवा.**

**(बुखारी–किताबल मरज़ा)**

## स्पष्टीकरण

इस्लाम एका अशा चारित्र्याची उभारणी करू इच्छितो ज्याचे महत्वपुर्ण वैशिष्टय सहानुभूति व दु:खनिवारण आणि दया अनुकंपा हे होय माणसाने संकट समयी इतरांच्या कामी यावे व त्यांच्या दु:खाची वेदना आपल्या हृदयात जाणावी. सहानुभूतिचे हे वर्तन त्या प्रत्येक माणसाशी झाले पाहिजे जो संकटग्रस्त असावा मगा तो स्वकीयां पैकी असो व परक्यांपैकी असो, किंवा त्याचा संबंध कोणत्याही जाती धर्माशी असो.

भुकेल्यांना जेऊ घालणे व उपासमारीस दूर करणे इस्लामच्या अत्याधिक महत्वाच्या उधिष्टांपैकी होय. आजाऱ्याच्या विचार पूस करण्यामध्ये त्याच्या दु:खाशी समरस होणे हे देखील सामील आहे व त्याची सेवा शुश्रूषा हे हि सामील आहे. कैद्याला सोडविणे याचा अर्थ अशा लोकांना कैदेतून व बंदी वासातून मुक्त करण्याचा प्रयत्न करणे जे निरपराध पकडले गेले आहेत.

## حديث

عَنْ جَابِرِ بْنِ عَبْدِاللّٰهِ (رض) قَالَ اَتَى رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ عَرَفَةَ فَخَطَبَ النَّاسَ وَقَالَ : " اِنَّ دِمَاءَكُمْ وَاَمْوَالَكُمْ حَرَامٌ عَلَيْكُمْ كَحُرْمَةِ يَوْمِكُمْ هٰذَا فِي شَهْرِكُمْ هٰذَا فِي بَلَدِكُمْ هٰذَا. اَلَا كُلُّ شَيْءٍ مِنْ اَمْرِ الْجَاهِلِيَّةِ تَحْتَ قَدَمَيَّ مَوْضُوْعٌ، وَدِمَاءُ الْجَاهِلِيَّةِ مَوْضُوْعَةٌ، وَاِنَّ اَوَّلَ دَمٍ اَضَعُ مِنْ دِمَائِنَا دَمُ ابْنِ رَبِيْعَةَ بْنِ الْحَارِثِ كَانَ مُسْتَرْضِعًا فِيْ بَنِي سَعْدٍ فَقَتَلَتْهُ هُذَيْلٌ، وَرِبَا الْجَاهِلِيَّةِ مَوْضُوْعَةٌ وَاَوَّلُ رِبًا اَضَعُ رِبَانَا رِبَا عَبَّاسِ بْنِ عَبْدِ الْمُطَّلِبِ فَاِنَّهُ مَوْضُوْعٌ كُلُّهُ. فَاتَّقُوا اللّٰهَ فِي النِّسَاءِ فَاِنَّكُمْ اَخَذْتُمُوْهُنَّ بِاَمَانِ اللّٰهِ وَاسْتَحْلَلْتُمْ فُرُوْجَهُنَّ بِكَلِمَةِ اللّٰهِ وَلَكُمْ عَلَيْهِنَّ اَنْ لَّا يُوْطِئْنَ فُرُشَكُمْ اَحَدًا تَكْرَهُوْنَهُ فَاِنْ فَعَلْنَ ذٰلِكَ فَاضْرِبُوْهُنَّ ضَرْبًا غَيْرَ مُبَرِّحٍ وَلَهُنَّ عَلَيْكُمْ رِزْقُهُنَّ وَكِسْوَتُهُنَّ بِالْمَعْرُوْفِ وَقَدْ تَرَكْتُ فِيْكُمْ مَالَنْ تَضِلُّوْا بَعْدَهُ اِنِ اعْتَصَمْتُمْ بِهٖ كِتَابَ اللّٰهِ، وَاَنْتُمْ تُسْأَلُوْنَ عَنِّيْ فَمَا اَنْتُمْ قَائِلُوْنَ؟ قَالُوْا نَشْهَدُ اَنَّكَ قَدْ بَلَّغْتَ وَاَدَّيْتَ وَنَصَحْتَ فَقَالَ بِاِصْبَعِهِ السَّبَّابَةِ يَرْفَعُهَا اِلَى السَّمَاءِ وَيَنْكُتُهَا اِلَى النَّاسِ اَللّٰهُمَّ اشْهَدْ اَللّٰهُمَّ اشْهَدْ ثَلٰثَ مَرَّاتٍ". ( مسلم كتابُ الحج)

# प्राण वित्त–प्रतिष्ठा

### (शेवटच्या हज्ज प्रसंगीचे प्रवचन)

## हदीस

**हज़रत जाबिर बिन अब्दुल्लाह (रज़ी.) फ़र्मावितात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) अरफ़ात येथे पोहचले व तेथे त्यांनी प्रवचन दिले. या प्रवचनात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फ़र्माविले तुमचे रक्त आणि तुमचा माल तुम्हावर अशा प्रकारे हराम आहे ज्या प्रमाणे तुमचा हा दिवस या महिन्यात व या शहरात हराम आहे. खबरदार ! आज्ञानाच्या समस्त प्रथा माझ्या पायांखाली आहेत. आणि अज्ञान काळातील रक्ताचे दावे खोटे ठरविले गेले आहेत. आणि पहिला वध ज्यास मी सोडून देतो. तो आपले आतेवाइक इब्ने रबिआ हारिस चा वध होय हा बालक–कबीला बनी सअद मध्ये दूध पीत होता ज्यास हुजैल ने ठार केले होते. आणि अज्ञान काळातील व्याज रद्दबातल ठरविले गेले आहे व सर्वात पहिले व्याज, ज्यास मी सोडून देत आहे तो माझे नातेवाइक अब्बास बिन अब्दुल**





**मुत्तलिब यांचे व्याज होय. ते पूर्णतः रद्द बातल ठरविले गेले आहे. (लोकांनो !) स्त्रीयांबाबत (पत्न्यांबाबत) अल्लाहचे भय बाळगा कारण तुम्ही त्यांना अल्लाहच्या संरक्षणासह घेतले आहे. व त्यांच्या लज्जा स्थानांना अल्लाहच्या आदेशाने हलाल केले आहे. तुमचा त्यांच्यावर हा हक्क आहे की त्यांनी तुमच्या बिछान्यावर एखाद्या अशा व्यक्तिस बसू देऊ नये ज्यास तुम्ही अप्रिय जाणता जर त्यांनी असे केले तर तुम्ही त्यांना मारु शकता अर्थात असा मार जो नुक़सान पोहचविणारा नसावा. आणि त्यांचा तुमच्यावर हा हक्क आहे की चांगल्या पद्धतिनुसार त्यांच्या खाण्यापिण्याची व कपडया लत्त्याची व्यवस्था करावी (लोक हो !) मी तुमच्या दरम्यान अशी वस्तू साडून जात आहे जिला तुम्ही जर मज़बूतीने पकडले तर कधीहि मार्ग भ्रष्ट होणार नाहीत आणि ती आहे ''अल्लाहचा ग्रंथ''तुम्हाला माझ्या बाबतीत विचारले जाईल तर तुम्ही काय उत्तर द्याल? उपस्थित असलेल्यांनी म्हटले, आम्ही या गोष्टीची साक्ष देणार की आपण आम्हा पावेतो अल्लाहचा दीन (धर्म) पोहचविला, आपले कर्तव्य पार पाडले व आमचे शुभहित इच्छिले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी तर्जनीची बोट आकाशकडे. उंचाविले व लोकांकडे संकेत करुन तीन वेळ फर्माविले, हे अल्लाह !तू साक्षी रहा हे अल्लाह! तू साक्षी रहा.''** (मुस्लिम किताबुल हज्ज)

# स्पष्टीकरण

ही त्या प्रसिद्ध व दार्घ प्रवचनातील रत्न माणके आहेत जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी शेवटच्या हज्ज यात्रा (जिल हिज्जा, १०/ फेब्रुवारी इ. स. ६३२) प्रसंगी अरफातच्या मैदानावर सुमारे एक लाख मुसलमानांच्या समुदायात फ़र्माविले होते. या वेळेपर्यंत इस्लामची परिपूर्ण व्यवस्था पूर्ण वैभवानिशी कायम झाली होती. आणि अज्ञान काळातील व्यवस्थेला मूळासकट उपटून फेकले गेले होते. आणि मुस्लिम जाती समूहाच्या नावाने एक सर्वोत्कृष्ट समाजनिर्माण झाला होता. आणि अल्लाहचे प्रेषित आपले कर्तव्य पार पाडल्यानंतर लवकरच जगाचा निरोप घेणार होते. या प्रसंगी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी या जाती समूहास संबोधून जे आदेश दिले ते केवळ या जाती समूहापुरतेच नव्हे किंबहुना संपूर्ण मानव जाती करित महत्वाची आहेत.

१.) प्राणवित्ताची आदर आवश्यक आहे. याच्या प्रतिष्ठेस हज्जच्या दिवसाची प्रतिष्ठा, हज्जचा महीना जिलहिज्जाची प्रतिष्ठा व मक्का शहराची प्रतिष्ठे समान लेखले आहे. कारण या दिवसाचा या महिन्याचा व या शहराचा अत्याधिक आदर होणे. अरब लोकांच्या दृष्टी अगदी सर्वमान्य होते आणि इस्लामने यांच्या प्रतिष्ठेस अधिक बळकट केले प्राणवित्ताची प्रतिष्ठा स्पष्ट करण्याकरीता याहून अधिक प्रभावी साधन अन्य असु शकत नाही.

२.) अज्ञान काळातीत रक्ताचे दावे खोटे आहेत. अरब लोकांमध्ये हा दस्तूर होता की

ते रक्ताचा सूड संबंधित कबिल्याशी वर्षानुवर्षे निघून गेल्यानंतरहि घेत. परिणामत: लढायांचा असा क्रम चालू राही जो संपता संपत नसे. इस्लामने अज्ञान काळातील हा दस्तूर मिटविला व किसास ला कायद्याचे स्वरूप दिले अर्थात सूड फक्त मारेऱ्याशी घेतला जाऊ शकतो त्याच्या संपूर्ण कुटुंबाशी वा कुटुंबातील कोणत्याही व्यक्तिशी नव्हे.तव्दतच इस्लाम ने न्याय-निति कायम केली. आणि या संदर्भात सर्वात प्रथम पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी आपल्या कुटुंबाच्या रक्ताच्या दाव्यास फोल ठरविले. जो रबीआ बिन हारिसच्या पुत्रा संबंधाने चालत आला होता. रबिआ बिन हारिस पैगंबरांचे चुलत भाऊ होते त्यांचा पुत्र ज्याचे नाव इलयास होते कबिला बनू सअद मध्ये त्याचे पालन होत होते की हुजैल ने त्याला ठार केले.

३.) अज्ञान काळीत व्याज़ खोटे आहे. इस्लामने ब्याज़ पराकोटीचे हराम ठरवित कायदेशीर रित्या वर्ज्य ठररिले. आणि व्याजापोटी जी थकबाकी पूर्वी पासून चालत येत होता तिला धर्मशास्त्रनुसार खोटे व कायद्याने रद्दबातल ठरविले. हा कायदा पैगंबरांनी सर्व प्रथम आपल्या कुटुंबाला लागू केला. हज़रत अब्बास पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे काका होते. व इस्लाम अंगिकारण्यापुर्वी व्याज बट्टायाचा धंदा करीत होते. त्यांचे जे व्याज कर्ज़दारांकडे देय प्राप्त होते ते सर्व व्याज पैगंबरांनी एका कलमात नाहीसे केले.

४.) स्त्रीयांच्या (पत्न्यांच्या) बाबतीत अल्लाहचे भय बाळगा. अज्ञान काळात हा अबला वर्ग सर्व प्रकारच्या अत्याचारांनी पिडीत होत इस्लाम ने यास अवनितीतून काढून मानाच्या उच्च स्थानावर पोहचविले आणि पती-पत्नीचे परंपरांवरील हक्क निर्धारीत केले. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी शेवटच्या हज्ज यांचे प्रसंगी समाजाच्या या अबला वर्गाकडे लक्ष देण्याची प्रामुख्याने ताकीद फ़र्माविली. ज्यावरुन हे अनुमान निघते की दुर्बलांना त्यांचा हक्कधिकार मिळवून देण्याची पैगंबरांनी केवढी माठी काळजी होती !

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी ताकीद फर्माविली की आपल्या पत्नींचा उदरनिर्वाह योग्य प्रकारे करीत रहा व त्यांच्याशी कोणतेही अप्रिय वर्तन करु नका व त्यांना मारहाण करु नका. याखेरीज त्यांच्या हातून न खपण्याजोगे अपकृत्य घडले असावे, व त्यांच्या सुधारणे करित त्यांना मारहाण करणे अंपरिहार्य व्हावे. परंतु अशा स्थितीत सुद्धा मारहाण साध्या स्वरूपाची असावी. शरीराला अपाय पोहचेल इतपत मारण्याची अनुज्ञा नाही.

पत्नीने ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे पती ज्या लोकांचे आपल्या घरात येणे जणे अप्रिय जाणतो त्यांना घरात येऊ देऊ नये. शेवटच्या हज्ज यात्रेच्या त्या विराट मेळाव्यात पैगंबरानी या आदेशांचे वर्णन केले व त्या सोबतच मार्ग दर्शनाचा मूल–स्त्रोत असलेल्या पवित्र क़ुरआनाशी अगाढ श्रद्धा व सामीप्य ठेवण्याचीहि ताकीद फ़र्माविली. जीवनाच्या खडतर मार्गात व अनाकलनीय समस्यांमध्यो जो कोणी विशुद्ध अंत: करणाने अल्लाहच्या ग्रंथापासून मार्गदर्शन प्राप्त करु इच्छिल त्याला मार्ग स्पष्ट दिसून येईल.

पैगंबारांनी शेवटी असे फ़र्माविले की, तुम्हाला माझ्या विषयी हे विचारले जाईल की मी अल्लाहचा धर्म तुम्हा लोकांपर्यंत पोहचविला किंवा नाही तेव्हा तुम्ही काय उत्तर द्याला?





यावरुन हे दिसून येते की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना प्रेषित-कर्तव्य पार पाडण्याची केवढी विलक्षण जाणीव होती आणि जेव्हा सहवासात असलेल्या अनुयायीनी एकमुखाने हे उत्तर दिले की आम्ही या गोष्टीची साक्ष देऊ की आपण अल्लाहची संदेश आम्हीपर्यंत पोहचविला. आपण आपले प्रेषित कर्तव्य फार चांगल्या रीतिने पार पाडले व आमचे पूरेपूर शुभचिंतन केले, तेव्हा पैगंबारांनी या गोष्टीवर अल्लाहला साक्षी ठरविले अशासाठी की कियामतीच्या दिवशी अल्लाहच्या न्यायलयात लोकांनी आपल्या दुराचाराकरिता व मार्गभ्रष्ट करिता हे कारण प्रस्तुत करु नये की अल्लाहचा धर्म आमच्या पर्यंत पोहचला नव्हता. आता ही गोष्ट आम्हा सर्वा चिंतनीय आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी अल्लाहचा जो धर्म आमच्यापर्यंत पोहचविला आहे. त्या धर्मासह आमची कर्म पद्धति कोणती आहे? आणि कियामतीच्या दिव:शी अल्लाहच्या नयायालयात आम्ही कोणते उत्तरदायित्व निभावणा आहेत?

## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ: لَيْسَ الْغِنٰی عَنْ كَثْرَةِ الْعَرَضِ وَلٰكِنَّ الْغِنٰی غِنَی النَّفْسِ.** ( البخاری کتاب الرقاق )

## हृदया–धन

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम )यांनी असे फ़र्माविले, श्रीमंती हे साधन संपत्तीच्या विपुलतेचे नाव नाही किबहुना श्रीमंती खरे पाहता मनाची श्रीमंती आहे.( ंबुखारी किताबुर्रिक़ाक़)**

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये एक फार मोठी मानसिक वस्तुस्थिती वर्णन केली गेली आहे. लोक साधन संपत्तिच्या विपूलतेस ''श्रीमंती'' समजतात परंतु जर खरोखर ही श्रीमंती असती तर श्रीमंतांना अधिकाधिक शांती लाभली असती. परंतु सर्व सामान्यपणे हे दिसून येते की धनाढय लोक अधिक चिंताग्रस्त असतात व त्यांना मानसिक शांतता लाभत नाही किंबहुना सामान्यत: त्यांच्यावर बेचैनी अस्वस्थता व व्याकूळतेची कैफ़ियत असते. याउलट ज्याचे मन श्रीमंत झाले त्याच्या अंगी निस्पृहता वैभव दिसून येते. साधन संपत्तिचा अभाव असतांना देखील तो स्वत:ला गरजवंत समजत नाही आणि ही मानसिक स्थिती त्याला खऱ्याखुऱ्या शांतीचा लाभ घडवते असे लोक हलाखीच्या दारिद्रावस्थेत ''बादशाही'' करु लागतात.

## حديث

عَنْ حَكِيْمِ ابْنِ حِزَامٍ قَالَ سَأَلْتُ النَّبِيَّ ﷺ فَاَعْطَانِىْ ثُمَّ سَاَلْتُهُ فَاَعْطَانِىْ ، ثُمَّ سَأَلْتُهُ فَاَعْطَانِى، ثُمَّ قَالَ اِنَّ هٰذَا الْمَالَ ---- وَ رُبَّمَا قَالَ سُفْيَانُ، قَالَ لِىْ حَكِيْمُ! ---- اِنَّ هٰذَا الْمَالَ خَضِرَةٌ حُلْوَةٌ، فَمَنْ اَخَذَهُ بِطِيْبِ نَفْسٍ بُوْرِكَ لَهُ فِيْهِ وَمَنْ اَخَذَهُ بِاِشْرَافِ نَفْسٍ لَمْ يُبَارَكْ لَهُ فِيْهِ وَكَانَ كَالَّذِىْ يَاكُلُ وَلَا يَشْبَعُ، وَالْيَدُ الْعُلْيَا خَيْرٌ مِّنَ الْيَدِالسُّفْلٰى. ( البخارى كتاب الرقاق )

## हदीस

**हकीम बिन हिजाम कथन करतातः मी पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम यांच्याकडे माल (धनसम्पत्ति)मागितले त्यावर पैगंबरानी दिला. मी पुन्हा मागितले तर पैगंबरांनी पुन्हा सानुग्रह दिले. मी अधिक मागितल्यावर त्यांनी अधिक सानुग्रह दिला. अज़ान झाल्यानंतर पैगंबरांनी फर्माविले, हकीम हा माल हिरवागार व गोड आहे. जो कोणी यास शुद्ध अंतः करणाने घेते त्यात त्याला बरकत दिली जाते. आणि जी व्यक्ति यास लोभीपणाने घेते त्यात बरकत दिली जात नाही. आणि अशा माणसाची स्थिती त्या माणसासारखी होते जो एकसारखा खात रहातो परंतु तृप्त होत नाही आणि (लक्षात ठेवा) वरचा हात खालच्या हातापेक्षा अधिक चांगला होय.**

(बुखारी–किताबुर्रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

सर्वश्रेष्ठ अल्लाहने माल मध्ये आकर्षण ठेवले आहे. अशासाठी की माणसाची त्यासंबंधाने परिक्षा व्हावी. जो माणुस मालाच्या लोभात फसतो त्याची गरजवत्ता वाढते मग अगदी विपुल माल देखील त्याच्याकरिता कमि होतो. याउलट जो माणूस लोभ माहापासून आपले मन मुक्त राखतो आणि जो माल प्राप्त होतो त्यावर अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करतो त्याच्याकरिता थोडा मालहि पुरेसा सिद्ध होतो. कारण त्यात सर्वश्रेष्ठ अल्लाह खैर बरकत प्रदान कारतो.

वरचा हात खालच्या होतापेक्षा अधिक चांगला आहे. याचा अर्थ हा की दान देणार दान घेणाऱ्या पेक्षा अधिक चांगला आहे.





## حديث

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ (رض) قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَنْ تَصَدَّقَ بِعَدْلِ تَمْرَةٍ مِنْ كَسْبٍ طَيِّبٍ وَلَا يَقْبَلُ اللّٰهُ اِلَّا الطَّيِّبَ، وَاِنَّ اللّٰهَ يَتَقَبَّلُهَا بِيَمِيْنِهِ ثُمَّ يُرَبِّيْهَا لِصَاحِبِهٖ كَمَا يُرَبِّىْ اَحَدُكُمْ فَلُوَّهُ حَتّٰى تَكُوْنَ مِثْلَ الْجَبَلِ. ( البخارى كتاب الزكاة )

# दान पुण्य

## हदीस

**हज़रत अबू हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फ़र्माविले, ज्याने आपल्या स्वच्छ शुद्ध कमाइमधुन एका खजूरी इतकेहि दान दिले–आणि अल्लाह स्वच्छ शुद्ध वस्तुंनाच कबूल करतो- तर अल्लाह त्या दानाचा आपल्या उजव्या हताने स्वीकार करतो व त्याचे अशा प्रकारे पालन करतो ज्या प्रमाणे तुम्ही आपल्या वासराचे पालन करता. येथपावेतो की हे (मामूली) दान (विकसित होऊन) पहाडा प्रमाणे मोठे होते.** (बुखारी-किताबुज-ज़कात )

## स्पष्टीकरण

जो माणूस अल्लाहची प्रसन्नता. हे उद्दिष्ट बाळगून पुण्य मार्गात जे काही खर्च करतो सर्वश्रेष्ठ अल्लाह त्याची पूरेपूर क़दर फ़र्मावितातो आणि आखिरत मध्ये त्याला महान मोबदला देऊन उपकृत करील. जर एखादा माणूस फार माठया प्रमाणात दानधर्म करू शकत नाही तर जे काही तो दान करू शकतो ते त्याने करावे कारण सर्वश्रेष्ठ अल्लाह जवळ फक्त किंमत पाहिली जात नाही किंबहुना त्या सोबतच कैफियत देखील पाहिली जाते कि दान–कर्त्याने कोणत्या भावनेने दान केले आहे जर त्यामागे नावलौकीक कमविण्याची भावना नाही किंबहुना शुद्ध व निस्पृह भावना आहे तर अशा प्रकारेचे दान मोठे समृदधशील असते. तसेच दान स्वीकृत होण्याकरिता ही अट आहे की ते योग्य कमाई मधुन दिले जावे. जर कमाई हरामाची असेल मग ती कितीही मोठया प्रमाणात दान दिले जावे अल्लाहजवळ स्वीकृत होणार नाही कारण हरामची कमाई अशुद्ध आहे आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह कडून ही अपेक्षा कशी बरे बाळगली जाऊ शकते की तो अशुद्ध वस्तूंनाहि कबूल फर्माविल.

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰہِ ﷺ : اِسْتَوْصُوْا بِالنِّسَآءِ فَاِنَّ الْمَرْأَةَ خُلِقَتْ مِنْ ضِلَعٍ وَ اِنَّ اَعْوَجَ شَیْءٍ فِی الضِّلَعِ اَعْلَاهُ فَاِنْ ذَهَبْتَ تُقِیْمُهٗ كَسَرْتَهٗ وَ اِنْ تَرَكْتَهٗ لَمْ یَزَلْ اَعْوَجَ، فَاسْتَوْصُوْا بِالنِّسَآءِ. (البخاری کتاب احادیث الانبیاء)

# स्त्रीयांशी सद्व्यवहार

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फ़र्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, स्त्रीयांशी चांगले वर्तन करा कारण स्त्री-निर्मिती फासळीद्वारे झाली आहे आणि सर्वाधिक वक्रता फासळीच्या वरच्या भागात असते म्हणून जर तुम्ही तिला अगदी सरळ करण्याचा प्रयत्न कराल तर ती तुटेल आणि जर तिला आपल्या स्थितीवर सोडाल तर ती वाकडीच राहील. यास्तव स्त्रीयांशी अधिक चांगले वर्तन करण्यासंबंधीचा माझा आदेश स्वीकारा.(अल्-बुख़ारी)**

## स्पष्टीकरण

यांचा अर्थ ही की फसलीत ज्या प्रकारची वक्रता असते तत्वत स्त्रीयांच्या स्वभाव धर्मात वक्रता असते आणि ज्याप्रमाणे सर्वाधिक वक्रता फासळीच्या वरच्या भागात असते. त्या प्रमाणे स्त्रीयांमधली वक्रता तिच्या बुद्धीत व आकलनात असते. यास्तव स्वाभावाचा सहानुभूति पुर्वक विचार केल्याखेरीज गत्यंतर नाही. जर कोणी तिच्या स्वभाव प्रकृतिस अगदी योग्य करू इच्छिल तर त्याला या कामात यश लाभणार नाही आणि त्याचा हा प्रयत्न वाकडया फासळीला अगदी सरळ करण्याचा प्रयत्न ठरेल. अर्थात हे उघड होय की याचा परिणाम हाच निघू शकतो की फासळी तुटावी तव्दतच स्त्रीच्या स्वभाव धर्मास अगदी दुरुस्त करण्याचा जर प्रयत्न केला तर परिणामी नैराश लाभेल व शेवटी तलाक द्यायची वेळ येईल म्हाडून त्यांच्या स्वभावाचा सहिष्णूतेने विचार व त्यांच्याशी चांगला व्यवहार करण्याचा जो आदेश दिला गेला आहे तो कबूल करा.

स्त्रीयांबाबत जी वक्रत म्हटली गेली आहे ती त्यांच्या स्वभाव-प्रकृति संबंधाने होय आणि ही गोष्ट सर्वसामान्य पणे अनूभवास येते. म्हणून त्यांच्या स्वभाव धर्मा सवलत देणे अत्यावश्यक आहे अर्थात यांचा असा अर्थ मूळीच नव्हे की त्यांच्या चारित्र्यात व आचरणात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला न जावा.





## حديث

عَنْ الزُبَیْرِ بْنِ الْعَوَامُ عن النَّبِی ﷺ قَالَ : لَّاَنْ یَأْخُذَ اَحَدُکُمْ اَحْبُلًا فَیَأْخُذَ حُزْمَةً مِنْ حَطَبٍ فَیَبِیْعَ فَیَكُفَّ اللّٰهُ بِهٖ وَجْهَهٗ خَیْرٌ مِنْ اَنْ یَسْأَلَ النَّاسَ اُعْطِیَ اَمْ مُنِعَ. (بخاری کتاب المزارعة)

# मानाने उपजिविका प्राप्त करणे

## हदीस

**ज़ुबैर बिन अवाम कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, तुमच्यापैकी एखाद्याने दोर घेऊन लाकाडांची मोळी उचलून आणणे व ती विकणे-या उद्देश्याने की अल्लाहने याद्वारे त्याची अब्रु राखावी-हे याहून अधिक चांगले आहे की त्याने लोकांकडे मागत फिरावे, मग त्याला काही लाभो अथवा न लोभो.**

(बुख़ारी)

## स्पष्टीकरण

लोकांकडे मागत फिरणे ही काही चांगली गोष्ट नव्हे. अशाने माणसाची आत्मा-प्रतिष्ठा घायाळ होते म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांपासून स्वत:ला वाचविण्याचा व काबाड कष्ट करून उपजिविका प्राप्त करण्याचा आदेश दिला आहे. जंगलातून लाकडे तोडून आणणे व ती विकणे हे त्या काळातील अर्थोपर्जनाचे सोपे साधन होते. म्हणून पैगंबरानी या साधनाचा उल्लेख केला. अर्थात यावरून इतर सोप्यात सोप्या साधनांचा विचार केला जाऊ शकतो अर्थ हा आहे की माणसाने अर्थेपार्जनाच्या क्षुल्लक साधनाला. अंगिकारण्यात ते स्वच्छ शुद्ध असतानाही लज्जास्पद वाटून घेऊ नये,किंबहुना लज्जा या गोष्टीत बाळगावी की त्याने लोको पुढे हात पसरावा. मग लोकांनी त्याला द्यावे न द्यावे.

حديث

عَن عَبْدِ اللهِ بْنِ عُمَرَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللهِ ﷺ اَعْطُوْا الاَجِيْرَ اَجْرَهُ قَبْلَ اَن يَّجُفَّ عَرَقُهُ.

( ابن ماجة باب اجر الاجراء )

# मजूराचा हक्काधिकार

## हदीस

**अब्दुल्लाह बिन उमर (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले की श्रमिकाची मजूरी त्याचा घाम सुकण्यापुर्वीच अदा करा.** (इब्ने माजा)

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ قَالَ اللّٰهُ تَعَالٰی : ثَلَاثَةٌ اَنَا خَصَمُهُمْ يَوْمَ الْقِيَامَةِ رَجُلٌ اَعْطٰی بِیْ ثُمَّ غَدَرَ وَ رَجُلٌ بَاعَ حُرًّا فَاَكَلَ ثَمَنَهُ وَ رَجُلٌ اِسْتَاجَرَ اَجِيْرًا فَاسْتَوْفٰی مِنْهُ وَلَمْ يُعْطِهِ اَجْرَهُ. ( بخاری ، ابن ماجة )

## हदीस

**अबु हुरैरा (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो तीन माणसे अशी आहेत की क़ियामतीच्या दिवशी मी त्यांच्या तर्फे वादी बनेन एक तो माणूस कि ज्याने माझी शपथ घेऊन करार केला मग नंतर वचनभंग केला, दुसरा तो माणूस ज्याने एखाद्या स्वतंत्र माणसाला विकून टाकले व त्याची किंमत खाऊन बसला आणि तिसरा तो माणूस होय ज्याने एखाद्या मजुरास मजुरीवर ठेवले आणि त्याच्याकडून काम तर पूरेपूर घेतले परंतु त्याची मजूरी अदा केली नाही.** (बुख़ारी इब्ने माजा)

## स्पष्टीकरण

या वचनांवरुप हे स्पष्ट होते की मजुराचा हक्क अदा करण्याची इस्लामने किती सक्त ताकीद केली आहे. येथपावेतो की मजुरी देण्यात झालेला विलंब देखील त्यास खपत नाही. जी व्यक्ति मजुराकडून काम तर पूरेपूर घेते परंतु त्याची मजुरी अदा करीत नाही,अशा व्यक्तिची कियामतीच्या दिवशी सक्तिने विचारपूस होईल मजूराच्या त्या हक्काचा ईश्वर स्वत:वादी असेल.

इस्लामच्या दृष्टीने स्वतंत्र (कोणाच्या गुलामगिरी नसलेल्या) व्यक्तिस गुलाम बनवणे देखील फार मोठया अपराधाची गोष्ट आहे व याबाबतहि ईश्वराच्या न्यायालयात पकड होईल याचा अर्थ हा नव्हे की या प्रकारच्या अपराधांची रोक थाम करण्याकरिता काहीही कायदेशीर उपाय योजना केली न जावी किंबहुना या उद्दिष्टाकरिता यथोचित व न्याय्य विधि योजना इस्लामच्या ध्येयउद्दिष्टानुसार होईल.





## حديث

عَنْ شَدَّادِ ابْنِ اَوْسٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اِنَّ اللّٰهَ كَتَبَ الْاِ حْسَانَ عَلٰی كُلِّ شَیْءٍ فَاِذَا قَتَلْتُمْ فَاَحْسِنُوا الْقِتْلَةَ. وَاِذَا ذَبَحْتُمْ فَاَحْسِنُوْا الذَّبْحَ. وَلْيُحِدَّ اَحَدُكُمْ شَفْرَتَهُ فَلْيُرِحْ ذَبِيْحَتَهُ. ( مسلم كتاب الصيد )

# प्राण्यांशी वर्तन

## हदीस

**शद्दाद बिन अवस कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, सर्व श्रेष्ठ अल्लाह प्रत्येक वस्तुवर उपकार करणे हे अनिवार्य कर्तव्य ठरविले आहे. म्हणून जेव्हा तुम्ही एखाद्या जनावरास माराल तर योग्य रित्या मारा आणि जेव्हा त्याचा वध कराल तर योग्य रित्या वध करा. आपला सूरा धारदार करा आणि ज्याचा वध करावयाचा त्या प्राण्यास आराम पोहचवा.**(मुस्लिम-किताबुस्सैद)

## حديث

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عُمَرَ (رض) اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ عُذِّبَتْ اِمْرَأَةٌ فِیْ هِرَّةٍ سَجَنَتْهَا حَتّٰی مَاتَتْ فَدَخَلَتْ فِيْهَا النَّارَ ـ ـ ـ لَا هِیَ اَطْعَمَتْهَا وَلَا سَقَتْهَا اِذْ حَبَسَتْهَا وَلَاهِیَ تَرَكَتْهَا تَاْكُلُ مِنْ خِشَاشِ الْاَرْضِ. ( بخاری كتاب احاديث الانبياء )

## हदीस

**अब्दुल्लाह बिन उमर यांचे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, एका स्त्रीवर या कारणस्तव ईश-प्रकोप होईल की तिने एक मांजर कैद करुन ठेवले होते शेवटी ते त्याच स्थितीत मेले यामुळे ती स्त्री आगीत दाखल झाली ती ना स्वत: मांजराला काही खाण्या पिण्याला द्यायची व ना त्यास जमीनीवरील किडे खाण्यास मोकळे सोडायची.**

## स्पष्टीकरण

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे कृपाक्षेत्र इतके विस्तृत आहे की चतुष्पाद प्राणीहि त्यापासून वंचित नाही. उपरोक्त कथनात पैगंबरांनी प्राण्यांना अकारण त्रास न देण्याची ताकीद फर्माविली आहे आणि प्राण्यांना बांधून ठेवून त्यांना उपाशी मारण्यास सक्त गुन्हा ठरविला आहे.

प्राण्याचा वध करतांना जर सूरी धारदार नसेल तर त्या ''वध्य'' प्राण्यास त्रास पोहचतो म्हणून हा आदेश फर्माविला की सूरी धारदार केली जावी व शक्यतोवर त्या प्राण्याला आराम पोहचवला जावा.

## حديث

عَنْ شَدَّادِ بْنِ اَوْسٍ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ اَلْكَيِّسُ مَنْ دَانَ نَفْسَهُ وَعَمِلَ لِمَا بَعْدَ الْمَوْتِ وَالْعَاجِزُ مَن اَتْبَعَ نَفْسَهُ هَوَاهَا وَتَمَنَّى عَلَى اللّٰهِ.

( ترمذی ابواب صفة القيامة)

# बुद्धिमानांची आचरण पद्धति

## हदीस

**शद्दाद बिन अवस द्वारा उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले बुद्धिमान तो आहे जो स्वत:ला (अल्लाहचा) आज्ञाधारक बनवितो आणि मरणोत्तर जीवनाकरिता आचरण करतो आणि बुद्धिहीन तो आहे जो आपल्या इच्छा आकांक्षा दास बनतो व अल्लाहशी चुकीची अपेक्षा बाळगतो.**

(तिर्मिजी अबवाब सिफ्तुल कियामह)

## स्पष्टीकरण

मृत्यु म्हणजे जीवनाचा शेवट नव्हाकिंबुना मृत्युचा अर्थ कर्म-विश्वातून फलदायी विश्वात स्थानांतरित होणे. म्हाणून बुद्धिमान तो आहे याची दृष्टी परिणामावर असते व तदनुसार आपल्या वर्तनास दुरुस्त करतो. परंतु जो माणूस परिणामाची तमा न बाळगता मनाच्या इच्छा अभिलाषा मागे धावतो आणि आपल्या या चुकीच्या कर्म पद्धतिचा अवलंब करूनहि अशा गोड भ्रमात वावरतो की अल्लाह जवळ आपला कार्यभाग साध्य आहे. तो स्वत:ला इच्छा आकांक्षांचा गुलाम म्हणून सिद्ध करुन दाखवितो. बुद्धिमान, ज्ञानी व अनुभवी म्हणून नव्हे, असे लोक बुद्धी ने अगदीच कोरे असतात मग त्यांची गणना ऐहिक दृष्ट्या मोठ मोठया बुद्धिवंतांमयध्ये का होईना.





## حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَنْ كَانَ يُؤْمِنُ بِا للّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ فَلْيَقُلْ خَيْرًا اَوْ لِيَصْمُتْ وَمَنْ كَانَ يُؤْمِنُ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ فَلَايُؤْذِجَارَهُ وَمَنْ كَانَ يُؤْمِنُ بِاللّٰهِ وَالْيَوْمِ الْاٰخِرِ فَلْيُكْرِمْ ضَيْفَهُ. ( بخاری کتاب الرقاق )

# ईमानाच्या निकडी

## हदीस

**हज़रत अबू हुरैरा (रजी.) फ़र्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले जी व्यक्ति अल्लाह व अंतिम दिनावर ईमान ठेवत असेल तीने भलेपणाचे बोल बोलले पहिजे अन्यथा चूप रहावे, आणि जी व्यक्ति अल्लाह व अंतिम दिनावर ईमान ठेवत असेल तीने आपल्या शेजाऱ्याला त्रास देऊ नये आणि जो अल्लाह व अंतिम दिनावर ईमान ठेवत असेल त्याने आपल्या अतिथीचा सन्मान केला पाहिजे.** (बुखारी किताबुर्रिक़ाक)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये ईमानाच्या तीन महत्वपुर्ण निकडी वर्णिल्या गेल्या आहेत. एक बोलण्यात सावधता पाळणे, दुसरे शेजाऱ्याला त्रास न देणे आणि तिसरे अतिथि सत्कार अर्थात या तिन्ही गोष्टी सर्व सामान्य नितीमत्तेशी संबंधित आहेत. परंतु या बाबतीतहि लोक निष्काळजीने वागतात. निरर्थक व व्यर्थ गोष्टी करणे किंवा अपशब्द मुखातून बाहेर काढणे बेजबाबदार पणाचा पुरावा होय. वस्तुत: अल्लाह व अंतिम दिनावर ईमान ठेवण्याचा अर्थच हा आहे, माणसाचे आपल्या प्रत्येक कथनाबाबत व प्रत्येक कृतिबाबत अल्लाहसमोर उत्तर दायित्व कियामतीच्या दिवशी त्याला पार पाडावे लागेल. अशा स्वरूपाचे ईमान जर माहणसाच्या अंतर्यामी सुज्ञत: असेल तर तो निश्चितपणे आपल्या बोलण्यात संयमशील राहील, व एखाद्या भल्या गोष्टीसाठीच आपल्या जिब्हेचा वापर करील. अन्यथा मौन पाळणे श्रेयस्कर मानील. तात्पर्य जिब्हेची शुद्धता ईमानाचे फळ आहे. आणि जिब्हेवर नियंत्रण करणारी गोष्टी म्हणजे मरणोत्तर जीवनाची यथार्थ जाणीव होय.

तव्दतच शेजाऱ्याला त्रास न देणे आणि अतिथिचा मान सन्मान करणे हे देखील ईमानास आवश्यक असलेल्या बाबीपैकी होय. आणि या वरुन हे स्पष्ट होते की इस्लाम मध्ये ईमान हे एकाद्या चैतन्य रहित व अंधश्रद्धतेचे नाव नाही. किंबहुना ती एक सुज्ञावस्था आहे जी माणसात विश्वास निर्माण करते व त्यासोबतच त्याला तत्वप्रिय, नियमशील व जबाबदार जीवन व्यतीत करण्यास प्रवृत्त करते.

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اَلْاِيْمَانُ بِضْعٌ وَسَبْعُوْنَ شُعْبَةً، فَاَفْضَلُهَا قَوْلُ لَااِلٰهَ اِلَّا اللّٰهُ وَاَدْنَاهَا اِمَاطَةُ الْاَذٰی عَنِ الطَّرِيْقِ وَ الْحَيَآءُ شُعْبَةٌ مِنَ الْاِيْمَانِ. ( مسلم كتاب الايمان )

# व्यावहारिक जीवनावर ईमानाचा प्रभाव

## हदीस

**हज़रत अबू हुरैरा (रज़ी) म्हाणतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, ईमानाच्या सत्तरहून अधिक शाखा आहेत. यात सर्वाधिक श्रेष्ठ ''ला इलाहा इल्लल्लाहु'' म्हणणे होय आणि सामान्य दर्जाची, त्रासदायक वस्तूंना मार्गातून दूर करणे होय. आणि लज्जा ईमानाची एक (महत्वपूर्ण) शाखा आहे.**

(मुस्लिम किताबुल् ईमान)

## स्पष्टीकरण

अर्थात ईमान एखादी चैतन्यरहित श्रद्धा नव्हे, किंबहुना एका विशिष्ट वस्तुस्थितीचा स्वीकार करण्याचे नाव आहे. जेव्हा माणूस त्या वस्तुस्थितीचा जिच्याकडे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आवाहन करीत अहेत तिचा स्वीकार करतो तेव्हा तिचा प्रभाव त्याच्या संपूर्ण जीवनावर व्यवस्थितपणे होऊ लागतो व त्याच्या अंगी उतकृष्ट गुण निर्माण होतात. त्या गुणांमध्ये सर्व श्रेष्ठ गुण ''ला इलाहा इल्लल्लाह'' म्हणणे अर्थात एकेश्वर वादास मान्य करणे होय. आणि सामान्य गुण म्हणजे त्रासदायक वस्तूना मार्गातून दूर करणे होय या उद्देश्याने कि ईश्वराच्या दासांना इजा पोहचू नये. तात्पर्य लोकांशी खरीखुरी सहानुभूति बाळगणे ईमानाचे अविभाज्य अंग आहे.जनसेवेचे याहून अधिक उच्च स्थान आणखी कोणते बरे असू शकते?

हदीस मध्ये ''लज्जा ईमानाची एक महत्वपूर्ण शाखा आहे'' असे जे म्हटले गेले आहे तर यावरुन लज्जा संकोचाची महत्व स्पष्ट होते. अर्थ असा की लज्जा ईमानाचा कणा आहे. आणि चरित्र्यात लज्जेचे अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. कारण हाच तो गुणधर्म जो माणसाला दुष्कर्मापासून परावृत्त करतो.





## حديث

عَنْ عَبْدِ اللّٰهِ اِبْنِ عَمْرٍ وَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : لَيْسَ الْوَاصِلُ الْمُكَافِئُ وَلٰكِنْ الْوَاصِلُ الَّذِیْ اِذَا قُطِعَتْ رَحِمُهٗ وَصَلَهَا. ( البخاری كتاب الادب )

# संबंध–विच्छेदाच्या प्रत्युत्तरात स्नेह संबंध

**हज़रत अब्दुल्लाह बिन अम्र कथन करतात कि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले स्नेह संबंध राखणारी ती व्यक्ति नव्हे जी मोबदल्याच्या स्वरुपात असे करते किंबहुना स्नेह संबंध राखणारी व्यक्ति खरे पाहता ती आहे की जिच्या सह संबंध विच्छेदाचा व्यवहार केला जात असतानाहि ती स्नेह संबंध राखते.**

(अल बुखारी किताबुल् अदब)

## स्पष्टीकरण

अर्थात माणसाला आपल्याला जबाबदारीची जाणीव असावयास हवी व त्याने आपले कर्तव्य पार पाडण्याचा पूरेपूर प्रयत्न केला पाहिजे. मग आप्त स्वीकारयांना आपल्या जबाबदारीची जाणीव होवो अथवा न होवे. त्यांनी हक्क अदा करावेत ''स्नेह संबंधाच्या उत्तरात स्नेह संबंध राखणे'' ही माणसाची गुणवत्ता माही किंबहुना संबंध विच्छेदाचे वर्तन होत असून देखील त्याने स्नेह संबंध कायम राखावा. ईश्वरला हीच गोष्ट पसंत आहे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची ही उदात्त शिकवण माणसाला चारित्र्याचा अत्युच्च शिखरावर नेणारी आहे. अर्थात उच्च चारित्र्याची ही शिकवण एका पैगंबराचीच शिकवण असू शकते !

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ جَاءَ رَجُلٌ اِلٰی رَسُوْلِ اللّٰہِ ﷺ
فَقَالَ يَا رَسُوْلَ اللّٰہِ مَنْ اَحَقُّ بِحُسْنِ صَحَابَتِیْ؟ قَالَ : اُمُّکَ
قَالَ ثُمَّ مَنْ؟ قَالَ اُمُّکَ قَالَ ثُمَّ مَنْ؟ قَالَ اُمُّکَ قَالَ ثُمَّ مَنْ ؟
قَالَ ثُمَّ اَبُوْکَ . ( البخاری کتاب الادب )

# माता पित्याशी चांगली वागणूक

## हदीस

**हज़रत अबू हुरैरा फर्मावितात की एक माणूस पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत उपस्थित झाला व त्याने विचारले हे अल्लाहचे प्रेषित ! माझ्या सदव्यवहारास सर्वात अधिक योग्य कोण आहे ? फर्माविले तुमची आई. त्याने विचारले या नंतर कोण? फर्माविले तुमची आई. त्याने विचारले या नंतर कोण? फर्माविले, तुमची आई. त्याने विचारले या नंतर कोण? फर्माविले, यांतर तुमचा पिता.** (अल-बुखारी किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

पवित्र क़ुरआनात मातापित्याशी चांगली वागणूक राखण्याची सक्त ताकीद केली गेली आहे. आणि मातेला बाळाकरिता जे कष्ट झेलावे लागतात त्यांचाहि उल्लेख केला गेला आहे. क़ुरआनातील त्या उल्लेखात जे संकेत गृहीत होता तो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी उघड केला, तो हा की सद्‌व्यवहारा बाबत, मातेचा हक्क पित्याच्या हक्काहुन श्रेष्ठ आहे.





## حديث

عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰہِ ﷺ قَالَ : لَيْسَ الشَّدِيْدُ بِالصُّرْعَةِ
اِنَّمَا الشَّدِيْدُ الَّذِیْ يَمْلِکُ نَفْسَهٗ عِنْدَ الْغَضَبِ . ( بخاری کتاب الادب )

# क्रोधावस्थेत आत्मा–नियंत्रण राखणे

## हदीस

**अबु हुरैरा द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले की बलवान तो नव्हे जो लोकांना चित करतो, किंबाहुना बलवान खऱ्या अर्थाने तो आहे जो क्रोधावस्थेत आत्मनियंत्रण राखतो.** (बुखारी किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

येथे हे स्पष्ट करणे अभिप्रेत आहे कि एखाद्याला चित चरणे तेवढे कठीण नाही जेवढे रागाच्या भरात स्वत:वर काबू राखणे होय. म्हणून जो माणुस रागाच्या भरात स्वत:वर नियंत्रण राखतो तो खरे पाहता सैतानाला चित करतो. यास्वत असाच माणूस खरोखर ताकतवर म्हटला जाण्यास पात्र आहे.

हे अलंकार युक्त वर्णन आहे ज्यात क्रोधावर नियंत्रण राखण्याची व भावनांच्या आहारी न जाण्याची ताकीद केली गेली आहे.

## حديث

عَنْ جَابِرِ ابْنِ عَبْدِاللّٰہِ اَنَّ رَسُوْلَ اللّٰہِ ﷺ قَالَ: رَحِمَ اللّٰہُ رَجُلًا
سَمْحًا اِذَا بَاعَ وَ اِذَا اشْتَرٰی وَاِذَا اقْتَضٰی.( بخاری کتاب البیوع)

# व्यवहारात मृदुता व सपन्नता अंगिकारणे

## हदीस

**हज़रत जाबीर इब्ने अब्दुल्लाह द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, अल्लाह त्या व्यक्तिवर दया करो जी**

**खरेदी व (कर्ज़ात) तगादा करण्यात कोमलता व संपन्नता अंगिकारते.**

(बुखारी किताबुल बुयु)

## स्पष्टीकरण

अर्थात जो माणूस खरेदी विक्रीच्या व्यवहारात न्यूनता करीत नाही व झिक झिक करीत नाही तसेच ऋणको कडून कर्जाची रक्कम परत मागण्यात सक्ति करीत नाही किंबहुना कोमलता, विशाल हृदयता व दृष्टी आड करण्याची वृत्ति अंगिकारतो तर त्याची ही निती त्याला ईशकृपेस पात्र बनविते.





# (३)
# बिघाड निमार्ण करणाऱ्या गोष्टी

## حدیث

عَنْ اَبِیْ ذَرٍ عَنِ النَّبِیِّ ﷺ فِیْمَا رَوٰی عَنِ اللّٰہِ تَبَارَکَ وَ تَعَالٰی اَنَّهُ قَالَ: یَا عِبَادِیْ اِنِّیْ حَرَّمْتُ الظُّلْمَ عَلٰی نَفْسِیْ وَ جَعَلْتُهُ بَیْنَکُمْ مُحَرَّمًا فَلَا تَظَالَمُوْا یَا عِبَادِیْ کُلُّکُمْ ضَالٌّ اِلَّا مَنْ هَدَیْتُهُ فَاسْتَهْدُوْنِیْ اَهْدِکُمْ. یَا عِبَادِیْ کُلُّکُمْ جَائِعٌ اِلَّا اَطْعَمْتُهُ فَاسْتَطْعِمُوْنِیْ اُطْعِمْکُمْ. یَا عِبَادِیْ کُلُّکُمْ عَارٍ اِلَّا مَنْ کَسَوْتُهُ فَاسْتَکْسُوْنِیْ اَکْسُکُمْ یَا عِبَادِیْ اِنَّکُمْ تُخْطِئُوْنَ بِاللَّیْلِ وَ النَّهَارِ وَ اَنَا اَغْفِرُ الذُّنُوْبَ جَمِیْعًا فَاسْتَغْفِرُوْنِیْ اَغْفِرْ لَکُمْ یَاعِبَادِیْ اِنَّکُمْ لَنْ تَبْلُغُوْا ضَرِّیْ فَتَضُرُّوْنِیْ وَلَنْ تَبْلُغُوْا نَفْعِیْ فَتَنْفَعُوْنِیْ. یَا عِبَادِیْ لَوْ اَنَّ اَوَّلَکُمْ وَ آخِرَکُمْ وَ اِنْسَکُمْ وَ جِنَّکُمْ کَانُوْا عَلٰی اَتْقٰی قَلْبِ رَجُلٍ وَاحِدٍ مِنْکُمْ مَازَادَ ذٰلِکَ فِیْ مُلْکِیْ شَیْئًا. یَا عِبَادِیْ لَوْ اَنَّ اَوَّلَکُمْ وَ آخِرَکُمْ وَ اِنْسَکُمْ وَجِنَّکُمْ کَانُوْا عَلٰی اَفْجَرِ قَلْبِ رَجُلٍ وَاحِدٍ مِّنْکُمْ مَانَقَصَ ذٰلِکَ مِنْ مُلْکِیْ شَیْئًا. یَا عِبَادِیْ لَوْ اَنَّ اَوَّلَکُمْ وَآخِرَکُمْ وَاِنْسَکُمْ وَ جِنَّکُمْ قَامُوْا فِیْ صَعِیْدٍ وَاحِدٍ فَسَأَلُوْنِیْ فَاَعْطَیْتُ کَلَّ اِنْسَانٍ مَسْئَلَتَهُ مَا نَقَصَ ذٰلِکَ مِمَّا عِنْدِیْ اِلَّا کَمَا یَنْقُصُ الْمِخْیَطُ اِذَا اُدْخِلَ الْبَحْرَ یَا عِبَادِیْ اِنَّمَا هِیَ اَعْمَالُکُمْ اُحْصِیْهَا لَکُمْ ثُمَّ اُوَفِّیْکُمْ اِیَّاهَا فَمَنْ وَجَدَ خَیْرًا فَلْیَحْمَدِ اللّٰہَ وَمَنْ وَجَدَ غَیْرَ ذٰلِکَ فَلَا یَلُوْمَنَّ اِلَّا نَفْسَهُ. ( صحیح مسلم کتاب البر)

# अत्याचार व अतिरेक

## हदीस

**अबु जर उल्लेखितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो, हे माझ्या दासांनो ! अत्याचाराला मी स्वत: साठी हराम केले आहे आणि तुमच्या दरम्यान देखील. यास हराम ठरविले**





**आहे म्हणून एकमेकावर अत्याचार करु नका.**

**हे माझ्या दासांनो ! ज्यास मी मार्गदर्शन करीन त्याच्या व्यक्तिरिक्त तुम्ही सर्व मार्ग भ्रष्ट आहात म्हणून माझ्याकडून मार्गदर्शन मागा.मी तुम्हाला मार्गदर्शन करेन.**

**हे माझ्या दासांनो ! ज्यास मी खाऊ घालीन त्याच्या व्यतिरिक्त तुम्ही सर्व उपाशी आहात म्हणून माझ्याकडे जेवण खाद्य मागा, मी तुम्हाला खाऊ घालीन.**

**हे माझ्या दासांनो !ज्यास मी कपडे घालीन त्याच्या व्यतिरिक्त तुम्ही सर्व नागडे आहात म्हणून माझ्याकडे कपडे माग. मी तुम्हाला कपडे घालीन.**

**हे माझ्या दासांनो ! तुम्ही रात्रदिवस गुन्हा करता आणि केवळ मीच प्रत्येक प्रकारचा गुन्हा माफ करतो म्हणून माझ्याकडे माफी मागा. मी तुम्हाला माफ़ करीन.**

**हे माझ्या दासांनो !तुम्ही मला ना नुकसान पोहचवु शकाल ना नफ़ा पोहचवू शकाल.**

**हे माझ्या दासांनो !जर तुमच्यातील मागचे पुढचे सर्व मानव व जिन्न सर्वाधिक संयमशील माणसा सारखे होतील तरीदेखील माझ्या साम्राज्यात काहीच वाढ होणार नाही.**

**हे माझ्या दासांनो ! जर तुमच्यातील मागचे पुढचे सर्व मनुष्य व जिन्न सर्वाधिक दुराचार माणसासारखे होतील तरीहि त्यामुळे माझ्या साम्राज्यात काही कमतरता जाणवणार नाही.**

**हे माझ्या दासांनो ! जर तुमच्यातील पुढचे मागेचे सर्व मनुष्य व जिन्नांनी एकाद्या विस्तृत मैदानात जमा होऊन माझ्या जवळ याचना केली व मी प्रत्येक व्यक्तिची याचना पूर्ण केली तर अशाने माझ्या खजिन्यात कीहीच कमी होणार नाही. मात्र एवढया कमी शिवाय जी समुद्रात सूई बुडविल्याने होते.**

**हे माझ्या दासांनो ! ही तुमची कर्मे होत ज्यांची मी गणना करीत आहे मग तुम्हाला त्यांचा पूरेपूर मोबदला देईन. तेव्हा जो कोणी भलेपणा प्राप्त करील त्याने अल्लाहची कृतज्ञता व्यक्त करावी आणि जो भलेपणा खेरीज अन्य एखादी गोष्ट प्राप्त करील त्याने स्वत:लाच दोष द्यावा.**

(मुस्लिम किताबुल बिर)

## स्पष्टीकरण

या हदीसमध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी स्पष्टीकरणासह सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या कथनाचा उल्लेख केला आहे. या स्वरूपाच्या हदीसचे स्थान हदीस संग्रहात अत्यंत उच्च आहे. आणि अशा हदीसला ''हदीसे कुदसी'' म्हाणतात.

या हदीसमध्ये सर्वश्रेष्ठ अल्लाहने दयेने व प्रेमळपणाने आपल्या दासांना संबोधून फर्माविले आहे. ''हे माझ्या दासांनो या शब्दाची पुनरावृत्ति त्याच्या या प्रेमळपणाकडे संकेत करते अणि ही संबोधन शैली माणसाच्या आत्मानुभूतिस जागृत करते आणि ईश दासांवर अत्याचार व अतिरेक न व्हावा या हेतुने त्यांस प्रेरित करते.

एकमेकांवर अत्याचार न करण्याचा आदेश देत असतांना माणसाला ही ताकीद केली गेली आहे की सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्वसमर्थ व सर्वसत्ताधिकार असुनहि कोणावर देखील तिळमात्र अन्याय करीत नाही. मग मानव करिता हे कसे योग्य ठरू शकते की त्याने अल्लाह प्रणित अधिकारांचा इतरांवर अत्याचार करण्याकरीता वापर करावा. या क्षणिक सामर्थ्यांना प्राप्त करुन एखाद्याने गर्वोन्नत होणे व इतरांवर अत्याचार करण्यास प्रवृत्त होणे नीचपणाची गोष्ट होय. मनुष्य स्वभाव अत्याचारीशी घृणा करतो. आणि अल्लाहचा दीन (धर्म) अकारण अतिरेकास कदापि योग्य ठरवित नाही. मग तो अत्याचार वा अतिरेक कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तिवर का होईना.

आजमानवता ज्या अत्याचारांची शिकार आहे. आणि एक समुह दुसऱ्या समुहाच्या विरुद्ध एक पंथ दुसऱ्या पंथाविरुद्ध व एक जाती समूह दुसऱ्या जाती समुहाविरुद्ध ज्या प्रमाणात अतिरेकास कार्यरत आहे अणि मनुष्य रक्ताचा जो सर्वत्र सडा शिंपला जात आहे त्याचा खराखरा इलाज या स्वरूपात शक्य आहे. वस्तुत: माणसाने आपल्या निर्मात्यास व स्वामीस ओळखावे, व त्याच्याच कडे वळावे. अशाने त्यांचा अंतरात्मा जागृत होईल व तो ईश-निर्मितीशी न्याय्य वर्तन करेल.

ही हदीस सर्व श्रेष्ठ अल्लाहच्या महानतेविषयाच्या कल्पेनेस प्रस्तुत करते व त्यासोबतच एकेश्वर वादास स्वीकृत करण्याचे आवाहन करते. आणि ही वस्तुस्थिती लक्षात आणून देते की या सर्व सृष्टीचा सर्वोच्च सत्ताधारी आणि आम्हा सर्वांचा दाता व पालनहार केवळ सर्वश्रेष्ठ अल्लाह आहे. म्हणूण आम्ही त्याच्याशीच अपेक्षा बाळगावी व जे काही मागावयाचे त्याच्याचकडे मागावे. तो अशा अवाढव्य खजिन्यांचा मालक आहे की आम्ही त्याविषयी कल्पना सुद्धा करु शकत नाही. त्याच्याखेरीज अन्य एखादा दाता असण्याची कल्पना खोटी आहे. मग ती मुर्ति असो व नक्षंत्र. देवी असो किंवा देवता जिन्न असो अथवा फ़िरिश्ता. किंबहुना वली असो कि पैगंबर.

हदीसचा शेवटचा भाग कर्म-फळाची कल्पना प्रस्तुत करतो. चांगल्या कर्मांचे प्रतिफळ चांगले असेल व दुष्कर्मांची परिणिती वाईट असेल.

सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या या स्पष्ट उपदेशानंतरहि ज्यांनी स्वत:ला सावरुन घेतले नाही ते आपल्या दुष्परिणितीस स्वत:च जबाबदार आहेत.





# حديث

**عَنُ ابُنِ عُمَرَ (رض) قَالَ قَالَ رَسُوُلُ اللّٰهِ ﷺ : اِنَّ الظُّلُمَ ظُلُمَاتٌ يَوُمَ الُقِيَامَةِ.** ( مسلم ـ كتاب الادب )

# हदीस

**इब्ने उमर (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले क़ियामतीच्या दिवशी अत्याचार जुल्मत (अंध:कारा) च्या स्वरूपात येईल.**

**(मुस्लिम–किताबुल् अदब)**

# स्पष्टीकरण

जेव्हा एखादा मनुष्य दुसऱ्यावर अत्याचार करतो तेव्हा तो आंधळा होतो. जर त्याने डोळसपणे पाहीले असते की मी काय करीत आहे तर त्याच्या हातुन अत्याचार घडलाच नसता. परंतु गर्व, स्वार्थपणा, पक्षपातीपणा त्याला आंधळा बनवितो. हा मानसिक अंधार जो अत्याचार व अतिरेकामुळे जगात निर्माण होतो. क़ियामतीच्या दिवशी साऱ्या विश्वावर पूर्णत: आच्छदित होईल. जणू जगावर या अंध:काराचे घनदाट आवरणे पडलेली असतील.

# حديث

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عُمَرَ (رض) قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ مَنْ اَخَذَ شَيْئًا مِنَ الْاَرْضِ بِغَيْرِ حَقِّهٖ خُسِفَ بِهٖ يَوْمَ الْقِيَامَةِ اِلٰى سَبْعِ اَرْضِيْنَ .(بخاری۔ کتاب بدء الخلق )

# दुसऱ्याच्या ज़मीनीवर बलपूर्वक कब्जा

## हदीस

**अब्दुल्लाह बिन उमर (रज़ी.) कथन करतात की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले जी व्यक्ति नाहक एखाद्याच्या ज़मीनीवर कब्ज़ा करील, तीला कियामतीच्या दिवशी सात ज़मीनीपर्यंत धसवले जाईल.**

(मुस्लिम–किताबुल् अदब)

## स्पष्टीकरण

इतरांच्या ज़मीनीवर बळजबरीने कब्ज़ा करणे मोठे अत्याचारमय कृत्य होय, परंतु हे दुष्कृत्य करणारे जगात पूर्वीहि कमी नव्हते आणि आजहि त्यांची कमतरता नाही. याचे कारण हे आहे की मनुष्य आपल्या त्या परिणितीशी अनभिज्ञ आहे जी मरणोत्तर जीवनात घडून येणार आहे जर त्याला हा विश्वास होईल की एखाद्याच्या ज़मीनीवर बळजबरीने क़ब्ज़ा करण्याचा परिणाम सात ज़मीनीत धसविले जाण्याचा असेल तर तो कधीही कोणाच्या इंचभर ज़मीनीवर क़ब्ज़ा करण्याचे धाडस करणार नाही. मग कायद्याचा बडगा याच्य शिरावर लोबकळत असो व नसो.





# حديث

عَنْ جُبَيْرِ بْنِ مُطْعِمٍ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ لَا يَدْخُلُ الْجَنَّةَ قَاطِعُ رَحِمٍ. ( مسلم کتاب البر )

# संबंध विच्छेद

## हदीस

**हज़रत जुबेर बिन मुतइम द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, स्नेह संबंध तोडणारा जन्नत मध्ये जाणार नाही.**

(मुस्लिम किताबुल बिर)

## स्पष्टीकरण

अर्थात आप्त स्वकीयांशी गैरवर्तन करणे व नाते संबंध तोडणे हे इस्लामच्या दृष्टीने एवढे मोठे पाप आहे की ज्याने हे पाप केले त्यावर जन्नतचे दरवाजे बंद होतात. म्हणून नाती गोती संबंध तोडणाऱ्यानी या गोड भ्रमात राहता कामा नये का आपल्या परंपरागत धार्मिक वृत्तीच्या आधारे ते जन्नत मध्ये जाण्यास पात्र होतील. जन्नतच्या योग्य केवळ तेच लोक असतील ज्यांच्या अंगी तक़वा (ईश-भय) असेल आणि ज्यांच्या अंगी ईश भय असेल तो नाते संबंध तोडण्याचे कृत्य करणार नाही, किंबहुना जोडण्याच्या प्रयत्न कतील.

# حديث

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ قال سَمِعْتُ النَّبِيَّ ﷺ يَقُوْلُ: لَوْ كَانَ لِابْنِ آدَمَ وَادِيَانِ مِنْ مَالٍ لَا بْتَغٰى ثَالِثًا وَلَا يَمْلَأُ جَوْفَ ابْنِ آدَمَ اِلَّا التُّرَابُ. وَيَتُوْبُ اللّٰهُ عَلٰى مَنْ تَابَ. ( بخاری کتاب الرقاق )

# धन लालसा

## हदीस

**हज़रत इब्ने अब्बास द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले जर माणसाजवळ धनसम्पत्तिने भरलेली दोन खिंडी असतील तरीहितो तिसऱ्याची अभिलाषा बाळगील. माणसाचे पोट तार मातीच भरेल आणि अल्लाह अशा व्यक्तिकडे आपले पूर्ण लक्ष देतो जो त्याच्या दिशेने बळतो.** (बुखारी किताबुर-रिक़ाक़)

## स्पष्टीकरण

हावरेपणाचे हे मोठे अलंकारीक उदाहरण होय. माणुस धनाचा इतका लोभी झाला आहे की त्याला कधीहि तृप्ति लाभत नाही. तो अधिकधिक धन सम्पत्ति प्राप्त करण्याच्या अभिलेषेत स्वत:ला व्यस्त ठेवतो व आपले सर्व आयुष्य याच नादात खपवितो, वस्तुत: सर्वश्रेष्ठ अल्लाहने जीवन अत्यंत उच्च ध्येयाकारिता प्रदान केले आहे. परंतु मानव धनसम्पत्ति मागे धावत राहण्यात इतका तल्लीन होतो की, जीवनाचे एखादे उच्च ध्येय आहे याची त्याला जाणीव सुद्धा होत नाही. उघड आहे की अशी व्यक्ति आपल्या ध्येय उधिष्टात अगदी निष्फळ आहे. आणि जेव्हा परिणाम उदयास येतील तेव्हा त्याला हे कळून येईल की तो जगात एक अयशस्वी जीवन व्यतीत करीत होता व त्याच्या निशिबी निराशेशिवाय काहीच असणार नाही. ''माणसाचे पोट तर मातीच भरेल'' याचा अर्थ हा की माणसाची लालसा कबरीत पोहचल्यानंतरच संपेल आणि अल्लाह अशा व्यक्तिकडे आपले पूर्ण लक्ष देतो जी त्याच्या दिशेने वळते. याचा अर्थ असा की जो माणुस ईश्वराच्या आदेशानुसार जीवन व्यतीत करू लागतो त्याला ईश्वर खात्रीने मार्गदर्शन करील व त्याला धनलालसेपासुन सुरक्षित ठेवून जीवनाच्या खऱ्या ध्येयउद्दिष्टा करीता प्रयत्न करण्याची सुबुद्धि प्रदान करील.

### حديث

عَنْ اَبِیْ بَکْرٍاَنَّ رَسُوْلَ اللّٰہِ ﷺ قَالَ لَایَدْخُلُ الجَنَّۃَ جَسَدٌ غُذِیَ بِالْحَرَامِ. (مشکوٰۃ کتاب البیوع رواہ البیہقی فی شعب الایمان)

# निषिद्ध वस्तू खाणे

## हदीस

**हज़रत अबु बकर सिद्दीक (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, ते शरीर जन्नत मध्ये दाखल होणार नाही ज्याचे पोषण निषिद्ध वस्तुनी झाले असेल.**

(मिश्कात किताबुल बुयू हवाला बैहकी)





### حديث

عَنْ جابِرٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰہِ ﷺ لَا یَدْخُلُ الْجَنَّۃَ لَحْمٌ نَبَتَ مِنَ السُّحْتِ، وَ کُلُّ لَحْمٍ نَبَتَ مِنَ السُّحْتِ کَانَتِ النَّارُ اَوْلٰی بِہٖ. ( مشکوٰۃ کتاب البیوع رواہ احمد )

## हदीस

**हज़रत जाबीर (रज़ी.) फर्मावितात, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, 'ते मांस जन्नतमध्ये दाखल होणार नाही ज्याचे पोषण निषेद्ध वस्तुंनी झाले असेल आणि असे ते प्रत्येक मांस जे निषेद्ध ''वस्तुंनी वाढीस लागले त्यास दोजख अनिवार्य आहे.** (मिश्कात किताबुल बुयू-रवाह अहमद)

## स्पष्टीकरण

यात अशा लोकांना सावधगिरीची सूचना दिली गेली आहे जे ''भाकरी'स जीवन–ध्येय बनवितात आणि भाकरीस योग्य-अयोग्य कशाहि मार्गाने प्राप्त करण्यास तयार असतात अर्थोपाजंना संबंधी ते शूद्धतेची कसलीहि कल्पना बाळगत नाही आणि या उच्च नैतिक मूल्यास संकुचित दृष्टीकोन समजतात. परंतु इस्लाम या वस्तुस्थिती बाबत सावध करतो की अयोग्य (वाइट) मार्गाने प्राप्त केलेली भाकरी शरीराचे पोषण तर करू शकते परंतु सत्कर्म करणारे रक्त निर्माण करू शकत नाही. आणि ज्या शरीरात दुराचारी वृत्तीचे रक्त प्रवाही आहे ते आगीतच होरपळले जाण्यायोग्य आहे. उघड आहे. अशुद्ध व दुराचारी शरीराला जन्नतमध्ये कोठे स्थान लाभेल?

### حديث

عَنْ اَبِیْ ھُرَیْرَۃَ (رض) عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ یَاتِیْ عَلَی النَّاسِ زَمَانٌ لَایُبَالِی الْمَرْءُ مَا اَخَذَ مِنْہُ أَمِنَ الْحَلَالِ اَمْ مِنَ الْحَرَامِ . ( بخاری کتاب البیوع )

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले. लोकांवर एक वेळ अशी येईल की माणसाला या गोष्टीची पर्वा नसेल की त्याने कोणत्या मार्गाने धनसंपदा प्राप्त केली. हलाल मार्गाने किंवा हराम मार्गा.**

**(बुख़ारी किताबुल बुयू)**

# स्पष्टीकरण

हदीस मध्ये ज्या नैतिक ऱ्हासाचे भाकित प्रकट केले गेले आहे. त्यात आजचा मनुष्य समाजफार वाईटरित्या ग्रस्त आहे. योग्य–अयोग्यातील विवेक नसल्या सारखाच आहे किंबंहुना लोकांवर फक्त कमावण्याचे भूत सवार आहे. मग ती कमाई कोणत्याही मार्गाने असो. अगदी विचार करण्यासारखी गोष्ट आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे हे भाकित कशा तऱ्हेने शब्दशः सत्य सिद्ध होत आहे.

## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَيُّهَا النَّاسُ اِنَّ اللّٰهَ طَيِّبٌ لَا يَقْبَلُ اِلَّا طَيِّبًا وَاَنَّ اللّٰهَ اَمَرَ الْمُؤْمِنِيْنَ بِمَا اَمَرَ بِهِ الْمُرْسَلِيْنَ فَقَالَ يَا اَيُّهَا الرُّسُلُ كُلُوْا مِنَ الطَّيِّبَاتِ وَاعْمَلُوْا صَالِحاً اِنِّیْ بِمَا تَعْمَلُوْنَ عَلِيْمٌ وَقَالَ يَا اَيُّهَاالَّذِيْنَ آمَنُوْا كُلُوْا مِنَ طَيِّبَاتِ مَا رَزَقْنَا كُمْ. ثُمَّ ذَكَرَ الرَّجُلَ يُطِيْلُ السَّفَرَ اَشْعَثَ اَغْبَرَ يَمُدُّ يَدَيْهِ اِلَی السَّمَآءِ يَا رَبِّ ! يَا رَبِّ ! وَمَطْعَمُهُ حَرَامٌ وَمَشْرَبُهُ حَرَامٌ وَ مَلْبَسُهُ حَرَامٌ وَ غُذِیَ بِالْحَرَامِ فَاَنّٰی يُسْتَجَابُ لِذَٰلِکَ .( مسلم كتاب الزكاة)**

# हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह सर्व दोषांपासून मुक्त आहे व स्वच्छ शुद्ध वस्तुनाच कबूल फर्मावितो. त्याने मोमीनांना त्या गोष्टीचा आदेश दिला आहे ज्या संबंधीचा आदेश त्याने प्रेषिताना दिला आहे. अल्लाहचे फर्मान आहे.**

**يَآَيُّهَاالرُّسُلُ كُلُوْا مِنَ الطَيِّبَاتِ وَاعْمَلُوْا صَالِحاً اِنِّیْ بِمَا تَعْمَلُوْنَ عَلِيْمٌ.** ( المؤمنون ـ ٥١)

**‘‘हे प्रेषितानो ! स्वच्छ शुद्ध वस्तू खा आणि पुण्यशील आचरण करा. तुम्ही जे काही करता ते मी जाणून आहे.’’ (अलमोमीनून. ५१)**

**तवद्तच फर्माविले,** **يَآَيُّهَاالَّذِيْنَ آمَنُوْا كُلُوْا مِنْ طَيِّبَاتِ مَا رَزَقْنَاكُمْ** ( بقره۔ ١٧٢)

**हे ईमान धारकांनो ! स्वच्छ शुद्ध वस्तु खा ज्या आम्ही तुम्हाला प्रदान केल्या आहेत. (बक़रा. १७१)**

**कथनकर्ता म्हणतो, नंतर पैगंबरानी अशा व्यक्तिचा उल्लेख केला जो (हज्ज यात्रे करीता) लांब प्रवास करतो ज्याचे केस (प्रवासामुळे) अस्ताव्यस्त व धूलमिश्रित होत आहेत. तो आपल्या हातांना आकाशाच्या दिशेने उंचावून दुआ (प्रार्थना) करीत आहे –‘हे माझ्यां पालनकर्त्या ! वस्तुतः त्यांचे खाणे त्याचे पिणे व त्याच्या पोषाख**





**सर्व हरामाचे आहे. व हराम भोजनावर त्याचे पोषण झाले आहे. मग त्याची प्रार्थना कशी बरे कबूल होइल?**

(मुस्लिम किताबुज जकात)

# स्पष्टीकरण

इस्लाम अर्थोपार्जना साठी केवळ योग्य मार्गाचा अंबलब करण्याची ताकीद करतो इस्लामची ही शिकवण आहे की संपूर्ण जीवनात ज्यातअर्थिक जीवन सम्मिलित आहे सर्वश्रेष्ठ अल्लाहचे आदेश व मार्गदर्शनाचे पालन करा. करंतु जी व्यक्ति हराम धन कमावित असेल व तिला अल्लाहच्या आदेशाची पर्वा नसेल. तर तिचे अल्लाहशी प्रार्थना करणे निरर्थक आहे केवळ तीच प्रार्थना स्वीकृत होऊ शकते जिच्यामागे अल्लाहच्या आज्ञापालनाची भावना कार्यरत असावी. व जी अगदी निष्कपट व शुद्ध मनांने केली गेली असावी.

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ النَّبِیَّ ﷺ قَالَ مَا مِنْ یَوْمٍ یُصْبِحُ الْعِبَادُ فِیْهِ اِلَّا مَلَکَانِ یَنْزِلَانِ فَیَقُوْلُ اَحَدُهُمَا اللّٰهُمَّ اَعْطِ مُنْفِقًا خَلَفًا وَیَقُوْلُ الاٰخَرُ اللّٰهُمَّ اَعْطِ مُمْسِکاً تَلَفاً.

( بخاری کتاب الزکاۃ)

# कृपणता

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, दररोज प्रात: काळी दोन फिरिश्ते अवतरतात, एक म्हणतो हे अल्लाह ! खर्च करणाऱ्यास खर्चा पाठो पाठ आणखी प्रदान कर आणि दुसरा म्हणतो, हे अल्लाह ! कृपणतेच्या धनास नष्ट कर.**

(बुखारी किताबुज जकात)

## स्पष्टीकरण

जे धन हक्क पूर्ततेत खर्च केले जाते ते समृद्धिशील असते. खर्च केलेल्या धनाजागी सर्वश्रेष्ठ अल्लाह दुसरे धन प्रदान करतो. परंतु ज्या लोकांच्या बुद्धिवर भौतिकतेचा पगाड असतो ते असे गृहीत धरतात की धन खर्च केल्याने घटते म्हणून ते हक्क अदा करण्यातहि कृपाणतेने काम घेतात ज्याचा परिणाम हा निघतो की त्यांचा धन सत्कार्यासाठी खर्च होत नाही. किबहुना त्याच्या करिता सर्वनाशाचे कारण बनते.

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْــرَةَ (رض) اَنَّــهُ سَمِعَ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ یَقُوْلُ : مِثْلُ الْبَخِیْلِ وَالْمُنْفِقِ کَمَثَلِ رَجُلَیْنِ عَلَیْهِمَا جُبَّتَانِ مِنْ حَدِیْدٍ مِنْ ثُدِیِّهِمَا اِلٰی تَرَاقِیْهِمَا فَاَمَّا الْمُنْفِقُ فَلَا یُنْفِقُ اِلَّا سَبَغَتْ اَوْ وَفَرَتْ عَلٰی جِلْدِهٖ حَتّٰی تُخْفِیَ بَنَانَهُ وَتَعْفُوَ اَثَرَهُ ، وَاَمَّا الْبَخِیْلُ فَلَا یُرِیْدُ اَنْ یُنْفِقَ شَیْئًا اِلَّا لَزِقَتْ کُلُّ حَلَقَةٍ مَکَانَهَا فَهُوَ یُوَسِّعُهَا وَلَا تَتَّسِعُ .( بخاری کتاب الزکوۃ)





## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले कृपणता करणारे व खर्च करणारे यांचे उदाहरण असे आहे जणू दोन माणसांनी लोखंडी अंगरखा (घातले असावे जो छातीपासून गळयाच्या हाडा पर्यंत असावे. खर्च करणारा जेव्हा खर्च करतो तेव्हा त्याचा अंगरखा विस्तृत होऊन संपूर्ण शरीराला झाकून घेतो. येथापावेतो की त्याची बोटे व त्याची पदचिन्हे सुद्ध झाकली जातात याउलट कृपण माणूस जेव्हा खर्च करण्याचा संकल्प करतो तेव्हा चिलखताच्या सर्व कडया आपल्या जागी संकुचित होतात तो त्यास विस्तृत करु इच्छितो परंतु ते विस्तृत होत नाही.**

## स्पष्टीकरण

ही उदाहरणे खर्च करणाऱ्यांची अर्थात व्यक्तिंची होत. खर्च करणाऱ्याचे चिलखत विस्तृत होण्याचा अर्थ ही की तो अल्लाहच्या मार्गात खर्च करण्याबाबत कसलाहि संकोच बाळगत नाही किंबहुना मोठया अभिरुचिने खर्च करतो ज्यामूळे मनाचे दरवाजे उघडण्याची कैफियत निर्माण होते. आणि मानसिक समाधान लाभते. याविपरीत जेव्हा कृपण व्यक्ति समोर फुटीरतेची गरज उद्‌भवते व त्या व्यक्तिच्या मनात खर्च करण्याचा विचार येत असला तरी त्याची कृपणता त्याला तसे करु देत नाही. व तो दांभिक वृत्ती पासून परावृत्त होतो. अशा प्रकारे त्याच्या अंगी दु:स्थिती व दुराचाराची कैफ़ियत निर्माण होते. जी त्याला बेचैनी. विमनस्कता व व्याकुळतेत ग्रस्त करते.

## حديث

عَنْ عَبْدِ اللّٰهِ بِنْ عَمْرٍو اَنَّ النَّبِیَّ ﷺ قَالَ اَرْبَعٌ مَنْ کُنَّ فِیْهِ کَانَ مُنَافِقًا خَالِصاً وَمَنْ کَانَتْ فِیْهِ خَصْلَةٌ مِنْهُنَّ کَانَتْ فِیْهِ خَصْلَةٌ مِنَ النِّفَاقِ حَتّٰی یَدَعَهَا اِذَا اُؤْتُمِنَ خَانَ وَاِذَا حَدَّثَ کَذَبَ وَاِذَا عَاهَدَ غَدَرَ وَاِذَا خَاصَمَ فَجَرَ.( بخاری کتاب الایمان )

# दांभिकतेची गुणवैशिष्टये

## हदीस

**अब्दुल्लाह बिन अम्र द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले चार गोष्टी अशा आहेत की ज्यात एकत्रित होतील तो निव्वळ मुनाफ़िक (दांभिक) आहे, आणि ज्यात या पैकी कोणताही**

**एक वैशिष्टय आढळून येईल तर ते दांभिकतेचे वैशिष्टय होय जो पावेतो तो सोडून देत नाही. त्याला जेव्हा विश्वस्त बनविले जावे तेव्हा त्याने अफरातफर करावी, जेव्हा तो बोलतो तर खोटे बोलतो जेव्हा करार करतो तर वचन भंग करतो व जेव्हा भांडण होईल तर शिवी गाळ करतो.** (बुख़ारी कीताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

दाभिकतेशी अभिप्रेत हे की माणसाने एकीकडे आपण मुसलमान असण्याचे जाहीर करावे परंतु दुसरीकडे आपल्या ईमान बाबत सुद्ध नसावा कारण शुद्ध ईमान धारकाच्या अंगी ती वैशिष्टये जमा होऊ शकता नाही जी खरे पाहता ईमानच्या विरुद्ध आहेत. हदीस मध्ये या चार वैशिष्टायांची उल्लेख आला आहे जी ढोंगीपणाच्या भूमिकेची वैशिष्टये होत. अर्थात अफरातफर, बोलणे, वचनाभंग, व दुर्वाच्यता. अत्यंत खेद जनक गोष्ट आहे, की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी सक्त ताकीद केली असतानाही मुसलमानांमध्ये या सर्व गोष्टी आपल्यात यावरून असे दिसून येते की इस्लाम मुसलमानांना चरित्र्याच्या कोणत्या ऊंचीवर नेऊ इच्छितो. आणि ते स्वत: कोण्तया अवनितिकडे जात आहे ।

## حدیث

عَنْ اَبِیْ شُرَیْحٍ اَنَّ النَّبِیَّ ﷺ قال : وَاللّٰہِ لَا یُؤْمِنُ وَ اللّٰہِ لَا یُؤْمِنُ وَاللّٰہِ لَا یُؤْمِنُ ـ قِیْلَ وَ مَنْ یَا رَسُوْلَ اللّٰہِ قَالَ الَّذِیْ لَا یَأْمَنُ جَارُہٗ بَوَائِقَہٗ . ( بخاری کتاب الادب )

# शेजाऱ्यास त्रास देणे

## हदीस

**अबु शूरैह द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले अल्लाह शपथ ! तो मोमीन नव्हे, अल्लाह शपथ ! तो मोमीन नव्हे. अल्लाह शपथ ! तो मोमीन नव्हे ! एकाने विचारले, हे अल्लाहचे प्रेषित ! कोण मोमीन नव्हे ? फर्माविले, तो की ज्याच्या शेजारी त्याच्या दुष्टपणापासून सुरक्षित नाही.**

(बुखारी किताबुल अदब )





## स्पष्टीकरण

अर्थात जो मुसलमान आपल्या शेजाऱ्यावर अत्याचार व अतिरेक करतो तर त्याचे आचरण या गोष्टीचा पुरावा होय की ईमानची वास्तविकता अजून त्याला साध्य होऊ शकली नाही, कारण ईमान तर शेजाऱ्याशी सदव्यवहार करण्यास शिकवीतो त्यांना त्रास देणे वा सताविणे नव्हे.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या या वचनात अशा मुसलमानांकरीता जबरदस्त ताकीद आहे जो स्वत:ला मुसलमान म्हणविण्यात तर अभिमान बाळगतात परंतु त्यांची निती इतकी भ्रष्ट असते की ती ईमानासह कोणत्याहि प्रकारे मेळ खात नाही जर यांच्या अंगी खरोखर ईश भय असते जे ईमानाचा पाया आहे तर त्यांनी कदापि मेळ अत्याचार व अतिरेकाचा मार्ग पत्करला नसता.

## حدیث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ حُجِبَتِ النَّارُ بِالشَّهَوَاتِ وَ حُجِبَتِ الْجَنَّةُ بِالْمَكَارِهِ . ( بخاری کتاب الرقاق )

# इच्छा भक्ति

## हदीस

**अबु हुरैरा द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्मावितात जहन्नमला मनोकामनांनी घेरले गेले आहे आणि जन्नतला अशा गोष्टीनी ज्या आत्म्यास अप्रिय वाटतात.**

(बुख़ारी किताबुर्रिकाक)

## स्पष्टीकरण

अर्थात आत्मा अशा कामांकरिता सहजगत्या तयार होतो. ज्यांच्या द्वारे इच्छा आकांक्षाची पूर्तता होते यात आत्म्या करीता सुखा स्वादाची सामुग्री अस्ते. परंतु याचा परिणाम जहन्नम आहे कारण हा मार्ग अल्लाहच्या अवज्ञेचा मार्ग आहे. उदा. माणुस आत्म्यास स्वैर सोडून मद्यपान, व्यभिचार व हराम (निषिद्ध वस्तु) खाणे या सारखी पाप कृत्ये करतो. परंतु असे करुन तो ईश्वराच्या प्रकोपास आमंत्रण देतो व जहन्नमच्या समीप होतो. याऊलट सत्कृत्ये कारणे माणसाच्या आत्म्यास मोठे असहय वाटते. कारण सत्कर्मकरण्यात बाहयात: कसलेहि आकर्षण व स्वादानुभव नस्तो परंतु खरे पाहता ही कृत्ये अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी त्यच्या आज्ञा पालनार्थ पार पाडली जातात. माहणून यांचा परिणाम अत्यंत आनंद दायक असेल. अर्थात जन्नत'च्या स्वरूपात. यास्तव मनुष्य जर ही इच्छा बाळगत असेल की आपल्या कर्मांचा उत्कृष्ट परिणाम आपल्या समोर यावा तर त्याने आपल्या मनास स्वैर सोडण्या ऐवजी त्यावरील पकड मजबूत राखावी आणि मनाला कितीही अप्रिय असले तरी ती कर्मे करावीत जी अल्लाहच्या आज्ञापालनाशी संबंधित आहेत.

حديث

عَنْ اَبِیْ هُـرَیْـرَةَ (رض) اَنَّ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ قَالَ : قَدْ اَذْهَبَ اللّٰهُ عَنْكُمْ عُبِيَّةَ الْجَاهِلِيَّةِ وَ فَخْرَهَا بِالْاٰبَآءِ ، مُؤْمِنٌ تَقِیٌّ وَ فَاجِرٌ شَقِیٌّ وَالنَّاسُ بَنُوْ آدَمَ وَ آدَمُ مِنْ تُرَابٍ. ( ترمذی۔ ابواب المناقب )

# वंश पूजा

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले तुमचा अज्ञानकाळाचा अभिमान आणि पूर्वजांविषयी अभिमान बाळगण्याची तऱ्हा सर्वश्रेष्ठ अल्लाहने मिटविली आहे. माणूस एकतर ईश भय बाळगणारा मोमीन असतो किंवा दुर्दैवी, दुराचारी असतो. सर्व मानव आदमची संतती आहे आणि आदम माती पासून निर्माण केले गेले होते.**

(तिरमिज़ी अबवाबुल् मनाकिब)

## स्पष्टीकरण

अज्ञानकाळात लोक वंशपूजेत व्यस्त होते. त्यांच्या दृष्टीने वंश-गोत्राची उच्चता प्रतिष्ठेचे स्तर होते. या गोष्टीने त्यांच्यात गर्व अंहकारीची भावना निर्माण केली होती, जी त्यांच्या सुधारणेस बाधक होती. यहूदी देखील वंशपूजेच्या व्याधीत ग्रस्त होते. जिने त्यांना आचरणशून्य बनविले होते.

इस्लाम ने अज्ञान काळाच्या या कल्पनेस खोटे ठरवित या वस्तुस्थितीस स्पष्ट केले की माणसाचे चांगले असणे त्याचे चारित्र्य चांगले असण्यावर व त्याचे वाईट असणे, चारित्र्याच्या वाईट असण्यावर अवलंबून आहे.

प्रतिष्ठा–स्तर वंश कुळ नव्हे तर ईशभय होय जे माणसाच्या अंगी उच्च गुण निर्माण करते. माणूस कोणत्याहि वंशकूळाशी संबंधित असो त्याच्या अंगी जर ईमान व ईश्वभय आहे तर तो सर्वोत्तम मानव होय. आणि जर तो यापासून असेल तर त्याच्या करिता मान प्रतिष्ठेचे कोणतेहि स्थान नाही.





حديث

عَنْ اُمِّ سَلَمَةَ قَالَتْ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : كَمْ مِنْ كَا سِيَةٍ فِیْ الدُّنْيَا عَارِيَةٍ يَوْمُ الْقِيَامَةِ . ( بخاری کتاب اللباس )

# नग्नता

## हदीस

**उम्मे सलमा कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, कित्येक स्त्रीया अशा आहेत ज्या जगात वस्त्रे परिधान करतात परंतु कियामतीच्या दिवशी त्या नग्न राहतील.**

(बुखारी किताबुल् लिबास)

## स्पष्टीकरण

येथे स्त्रीयांच्या अर्धनग्न पोषाखाकडे संकेत केला गेला आहे विशेषत: त्या आत्याधिक पातळ वस्त्राकडे जी परिधान केल्याने शरीर प्रदर्शन होते. तसेच यात घट्ट व चुस्त पोषाख देखील अभिप्रेत आहे. ज्यातून शरीराचे चढाव उतार प्रकट होतो.

वर्तमान काळाच्या लज्जास्पद चारित्र्य संस्कृतीने स्त्रीयांना ''फैशन'' चे इतके वेड लावले आहे की त्यांची नैतिक अनुभूति गत प्राण झाली आहे, व त्या लज्जा संकोचादि गुणांपासून जे स्त्रीत्वाचे आभूषण होते वंचित झाल्या आहेत. मग नागरी संवर्धनाने नायलोन ची अतीपातळ व पारदर्शि व्स्त्रांचा शोध लावून निर्लज्जतेच्या पोषाखास सर्वसामान्य केले आहे.

परंतु इस्लामच्या दृष्टीने खरे महत्व नैतिक मूल्यांचे आहे. म्हणूनच इस्लाम अशा पोषाखास नापसंत करतो. ज्याच्या आवरणात निर्लज्जतेचे प्रकटीकरण व्हावे त्यास तो मुन्कर (उघड दुष्कर्म) ठरवितो. आणि ही तंबी ऐकवितो की असा पोषाख घालणाऱ्या स्त्रीया कियामतीच्या दिवशी पोषाखास वंचित राहतील कारण ज्या अर्थी त्यांनी नग्नतेस पसंत केले त्याआर्थी स्वत:ला या शिक्षेस पात्र केले की कियामतीच्या दीवशी त्यांनी वस्त्रहीन रहावे हदीसच्या शब्दात केवढ्या घोर शिक्षेची ताकीद आहे. व याच्या अर्थात केवढी अलंकार युक्त शैली आहे.

## حديث

عَنْ اِبنِ عَبَّاسٍ قَالَ لَعَنَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ الْمُتَشَبِّهِيْنَ مِنَ الرِّجَالِ بِالنِّسَاءِ وَالْمُتَشَبِّهَاتِ مِنَ النِّسَاءِ بِالرِّجَالِ. ( بخاری کتاب اللباس )

# स्त्रीयांशी एकरुपता

## हदीस

**हज़रत इब्ने अब्बास (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) यांनी स्त्रीयांशी एकरुपता साधाणाऱ्या पुरुषांशी एकरुपता साधाणाऱ्या स्त्रीयांची धिक्कार केला आहे.**

(बुखारी किताबुल लिबास)

## स्पष्टीकरण

स्त्री आणि पुरुष शरीर रचनेबाबत समान नाहीत किंबहुना नैसर्गिक रित्या त्यांच्यात भेद आढळून येतो तव्दत्च दोघांची मानसिकताहि एकमेकाहून भिन्न अस्ते. पुरुषांत पौरुषत्वाची वैशिष्टये आढळून येतात. तर स्त्रीयांमध्ये स्त्रीत्वाची वैशिष्टये आढळून येतात. या नैसर्गिक व मानसिक विभिन्नतेची ही निकड आहे की दोघांचा पोषाख. वेशभूषा व हावभाव एकमेकाहून भिन्न असाव्या.

याऊलट पुरुषांनी स्त्रीयांशी एकरुपता साधणे व स्त्रीयांनी पुरुषांशी एकरुपता साधणे खरे पाहतां आपल्या स्वभाव धर्माशी युद्ध करण्या सारखेच होय, आणि या आधारावर ते ईश-प्रकोपास पात्र ठरतात.

फॅशन-भक्त बनविणाऱ्या पाश्चिमात्य संस्कृतिने पुरुषांना स्त्रीसम बनण्याचे व स्त्रीयांना पुरुष स्वरूप बनण्याचे एवढे आकर्षण निर्माण केले आहे की आता रस्त्यावर स्त्रीया अर्धपुरुष व पुरुष अर्धस्त्री दिसून येतात. आणि प्रसंगी मनाला हे कोडे पडते की शेजारुन जाणारी व्यक्ति पुरुष आहे कि स्त्री! स्त्री साम्यतेच्या नादात आदी पुरुषांनी दाढीवर हात साफ केला, जिच्यामुळे पुरुषत्वाचा रुबाब कायम होत असे. यानंतर पोषाख व श्रृंगार सजावटीतहि स्त्रीयांची नक्कल सुरु केली. यांच प्रमाणे स्त्रीयांनीहि पुरुषांरखे दिसावे या नादात पुरुषी पोषाख परिधान करण्यास सुरवात केली आहे. आपल्या केसांनहि पुरषांसारखे कापू लागल्या आहेत. स्त्री पुरषांच्या परस्पर सादृश्य अंगिकारण्याचे स्पष्ट उदाहरण वर्तमान काळतील ते ''सुसंस्कृत वेडे'' होत ज्यांना जग ''हिप्पी'' या नावाने ओळखते.





## حديث

عَنْ اَبِی هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اِيَّاكُمْ وَ الظَّنَّ فَاِنَّ الظَّنَّ اَكْذَبُ الْحَدِيْثِ وَلَا تَحَسَّسُوْا وَلَا تَجَسَّسُوْا وَلَا تَحَاسَدُوْا وَلَا تَبَاغَضُوْا وَكُوْنُوْا عِبَادَ اللّٰهِ اِخْوَانًا. ( البخاری کتاب الادب )

# परस्पर संबंध विघडविणाऱ्या गोष्टी

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले वाईट मता पासून अलिप्त रहा कारण वाईटमत निकृष्ट दर्जाचे असत्य आहे लोकांचे व्यंग दोष शोधू नका, पाळतीवर राहू नका, ऐकमेकांचा मत्सर करु नका व आपसात द्वेषभाव बाळगु नका किंबहुना हे अल्लाहच्या दासांनो ! भाऊ भाऊ व्हा.**

(बुखारी किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

या अशा गोष्टी होत ज्या चारित्र्यात बिघाड व परस्पर संबंधात वितुष्ट निर्माण करतात आणि या सर्वात अग्रस्थानी ''वाईट मत'' होय, दुराग्रहाशी अभिप्रेत माणसाने एखाद्या व्यक्तिसंबंधी वाईट मत कायम करावे वस्तुत: त्यासाठी कसलाही सत्य आधार व स्पष्ट प्रमाण उपलब्ध नसावे. या स्थितीत मनुष्य अघटित गोष्टीचा इतरांच्या संबंधाने निर्देश करतो, व प्रसंगी त्याविरुद्ध पाऊल देखील उचलतो आणि नंतर जेव्हा खरी वस्तुस्थिती डोळयासमोर येते तेव्हा पश्चाताप करु लागतो म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी ''दुराग्रह'चा अर्थ अत्यंत निकृष्ट असे खोटे'' असा घेतला आहे. पवित्र क़ुरआनातहि दुराग्रहा पासून अलिप्त राहण्याची ताकिद केली गेली आहे.

लोकांची व्यंग-दोष शोधणे व त्यांच्या पाळतीवर राहणेहा सुद्धा एक नैतिक रोग आहे. जो माणुस आपल्या चारित्र्यास दुरुस्त व निर्दोष ठेऊ इच्छितो तो प्रथम आपले व्यंग दोष शोधील अशासाठी की त्याची सुधारणा व्हावी. परंतु जी व्यक्ति आत्मा सुधाराबाबत गाफिल असते ती इतरांचे व्यंगदोष शोधत फिरते. हज़रत ईसा (येशूखिस्त) यांनी देखील या संदर्भात मोठा परिणाम कारक उपदेश फर्माविला होता. बायबल ''मत्य'' तील उल्लेखानुसार :

व्यंग दोष शोधू नका की ज्यामूळे तुमचेहि व्यंग दोष काढले जावे कारण ज्या प्रकारे तुम्ही व्यंग दोष काढता तव्द्तच तुमचे सुद्धा व्यंग दोष काढले जाईल आणि ज्या मापाने तुम्ही मोजणी

करता त्याच मापाने तुम्हाकरिता मोजणी होईल. तेव्हा तू का म्हणून आपल्या बांधवाच्या डोळयातील कुसळ बघतोस, आणि स्वत:च्या डोळयातील मुसळाचा विचार नाही करीत? अणि ज्या अर्थी तुझ्याच डोळयात मुसळ आहे तर तू आपल्या बांधवाला का बरे असे म्हणू शकतो की, ये तुझ्या डोळयातील कुसळ काढतो हे विद्रोही ! प्रथम आपल्या डोळयातील मुसळ तर काढ मगच आपल्या बांधवाच्या डोळयातील कुसळ चांगल्या प्रकारे बघून तू काढू शकशील.(मत्त्य ७:ते ५)

मत्सर हा की माणसाला दुसऱ्याचा गुण किंवा सुस्थिती बघने असह्य व्हावे व त्याने अशी इच्छा बाळगावी की दुसऱ्याला प्राप्त असलेला गुण व ऐश्वर्य त्याच्यापासून हिणावून घेतले जावे. अशा प्रकारे माणूस मत्सराग्नित स्वत:जळत राहतो.

एखाद्याशी स्वार्थ परायणतेने द्वेष भाव राखणे हृदयाच्या मलीनतेस प्रकट करते. इस्लाम माणसाच्या अंत: करणास प्रत्येक प्रकारच्या मलीनतेपासून व प्रत्येक प्रकाराच्या रोगा पासून स्वच्छ करू इच्छितो व शुद्ध राखू इच्छितो, आणि याची शिकवण याच उच्च उद्दिष्टा करिता आहे अणि ही शिकवण आचरणात आणल्याने परस्पर बंधुत्वाचे नाते दृढ होते.

## حديث

عَنِ ابْنِ مَسْعُوْدٍ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ : اِنَّ مِمَّا اَدْرَکَ النَّاسُ مِنْ كَلَامِ النُّبُوَّةِ الْاُوْلٰى اِذَا لَمْ تَسْتَحْ فَاصْنَعْ مَا شِئْتَ . (بخاری کتاب الادب)

## जेव्हा लज्जा लोप पावते

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन मसऊद फर्मावितात की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले, पूर्व-प्रेषितत्वाच्या गोष्टी पैकी लोकांना ज्या काही साध्य झाल्या आहेत त्यापैकी एक गोष्ट ही सुद्धा आहे की जेव्हा तुमच्या अंगी लाज लज्जा राहणार नाही तेव्हा वाटेग ते करा.** (बुखारी किताबुल अदब)

## स्पष्टीकरण

अर्थात लज्जा भाव प्रेषितांच्या शिकवणीपैकी आहे. आणि ही उक्ति जी लोकांच्या तोंडवळणी पडली आहे की, जेव्हा तुमच्याअंगी लाज लज्जा रहाणार नाही तेव्हा वाटेल ते करा' खरे पाहंता प्रेषित-शिकवणीचाच अंश आहे आणि ही वस्तुस्थिति आहे की जेव्हा माणसात लाज लज्जा शिल्लक राहात नाही तेव्हा मग त्याला कोणतेहि दुष्कृत्य करण्यात संकोच वाटत नाही. म्हाणून लाज लज्जेचा गुण आधारभूत महत्व बाळगतो. अणि याचा माणसाच्या चारित्र्य रचनेत मोठा वाटा आहे.





## حديث

عَنْ اَبِىْ بَكْرِ الصِّدِّيْقِ اَنَّهُ قَالَ سَمِعْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ : اِنَّ النَّاسَ اِذَا رَاَوُا الظَّالِمَ فَلَمْ يَأْخُذُوْا عَلٰى يَدَيْهِ اَنْ يَعُمَّهُمُ اللّٰهُ بِعِقَابٍ مِنْهُ. (الترمذی ابواب الفتن)

# अत्याचारीस न रोखण्याचा परिणाम

## हदीस

**हज़रत अबु बकर सिद्दीक फर्मावितात की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांना फर्मावितांना ऐकले ''जेव्हा लोक अत्याचारीस पाहून त्याचा हात पकडीत नाहीत तर अल्लाह त्यांच्यावर सर्वसामान्य प्रकोप अवतरित करतो. (तिर्मिज़ी अबवाबुल् फितन)**

## स्पष्टीकरण

अत्याचारी इसमास जर अत्याचारा पासून रोखले गेले नाही तर वाईट तत्वांचे साहस वाढू लागते आणि अत्याचार व अतिरेक समाजात सर्वसामान्य होतो व इतर अपराधांमध्येहि वृद्धि होते. तसेच वाईट गोष्टी दूर केल्या पाहिजे या संबंधी लोकांची जाणीव हळू हळू कमी होत जाते, आणि ते सर्व काही सहन करु लागतात. जणू समाजाने एका सडलेल्या अवयवाला न कापता संपूर्ण शरीराला सडण्याचा अवसर दिला म्हणून असा समाज आपल्या कर्तव्य विमुखतेमुळे दुष्परिणीतीस पोहचतो. अत्याचार व अतिरेकाचे परिणाम म्हणून राष्ट्र विनाश होणे ही एक ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. आणि ही देखील वस्तुस्थिती आहे की हा विनाश ईशवराकडून त्याच्या दण्य-न्यायाला अनुसरून असतो.

## حديث

عَنْ وَاثِلَةَ بْنِ الْاَسْقَعِ قَالَ قُلْتُ يَا رَسُوْلَ اللّٰهِ مَا الْعَصَبِيَّةُ قَالَ : اَنْ تُعِيْنَ قَوْمَکَ عَلَى الظُّلْمِ . ( ابو داؤد کتاب الادب )

## हदीस

**वायला बिन असकअ वर्मावितात की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना विचारले पक्षपात कशास म्हणावे? फर्माविले पक्षपात ही की तुम्ही आपल्या जातीसमूहाचे अत्याचार संबंधात सहय्य करावे.**

# حديث

**عَنْ رِفَاعَةَ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ التُّجَّارُ يُحْشَرُوْنَ يَوْمَ الْقِيَامَةِ فُجَّارًا اِلَّا مَنِ اتَّقٰى وَ بَرَّ وَ صَدَقَ.** ( الترمذی )

# व्यापारात दुराचार

## हदीस

**हज़रत रिफाआ द्वारे उल्लेखित आहे की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, व्यापरी लोकांना (कियामतीच्या दिवशी दुराचाऱ्यांच्या स्वरूपात उठविले जाईल, मात्र त्या लोकांखेरीज ज्यांनी तकवा (ईश-भय) पुण्य व सत्य वर्तन पत्करले असेल. (तिर्मिज़ी)**

## स्पष्टीकरण

धंदा व्यवसाय व व्यापारात लोक निव्वळ ऐहिक लालसा युक्त बुद्धी प्रकट करतात. येथापावेतो की, प्रसंगी स्वत:ला धर्मनिष्ठ म्हणविणारे लोक देखील या संदर्भात धर्मनिष्ठता बाळगत नाहीत. त्यांना या गोष्टीचीहि पर्वा नस्ते की योग्य काय आहे व अयोग्य काय व ते प्रमाणिकता व सत्य शीलतेचा सुद्धा विचार करीत नाही. त्यांना फक्त पैसे कमविण्याचा ध्यास असतो. मग त्यासाठी धर्म नितिच्या मर्यादांचे उल्लंघन करावे का लागेना! म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी व्यापाऱ्यांना सावध केले आहे की जर त्यांनी ईश -भय सदाचार व प्रामाणिकतेचे आचरण पतकरले नाही तर कियामतीच्या दिवशी त्यांची अवस्था दुराचाऱ्यांसारखी होईल.





# حديث

**عَنْ مَعْمَرِ بْنِ عبداللّٰهِ عن رَسُولِ اللّٰهِ ﷺ قَالَ : لَا يَحْتَكِرُ اِلَّا خَاطِیٌٔ .**

( مسلم كتاب المساقاة)

# साठे बाजी

## हदीस

**हज़रत मअमर बिन अब्दुल्लाह द्वारे उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, तीच व्यक्ति साठेबाजी करते, जी पापी असते.**

## स्पष्टीकरण

अधिकाधिक किंमतीने विक्री व्हावी म्हणून अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तु थोपवून धरणे म्हणजे बाजारात त्या वस्तुंचा तुटवडा झाल्याने अडचणीनी गांजलेल्या संकट ग्रस्त लोकांच्या विवंशतेचा पूरेपूर लाभ घेणे, इस्लाम या विचार सरणीस चुकीची व अपराधात्मक ठरवितो. कारण ही पद्धत मनुष्य सहानुभूति विरुद्ध लोकांच्या अडचणीत वृद्धीचे कारण व स्वार्थी पणाची आहे. पैगंबरांनी आपल्या या वचनांत साठेबाजंना स्पष्टत: अपराधी ठरविले आहे.

# (४)
# राजनिती
# व
# शासन





## حديث

عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ عُمَرَ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُمَا اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ اَلَا كُلُّكُمْ رَاعٍ وَ كُلُّكُمْ مَسْئُوْلٌ عَنْ رِعِيَّتِهِ فَالْاِمَامُ الَّذِیْ عَلٰی النَّاسِ رَاعٍ وَهُوَ مَسْئُوْلٌ عَنْ رِعِيَّتِهِ وَالرَّجُلُ رَاعٍ عَلٰی اَهْلِ بَيْتِهِ وَهُوَمَسْئُوْلٌ عَنْ رِعِيَّتِهِ وَالْمَرْاَةُ رَاعِيَةٌ عَلٰی اَهْلِ بَيْتِ زَوْجِهَا وَوَلَدِهٖ وَهِیَ مَسْئُوْلَةٌ عَنْهُمْ وَعَبْدُ الرَّجُلِ رَاعٍ عَلٰی مَالِ سَيِّدِهٖ وَهُوَ مَسْئُوْلٌ عَنْهُ. اَلَا فَكُلُّكُمْ رَاعٍ وَ كُلُّكُمْ مَسْئُوْلٌ عَنْ رِعِيَّتِهٖ . ( بخاری ،کتاب الاحکام)

## जबाबदारीची जाणीव

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह बिन उमर (रज़ी.) यांचे निवेदन आहे की पैगंबर सल्लल्लाहु अलैहि व सल्लम )यांनी असे फर्माविले,''ऐका ! तुमच्या पैकी प्रत्येक व्यक्ति निरीक्षक आहे आणि प्रत्येकाला त्याच्या देखरेखी खाली असलेत्यांबाबत विचारपूस केली जाईल इमाम जो लोकांचा नेता असतो. निरीक्षक आहे आणि त्याला त्याच्या देखरेखी खाली असलेल्या लोकांबाबत विचारपूस केली जाईल. मनुष्य आपल्या कुटुंबियांचा निरीक्षक आहे व त्याला त्यांच्या बाबतीत उत्तर दायित्व पार पडावे लागेल. पत्नी आपल्या पतिचे घर व त्याच्या मुलांची निरीक्षिका आहे व तिला त्यांच्या संबंधाने विचारले जाईल. गुलाम आपल्या मालकाच्या मालमत्तेचा निरीक्षक आहे व त्याला त्याच्या या जबाबदारी बद्दल विचारले जाईल.**

**तर पहा ! तुमच्या पैकी प्रत्येक व्यक्ति निरीक्षक आहे आणि प्रत्येकाला त्याच्या जबाबदारीं संबंधी पृच्छा होईल.** (बुखारी किताबुल अहकाम)

### स्पष्टीकरण

ही हदीस, जी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या महत्वपूर्ण आदेशांपैकी होय, माणसाला सावध करते की, तो मग कोणत्याही योग्यतेचा असो, शासक असो व सेवक, नेता असो वा नोकर, पुरुष असो व स्त्री, आणि पती असो कि पत्नी सर्वांना आपल्या जबाबदारी विषयी जी त्यांच्या देखरेखीखाली व अधीन व्यक्ति आणि अमानतीच्या संबंधाने त्यांच्यावर बंधनकारक असते त्या जबाबदारी विषयी ईश्वरापुढे उत्तरदायित्व पार पडावे लागेल. हे उत्तर दायित्व या गोष्टीचे की अधीन व आश्रितांचे संरक्षण, संगोपन, मार्गदर्शन किवा अनामतीच्या रक्षाणाची जी जबाबदारी त्यांच्यावर येते ती त्यांनी कोठपर्यंत पार पाडली. हे उत्तर दायित्व कियामतीच्या दिवशी प्रत्येकाला सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या न्यायालयात पार पाडावे लागेल. अणि खरे पाहता उत्तरदायित्वाची ही कल्पना माणसाच्या अंगी जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यास पुरेशी आहे.

# حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِذَا ضُیِّعَتِ الْاَمَانَةُ فَانْتَظِرِ السَّاعَةَ قَالَ كَیْفَ اِضَا عَتُهَا قَالَ اِذَا وُسِّدَ الْاَمْرُ اِلٰی غَیْرِ اَهْلِهٖ فَانْتَظِرِ السَّاعَةَ. ( بخاری ،کتاب االعلم )

# सत्ताधिकार, अयोग्य असलेल्यांच्या हाती सोपवणे

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) यांचे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले जेव्हा अनामत वाया घालविली जाईल तेव्हा कियामातीची प्रतिक्षा करा. प्रश्नकर्तांने विचाले, अनामत कशा प्रकारे वाया घालविली जाईल? फर्माविले, जेव्हा सत्ता व्यवहार अयोग्य असलेल्यांच्या हाती सोपविले जातील, तर मग कियामतीची प्रतिक्षा करा.**

(बुखारी किताबुल इल्म)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये त्या लोकांकरिता जबरदस्त ताकीद आहे जे सत्ताधिकार आयोग्य लोकांच्या हाती सोपवितात, या गोष्टीस अगदी किरकोळ समजले जाते. वस्तुत: हे सर्व सामान्य बिघाडाचे व जमीनीवरील उत्पात विध्वंसाचे फार मोठे कारण आहे. अपात्र व्यक्तिंच्या हाती जेव्हा सत्ताधिकाराची शुत्रे येतात तेव्हा ते विकृत विचार चिंतन फैलाविण्यात वाईट आणि निर्लज्जतेच्यां गोष्टींना सार्वत्रिक करण्यात, हरामाचा माल खाण्यात, व खाऊ घालण्यात,खुचींचे लोभी होण्यात व जनतेला लोभी बनविण्यात, अत्याचार व अतिरेक करण्यात आणि लोकंमध्ये नैतिक व आचरणीय बिघाड निर्माण करण्यात काहीहि कसर सोडत नाही, किंबहुना त्यांच्या नेतृत्वाता प्रत्येक प्रकारची दुष्कृत्ये वाढीस लागताना घृनित गोष्टींनी वैभव लाभते. त्यानंतर लौकांची सुधारणा एक अत्यंत कठीण समस्या बनते.

अयोग्य म्हणजे बेजबाबदार लोक होत.अर्थात असे लोक जे सत्ताधिकारास ईश्वराने सोपवलेली अनामत समजत नाही. अणि या बाबत निर्भय होऊन या अनामतीचा चुकीचा व अयोग्य वापर करतात. हदीसमध्ये सत्तेचा अर्थ अनामत असा घेतला आहे. कारण ही एक भारी जबाबदारी आहे





जी याच्या हाती सोपली गेली आहे व त्यासंबंधी याला ईश्वरसमोर जाब द्यावा लागेल. हीच अर्थ शैली पवित्र क़ुरआनातही उपलब्ध आहे.

اِنَّ اللّٰهَ یَاْمُرُكُمْ اَنْ تُؤَدُّوْا الْاَمَانَاتِ اِلٰۤی اَهْلِهَا. ( سورة نساء ـ ۵۸ )

“अल्लाह तुम्हाला आदेश देतो की अनामतीना, त्यांच्या मालकांना सोपवा”(सूरह निसा-५८)

क़ियामत अशा वेळी येईल जेव्हा मनुष्य समाज अध:पतनाच्या दृष्टीने मर्यादेच्या परिसीमेस पोहचेल आणि मानवतेस अवनितिच्या खोग खाईल लोटण्याचे काम तेच लोक पार पाडतात जे अयोग्य व बेजबाबदार असूनहि लोकांच्या समर्थनाद्वारे सत्तासिंहासनावर विराजमान होतील.

# حديث

عَنْ عَائِذِ اِبْنِ عَمْرٍ و قَالَ سَمِعْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ یَقُوْلُ اِنَّ شَرَّ الرُّعَاءِ الْحُطَمَةُ. (مسلم کتاب الامارة)

# सर्वात वाईट शासक

## हदीस

**आइज बिन अम्र फर्मावितात की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना हे फर्मावितानना ऐकले, सर्वात वाईट शासक ते आहेत जे जनतेला पायदळी तुडवतात.**(मुस्लिम किताबुल् इमारह)

## स्पष्टीकरण

सत्ता आणि अधिकार खरे पाहता सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे अनामत होय, जी लोकांच्या कल्याणासाठी, न्याय प्रस्थापित करण्यासाठी आणि त्यांच्या भलाई व उन्नती करिता वापरली पाहिजे परंतु जे शासक सत्ताधिकारास लोकांचे हक्क डावलण्याटे व त्यांना पायदळी तुडविण्याचे साधन बनवितात ते सर्वात वाईट उदाहरण कायम करतात. आणि या आधारे ते तिरस्करणीय होत.

## حديث

**عَنْ اِبْنِ عَبَّاسٍ اَنَّ النَّبِيَّ ﷺ بَعَثَ مُعَاذًا اِلٰى الْيَمَنِ فَقَالَ : اِتَّقِ دَعْوَةَ الْمَظْلُوْمِ فَاِنَّهَا لَيْسَ بَيْنَهَا وَ بَيْنَ اللّٰهِ حِجَابٌ.** ( بخاری ،کتاب المظالم )

# अत्याचार पिडीताच्या तळतळाटापासून स्वत:ला वाचविणे

## हदीस

**हज़रत इब्ने अब्बास द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी हज़रत मुआज़ यांना यमन (चा शासक बनवून) पाठविले तेव्हा त्यांना आदेश दिला की 'अत्याचार पिडीताच्या निश्वासापासून स्वत:ला वाचवा कारण त्याच्या आणि अल्लाहच्या दरम्यान कोणतीही वस्तु आड येत नाही.**

(बुखारी, किताबुल मज़ालिम)

## स्पष्टीकरण

शासनाचे मूल कार्य लोकांच्या हक्काधिकाराचे रक्षण करणे व त्यांच्या दरम्यान न्याय प्रस्थापित करणे होय. परंतु सत्तेचा उन्माद असा असतो कि अधिकांश शासक अत्याचार व अतिरेकाचे धोरण पत्करतात. यास्तव जेव्हा पैगंबरनी हज़रत मुआज यांना यमनचा शासक बनवून पाठवले तेव्हा त्यांना ही ताकीद केली की या गोष्टीचे स्मरण असू द्या कि एखाद्याचा हक्क हिरावून घेतला जाऊ नेय किंवा एखाद्यावर अतिरेक होता कामा नये. या प्रसंगी प्रेषितांनी जी वचने सांगितली ती अत्यंत अलंकारीक व प्रभावी आहेत आणि त्यांचा हा अर्थ आहे की अत्याचार पिडीताचा विश्वास (तळतळाट, हाय!) आकाशाला छेदीत ईशसिंहासनापर्यंत पोहचतो. म्हणून या बाबत अल्लाहचे भय बाळगले पहीजे अणि अत्याचारापासून परावृत्त झाले पाहिजे.

यावरून हे अनुमान काढले जाऊ शकते की इस्लाम कशाप्रकारचे शाहक निर्माण करू इच्छितो.





## حديث

**عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ عَمْرٍو و عَنِ النَّبِيِّ ﷺ قال: مَنْ قَتَلَ نَفْساً مُعَاهَدًا لَمْ يَرِحْ رائِحَةَ الْجَنَّةِ وَاِنَّ رِيْحَهَا يُوْجَدُ مِنْ مَسِيْرَةِ اَرْبَعِيْنَ عَامًا.** ( بخاری کتاب الدیات )

# मुस्लिमेतर करार–कर्त्यास ठार करणे महापाप

## हदीस

**अब्दुल्लाह बिन अम्र द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, 'ज्याने एखाद्या अशा मुस्लिमेतर व्यक्तिस ठार केले जिच्याशी करार झाला होतो. तो जन्नतचा सुवासहि घेऊ शकणार नाही. वस्तुतः जन्नतचा सुवास चाळीस वर्षाच्या अंतरावरून जाणवेल. (बुख़ारी किताबुद-दियात)**

## स्पष्टीकरण

करार कर्त्याशी अभिप्रेत असे मुस्लिमेतर होय जे इस्लामी राज्यचे नागरीक असावेत किंवा ज्यांच्याशी इस्लामी राज्याचा शांतता करार-तर झाला असावा. अशा एखाद्या मुस्लिमेतरास अकारण ठार करणे उघड वचनभंग आहे आणि जो मुसलमान हे कृत्य करील तो क्रियामतीच्या दिवशी जन्नत पासून वंचित राहील. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा हा आदेश या गोष्टीस अत्याधिक दुषित ठरवितो की इस्लामी राज्याच्या क्षेत्रात मुस्लिमेतरांविरूद्ध जातीयवादी दंगे उदंभाविले जावे. व त्यांच्या प्राणवित्तास व प्रतिष्ठेस हानी पोहचविले जावी.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी वचनाची कास बाळगण्याविषयी जी ताकीद फर्माविली आहे त्याचे अनुमान काढण्यासाठी हीच एक गोष्ट पुरेशी आहे.

# حديث

عَنْ اَبِیْ سَعِیْدٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : لِکُلِّ غَادِرٍ لِوَاءٌ یَوْمَ الْقِیَامَةِ یُرْفَعُ لَهٗ بِقَدْرِ غَدْرِهٖ . اَلَاوَلَا غَادِرَ اَعْظَمُ غَدْرًا مِنْ اَمِیْرِ عَامَّةٍ . (مسلم کتاب الجہاد)

# वचन भंग

## हदीस

**अबु सईद (रज़ी.) कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले क़ियामतीच्या दिवशी प्रत्येक वचनभंग करणाऱ्याचा एक ध्वज असेल, जो त्याच्या वचनभंगानुसार उंचविला जाईल. सावधान ! लोकांवरील शासकापेक्षा अधिक वचनभंग करणारा कोणीच नाही.**

(मुस्लिम किताबुल जिहाद)

## स्पष्टीकरण

या हदीसमध्ये त्या वचनभंगास जे शासनाचा जबाबदार वर्ग लोकांशी करतात, सर्वाधिक अफरातफर या अर्थाने घेतले आहे. प्रत्येक वचनभंग करणाऱ्यास ही शिक्षेची धमकी दिले गेली आहे की कियामतीच्या दिवशी त्याच्या अवहेलनेचा ध्वज रोवला जाईल.

आजच्या युगात सत्ताधिकाऱ्यांची अफरातफर व वचनभंगता अगदी सर्व सामान्य आहे. ते लोकांशी त्यांच्या कल्याणाचा वायदा करतात आणि एकनिष्ठतेची शपथ ग्रहण करतात परंतु अवसर लाभताच त्यांना आपल्या वचन विरूद्ध जाण्यात लोकांशी विद्रोह करण्यात किंचतहि संकोच वाटत नाही परंतु एक दिवस असा येईल की यांच्या विद्रोहाचे पितळ उघडकीस येईल व त्यांच्या एकनिष्ठातेच्या दाव्यांची वस्तुस्थिति स्पष्ट होईल. आणि निश्चितपणे तो दिवस अशा लोकांकरिता अत्यंत अवहेलनाजनक असेल.





# حديث

عَنْ عَبْدِاللّٰهِ بْنِ عَمْرٍو قَالَ لَعَنَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَلرَّاشِیَ وَالْمُرْتَشِیَ . ( ترمذی ابواب الاحکام )

# लाचखाऊ वृत्ति

## हदीस

**अब्दुल्लाह बिन अम्र फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी लाच देणाऱ्याचा व लाच घेणाऱ्याचा धिक्कार केला आहे.**

**(तिर्मिज़ी अबवाबुल अहकाम)**

## स्पष्टीकरण

लाच सत्य आणि न्यायाचा गळा दाबते आणि ज्या समाजात लाच लुचपत सर्वसामान्यत: प्रचलित असेल त्यात अत्याचार व अतिरेकहि सर्वसामान्य होतात. गरीब व असहाय लोकांचे हक्क मारले जातात आणि शासनाच्या पदाधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांनी हरामाची चट लागते.यांच्या उघड हानीना समोर ठेवून इस्लामने लाच घेणे व देणे या दोन्ही गोष्टी हराम (निषिद्ध) व निर्भत्सनीय ठरविल्या आहेत. येथे हे लक्षात घ्यावे की सध्याच्या बिघडलेल्या समाजात जर मनुष्य एखाद्या हक्क डावलण्य ऐवजी आपला योग्य हक्क वसूल करण्याकरिता किंवा न्याय प्राप्त करण्याकरिता किंवा एखादया उपद्रवास दूर करण्याच्या हेतुने काहीतरी देण्यास विवश होतो तेव्हा देण्याची ही विवशता निरोपाच्या बाबीपैकी होय. कारण इस्लाम ने खरोखर लाचारीची. भीड बाळगली आहे. परंतु लाच घेण्याच्या धर्मानुकूलतेचा प्रश्नच निर्माण होत नाही. कारण लाच घेणे कदापि लाचारी नव्हे. यास्तव जे लोक लाचलुचपतीने आपले खिसे भरत आहेत ते खरे पाहता हरामाचा माल जमा करीत आहे. आणि यामुळे ते ईश्वराच्या निर्भत्सनेस पात्र आहेत.

# (५) जगाची पात्रता





### حديث

**عَنْ مُسْتَوْرِدٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ وَاللّٰهِ مَا الدُّنْيَا فِیْ الْاٰخِرَةِ اِلَّا مِثْلُ مَا يَجْعَلُ اَحَدُكُمْ اِصْبَعَهُ هٰذِهِ فِی الْيَمِّ فَلْيَنْظُرْ بِمَا تَرْجِعُ.** ( مسلم كتاب الجنة )

# आखिरतच्या तुलनेने इहलोकाची वास्तविकता

## हदीस

**मुस्तौरिद कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, अल्लाह शपथ ! इहलोक आखिरतच्या तुलनेने असे आहे जणू एखाद्या व्यक्तिने समुद्रात बोट बुडवावे आणि मग बाहेर काढून बघावे की यास किती पाणी लागले आहे.** (मुस्लिम किताबुल् जन्नह)

## स्पष्टीकरण

समुद्रात बोट बूडविल्याने जेवढे पाणी बोटाला लागते ते समुद्रात असलेल्या अफाट जलाशयाच्या तुलनेने काहीच महत्व बाळगत नाही. अगदी हीच स्थिती ऐहिक जीवनाची व त्यातील सुख विलासाची आहे. ती अशी की आखिरतच्या तुलनेने ऐहिक जीवन इतके अल्प व त्यातील सुखविलास इतका सामर्थ्यहीन आहे की दोघात ज़मीन अस्मानाची तफावत आहे. यास्तव दूरदर्शितेची ही निकड आहे की माणसाने ऐहिक जीवनावर आसक्त होण्याऐवजी आखिरत (मरणोत्तर जीवना) ला ध्येय उद्दिष्ट बनवावे. आणि अशी कामे करावीत जी आखिरत मध्ये लाभप्रद ठरतील.

### حديث

**عَنْ جَابِرِ بْنِ عَبْدِاللّٰهِ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ مَرَّ بِالسُّوقِ دَاخِلًا مِّنْ بَعْضِ الْعَالِيَةِ وَالنَّاسُ كَنَفَتَهُ فَمَرَّ بِجَدْیٍ اَسَکَّ مَيِّتٍ فَتَنَاوَلَهُ فَاَخَذَ بِاُذُنِهِ ثُمَّ قَالَ اَيُّكُمْ يُحِبُّ اَنَّ هٰذَا لَهُ بِدِرْهَمٍ ؟ فَقَالُوْا مَا نُحِبُّ اَنَّهُ لَنَا بِشَیْءٍ وَمَا نَصْنَعُ بِهِ قَالَ تُحِبُّوْنَ اَنَّهُ لَكُمْ قَالُوْا وَاللّٰهِ لَوْ كَانَ حَيًّا كَانَ عَيْبًا فِيْهِ لِاَنَّهُ اَسَکَّ فَكَيْفَ وَهُوَ مَيِّتٌ فَقَالَ وَ اللّٰهِ لَلدُّنْيَا اَهْوَنُ عَلَى اللّٰهِ مِنْ هٰذَا عَلَيْكُمْ.** ( مسلم كتاب الزهد )

## हदीस

**हज़रत जाबीर यांचे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)शहरच्या वरच्या भागा कडून शुभागमन करीत होत. या प्रसंगी बाजारातून त्यांचे जाणे झाले. काही लोक त्यांच्या समवेत होते. पैगंबर बकरीच्या एका मृत पिल्ल्या जवळून गेले ज्याचे कान लहान होते. पैगंबरांनी कान धरुन उचलले व आपल्या सहकाऱ्यांना विचारले, तुमच्यापैकी कोण याला एक दिरहम किंमतीत घेणे पसंत करील? त्यांनी उत्तर दिले आम्ही कोणत्याही स्थितीत घेणे पसंत करणार नाही. त्याला खरेदी करुन आम्ही काय करणार? फर्माविले, काय तुम्ही यास किंमतीविना घेणे पसंत कराल? त्यांनी संगितले, अल्लाह शपथ जर हे जिवंत असते तरीहि कान लहान असल्यामुळे दोषपूर्ण होते आणि आता तर मेलेले आहे ! फर्माविले, अल्लाह शपथ ! अल्लाहच्या नजरेत हे जग याहूनहि अधिक तुच्छ आहे जेवढे हे मृत पिल्लू तुमच्या नजरेत आहे.**

## स्पष्टीकरण

या हदीसमध्ये बकरीच्या दोषयुक्त मृत पिल्लूचे उदाहरण प्रस्तुत करुन जगाच्या तुच्छेतेस स्पष्ट केले आहे. जगाचे तुच्छ व भारशून्य असणे त्याच्या लाभा संबंधी आहे, जो आखिरतच्या तुलनेने असावा तात्पर्य, जे लोक आखिरतला दृष्टी आड करुन जगाला ध्येय उद्दिष्ट बनवितात व त्याच्या लाभावर संतुष्ट होतात ते खरे पाहता मौल्यवान वस्तूच्या तुलनेने एक तुच्छ वस्तु प्राप्त करतात आणि महान लाभांना सोडून तुच्छ लाभांच्या पाठीशी धावतात.





## حديث

**عَنۡ اَبِی هُرَیۡرَةَ قَالَ قَالَ رَسُوۡلُ اللّٰـهِ صلی الله علیه وسلم لَوۡ تَعۡلَمُوۡنَ مَا اَعۡلَمُ لَضَحِكۡتُمۡ قَلِيۡلاً وَّلَبَكَيۡتُمۡ كَثِيۡرًا.**

( بخاری کتاب الرقاق )

# जग हसण्याचे स्थान नव्हे

## हदीस

**हजरत अबु हुरैरा फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, जे काही मी जाणतो ते जर तुम्ही जाणून असता तर तुम्ही हसले असते कमी व रडले असते जास्त.**

(बुखारी किताबुर्रिकाक)

## स्पष्टीकरण

मनुष्य आपल्या जीवना बाबत जितका जास्त गंभीर असेल तितकी त्याच्या अंगी जबाबदारीची जाणीव दिसून येईल आणि ईश्वरा समोरचे उत्तरदायित्व त्याला' वार्तालाप संभाषण इ. ला सावधगिरी बाळगण्यास प्रवृत्त करील. माणसाच्या प्रत्येक कथनाचा व प्रत्येक कृतिचा जो परीणाम कियामतीच्या दिवशी समक्ष येणारा आहे. त्याची माणसाला जितकी जास्त जाणीव होईल तितका तो आपल्या वागणूकीत गंभी व सावध राहील आणि ही जाणीव ज्ञानामुळे. निर्माण होते अर्थात ते ज्ञान जे मरणोत्तर जीवनात प्रकट होणाऱ्या परीणामाविषयी सचेत करते. हे ज्ञान माणसाला जितके जास्त लाभेल तितकी अधिक आपल्या मरणोत्तर जीवनाची काळजी त्याला लागून राहील. आणि ही काळजी त्याला हसण्यापेक्षा रूदन करण्यास अधिक प्रवृत्त करील. तात्पर्य हे की जग हसण्याचे स्थान नव्हे किंबहुना रूदन-स्थान होय. यास्तव आपला बहुमूल्य वेळ हसण्यात. थट्टा-मस्करीत वाया घालविण्या ऐवजी ईश-भय युक्त कार्यास लावला पाहिजे.

حديث

عَنْ عَبْدِاللّٰهِ ابْنِ عُمَرَ قَالَ اَخَذَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ بِمَنْكَبِىْ فَقَالَ كُنْ فِى الدُّنْيَا كَاَنَّكَ غَرِيْبٌ اَوْ عَابِرُ سَبِيْلٍ. ( بخارى كتاب الرقاق )

# ''मजल'' कडे

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह इब्ने उमर म्हणतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी माझा खांदा पकडून फर्माविले, जगात अशा तऱ्हेनें रहा की जणू तुम्ही परदेशीय आहात किंवा वाटसरु आहात.** (बुखारी किताबुर्रिकाक)

## स्पष्टीकरण

जी व्यक्ति आपल्या देशापासून दूर एखाद्या नव्या स्थानी तात्पुरता मुक्काम करील तेव्हा या नव्या स्थानी तिला परकेपणा जाणवेल तिचे मन या नव्या वातावरणात कधीही लागणार नाही उलट स्वदेशाच्या आठवणीने ती बेचैन राहील. तसेच या नव्या स्थानी तिला ठराविक अवधी पर्यंतच राहावयाचे असल्याने ती तेथे निवास करताना अधिक साधन-सामाग्रीची काळजी करणार नाही उलट ती केवळ तितक्याच वस्तुवर भागवील ज्या आवश्यक आहेत, तव्दतच जी व्यक्ति मरणोत्तार जीवनास आपले खरे स्थान व जगाला तात्पुरते निवास-स्थान समजत असेल तिचे मन कधीही या जगात रमणार नाही व तिला इहलोकीय वैभव कदापि प्रभावित करणार नाही अशी व्यक्ति या जगात सुख विलासाचे जीवन व्यतीत करण्याऐवजी अल्पसंतोषवृत्तीचा मार्ग पत्करील व तिची धावपळ फक्त गरजेपुरते धन-साधन प्राप्त करण्याकरीता असेल.

''परदेशीय'' पेक्षाहि अधिक वाडमयीन उदाहरण ''प्रवाशा'' चे आहे. कारण प्रवासी, प्रवासात असल्यामुळे ज्या वस्तुंची प्रवासात मोठी निकड भातसे फक्त तेवढयाच आपल्या सोबत नेतो व त्याला क्षणोक्षणी ही विवेचना असते की केव्हा आपल्या स्थानी जाऊन पोहचेल, अशाच प्रकारे ज्याचे खरे स्थान मरणोत्तर जीवन असेल तो या जगात जीवन व्यतीत करण्याचा असला मार्ग कधीही पत्करणार नाही जो ऐहिक भक्त पत्करतात, तसेच तो इहलोकीय वैभवशाली स्थानांना आासुसलेल्या नजरेने पाहणार नाही उलट जगात राहण्यासाठी आवश्यक असेल तेवढयाचा सामुग्रीवर समाधान मानील, एखाद्या प्रवाशासह सामानाचे ओझे जेवढे कमी असेल तेवढी सहजता त्याला प्रवासात लाभेल. तव्दतचा जग व मरणात्तर जीवन या दोहोंच्या दरम्यान जो पूल आहे त्यावरुन जाणे अशाच व्यक्तिला सहज सुलभ होईल की जिच्यासोबत ऐहीक साधन सामुग्रीचे प्रमाण कमी असेल.





حديث

عَنْ اَبِىْ هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اَلدُّنْيَا سِجْنُ الْمُؤْمِنِ وَ جَنَّةُ الْكَافِرِ.

( بخارى كتاب الزُّهد )

# इहलोक सुख विलासाचे स्थान नव्हे

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) द्वारे उल्लिखित आहे कि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, इहलोक ईमान धारकाकरिता बंदीगृह आहे आणि काफिर करिता जन्नत आहे.**

(मुस्लिम किताबुज-जुहद)

## स्पष्टीकरण

ईश्वरावर अटळ श्रद्धा ठेवणाऱ्या व्यक्तिस एक बंधनयुक्त जीवन व्यतीत करावे लागते तिला आपल्या इच्छा आकांक्षांवर नियंत्रण ठेवावे लागते. आणि ती ईश्वरीय धर्मशास्त्राच्या मर्यादेत राहून सर्व कामे पार पाडते व सत्यामार्गातील अडचणी सहन करते अशी व्यक्ति ईश-आज्ञापालनास बांधलेली असते. आणि जगाला या दृष्टीने पाहते की हे सुखविलासाचे व हिंडण्या फिरण्याचे स्थान नव्हे किंबहुना हे एक परीक्षा स्थळ आहे. या परीक्षा स्थळावर तिने जर जबाबदारीपूर्ण व आज्ञा पालन युक्त जीवन व्यतीत केले तर तिला कायमचे यश ताभेल, आणि ती अखिरतमध्ये अविनाशी देणग्यांनी उपकृत होईल अशा देणग्या की ज्यांच्यापुढे जागातील देणग्या तुच्छ होत.

हेच ते बंधनकारक जीवन, ज्यामुळे जगाचा बंदीगृह असा अर्थ घेतला गेला आहे. या उलट काफिर मनुष्य जगाला मनोरंजनाचे स्थान समझतो व याच्या भौतिक लाभांना व सुखास्वादांना प्राप्त करण्यात, ईश्वराने प्रस्थापित केलेल्या मर्यादांची तमा बाळगत नाही. आणि आपल्या इच्छा आकांक्षाच्या मागे धावत राहतो. यास्तव त्याला सत्यमार्गातील त्या अडचणीचा सामना करावा लागत नाही ज्या ईमान धारकाच्या जीवनात येतात. आणि त्याला तो त्याग व बलीदानहि करावे

लागत नाही जे एका ईमानधारकाला करावे लागते. आणि प्रसंगी ऐहिक देणग्यांचा वर्षाव ऐहिक भक्तांच्याच हिश्यात येते. अशासाठी की त्यांनी येथे खूप सुखोपभोग घ्यावा व आखिरत मध्ये जहन्नम चे ईंधन बनावे. या दृष्टीने ईमानाचा इन्कार करणाऱ्यास जे निर्बंध जीवन व्यतीत करण्याची संधी मिळते व ज्या प्रकारे त्याच्याकरिता हे जग मनोरंजनाचे व सुखविलासाचे साधन बनते ते जन्नत या अर्थाने घेतले आहे.

याचा अर्थ हा नव्हे की इस्लाम ऐहिक वा सांसारिक उन्नतीच्या विरुद्ध आहे. किंबहुना इस्लाम अशा उन्नतिस मान्य करणारा आहे ज्यासह माणसाचा वैचारिक, नैतिक व आचरणीय उत्कर्ष साध्य व्हावा.अशासाठी की मनुष्य आपल्या ध्येयाप्रत पोहचावा इस्लाम अशा उन्नतिचा कदापि मान्य कर्ता नाही जी बाह्यत: भौतिक उन्नति असावी परंतु जी वैचारिक नैतिक व आचरणी ऱ्हासास कारणीभूत ठरावी. व परिणामी मनुष्य अनंत विनाशाच्या खाईत पडावा.

कोणत्याही उच्च ध्येयाच्या प्राप्तीकरित माणसाला बलदान द्यावेच लागते म्हणून ज्यांना आखिरत प्रिय आहे त्यांना इस्लामी निति नियमांचे पालन करताना आपल्या सुखविलासाची व कित्येक ऐहिक लाभांची आहुति द्यावी लागेल.





# (६)
# अनेकेश्वरवाद व धर्मप्रविष्ट नव्या गोष्टी
# (शिर्क व बिदअत)

## حديث

**عَنْ عَبْدِ اللّٰهِ قَالَ قُلْتُ يَا رَسُوْلَ اللّٰهِ اَیُّ الذَّنْبِ اَعْظَمُ . قَالَ اَنْ تَجْعَلَ لِلّٰهِ نِدًّا وَهُوَ خَلَقَکَ، ثُمَّ قَالَ اَیُّ قَالَ اَنْ تَقْتُلَ وَلَدَکَ خَشْيَةَ اَنْ يَا کُلَ مَعَکَ قَالَ ثُمَّ اَیُّ قَالَ اَنْ تُزَانِیَ حَلِيْلَةَ جَارِکَ.** (بخاری کتاب الادب)

# सर्वात मोठे पाप

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह फर्मावितात की मी, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना विचारले, सर्वात मोठे पाप कोणते? फर्माविले, तुमचे अल्लाहचा समकक्ष ठरविणे जेव्हा त्यानेच तुम्हाला निर्माण केले आहे. मी विचारले, या नंतर कोणते? फर्माविले, तुमचे आपल्या संततीस ठार करणे या भितीने की ते तुमच्या अन्नात सहभागी होतील मी विचारले, या नंतर कोणते? फर्माविले, आपल्या शेजाऱ्याच्या पत्नीशी व्यभिचार करणे.**

(बुख़ारी किताबुल् अदब)

## स्पष्टीकरण

हा हदीस मध्ये ज्या तीन महापापांचा उल्लेख केला गेला आहे त्यात अग्रभागी, अल्लाहचा समकक्ष ठरविणे हे होय. अल्लाहचा समकक्ष ठरविण्याचा अर्थ असा की एखाद्याच्या बाबतीत अशी श्रद्धा बाळगली जावी की तो देखील ईश्वरीय गुणवेशिष्टे बाळगतो किंवा तो देखील ईश्वर समान उपासनीय आहे आणि हीच गोष्ट शिर्क (अल्लाह समान दुसऱ्यास लेखणे) आहे. आणि शिर्कला पावित्र क़ुरआनात महा अत्याचार म्हटले गेले आहे. येथे या संबंधीचा हा पुरावाहि दिला गेला आहे की, ज्या अर्थी तुमचा निर्माण कर्ता केवळ अल्लाह आहे मग जो निर्माण कर्ता नाही किंबहुना निर्मित आहे त्यात ईश्वरीय गुण वैशिष्ट काढून आलीत? आणि तुमचे एखाद्याला ईश्वर बनविणे हे आपल्या निर्माण कर्त्याशी कृतघ्नता व त्याच्याशी अनिष्ठा नाही तर आणखी काय आहे?

आणि जो मनुष्य आपल्या निर्माण कर्त्याशीच कृतघ्न व अनिष्ठा बाळगणारा असेल त्याहून अधिक अपराधी व पापी आणखी कोण असू शकतो?





लोक असे समजतात की एक ईश्वर माना किंवा दहा ईश्वर माना अथवा मूलत: ईश्वराचा इन्कार करा, सर्वकाही सारखेच आहे. यामुळे माणसाच्या चांगल्या वाइट असण्यावर काहीच परिणाम होत नाही ही वस्तुस्थितीच्या विपरीत अशी गोष्ट आहे, आणि ही हदीस स्पष्टीकरण करते की शिर्क सर्वात मोठे पाप आणि सर्वात मोठा अपराध होय. यास्तव सर्व प्रथम यापासून अलिप्त राहिले पाहिजे.

शिर्क नंतर ज्या गोष्टीला सर्वात मोठे पाप ठरविले गेले आहे ती संतती हत्या होय. अज्ञान काळात याचे स्वरूप असे होते की लोक दारिद्रयाच्या भयाने आपल्या संततीस विशेषत: मुलीना जिवंतपणीच जमीनीत गाडून देत. हे कृत्य मोठे पाषण ह्रदयी आहे मग ते दारिद्रयाच्या भयाने केले जावे अथवा अन्य एखाद्या कारणास्तव केले जावे. आणि अकारण हत्या मग ती संततीची असो अथवा अन्य कुणाची नि:संदिग्ध महापाप आहे. तव्दतच व्यभिचार देखील एक महापाप आहे. परंतु ते जर आपल्या शेजाऱ्याच्या पत्नीशी केले गेले तर त्याच्या तीव्रतेत आणखी भर पडते कारण शेजाऱ्याकडून ही अपेक्षा केली जाते की तो दुसऱ्या शेजाऱ्याचे संरक्षण करील परंतु त्याने आपल्या शेजाऱ्याचे संरक्षण करण्या ऐवजी त्याच्या पत्नीचे शील भ्रष्ट केले तर त्याहून अधिक हक्कांची पायमल्ली करणारा कोण असेल?

## حديث

**عَنْ اَبِیْ بَکْرَةَ قَالَ قَالَ النَّبِیُ ﷺ : اَکْبَرُ الْکَبَائِرِ الْاِشْرَاکُ بِاللّٰهِ وَ حُقُوْقُ الْوَالِدَيْنِ وَشَهَادَةُ الزُّوْرِ.**

(بخاری کتاب استتابۃ المرتدین)

## हदीस

**हदीस अबू बकर फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले महापातकांपैकी सर्वात मोठे पातक हे आहे, अल्लाहचा सहभागी ठरविणे, मातापित्याशी दुर्वर्तन करणे व खोटी साक्ष देणे.**

**(बुखारी)**

حديث

عَنْ جَابِرِ بْنِ عَبْدِاللّٰهِ قَالَ سَمِعْتُ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ: مَنْ لَقِىَ اللّٰهَ لَا يُشْرِكُ بِهٖ شَيْئًا دَخَلَ الْجَنَّةَ وَمَنْ لَقِيَهٗ يُشْرِكُ بِهٖ دَخَلَ النَّارَ۔ (مسلم كتاب الايمان)

# ''शिर्क'' नाशिवंत

## हदीस

**हज़रत जाबिर बिन अब्दुल्लाह यांचे कथन आहे की मी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना असे फर्माविताना ऐकले, जी व्यक्ति अल्लाहशी अशा स्थितीत भेट घेईल की तिने कोणालाहि त्याचा सहभागी ठरविले नसेल तर ती जन्नतमध्ये दाखल होईल आणि जी व्यक्ति त्याच्याशी अशा स्थितीत भेट घेईल की तिने एखाद्यास त्याचा सहभागी ठरविले असेल तर ती आंगीत दाखल होईल.**

(मुस्लिम किताबुल् ईमान)

## स्पष्टीकरण

शिर्क हे की अल्लाहच्या स्वत्वात व त्याच्या गुण वैशिष्टयात अन्य एखाद्यास सहभागी ठरविले जावे मग तो सुर्य असो व तारे नाग असो की आग, मुर्ति असो किंवा मनुष्य, फिरिश्ते असोत वा जिन्न, वली (सिद्ध पुरुष) असो अथवा पैगंबर, भौतिक वस्तू असोत किंवा अध्यात्मिक वा काल्पनिक देवी असो वा देवता.

अल्लाहच्या स्वत्वात शिर्क संबंधीचे एक उदाहरण तर ते आहे जे खिश्चन मतात आढळून येते. ते एका ऐवजी तीन ईश्वरांचे मान्य कर्ते झालेत. पिता, पुत्र व रूहुल कुदुस (पवित्र आत्मा) आणि दुसरे उदाहरण हिंदुस्तानाच्या बहुसंख्याक धर्मीयांच्या श्रद्धेचे आहे. हा समूह निर्माण कर्ता व ''निर्मिती'' मध्ये कसलाहिं फरक करत नाही किंबहुना दोघांना समसमान लेखतो.

अर्थात या समूहाच्या दृष्टीने सर्व काही ईश्वर आहे व मनुष्य देखील ईश्वराचाच अंश आहे या दृष्टीकोनास कणा कणात ईश्वर म्हणतात.

अल्लाहच्या गुणवैशिष्टयात शिर्क चे उदाहरण म्हणजे ही श्रद्धा होय की ईश्वरीय व्यवस्थापनेत व त्याच्या आधिपत्यात इतरही सम्मिलित व सहभागी आहेत.

उदा. कोणी पावसाचे दैवत,तर कोणी हवेच दैवत. तसेच एक रोग देवता आहे तर एक धन





देवता.तव्द्तच औलिया (सिद्ध पुरुष) आणि महापुरुषांबाबत ही धारणा की ते न्याय दाता व विघ्नहर्ता आहेत व माणसाची गरजपुर्ति करणारे आहेत. अर्थात उघड आहे की अल्लाह हा एकमात्र पालनकर्ता व गरज भागविणारा आहे, हे जाणूनहि त्याच्या या गुणवैशिष्टयात इतरांना सहभागी करणे शिर्क होय.

सर्वश्रेष्ठ अल्लाहची अतिशय महान असे वैशिष्टय हे आहे की तोच उपासनेस पात्र आहे आणि त्याचा हा हक्क आहे की दासांनी त्यांची उपासना करावी.

यात ''शिर्क'' हे आहे की माणसाने अल्लाह खेरीज इतरासहि उपासनायोग्य समजू लागावे अथवा एखाद्या देवी देवता, मुर्ति व सुर्यादिंची पूजा कुरु लागावे, अथवा सिद्ध पुरुषांची व प्रेषितांची भक्ति करु लागावे.

ही सर्व शिर्क ची रुपे होत. याखेरीज हे देखील स्पष्ट शिर्क आहे की अल्लाहखेरीज एखादयास अल्प प्रमाणात आज्ञापालनास योग्य समजले जावे, किंवा एखाद्याकरिता शरीअतच्या कायद्यांत दुरुस्तीचा हक्क मान्य केला जावा अथवा लोकशाहीच्या या दाव्यास उचित ठरविले जावे की अल्लाहच्या आदेशाना व विधि नियमांना दृष्टी आड करुन त्यांना प्रत्येक प्रकारच्या विधि तयार करण्याचा अधिकार आहे.

खरे पाहिले असता शिर्क त्या स्वभाव धर्माविरुद्ध आहे ज्यावर सर्वश्रेष्ठ अल्लाहने माणसाची निर्मिती केली आहे, आणि हे प्रत्यक्षत: त्याविरुद्धचे बंड व विद्रोह आहे म्हणून याला सर्वात मोठा अपराध व अक्षम्य पाप ठरविले गेले आहे.

येथे ही गोष्ट देखील समजून घतली पाहीजे की शिर्कच्या आदेशात कुफ्र आणि नास्तिकताहि सम्मिलित आहे कारण या अर्थात अल्लाहशी बंड आणि विद्रोह आहे आणि अल्लाहचा इन्कार करुन स्वत:ला तसेच इतर माणसांना ईश्वर पदावर बसवितो, उघड आहे की या प्रकारे तो अपरिहार्यत: शिर्क करणारा होतो. फरक केवळ इतकाच की शिर्क धार्मिक स्वरुपात येते आणि नास्तिकता धर्महीनतेच्या स्वरूपात येते.

(भाष्य: दाअवतुल क़ुरआन पृ. २८९)

पवित्र क़ुर्आन फर्माविल्याप्रमाणे (सूरह निसा: ४८)शिर्क एक अक्षम्य पाप आहे म्हणून प्रत्येक शिर्क करणारा जर त्याने शेवटच्या क्षणापर्यंत शिर्क पासून तौबा केली नाही तर कियामतीच्या दिवशी अपरिहार्यत: जहन्नम मध्ये दाखल होइल. तथापि ज्याने शिर्क पासून अलिप्तता बाळगली असेल तो मूलत: जन्नत पात्र ठरेल. जर त्याने इतर दुष्कृत्ये केली असतील व ते क्षम्य केले गेले नाहीत तर त्या दुषकृत्यांची शिक्षा भोगल्यानंतर त्याला जन्नत मध्ये प्रवेश मिळेल. तात्पर्य जर तो एकेश्वरवादी (मुवहिहद) आहे तर त्याचे अंतिम स्थान जन्नत हेच ठरेल.

## حديث

**عَنْ جَابِرٍ قَالَ : نَهَى رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَنْ يُجَصَّصَ الْقَبْرُ وَاَنْ يُّقْعَدَ عَلَيْهِ وَاَنْ يُّبْنٰى عَلَيْهِ .** ( مسلم ، كتاب الجنائز )

# कबर पूजा

## हदीस

**हज़रत जाबिर फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी कबरीस चुन्याने मजबूत करण्यास, तिच्यावर बसण्यास व तिच्यावर इमारत बांधण्यास मना फर्माविले आहे.** (मुस्लिम किताबुल जनाइज)

## स्पष्टीकरण

ही हदीस कबर पूजेची मूळे खणून काढते कारण कबर पूजा अशाच ठिकाणी निर्माण होते जेथे कबरीला मजबूत करून सूशोभित केले जाते आणि तिच्यावर इमारत बांधून ‘‘दरगाह’’ बनविला जातो, परंतु इस्लाम महापुरुषांच्या कबरीना ‘‘दरगाह’’बनविण्याची आज्ञा देत नाही. मुसलमानांनी आपल्या महापुरुषांचे व सिद्ध पुरुषांचे जे शानदार मकबरे बांधले आहेत ते वस्तुत: इस्लामच्या आदेशाच्या अगदी विरुद्ध आहे इस्लाम धर्म कबरीला मग ती एखाद्या महापुरुषाची किंवा वलीचा का असेना, अत्यंत साध्या स्वरूपात पाहू इच्छितो अशासाठी की लोक एकेश्वरवादावर कायम रहावेत, व कबर पूजेत ग्रस्त न व्हावेत परंतु मुसलमानांनी बांधलेल्या शानदार मकबरे व प्रकाशमय दरग्यानी आपल्या अंगी असे आकर्षण निर्माण केले आहे की हे मकबरे व दरगे लोकांची शरण स्थाने बनली आहेत. त्यांचा आदर उपासनेच्या मर्यादेप्रत पोहचला आहे व त्यांच्या पावित्र्याने त्यांने ईश्वराचे स्थान प्रदान केले आहे. म्हणून या कबरीना सजदाहि केला जातो. व जेथे नवसहि मानले जातात,त्यांच्यावर भेट, नजराणे देखील चढविले जातात व त्यांच्यापासून लाभ सुद्धा प्राप्त केला जातो. या कबरीना गिलाफ़ व फूलांच्या चादरीनी सजविले जाते व तेथे रोशनाई देखील केली जाते. एवढेच नव्हे तर या कबरींकडे लोकांना आकर्षित करण्याकरिता महफिली कार्यक्रम व उर्स वगैरे भरविले जातात. या समस्त अनेकेश्वर वादी हरकती करुनही मुसलमानांमधील कबर पूजक वर्ग या भ्रामक कल्पनेत ग्रस्त आहे की यामूळे त्यांच्या एकेश्वरवादाच्या श्रद्धेवर आंच येत नाही वस्तुत: ग्रंथ व सुन्नत च्या दृष्टीने कबरीचा हा गिलाफ धर्माचे कफन आहे आणि भव्य शानदार मकबऱ्यांची रचना इस्लाम ची कबर खोदण्याच्या अर्थासमान आहे.





हदीसमध्ये कबरीवर बसण्याची जी मनाई केली गेली आहे त्याच्या अर्थात कबरीजवळ लाभार्जन, ध्यानधारण व मुजावरी करिता बसणे हे देखील सामिल आहे. اَنْ يُّقْعَدَ عَلَيْهِ

‘‘त्यावर बसणे’’ याचा अर्थ अरबी भाषेत जवळ किंबा किनाऱ्याशी बसणे असाही होतो क़ुरआनातील उल्लेखानुसार वस्तुत: اِذْ هُمْ عَلَيْهَا قُعُوْدٌ

ते आगीवर (अर्थात आगीच्या किनाऱ्याजवळ) बसले होते. (सूरह बुरुज) यास्तव कबरीवर बसण्याच्या या स्पष्ट मनाई नंतरहि कबरीवर समाधीस्थ होण्याकरिता तिची मुजावरी करण्याकरिता व तेथे दरबार भरविण्याकरिता धर्मानुकूल असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

## حديث

**عَنْ اَبِى الْهياج الاَسَدِى قَالَ قَالَ لِى عَلِىٌّ(رض): اَلَا اَبْعَثُكَ عَلٰى مَا بَعَثَنِى عَلَيْهِ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَنْ لَّا تَدَعَ تِمْثَالًا اِلَّاطَمَسْتَهٗ وَلَا قَبْرًا مُشْرِفًا اِلَّاسَوَّيْتَهُ .** (مسلم ، كتاب الجنائز )

## हदीस

**अबू हयाज असदी कथन करतात की मला हजरत अली यांनी फर्माविले, मी तुम्हाला त्या कामासाठी का नये पाठवू ज्या करिता पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) यांनी मला पाठविले होते आणि ते हे की कोणत्याहि पुतळयास नष्ट केल्याशिवाय व कोणात्याहि उंच कबरीस सपाट केल्याखेरीज सोडू नये.** (मुस्लिम, किताबुल् जनाइज़)

## स्पष्टीकरण

इस्लाम पुतळयांच्या संस्कृतीला मानत नाही. करण पुतळे मूर्तिपूजेस व व्यक्तिपूजेस कारक होत आणि आजच्या सुसंस्कृत जगातहि ही कला शिर्कचीच सेवा करीत आहे. राहील्यात उंत कबरी तर ही देखील कबर पूजेस प्रोत्साहन देणारी गोष्ट आहे म्हणून इस्लामने यासहि मनाई केली आहे. ही गोष्ट वेगळी की मुसलमानांमध्ये आपल्या महापुरुषांच्या कबरींना ऊंच बनविण्याचा छंद निर्माण झाला !

## حديث

**عَنْ عَائِشَةَ عن النَّبِىِّ ﷺ قَالَ فِىْ مَرَضِهِ الَّذِىْ مَاتَ فِيْهِ لَعَنَ اللّٰهُ الْيَهُوْدَ وَالنَّصَارٰى اِتَّخَذُوْا قُبُوْرَ اَنْبِيَائِهِمْ مَسْجِداً .** ( بخارى كتاب الجنائز)

## हदीस

**हजरत आयशा द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांनी मरणसाध्य रोगात फर्माविले, अल्लाह धिक्कार करो यहूद व ख्रिश्चनांचा**

**त्यांनी आपल्या प्रेषितांच्या कबरीची पूजा सजाद्याचे (माथा टेकण्याचे) स्थान बनविले .**

(बुखारी किताबुल् जनाइज)

## स्पष्टीकरण

प्रेषितांचे आगमन या हेतुने झाले की त्यांनी लोकांनी तौहीद (एकेश्वर वादा) ची शिकवण दयावी. यास्तव समस्त प्रेषितांचे सर्वसंमत आवाहन हेच होते की एकमेव ईश्वराखेरीज कोणाचीहि उपासना केली जाऊ नये, पण त्यांचे अनुयायी त्यांच्या पश्चात त्यांनी दिलेल्या शिकवणीत असत्याचे मिश्रण करीत राहिले. येथपावेतो की यहूदी व खिश्चनांनी त्यांच्या कबरीची पूजा सुरू केली. ही त्यांच्या शिकवणीची उघड अवहेलना होती.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी आपल्या मरणसाध्य रोगात यहूदी व खिश्चनांच्या या मार्ग भ्रष्टतेबाबत मुसलमानांना सावध केले, अशा साठी की त्यांनी आपल्या पैगंराच्या कबरीसह हा व्यवहार करू नये, व तिला सजदा करण्याचे ठिकाण बनविण्या बाबत घृणा बाळगावी कारण हे कृत्य ऐकेश्वर वादाच्या श्रद्धे विरुद्ध व धिक्काराई आहे.

## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَيْـرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : لَا تَجْعَلُوْا قَبْرِیْ عِيْدًا وَصَلُّوْاعَلَیَّ فَاِنَّ صَلَاتَكُمْ تَبْلُغُنِیْ حَيْثُ كُنْتُمْ** . ( ابو داؤد كتاب المناسک )

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा (रज़ी.) फर्मावितात की, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, ''माझ्या कबरीला यात्रा स्थान बनवू नका तथापि मजवर दरूद पाठवा, कारण तुम्ही कोठही असात. तुमचे दरूद मला पोहचेल.''**

(अबु दाऊद किताबुल् मनासिक)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी आपल्या समस्त जाती समूहास आदेश दिला आहे की त्याने आपल्या कबरीस शरण स्थान बनवू नये मूळ ग्रंथात अरबी शब्द ''ईद'' वापरला गेला आहे ज्याचा अर्थ यात्रा स्थान असाहि आहे व मेळाव्यांचे ठिकाण व उत्सवस्थान असाहि आहे. अर्थात पैगंबरांच्या कबरीवर गर्दी करण्याविषयी आणि उर्स व मेळावे भरविण्याविषयी घृणा बाळगली जावी. दरूद पाठविण्या करिताहि वारंवार कबरीवर हजेरी.





देण्याची आवश्यकता नाही किंबहुना मुसलमान कोठेहि असेल तेथून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम ) यांच्यावर दरूद पाठवू शकतो. आणि त्याने पाठविलेले दरुद पैगंबरांपर्यंत पोहचेल. जर कोणी मदीना येथे पोहचला असेल तर तो पैगंबरांच्या कबरीच्या दर्शनाचा लाभ घेऊ शकतो परंतु केवळ एवढयासाठी त्रास व कष्ट करुन जाण्याची गरज नाही कारण जर कबरीस उद्दिष्ट व शरण स्थान बनविले गेले तर अशाने कबर पूजेचा उपद्रव निर्माण होईल, यास्तव प्रेषित कबरीच्या दर्शना संबंधी अतिशयोक्ति पासून दूर राहण्याची व समतोल मार्गावर राहण्याची गरज आहे.

अर्थात, प्रेषित कबरीस ज्याअर्थी शरणस्थान व उत्सव स्थान बनविले जाऊ शकत नाही तर धर्म विभूतिंच्या कबरींना शरणस्थान बनविण्याचा व त्यांचा उत्सव साजरा करण्याचा प्रशन कोठे निर्माण होतो? वस्तुस्थिती ही आहे की जो मुसलमान कबर दर्शनाच्या मर्यादांचे उल्लंघन करुन मजारी व दरगाह यांना आपले शरण स्थान बनवितात ते पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या आदेशा विरूद्ध वर्तन करतात अर्थात त्यांच्या या कबर पूजा पद्धतिचा इस्लामशी कसलाहि संबंध नाही.

# (७)
# तौहीद ( एकेश्वरवाद )





حديث

عَنِ ا بْنِ عُمَرَ رَضِیَ اللّٰہُ عَنْھُمَا قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰہِ ﷺ بُنِیَ الْاِسْلَامُ
عَلٰی خَمْسٍ. شَھَادَۃِ اَنْ لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَاَنَّ مُحَمَّدًا رَّسُوْلُ اللّٰہِ وَاِقَامِ
الصَّلٰوۃِ وَ اِیْتَاءِ الزَّکَاۃِ وَالْحَجِّ وَصَوْمِ رَمَضَانَ . ( بخاری کتاب الایمان )

# इस्लामचा आधार

## हदीस

**हज़रत अब्दुल्लाह इब्ने उमर (रज़ी.)फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, इस्लाम पाच गोष्टीवर आधारीत आहे. या गोष्टीची साक्ष देणे की अल्लाह खेरीज कोणीहि उपास्य नाही, नमाज़ क़ायम करणे जकात देणे, हज्ज यात्रा करणे आणि रमज़ानाचे रोज़े पाळणे.**

(बुखारी किताबुल् ईमान)

## स्पष्टीकरण

इस्लाम एक परिपूर्ण उपासना व्यवस्था आहे व परिपूर्ण जीवन व्यवस्थाहि आहे. या धर्मात ज्या गोष्टीला सर्वप्रथम व सर्वात महत्वपूर्ण स्थान प्राप्त आहे ती याच्या विशिष्ट परिभाषेत ‘‘इबादत’’ आहे येथे उपासनांचाच उल्लेख आधार म्हणून केला गेला आहे. ह्या उपासना पद्धति माणसाचा ईश्वराशी खरा संबंध निर्माण करतात. माणसाच्या अंगी तौहीद ची कल्पना दृढ करतात . हृदयांत विनम्रता व पश्चातापाची स्थिती निर्माण करतात. दास्यत्व आणि नतमस्तकतेची सूज्ञता जागृत करतात. आपल्या पालनकर्त्याशी प्रेम करणे व त्याच्याचकंडून अपेक्षा वाळगणे शिकवितात. त्यांच्या शिक्षेचे भय दर्शावितात.त्यांच्याअंगी आपल्या पालनकर्त्याची आसक्ति निर्माण करतात. ईमान विषयक भावनां उंचावते. आज्ञापालन आणि आज्ञाधारकतेचा आत्मा त्यांच्या अंतर्यामी फूंकतात. तसेच केवळ अल्लाह कारीताच जगण्यास व मरण्यास व त्याच्या वचनाला जागण्याकरिता आहुत्या देण्या करिता माणसाला प्रवृत्त करतात. आणि म्हणूनच या उपासना-पद्धतिंचे प्रतिबिंब त्या सुज्ञता पूर्वक पार पाडल्या गेल्यास-मनुष्याच्या संपूर्ण जीवनावर पडते आणि तो जीवन व्यतित करण्याचा तोच मार्ग पत्करतो जो अल्लाहने निर्धारीत केलेला आहे, म्हणजे अल्लाहच्या शरीअत चे पालन व त्याच्या विधि आदेशांची पूर्तता जोपर्यंत या उपासनांची छाप मनावर चांगली नसेल तोपर्यंत व्यावहारीक आणि सामूहीक जीवनात इस्लामच्या आदेशांचे यथायोग्य पालन करणे कठीण आहे. या वस्तुस्थितीस लक्षात घेता या उपासना

प्रकारांचे शरीअतच्या इतर सर्व आदेशांवरील श्रेष्ठत्व अगदी स्पष्ट आहे. आणि याच कारणास्तव यांना आधार स्तंभ (Pillars) चा दर्जा दिला आहे. ज्यांच्या आधारे इस्लामची संपूर्ण इमारत उभी असते.

येथे हेहि लक्षात घेतले पाहिजे की जिहाद (धर्मयुद्धाला) हा दर्जा त्याची महत्ता व उपयोगिता असतांना हि दिले गेले नाही कारण जिहाद (धर्मयुद्ध हे नित्य पार पाडले जाणारे कर्तव्य नव्हे किंबहुना ते परिस्थिती संबंधाने फर्ज (कर्तव्य)ठरते व है कर्तव्य सर्वसामान्यत: सामूहीक स्वरूपात असते,उलट या उपासना पद्धति प्रत्येक प्रकारच्या परिस्थितीत नित्य कर्तव्ये ठरतात व त्याविषयी प्रत्येक व्यक्तिस तगादा केला गेला आहे. याखेरीज की एखादी व्यक्ति ही कर्तव्ये पार पाडण्याची मूलत: सामार्थ्य बाळगत नसेल. या स्थितीत शरीअतने अशा व्यक्तिस एका विशिष्ट मर्यादेपर्यत सवलत दिली आहे.

हाफ़िज़ इब्ने हजर या हदीसचे स्पष्टीकरण करतांना लिहितात.

**لَمْ يذكر الجهاد لانه كفاية ولا يتعين اِلّا فى بَعض الاحوال**

( فتح الباری ج ١ ص ٤٣ )

जिहादचा उल्लेख कारणास्तव केला गेला नाही की ते फर्ज किफाया (सामूहिक कर्तव्य) आहे व काही परिस्थितीतच लागू पडते.

(फतहुल बारी खंड १ पृ.४२)





## حديث

**عَنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عُمَرَ قَالَ قَالَ رَسُولُ اللّٰهِ ﷺ يَطْوِى اللّٰهُ عَزَّوَجَلَّ السَّمٰوَاتِ يَوْمَ الْقِيَامَةِ ثُمَّ يَاخُذُهُنَّ بِيَدِهِ الْيُمْنىٰ ثُمَّ يَقُوْلُ اَنَا الْمَلِكُ اَيْنَ الْجَبَّارُوْنَ؟ اَيْنَ اَلْمُتَكَبِّرُوْنَ؟ ثُمَّ يَطْوِىْ اَلْاَرِضِيْنَ بِشِمَالِهِ ثُمَّ يَقُوْلُ اَنَا الْمَلِكُ اَيْنَ الْجَبَّارُوْنَ اَيْنَ الْمُتَكَبِّرُوْنَ.** ( مسلم باب صفة القيامة )

# खरा बादशाह

## हदीस

**अब्दुल्लाह इब्ने उमर फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह कियामतीच्या दिवशी आकाशांना गुंडाळील व आपल्या उजव्या हातात घेऊन फर्माविल, मी आहे बादशाह. कोठे आहेत जबरदस्त शासक? आणि कोठे आहेत ते जे आपल्या मोठेपणाचा दावा करणारे होते? मग जमीनीना आपल्या डाव्या हातात गुंडाळून (अशा प्रकारे) फर्माविले की,मी आहे बादशाह, कोठे आहात जबरदस्त शासक ? आणि कोठे आहेत मोठेपणाचा दावा करणारे ?**

(मुस्लिम बाब सिफतुल क़ियामह)

## स्पष्टीकरण

आकाशांचा व जमीनींचा सर्वोच्च अधिपती केवळ अल्लाह आहे. परंतु या कसोटीच्या जीवनात त्याच्या कडून तात्पुरते अधिकार प्राप्त करुन मनुष्य गर्विष्ठ होतो. आपल्या स्वामीत्वाचा दावेदार बनून अत्याचार व अतिरेक करु लागतो. परंतु क़ियामतीच्या दिवशी ज्यावेळी माणसा कडून समस्त हक्काधिकार हिरावून घेतले गेले असतील सत्ता आणि स्वामीत्वाचा कोणीही दावेदार नसेल त्या दिवशी मनुष्याला हे चांगल्या प्रकारे कळून येईल की सत्ता आणि राज्य अल्लाह खेरीज इतर कोणाचेच नाही. त्या दिवशी प्रत्येक व्यक्तिला ही वस्तुस्थिती स्वीकारणे भाग पडेल. माणसाने या जगातच ही वस्तुस्थिती मान्य केली असली तर किती लाभदायक ठरले असते !

## حديث

**عَنْ اَبِی هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَا مِنْ مَوْلُوْدٍ اِلَّا يُوْلَدُ عَلَى الْفِطْرَةِ. فَاَبَوَاهُ يُهَوِّدَانِهٖ وَيُنَصِّرَانِهٖ وَيُشَرِّكَانِهٖ .**

( مسلم کتاب القدر )

# स्वाभाविक धर्म

## हदीस

**हजरत अबु हुरैरा फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, कोणतेहि मूल असे नाही जे स्वाभाविक सत्यतेच्या आधारे जन्माला आलेले नसावे. मग त्याचे माता पिता त्याला यहूदी, खिश्चन किंवा अनेकेश्वरवादी बनवितात.**

(मुस्लिम किताबुल कद्र)

## स्पष्टीकरण

स्वाभाविक सत्योच्या आधारे जन्माचा अर्थ एकेश्वर वादावर जन्मला येणे हा आहे प्रत्येक मनुष्यच्या स्वभावात त्याचा पालनकर्ता या नात्याने एक ईश्वराची कल्पना असते. आणि इतर उपास्यांबाबत तो अगदी अनीभज्ञ असतो. तव्द्तच प्रत्येक मनुष्याचा स्वभाव मुलत:पुण्याईच्या व भलाईच्या कृत्यांना पसंत करतो. व दुष्कृत्यांना व अपायकारक कृत्यांना नापसंत करतो. तसेच त्याची विवेक बुद्धि व त्याची आत्मविस्मृति त्याला आपल्या पालनकर्त्या समोर उत्तराधिकारी ठरवितो.

इस्लाम याशिवाय काही नाही की तो स्वभावाच्या त्या संकेतांचा खुलासा आणि त्याचे परिपूर्ण स्पष्टीकरण आहे. म्हणून त्यास उचित अर्थाने स्वाभाविक धर्म म्हटले गेले आहे आणि येथूनच ही व्सतुस्थितीहि स्पष्ट होते की मुलाला त्याच्या स्वाभाविक धर्मापासून परावृत्त करुन अन्य एखाद्या धर्माशी संबंधित करणारी गोष्ट एक बाहय कार्य असते. हे कार्य माता पिता किवा वातावरणाद्वारे पार पाडले जाते. मग ते यहुदी धर्माच्या स्वरुपात असो किंवा खिश्चन मताच्या स्वरूपात असो, बुद्धिमताच्या स्वरूपात असो किंवा हिंदूमताच्या स्वरूपात असो मुर्तिपूजेच्या स्वरूपात असो अथवा नास्तिकतेच्या स्वरूपात असो.





## حديث

**عَنْ اَبِی هُرَيْرَةَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ قَالَ اللّٰهُ تَعَالٰى: يَشْتِمُنِیْ اِبْنُ آدَمَ ، وَمَا يَنْبَغِیْ لَهٗ اَنْ يَشْتِمَنِیْ وَ يُكَذِّبُنِی ، وَمَا يَنْبَغِیْ لَهٗ . اَمَّا شَتْمُهٗ فَقَوْلُهٗ اَنَّ لِی وَلَدًا وَاَمَّا تَكْذِيْبُهٗ فَقَوْلُهٗ لَيْسَ يُعِيْدُنِیْ كَمَا بَدَأَنِیْ .** ( البخاری کتاب بدء الخلق )

# ईश्वरास संतती असण्याची कल्पना

## हदीस

**हजरत अबु हुरैरा कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो आदम पुत्र मला बरे वाईट म्हण्तो, वस्तुतः ही गोष्ट त्याला शोभत नाही. आणि तो मला खोटे ठरवितो आणि हे खोटे ठरविणे त्याला शोभत नाही. त्याचे बरे वाईट म्हण्णे असे आहे की तो माझ्याकरिता संतती योजितो, आणि त्याचे खोटे ठरविणे असे आहे की तो म्हणतो, ज्या प्रकारे ईश्वराने मला पहिल्यांदा निर्माण केले, त्याच प्रकारे दुसऱ्यांदा निर्माण करणार नाही.**

(अल् बुखारी किताब बद्उ्ल खल्क)

## स्पष्टीकरण

ही हदीस कुदसी आहे. ज्यात पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी अल्लाहच्या फर्मानाचा उल्लेख केला आहे. म्हणून ही हदीस असामान्य महत्व बाळगते. यात त्या दोन मोठया मार्गभ्रष्टांची निकृष्टता स्पष्ट केली गेली आहे. ज्यात असंख्या लोक प्राप्त आहेत.

एक मार्गभ्रष्टता ही की ईश्वराकरिता संतती जावी. असे कितीतरी धर्म आहेत ज्यांत ईश्वराला संतती असण्याची श्रद्धा दिसून येते. उदा. खिश्चन धर्मीय. हज़रत ईसा (येशु) संबंधी तो ईश्वर पुत्र असल्याचा दावा करतात यहूदी लोक हज़रत उजैर यांना ईश्वर पुत्र म्हणतात. आणि मक्केचे अनेकेश्वरवादी फिरिश्त्यांनी ईशकन्या ठरवत. वस्तुत: यामागे ना एखादे बौद्धिक प्रमाण आहे ना ग्रंथ-प्रमाण किंबहुना यांची अयोग्यता अगदी स्पष्ट आहे कारण संततीचा अर्थ ईश्वरला मानवाच्या पातळीवर आणणे होय. वस्तुत: ईश्वर अत्यंत श्रेष्ठ व सर्वोच्च अस्तित्व आहे त्याला

पुत्र अथवा कन्या असण्याची तुच्छ कल्पना केवळ असेच लोक कायम करू शकतात ज्यांची विचार सरणी उच्चपातळीची नसते. अन्यथा ही कामकुवत गोष्ट ईश्वराकडे कशा प्रकारे निर्देशित केली जाऊ शकते म्हणूनच सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो की माझ्या करिता संतती योजणे खरे पाहिले असता मला बरे वाईट म्हणणे होय.

दुसरी मोठी मार्गभ्रष्टता म्हणजे दुसऱ्यांदा निर्माण केल्या जाण्याचा इन्कार होय. वस्तुत: सर्वश्रेष्ठ अल्लाह आपल्या प्रेषितांद्वारे व ग्रंथांद्वारे मानवाला सचेत करीत राहीला की कियामतीचा दिवस अपरिहार्यत: येणार आहे. त्यावेळी समस्त मानवांना दुसऱ्यांदा उठवून उभे केले जाईल. अशा साठी की ईश्वराच्या न्यायालयात प्रत्येकाची पेशी व्हावी. आणि आपल्या आचरणानुसार त्याला शिक्षा व मोबदला मिळावा. हे दुसरे जीवन मनुष्याला प्रदान करणे बुद्धि आणि न्यायाची निकड देखील आहे. आणि असे करण्यास अल्लाह निश्चितपणे समर्थ आहे. परंतु मनुष्य है इच्छित नाही की एक अशा कल्पनेचा अंगिकार करावा ज्याच्या परिणामी त्याला जगात एक जबाबदार जीवन व्यतीत करणे क्रमप्राप्त व्हावे. यासाठीच तो सत्याचा इन्कार करतो आणि म्हण्तो की मातीत मिसळल्यानंतर माणसाला दुसऱ्यांदा जिवंत करणे शक्य आहे काय? जणू ईश्वराकरिता पहिल्यांदा निर्माण करणे कठीण नव्हते तथापि दुसऱ्यांदा निर्माण करणे कठीण आहे. उघड आहे ही ईश्वर-सामर्थ्याची अत्यंत मर्यादित व चुकीचा कल्पना आहे. तसेच हे ईश्वराच्या अवतरीत ग्रंथांना व त्याने पाठविलेल्या पैगंबरांना खोटे ठरविणे आहे, किंबहुना ईश्वरालाच खोटे ठरविणे आहे कारण दुसऱ्यांदा निर्माण केले जाण्याची खबर स्वत: सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या ग्रंथांमध्ये व आपल्या प्रेषितांद्वारे दिली आहे. आणि सृष्टीत अशी चिन्हें ठेवली आहेत जी त्याच्या दिशेने मार्गदर्शन करतात





حديث

عَنِ ابْنِ عَبَّاسٍ قَالَ كَانَ النَّبِىُّ صلى الله عليه وسلم اِذَا تَهَجَّدَ مِنَ اللَّيْلِ قَالَ اللّٰهُمَّ رَبَّنَا لَکَ الْحَمْدُ اَنْتَ قَيِّمُ السَّمٰوَاتِ وَالْاَرْضِ وَلَکَ الْحَمْدُ اَنْتَ رَبُّ السَّمٰوَاتِ وَالْاَرْضِ وَمَنْ فِيْهِنَّ وَلَکَ الْحَمْدُ اَنْتَ نُوْرُ السَّمٰوَاتِ وَالْاَرْضِ وَمَنْ فِيْهِنَّ اَنْتَ الْحَقُّ وَقَوْلُکَ الْحَقُّ وَوَعْدُکَ الْحَقُّ وَلِقَاءُکَ الْحَقُّ وَالْجَنَّةُ حَقٌّ وَالنَّارُ حَقٌّ وَالسَّاعَةُ حَقٌّ اَللّٰهُمَّ لَکَ اَسْلَمْتُ وَبِکَ آمَنْتُ وَعَلَيْکَ تَوَكَّلْتُ وَاِلَيْکَ خَاصَمْتُ وَبِکَ حَاكَمْتُ فَاغْفِرْلِى مَاقَدَّمْتُ وَمَا اَخَّرْتُ وَاَسْرَرْتُ وَاَعْلَنْتُ وَمَا اَنْتَ اَعْلَمُ بِهِ مِنِّىْ لَااِلٰهَ اِلَّا اَنْتَ. (البخارى كتاب التوحيد)

# एकेश्वर वादाची स्वीकृति आणि दास्यत्वाची जाणीव

## हदीस

**हज़रत इब्ने अब्बास (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) रात्री तहज्जुदच्या वेली ही दुआ फर्मावित: हे अल्लाह, आमच्या पालनकर्त्या ! स्तुति व कृतज्ञता फक्त तुझ्याच साठी आहे तू आकाश व जमिनीला कायम करणारा व आबाधित ठेवणारा आहे. प्रशंसा केवळ तुझ्याच साठी आहे तू आकाशांच्या व जमीनीच्या आणि यांच्या दरम्यानच्या प्राणी मात्रांचा पालनकर्ता आहेस. स्तुति तुझ्याच साठी आहे तू आकाशाच्या व जमीनीच्या आणि यांच्या दरम्यानच्या अस्तित्वांचा नूर (प्रकाश) आहेस. तुझे अस्तित्व सत्य आहे. तुझे फर्मान सत्य आहे. तुझा वायदा खरा आहे. व तुझ्या समक्ष पेशीहि एक वस्तुस्थिती आहे. जन्नत देखील सत्य आहे आणि जहन्नम देखील सत्य आहे. तसेच कियामतीची वळही सत्य आहे. हे अल्लाह ! मी स्वत:ला तुझ्या हवाली सोपविले व तुजवर ईमान आणले तुझ्यावरच भरवसा ठेवला आणि तुझ्याच समक्ष तक्रार गाऱ्हाणे मांडले व तुलाच निर्णयकर्ता बनविले. तेव्हा माझे पुढचे मागचे आणि ते सर्व पाप जी तू माझ्यापेक्षा अधिक जाणतोस माफ कर कारण तुझ्याकेरीजकोणीहि उपासनीय नाही.** (बुखारी किताबुत तौहीद)

## स्पष्टीकरण

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या या अर्धरात्रीच्या प्रार्थना होत. ज्यात एकेश्वरवादाची स्वीकृतिहि आहे आणि दास्यत्वाचे प्रकटीकरणहि आहे. ईश्वराची स्तुति प्रशंसाहि आहे आणि कृतज्ञता निष्ठाहि आहे अल्लाहच्या गुणवैशिष्टयांचे वर्णन आहे व ईमान आणि भरवशाचे प्रकटीकरण देखील आहे. आणि शेवटी क्षमायाचनाहि आहे. तात्पर्य या प्रार्थनेत ते सर्व काही आहे ज्या द्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाहशी खरा संबंध कायम केला जाऊ शकतो.

(८)
## हजरत मुहम्मद यांचे प्रेषितत्व





حديث

قَالَ جَابِرُ بنِ عَبدِ اللّٰهِ (رض) قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : كَانَ النَّبِيُّ يُبعَثُ
اِلَى قَوْمِهِ خَاصَّةً وَ بُعِثْتُ اِلَى النَّاسِ كَافَّةً. (صحيح البخارى ـ كتاب الصلوٰة)

# विश्वव्यापी प्रेषितत्व

## हदीस

**हजरत जाबीर बिन अब्दुल्लाह (रज़ी.) फर्माविताात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी असे फर्माविले, या पुर्वी प्रेषित विशेषतः त्याच्या स्वतःच्या जाती समूहाकडे पाठविला जाई परंतु मला समस्त मानवांकडे पाठविले गेले आहे.**

(सहीऊल बुखारी किताबुस्सलात)

## स्पष्टीकरण

हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या पूर्वी विविधि काळात व विविध देशात अल्लाह चे प्रेषित आले. सर्वश्रेष्ठ अल्लाह प्रत्येक जाती समूहात एक ना एक प्रेषित पाठवत राहिला अशासाठी की त्याचा धर्म प्रेषित द्वारे त्याच्या जाती समूहाप्रत पोहचावा. हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या पूर्वी जग आंतराष्ट्रीय दृष्टया एवढे विस्तृत नव्हते तसेच नागरीसाधनांचीही इतकी प्रगती नव्हती की विश्वव्यापी प्रेषितत्व आणि परिपूर्ण शरीयतीच्या निकडी पूर्ण झाल्या असत्या यासाठी सर्वसामान्यतः प्रत्येक पैगंबराशी केवळ त्याच्या जाती समूहाचे लोक संबंधित राहलि तथापि त्यांचे आवाहन मूल भूत दृष्टीया समस्त मानवांकरिता राहीले कारण सर्व प्रेषितांचा धर्म एकच होता अर्थात इस्लाम धर्म जो समस्त मानवांच्या मार्गदर्शनाकरिता पाठविला गेला होता तथापि सर्वश्रेष्ठ अल्लाहने परिस्थिती व काळाची निकड जाणून प्रत्येक जाती समूहाकरिता अलग अलग शरीअत निर्धारित केलेली होती. परंतु जेव्हा हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे शुभागमन झाले तेव्हा जग नागरी दृष्टया व आंतर्राष्ट्रीय दृष्टया एवढया प्रगतीप्रत पोहचले होते की परिपूर्ण शरीअत व विश्वव्यापी प्रेषितत्वाच्या निकडी पुर्ण होऊ शकल्या असत्या. म्हणून सर्वश्रेष्ठ अल्लाहने हजरत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना स्थळ काळाच्या बंधनाशिवाय

कियामती पर्यंत समस्त विश्व वासीयांकडे प्रेषित व पैगंबर बनवून पाठविले. यास्तव पैगंबरांशी संबंधित केवळ अरबच नव्हे तर कैसर व कसराहि ठरले. आणि प्रत्येक जाती समूहाचे लोक इस्लामचा अंगिकार करत गेले. येथपावेतो की विश्वाच्या काना कोपऱ्यापर्यंत इस्लाम प्रसारित झाला. आणि म्सणूनट अशी कल्पना करणे उचित ठरणार नाही की हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) केवळ ''मुस्लिम जन समूहाचे'' पैगंबर आहेत किंबहुना वस्तुस्थिती ही आहे की सर्व विश्वांच्या पालनकर्त्या अल्लाहने त्यांना विश्वातील सर्व जाती समूहांकरिता पैगंबर बनवून पाठविले आहे पैगंबरांचे मार्गदर्शन कियामतीपावेतो आहे.आणि त्यांचा धर्म व त्यांचा धर्म व त्यांची शरीअत समस्त ईशवर दासांकरिता आहे.मग ते कोणत्याही जाती धर्माचे असोत, कोणत्याहि देशाचे स्थायिक असोत जे लोक पक्षपात आणि संकुचित वृत्तीमुळे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे प्रेषितत्व, व मार्गदर्शन मान्य करणार नाहीत ते फार मोठया मंगलते पासून वंचित राहतील एवाढेच नव्हे तर ईश्वराच्या प्रतिनिधि, मान्य न केल्यामूळे घोर अपराधी ठरतील.





## حديث

**عَنْ جَابِرٍ (رض) قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : مَثَلِىْ وَمَثُلُكُمْ كَمَثَلِ رَجُلٍ اَوْقَدَ نَارًا فَجَعَلَ الْجَنَادِبُ وَالْفِرَاشُ يَقَعْنَ فِيْهَاوَهُوَيَذُبُّهُنَّ عَنْهَا وَاَنَا آخِذٌبِحُجَزِكُمْ عَنِ النَّارِوَاَنتُمْ تَفَلَّتُوْنَ مِنْ يَدِىْ .**

( مسلم كتاب الفضائل )

# विश्वाचा मुक्तिदाता

## हदीस

**हजरत जाबीर (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, माझे आणि तुमचे उदाहरण असे आहे जणू एखाद्याने आग प्रज्वलीत केली, तेव्हा पतिंगे येऊन त्यात पडू लागले आणि तो त्यांना त्या आगीपासून हटवित आहे. मी सुद्धा तुमचे कंबर पकडून तुम्हाला (दोज़खच्या) आगिपासून हटवित आहे परंतु तुम्ही आहात की माझ्या हातून निघून जात आहात.**

(मुस्लिम किताबुल् फजाइल)

## स्पष्टीकरण

पैगंबर मुहम्मद सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी सर्वश्रेष्ठ अल्लाह तर्फे सर्व विश्वाच्या मानव जातीकरिता मार्गदर्शक व मुक्तिदाता बनून शुभागमन केले. त्यांनी जी शिकवन सादर केली तिचे उद्दिष्ट मानवाला जहन्नमच्या आगीपासून वाचविणे हे होय. परंतु मनुष्य इच्छा आकांक्षाच्या मागे लागून व परिणितीशी गाफील राहून दुष्कृत्यांत व पापकर्मात जाऊन पडतो. तद्वतच त्याला पतंग्यांचे उदाहरण अगदी यथार्थ ठरते जे आगीवर आसक्त होतात. वस्तुत: आग त्यांना जाळून भस्मसात करते.जर मनुष्य जहन्नमच्या आगी पासून स्वत:ला वाचवू इच्छित असेल तर त्याच्यासाठी मुक्तिचा एकच मार्ग आहे आणि तो हा की आपल्या इच्छा आकांक्षांचे पालन करण्याएवजी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या अनुसरणाचा मार्ग अंगिकारावा. जगाने जर हे जाणून घेतले असते की मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) हे एखाद्या विशिष्ट जाती समूहाकरिता नव्हे किंबहुना जगाच्या सर्व मानवांकरिता मुक्तिदाता बनून आले होते व त्यांची शिकवण जगाच्या अंतापर्यंच समस्त मानव जाती करिता व समस्त जाती समूहांकरिता आहे तर किती बरे झाले असते.

## حديث

عَنْ اَبِی مُوسیٰ عَنِ النَّبِی ﷺ قَالَ : اِنَّ مَثَلِیْ وَ مَثَل مَا بَعَثَنِیَ اللّٰهُ عَزَّ وَ جَلَّ بِهٖ كَمَثَلِ رَجُلٍ اَتیٰ قَوْمَهٗ فَقَالَ يَا قَوْمِ اِنِّیْ رَأَيْتُ الْجَيْشَ بِعَيْنَیَّ وَ اِنِّیْ اَنَا النَّذِيْرُ الْعُرْيَانُ فَالنَّجَاءَ فَاَطَاعَهٗ طَائِفَةٌ مِّنْ قَوْمِهٖ فَأَدْلَجُوْا فَانْطَلَقُوْا عَلٰی مُهْلَتِهِمْ وَ كَذَّبَتْ طَائِفَةٌ مِّنْهُمْ فَاَصْبَحُوْا مَكَانَهُمْ فَصَبَّحَهُمُ الْجَيْشُ فَاَهْلَكَهُمْ وَاجْتَاحَهُمْ. فَذٰلِكَ مَثَلُ مَنْ اَطَاعَنِیْ وَاتَّبَعَ مَا جِئْتُ بِهٖ وَ مَثَلُ مَنْ عَصَانِیْ وَ كَذَّبَ مَا جِئْتُ بِهٖ مِنَ الْحَقِّ. ( مسلم كتاب الفضائل )

## हदीस

**हज़रत अबू मूसा (रज़ी) कथन करितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी असे फर्माविले, मला अल्लाह ने ज्या मार्गदर्शनासह पाठविले आहे आहे त्याचे उदाहरण त्या व्यक्तिसारखे आहे जी आपल्या जाती समूहाजवळ येऊन म्हणाली, लोक हो ! मी आपल्या डोळायांनी पाहिले आहे की सैन्य (तुमच्यावर आक्रमण करण्याकरिता) येत आहे. वस्तुस्थिती अशी की मी अनावरित भय दर्शविणारा आहे म्हणून मुक्तिची काळजी करा. जाती समूहाच्या एका गटाने त्या व्यक्तिचे म्हणणे मान्य केले व सवलतीस उत्तम जाणून तो (तत्काळ) रात्रीच्या अंधःकारातच (मुकाबल्यासाठी) बाहेर पडला परंतु दुसाऱ्या गटाने खोटे ठरविले व तो आपल्या जागीच राहिल. प्रातःकाळ होताच सैन्याने हल्ला चढविला व त्यांना ठार केले व सर्वनाश केला. हे (पहिले) उदाहरण त्या लोकांचे आहे ज्यांनी माझे म्हणणे मान्य केले व मी आणलेल्या मार्गदर्शनाची अनुसरण केले. आणि हे (दुसरे) उदाहरण त्या लोकांचे आहे ज्यांनी माझे म्हणणे मान्य केले नाही व मी जे सत्य घेऊन आलो आहे त्यास खोटे ठरविले.**

(मुस्लिम किताबुल् फजाइल)

## स्पष्टीकरण

अज्ञान काळात जेव्हा जाती समूहाचा प्रमुख बाहेरून शत्रु-हल्याची खबर आणि तेव्हा वस्तीत दाखल होण्यापूर्वी दुरूनच आपले कपडे उतरवून संकटाचा संकेत करी अशासाठी की लोकांनी त्वरीत सावध व्हावे व स्वसरंक्षणाची उपाय योजना करावी अशा व्यक्तिला ''नजीर उर्या'' म्हटले जाते अर्थात इघड सचेत करणारा.





या उदाहरणावरुन हे स्पष्ट करणे उद्दिष्ट आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी विश्ववासीयांना मोबदल्याच्या दिवसाविषयी खबरदार करण्याकरिता शुभागमन केले आहे. पैगंबराचे आवाहन मानवाला येणाऱ्या दिवसाच्या भंयानकते पासून वाचविण्यातरिता व त्यास सदैव यशस्वी करणयाकरिता आहे म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची योग्यता जगलवाल्यांकरिती मुक्तिदाता या नात्याने आहे. परंतु लोकांनी पैगंबरांच्या या योग्यतेला समजून घेतले नाही. यास्तव पैगंबरांनी सावध केल्यानंतरहि ते इतक्या समाधानाने जीवन व्यतित करीत आहेत की जणू कियामत येणार नाही व त्यांना ईश्वरापुढे आपल्या कृतकर्माचा जाब द्यावा लागणार नाही.

حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ عَنْ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَنَّهُ قَالَ: وَالَّذِیْ نَفْسُ مُحَمَّدٍ بِیَدِهٖ لَایَسْمَعُ بِیْ اَحَدٌ مِنْ هٰذِهِ الْأُمَّةِ یَهُوْدِیٌّ وَلَا نَصْرَانِیٌّ ثُمَّ یَمُوْتُ وَلَمْ یُؤْمِنْ بِالَّذِیْ اُرْسِلْتُ بِهٖ اِلَّا كَانَ مِنْ اَصْحَابِ النَّارِ. ( مسلم کتاب الایمان )

# मुक्तिकरिता हजरत मुहम्मद यांच्या प्रेषितत्वावर ईमान आणणे अत्यावश्यक

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) द्वारे उल्लेखितात की, पैगंबरानी फर्माविले, शपथ त्या शक्तिची जिच्या हाती मुहम्मदचा प्राण आहे, या काळीतील लोकांपैकी कोणताहि मनुष्य मग तो यहूदी असो वा खिश्चन त्याने माझी वार्ता ऐकावी आणि मग त्या (धर्मा) वर ईमान आणल्याशिवाय मरावे ज्यासह मला पाठविले गेले आहे तर तो अपरिहार्यतः जहन्नमी पैकी असेल.**

(मुस्लिम किताबुल ईमान)

## स्पष्टीकरण

''या काळीतील'' म्हण्जे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या शुभागमनापासून कियीमती पर्यंतचा काळ होय. कारण त्यांना कियामती पर्यंत करिता ''रसूल'' बनवून पाठविले गेले आहे. आणि त्यांना पाठविले जाणे अरब व इतरच्या सर्व जाती समूहांकडे आहे.

पैगंबरांनी अल्लाहची शपथ घेऊन फर्माविले. अशासाठी की कथनाची निश्चितता स्पष्ट व्हावी व शंका संशयाकरिता वाव राहू नये.

प्रेषितांच्या फर्माविण्याचा अर्थ हा आहे की त्यांच्या प्रेषितत्वाची खबर कोणत्याही व्यक्तिपर्यंत पोहचल्यास त्याच्याकरिता पैगंबरांवर ईमान आणणे व त्यांनी आणलेल्या शरीअतीस मान्य करणे आवश्यक आहे. याबाबत कोणतीही व्यक्ति व कोणताही जातीसमूह यथेपावेतो की ग्रंथ धारक हि अपवाद नाही त्यांच्या प्रेषितत्वाचे आवाहन पोहचल्यानंतर कोणतीहि मनुष्य त्यांच्यावर व त्यांनी आणलेल्या धर्मावर ईमान आणणार नाही तो जहन्नमी (नरकवासी) ठरेल.





حديث

عَنْ اَبِی هُرَیْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ: مَنْ اَطَاعَنِیْ فَقَدْ اَطَاعَ اللّٰهَ وَمَنْ عَصَانِیْ فَقَدْ عَصَی اللّٰهَ . ( بخاری کتاب الاحکام )

# प्रेषिताचे आज्ञापालन

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा यांचे कथन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले, ज्याने माझे आज्ञापालन केले त्याने खरे पाहता, अल्लाहचे आज्ञापालन केले व ज्याने माझी अवज्ञा केली त्याने खरे पाहता अल्लाहची अवज्ञा केली.**

(बुखारी किताबुल् अहकाम)

## स्पष्टीकरण

एखाद्या व्यक्तिच्या रसूल असण्याचा अर्थ हा की सर्वश्रेष्ठ अल्लाहने त्याला मार्गदर्शनाच्या पदावर नियुक्त केले आहे. ईश्वर संदेश लोकांपर्यंत पोहचविणे व त्याच्या आदेश व शरीअत संबंधीच्या तपाशीलाबाबत त्यांना सचेत करणे प्रेषितपदाचे कर्तव्या आहे. तसेच लोकांचे हे कर्तव्य आहे कि त्यांनी कां कू न करता प्रेषिताचे आज्ञापालन करावे, हे आज्ञापालन खरे पाहता अल्लाहचे आज्ञापालन आहे कारण प्रेषित कोणतीही आदेश स्वत:तर्फे देत नाही. किंबहुना जे मार्गदर्शन तो ईश्वराकडून प्राप्त करतो, त्याचविषयी तो आदेश देतो. या स्थितीत प्रेषिताच्या कोणत्याही आदेशाची अवज्ञा, वस्तुत: अल्लाहच्या आदेशाची अवज्ञा आणि त्याच्या अज्ञापालनास नकार म्हणजे अल्लाहच्या आज्ञापालनास दर्शविन्यासारखे आहे.

## حديث

عَنْ اَبِی هُرَيْرَةَ اَنَّ رَسُوْلَ اللهِ ﷺ قَالَ: فُضِّلْتُ عَلَى الْاَنْبِيَاءِ بِسِتٍّ:۔ اُعْطِيْتُ جَوَامِعَ الْكَلِمِ وَ نُصِرْتُ بِالرُّعْبِ، وَاُحِلَّتْ لِىَ الْغَنَائِمُ ، وَجُعِلَتْ لِىَ الْاَرْضُ طَهُوْرًا وَ مَسْجِدًا، وَاُرْسِلْتُ اِلَى الْخَلْقِ كَافَّةً وَخُتِمَ بِىَ النَّبِيُّوْنَ. ( مسلم كتاب المساجد)

# पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची खास वैशिष्टये

## हदीस

**हजरत अबु हुरैरा (रजी.) यांचे कथन आहे पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, मला इतर प्रेषितांच्या तुलनेने सहा गोष्टीत श्रेष्ठत्व दिले गेले आहे. मला सर्वकष वचने प्रदान केली गेली आहेत दबदब्याद्वारे माझी मदत केली गेली आहे. युद्धात जिंकलेली मालमत्ता माझ्याकरिता उचित केली गेली आहे. सर्व जमीनीस माझ्याकरिता स्वच्छ शुद्ध व उपासना-स्थळ बनविले गेले आहे. मला सर्व निर्मितीकडे प्रेषित बनवून पाठविले गेले आहे, आणि प्रेषित-क्रम मजवर समाप्त केला गेला आहे.**

(मुस्लिम किताबुल् मसाजिद)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची सहा प्रमुख वैशिष्टये वर्णिली गेली आहेत, जी सर्वश्रेष्ठ अल्लाह ने त्यांना प्रदान केली होती.

१. पैगंबर यांना सर्वकष वचने प्रदान केली गेली आहेत कुरआनाच्या संदर्भात, तो अल्लाहचा ग्रंथ आहे आणि सर्व दृष्टया एक चमत्कार आहे, परंतु हदीस देखील जे प्रेषित वाणी आहे आपल्या परिने एक विशिष्ट स्थान बाळगते. शब्द मोजके पण विषय परिपूर्ण व अर्थपूर्ण जणू अर्थसागराला ओंजळीत सामावून घेतले आहे. प्रेषितवाणीच्या या वैशिष्टयामुळे हदीस वचने सहजतेने मुखोद्‌गत होतात आणि त्यांच्यात कमालीचा प्रभाव दिसून येतो.

२.रुबाबद्वारे त्यांची मदत केला आहे आणि दुसऱ्या एका हदीसमध्ये हे स्पष्टीकरण आहे की





त्यांचा शत्रू एक महिन्याचा प्रवासा इतक्या अतंरावर असेल तरीहि तो भयभीत होईल, यास्तव कैसर व किसरा वर त्यांचा जबरदस्त धाक बसला आणि सत्ताधिकाऱ्यां चे घावे दणाणले.

३. युद्ध प्रसंगी शत्रुचा जो माल ताब्यात येई तो मागील जाती समूहांकरिता या कारणास्तव उचित नव्हता त्यांच ज्याप्रमाणे मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या जाती समूहाकरिता उचित ठरविले गेला आहे. सर्वश्रेष्ठ अल्लाहने पैगंबराना व त्यांच्या जाती समूहास आपल्या या विशेष कृपेने उपकृत केले आहे.

४. नमाज़ करिता विशिष्ट प्रकारच्या उपासनास्थलाची शर्त ठेवली गेली नाही किंबहुना सर्व पृथ्वीला प्राथना स्थळ बनविले गेले आहे. म्हणून आवश्यकता व श्रेष्ठते नंतहि धर्मशास्त्र संदर्भान्वये जमानीच्या कोणत्याही भागावर नमाज़ अदा केली जाऊ शकते. तव्द्‌तच वजू आणि स्नानकरिता पाणी न मिळण्यांच्या स्थितीत स्वच्छ शुद्ध मातीने तयम्मुम केला जाऊ शकतो.

५. पैगंबराचे प्रेषितत्व विश्वव्यापी आहे अर्थात त्याना एखाद्या विशिष्ट जाती समूहाकडे पाठविले गेले नाही, काळे व गोरे आणि मनुष्य व जिन्नादि समस्त विश्वाच्या जातीसमूहांकडे स्थळ काळाच्या बंधनाशिवाय कियामतीपर्यंत समस्त ईश-दासांकडे पाठविले गेले आहे.

६.पैगंबरांचे एक अत्यंत महत्वपूर्ण वैशिष्टय हे आहे की ते प्रेषित-क्रमाची अंतिम कडी होय आणि त्यांचा प्रेषितत्व-काळ कियामती पर्यंतचा आहे धर्म परिपुर्ण झाल्यामुळे व क़ुरआन कियामतीपर्यंत सुरक्षित असल्यामूळे कोण्तयाही नवीन प्रेषिताची गरजबाकी राहीली नाही. म्हणून त्यांच्यानंतर जो कोणी प्रषित असल्याचा दावा करील तो खोटारडा आहे.

## حديث

عَنْ اَبِیْ مُوْسیٰ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ : اِنَّ مَثَلَ مَا بَعَثَنِیَ اللّٰهُ عَزَّ وَ جَلَّ مِنَ الْهُدٰی وَالْعِلْمِ کَمَثَلِ غَیْثٍ اَصَابَ اَرْضًا فَکَانَتْ مِنْهَا طَائِفَةٌ طَیِّبَةٌ قَبِلَتِ الْمَاءَ فَاَنْبَتَتِ الْکَلَاءَ وَالْعُشْبَ الْکَثِیْرَ وَکَانَ مِنْهَا اَجَادِبَ اَمْسَکَتِ الْمَاءَ فَنَفَعَ اللّٰهُ بِهَا النَّاسَ فَشَرِبُوْا مِنْهَا وَسَقُوْا وَرَعَوْا وَاَصَابَ طَائِفَةً مِنْهَا اُخْرٰی اِنَّمَا هِیَ قِیْعَانٌ لَا تُمْسِکُ مَاءً وَلَا تُنْبِتُ کَلَاءً فَذٰلِکَ مَثَلُ مَنْ فَقُهَ فِیْ دِیْنِ اللّٰهِ وَنَفَعَهُ اللّٰهُ بِمَا بَعَثَنِیَ اللّٰهُ بِهٖ فَعَلِمَ وَعَلَّمَ وَمَثَلُ مَنْ لَّمْ یَرْفَعْ بِذٰلِکَ رَاسًا وَلَمْ یَقْبَلْ هُدَی اللّٰهِ الَّذِیْ اُرْسِلْتُ بِهٖ.

( مسلم كتاب الفضائل )

# ज्ञान व विज्ञानाची वर्षा

## हदीस

**हज़रत अबू मूसा (रज़ी.) उल्लेखितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले, सर्वश्रेष्ठ अल्लाह ने ज्या ज्ञान व मार्गदर्शनासह मला पाठविले आहे त्याचे उदाहरण पावसासारखे आहे ते असे की, जेव्हा पाऊस पडला तेव्हा जमीनीने पाण्याला शोषून घेतले आणि तिच्यावर गवत उगवून आले आणि जमीनीचा जो हिस्सा सखल होता त्याने पाण्याणे थोपवून धरले अशा प्रकारे अल्लाहने या द्वारे लोकांना लाभ पोहचविला तेव्हा ते स्वत: देखील पाणी प्यायले व इतरांनाहि पाजले. परंतु ज़मीनीचा जो हिस्सा खडकाळ मैदान होता त्यावर जेव्हा पाऊस पडला तेव्हा तो ज्या ज्ञान व विज्ञान सह मला पाठविले गेले आहे यांना लाभ घाडविले तेव्हा यांनी स्वत: देखील (धर्माचे)**





**ज्ञान प्राप्त केले, आणि इतरांनाहि याचे शिक्षण दिले, आणि हे (दुसरे) उदाहरण अशा लोकांचे आहे ज्यांनी या ज्ञानाकडे किंचितही ध्यान दिले नाही आणि ज्या मार्गदर्शनासह मला पाठीविले गेले आहे ते स्वीकारले नाही.**

(मुस्लिम, किताबुल फ़ज़ाइल)

## स्पष्टीकरण

या उदाहरणांनी हे स्पष्ट करण्याचा हेतु आहे की प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) चे पाठविले जाणे सत्यज्ञाना सह झाले आहे. ज्यायोगे विश्ववासीयांना अल्लाहचे अध्यात्म प्राप्त व्हावे आणि त्या प्रकाशात त्यांनी जीवन व्यतीत करावे. परंतु ज्या प्रमाणे अशी ज़मीन जी खडकाळ असावी. पावसाचा तिच्यावर काहीही परिणाम होत नाही तव्दतच ते लोक देखील ज्ञान अध्यात्माच्या या पावसापासून काहीच लाभ घेत नाहीत जे आपल्या पाषाण हृदयामूळे सत्य स्वीकृतिची योग्यता हरवून बसले आहेत. ज्ञान अध्यात्माच्या या पावसाने केवळ तेच लोक लाभांकित होतात व असे लोक प्रेषित (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या ज्ञान व उपदेशापासून स्वत: देखील लाभ घेतात आणि इतरांनाहि लाभ पोहचवितात.

## حديث

**عَنْ اَبِیْ هُرَیْرَةِ اَنَّ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ قَالَ : اِنَّ مَثَلِیْ وَمَثَلُ الْاَنْبِیَاءِ مِنْ قَبْلِیْ كَمَثَلِ رَجُلٍ بَنٰی بَیْتاً فَاَحْسَنَهُ وَ اَجْمَلَهُ اِلَّا مَوْضِعَ لَبِنَةٍ مِنْ زَاوِیَةٍ فَجَعَلَ النَّاسُ یَطُوْفُوْنَ بِهِ وَیَعْجَبُوْنَ لَهُ وَیَقُوْلُوْنَ هَلاَّ وُضِعَتْ هٰذِهِ اللَّبِنَةُ قَالَ فَاَنَا اللَّبِنَةُ وَ اَنَا خَاتِمُ النَّبِیِّیْنَ.** (بخاری کتاب الانبیاء)

# अंतिम प्रेषित

## हदीस

**हज़रत अबु हुरैरा द्वारे उल्लेखित आहे कि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांनी फर्माविले, माझे व पुर्वी होऊन गेलेल्या प्रेषितांचे उदाहरण त्या व्यक्तिसारखे आहे जिने एक सुन्दर व भव्य घर बनविले परंतु त्याच्या एका कोपऱ्यात एका वीटेची जागा खाली सोडली. लोक त्याच्या सभोवती फिरत व त्या सुन्दरतेविषयी आशचर्य करीत तथापि (त्या रिक्त स्थानास पाहून) म्हणत, ''काय गोष्टी आहे, येथे वीट नाही बसवली गेली''! पैगंबरांनी फर्माविले, तर ती वीट मीच होय आणि मी असा की ज्यासह प्रेषितांचा क्रम समाप्त केला गेला आहे.**

(बुखारी किताबुल अम्बीया)

## स्पष्टीकरण

पवित्र क़ुरआन व प्रमाण हदीस द्वारे हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे अंतिम प्रेषित असणे निश्चितपणे सिद्ध आहे. आणि या बाबत सर्व मुसलमानांचे एकमत आहे, ही हदीस देखील त्या सप्रमाण हदीस पैकी होय ज्यात हे स्पष्ट केले गेले आहे की पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) प्रेषित क्रमाची अंतिम कडी होय.

प्रेषितत्व वास्तुत: जी एका वीटेची जागाखाली राहीली होती ती त्यांना पाठविले गेल्याने





पुर्ण झाली. व इमारत परिपूर्ण झाली. आता त्यांच्यानंतर कोणताही नवा प्रेषित येणार नाही. म्हणून जो कोणी प्रेषितत्वाचा दावा करील त्याचा हा दावा अगदीच खोटा व असत्य आहे.

पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) असे होत की ज्यांच्यासह प्रेषितक्रम संपविला गेला आहे. अर्थात ते प्रेषित क्रमास संपविणारे व सर्व प्रेषितांवरील मोहर आहेत.

ज्याप्रमाणे मोहर लागल्यानंतर कोणत्याही गोष्टीचा प्रवेश होऊ शकत नाही त्याच प्रमाणे पैगंबरांच्या नंतर प्रेषितत्व क्षेत्रात कोणाच्याहि प्रवेशास वाव उरत नाही. म्हणून जी शरीअत पैगंबर घेऊन आले ती कियामती पर्यंत आहे. व स्थळकाळाच्या बंधनाशिवाय लोकांकरिता हे आवश्यक आहे आहे की त्यांनी हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्यावर ते अंतिम प्रेषित असल्याविषयी ईमान आणावे व त्यांनी आणलेल्या धर्माचे व शरीअतचे अनुसरण करावे.

जो कोणी हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्यानंतर एखाद्या नव्या प्रेषितास मानतो तो खरे पाहता, पैगंबरांना अंतिम प्रेषित मानत नाही. आणि त्यांना प्रेषित न मानणे कुफ्र आहे.

# (९)
# क़ुर्आन





## حديث

**عَنۡ عُمَرَ قَالَ اِنَّ نَبِيَّكُمۡ ﷺ قَدۡ قَالَ : اِنَّ اللّٰهَ يَرۡفَعُ بِهٰذَا الۡكِتَابِ اَقۡوَامًا وَيَضَعُ بِهٖ آخِرِيۡنَ .** ( مسلم كتاب الفضائل القرآن )

# जाती समूहांच्या उत्कर्ष व ऱ्हासाचे कारण

## हदीस

**हज़रत उमर (रजी.) द्वारे उल्लेखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, अल्लाह या ग्रंथाद्वारे कित्येक जाती समूहांना उच्चता प्रदान करील आणि कित्येकांना ऱ्हासात टाकील.**

(मुस्लिम किताबुल फजाईलिल क़ुर्आन)

## स्पष्टीकरण

क़ुर्आन अल्लाहचा तो ग्रंथ आहे जो राष्ट्रांचा भाग्य-निर्णय करण्याकरिता अवतरित झाला आहे. जे राष्ट्र व जो जातीसमूह या ग्रंथावर ईमान आणून आपल्या वैयक्तिक व सामूहीक जीवनाकरिता यास मार्गदर्शक बनविल ती उत्कर्षास पोहचेल आणि याला इतिहास साक्षी आहे. आणि म्हणूनच अरबचे रहिवाशी या ग्रंथामुळे मोठया उत्कर्षास पोहचले आणि त्यांना विचार चिंतन व आचारण, निति व चारित्रय, संस्कृति व शिष्टता प्रत्येक गोष्टीत उच्च स्थान प्राप्त झाले. याउलट जे राष्ट्र या ग्रंथाला रद्द करते ते अवनतिच्या गर्तेत कोसळते. म्हणून ज्या राष्ट्रांनी यास रद्द केले ते आपल्या सर्व भौतिक प्रगतीनंतरहि अवनति आणि दूरदशे चे शिकार झालेत आणि त्यांना खऱ्या प्रतिष्ठेचे स्थान कदापि लाभू शकले नाही. जे राष्ट्र कुरआनच्या प्रकाशात चालू इच्छित नाही त्याच्या नशीबी अंध:करात भटकणे व अवनतित ग्रस्त होणे या खेरीज काही नाही. असे राष्ट्र वैचारिक व आचरणीय जगात फार मोठया उत्पातास कारणीभूत ठरते.

## حديث

**عَنْ عَائِشَةَ أُمِّ الْمُؤْمِنِيْنَ رَضِیَ اللّٰه عَنْهَا اَنَّ الْحَارِثَ بْنِ هِشَامٍ رَضِیَ اللّٰهُ عَنْهُ سَأَلَ فَقَالَ يَا رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ كَيْفَ يَاتِيْکَ الْوَحْیُ فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اَحْيَانًا يأْتِيْنِیْ مِثْلَ صَلْصَلَةِ الْجَرَسِ وَهُوَ اَشَدُّ عَلَیَّ فَيُفْصِمُ عَنِّیْ وَقَدْ وَعِيْتُ مَا قَالَ وَ اَحْيَاناً يَتَمَثَّلُ لِیَ الْمَلَکُ رَجُلًا فَيُكَلِّمُنِیْ فَاَعِیْ مَا يَقُوْلُ . قَالَتْ عَائِشَةُ رَضِیَ اللّٰهُ عَنْهَا وَلَقَدْ رَاَيْتُهُ يَنْزِلُ عَلَيْهِ الْوَحْیُ فِی الْيَوْمَ اَلشَّدِيْدِ الْبَرْدِ فَيَفْصِمُ عَنْهُ وَ اَنَّ جَبِيْنَهُ لَيَتَفَصَّدُ عَرَقاً.** (بخاری بدء الوحی)

# ''वही''चे अवतरण

## हदीस

**मोमीनांची माता हज़रत आयशा (रज़ी.)यांचे कथन आहे की हारिस बिन हिशाम (रज़ी.) यांनी पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना विचारले, की हे अल्लाहचे प्रेषित, आपणावर ''वही'' कशाप्रकारे अवतरते ? पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फ़र्माविले, कधी ही स्थिती असते की वही घंटानादा प्रमाणे मजजवळ येते आणि ही स्थिती मजवर मोठी कठीण असते. मग तेव्हा स्थगित होते तेव्हा.मी वाणी आत्मसात केलेली असते. आणि कधी फिरिश्ता मनुष्य रुपात माझ्या समक्ष प्रकट होतो व माझ्याशी संभाषण करतो आणि तो जे काही सांगतो ते मी सुरक्षित करतो. हज़रत आयशा (रज़ी.) फर्मावितात की मी पैगंबरांना ''वही'' अवतरीत होण्यच्या स्थितीत पाहिले आहे. अत्यंत कडाक्याच्या थंडीतहि अशी स्थिती राहत असे की जेव्हा ''वही'' येऊन जाई तेव्हा त्यांचे कपाळ घामाने डबडबलेले असे.**

(बुखारी बिदउल वही)

## स्पष्टीकरण

वही म्हणजे संकेत करणे व गुप्तरित्या संभाषण करणे होय. सर्वश्रेष्ठ अल्लाह आपला संदेश ज्या गुप्त पद्धतिने प्रेषितांपर्यंत पाठवितो त्यास क़ुरआनाच्या परिभाषेत ''वही'' म्हटले जाते.





इतर भाषेत हुबेहूब याच अर्थाला व्यक्त करणारा पर्यायी शब्द मिळणे कठीण आहे. इंग्रजीत यासाठी Revelation हा शब्द प्रयोग केला जातो परंतु या शब्दाने ''वही'' ची सर्व वैशिष्टये स्पष्ट होत नाही.

पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्यावर जी वही अवतरत असे त्याच्या दोन पद्धति या दहीस मध्ये वर्णिल्य गेल्या आहेत. एक घंटानादाप्रमाणे आणि दुसरी, फिरिश्त्याचे मनुष्य रुपाने प्रकट होऊन संदेश पोहचविणे, पाहिल्या पद्धतिच्या संबंधात ईशवर संदेश पोहचविण्याच्या या पद्धतिचे आमच्या बुद्धीला आकलन होऊ शकत नाही. म्हणून यास घंटा नादा ची उपमा दिली गेली आहे. अशासाठी की एक सरासरी अनुमान होणे शक्य व्हावे. आज संदेश-वहानाच्या त्या पद्धति संशोधित झाल्या आहे ज्यांच्याविषयी जग अगदी अनभिज्ञ होते. म्हणून जर आकाशी संदेश अवतरणाची एक असामान्य व अदृश्य साधनाचा निर्देश पैगंबरांनी केला असेल तर तो का म्हणून मान्य केला जाऊ नये? वस्तुत: याची वार्ता देणारे सत्यांची साक्षात रुपे होती, व त्या सर्वांनी सर्वसंमत पणे या गोष्टीचा संकेत केला आहे.

वहीची दुसरी पद्धत हदीस मध्ये वर्णिली गेली आहे. फिरिश्ता मनुष्य रुपाने अवतरित होउन अल्लाहचा संदेश सादर करीत असे. ही पद्धत देखील अदृश्याशी संबंधित होती,परंतु तत्संबंधीने अनुमान करणे मानवाकरिता सहज आहे.

वही अवतरीत होत असतांना पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे शुभ ललाट घामाने डबडबणे आणि अत्यंत कडाक्याच्या थंडीत पैगंबरांचे साथी स्वत: या गोष्टीचे अवलेकन करीत हा या गोष्टीचा प्रत्यक्ष पुरावा होय की वहीची स्थिती एक असामान्य स्थिती राहात असे. जर पवित्र क़ुरआन पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी लिहिलेला ग्रंथ असता तर ही असामान्य स्थिती कदापि उद्‌भवली नसती.

حديث

عَنْ جَابِرِ بْنِ عَبْدِ اللّٰهِ قَالَ كَانَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يَقُوْلُ : فَإِنَّ خَيْرَ الْحَدِيْثِ كِتَابُ اللّٰهِ وَ خَيْرَ الْهَدْيِ هَدْيُ مُحَمَّدٍ وَ شَرُّ الْأُمُوْرِ مُحْدَثَاتُهَا وَ كُلُّ بِدْعَةٍ ضَلَالَةٌ. ( مسلم كتاب الجمعة)

# सर्वोत्कृष्ट वाणी

## हदीस

**हजरत जाबीर बिन अब्दुल्लाह फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) प्रवचनात फर्मावित असत, सर्वोत्कृष्ट वाणी अल्लाहचा ग्रंथ आहे आणि सर्वोत्कृष्ट पद्धत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची पद्धत आहे आणि अत्यंत निकृष्ट गोष्टी, धर्मात नव्या दाखल केलेल्या गोष्टी होत आणि धर्मात दाखल केलेली प्रत्येक नवी गोष्ट मार्गभ्रष्टता आहे.** (मुस्लिम किताबुल जुमुआ)

## स्पष्टीकरण

या हदीस मध्ये अल्लाहच्या ग्रंथास (पवित्र कुर्आनास) सर्वोत्कृष्ट वाणी म्हटले गेला आहे. अर्थात उघड आहे की अल्लाहच्या वाणीपेक्षा उत्कृष्ट वाणी आणखी कोणाची असू शकते. परंतु फार थोडया लोकांना या सर्वोत्कृष्ट वाणीचे पठण करण्यात व ती ऐकण्याविषयी गोडी असते. आजच्या काळात मनुष्य ढीगभर पुस्तके वाचतो पण कुर्आन मात्र वाचत नाही जी नि:संशय सर्वोत्कृष्ट वाणी आहे. आता याहून अधिक वंचितता माणसासाठी आणखी काय अशू शकते?

हज़रत मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) अल्लाहचे रसूल होते यास्तव त्यांची पद्धत सर्वोत्कृष्ट पद्धत आहे. आणि या पद्धतिशी अभिप्रेत उपासना पद्धतिही होय, व जीवन व्यतीत करण्याची पद्धत देखील, सत्कृत्येहि होत आणि पैगंबरांची आचार संहिता देखील.

धर्मात नव्याने दाखल केलेल्या गोष्टी म्हणजे त्या गोष्टी होत ज्यांचा धर्माशी सुतराम संबंध नाही पण लोकांनी आपल्या परिने त्यांचा समावेश केला आहे. वस्तुत: अल्लाहच्या धर्मात कोणालाहि कोणतीही गोष्ट सामील करण्याचा अधिकार नाही मुसलमानांच्या विविध पंथांनी इस्लामवर ज्या कडा सुशोभित केल्या आहेत त्यामुळे इस्लामचे खरे स्वरूप समजून घेणे लोकांना मोठे अवघड झाले आहे. परंतु पवित्र कुर्आन व प्रेषित आचरणात तो अपल्या मूळ स्वरूपात कायम आहे. आणि पवित्र कुरआन व ''सुन्नह'' (प्रेषित आचरण)हेच सत्य-स्तर होय.





حديث

عَنْ عُثْمَانَ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : خَيْرُكُمْ مَنْ تَعَلَّمَ الْقُرْآنَ وَ عَلَّمَهُ . ( بخارى)

# सर्वोत्कृष्ट ज्ञान

## हदीस

**हज़रत उस्मान फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, तुमच्यात सर्वाधिक चांगला तो आहे जो कुर्आनाचे ज्ञान प्राप्त करिल व इतरांना ते शिकवील.**

(अल् बुखारी)

## स्पष्टीकरण

पवित्र कुर्आन शब्दाश: विश्व पालनकर्त्याची वाणी म्हणूनच ते ज्ञान व बुद्धि कौशल्याचा मुख्य स्त्रोत आहे. ते सृष्टिच्या सत्यांना अनावरित करते आणि जीवनाच्या रहस्य भेदावरील पडदा दूर करते.

कुर्आन वाचल्याने माणसाला आपल्या निर्माण कर्त्याची ओळख पटते व त्याचा खरा संबंध त्याच्याशीच प्रस्थापित होतो. हा ग्रंथ मानव करिता परिपूर्ण मार्गदर्शन आहे म्हणून जो कोणी यास अर्थ लक्षात घेऊन वाचतो त्याला खरेखरे ज्ञान होते आणि मग तो उत्कृष्ट मानव बनतो. तव्द्तच जो माणुस इतरांना कुरआनचे शिक्षण देतो तो उत्कृष्ट सेवा पार पाडतो.

# (१०)
# मरणोत्तर जीवन





حديث

**عَنْ اَنَسٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : يَتْبَعُ الْمَيِّتَ ثَلٰثَةٌ فَيَرْجِعُ اِثْنَانِ وَيَبْقٰى وَاحِدٌ، يَتْبَعُهُ اَهْلُهُ وَمَالُهُ وَعَمَلُهُ، فَيَرْجِعُ اَهْلُهُ وَمَالُهُ وَيَبْقَى عَمَلُهُ.** ( مسلم كتاب الزهد)

# मय्यतीसह कोणती गोष्ट स्थानांतरित होते?

## हदीस

**हजरत अनस यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले, मयतीसह तीन गोष्टी जातात, ज्यापैकी दोन परत येतात व एक बाकी राहते त्यासह त्याचे कुटुंबिय, त्याची मालमत्ता व त्याचे आचरण जाते. कुटुंबिय व माल तर परत येतात, परंतु त्याचे आचरण बाकी राहते.**

(मुस्लिम किताबुज जुहद)

## स्पष्टीकरण

अर्थात मयतीसह जी गोष्ट मारणोत्तर विश्व व आखिरतच्या विश्वात स्थानांतरित होते ती त्याचे आचरण होय. त्याचे कुटुंबिया व त्याचा माल नव्हे. आणि ज्याअर्थी ही वस्तुस्थिती आहे त्याअर्थी माणसाला खरी काळजी त्याच गोष्टीची केली पाहिजे जी त्यासह सदैवकरिता स्थानांतरित होणार आहे. परंतु मनुष्य या वस्तुस्थितीशी गाफील राहून ज्या गोष्टीची काळजी वाहतो व ज्याकरिता आपले आयुष्य खपवितो ती म्हणजे आपल्या धनसम्पत्तित वृद्धि व आपल्या आप्त स्वकीयांची सुस्थिती होय. जणू या गोष्टी त्याच्या जीवनाचे एकमात्र ध्येय होत.

## حديث

عَنْ اَبِیْ هُرَیْرَةَ عَنِ النَّبِیِّ ﷺ قَالَ: اِنَّ الْمَیِّتَ یَصِیْرُ اِلَی الْقَبْرِ فَیَجْلِسُ الرَّجُلُ الصَّالِحُ فِیْ قَبْرِهٖ غَیْرَفَزِعٍ وَلَا مَشْعُوْفٍ ثُمَّ یُقَالُ لَهٗ فِیْمَ کُنْتَ فَیَقُوْلُ فِی الْاِسْلَامِ، فَیُقَالُ لَهٗ مَا هٰذَا الرَّجُلُ فَیَقُوْلُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰهِ ﷺ جَاءَ نَا بِالْبَیِّنَاتِ مِنْ عِنْدِاللّٰهِ فَصَدَّقْنَاهُ فَیُقَالُ لَهٗ هَلْ رَاَیْتَ اللّٰهَ؟ فَیَقُوْلُ مَا یَنْبَغِیْ لِاَحَدٍ اَنْ یَّرَی اللّٰهَ، فَیُفْرَجُ لَهٗ فُرَجَةٌقِبَلَ النَّارِ فَیَنْظُرُ اِلَیْهَا یَحْطِمُ بَعْضُهَا بَعْضاً فَیُقَالُ اُنْظُرْ اِلٰی مَاوَقَاکَ اللّٰهُ ثُمَّ یُفْرَجُ لَهٗ فُرْجَةٌ قِبَلَ الْجَنَّةِ فَیَنْظُرُ اِلٰی زَهْرَتِهَا وَمَا فِیْهَا، فَیُقَالُ لَهٗ هٰذَامَقْعَدُکَ وَیُقَالُ لَهٗ عَلَی الْیَقِیْنِ کُنْتَ وَ عَلَیْهِ مُتَّ وَ عَلَیْهِ تُبْعَثُ اِنْ شَآءَ اللّٰهُ. وَیَجْلِسُ الرَّجُلُ السُّوْءُ فِیْ قَبْرِهٖ فَزِعاً مَشْعُوْفاً فَیُقَالُ لَهٗ فِیْمَ کُنْتَ؟ فَیَقُوْلُ لَا اَدْرِیْ فَیُقَالُ لَهٗ مَا هٰذَا الرَّجُلُ؟ فَیَقُوْلُ سَمِعْتُ النَّاسَ یَقُوْلُوْنَ قَوْلاً فَقُلْتُهٗ فَیُفْرَجُ لَهٗ قِبَلَ الْجَنَّةِ فَیَنْظُرُ اِلَی زَهْرَتِهَا وَمَا فِیْهَا، فَیُقَالُ لَهٗ اُنْظُرْ اِلَی مَا صَرَفَ اللّٰهُ عَنْکَ، ثُنَّ یُفْرَجُ لَهٗ فُرْجَةٌ قِبَلَ النَّارِ فَیَنْظُرُ اِلَیْهَا یَحْطِمُ بَعْضُهَا بَعْضاً، فَیُقَالُ لَهٗ هٰذَا مَقْعَدُکَ، عَلَی الشَّکِّ کُنْتَ وَعَلَیْهِ مُتَّ وَ عَلَیْهِ تُبْعَثُ اِنْ شَآءَ اللّٰهُ تَعَالٰی.

( ابن ماجه باب الذكر القبر)

# मृत्युनंतरची अवस्था

## हदीस

**अबु हुरैरा (रजी.) द्वारे उल्लिखित आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, मय्यत कबरीत पोहचल्यानंतर असे होते की जर तो नेक (सदाचारी) इसम होता तर तो कोणत्याही प्रकारच्या भय व दहशती शिवाय कबरीत उठून बसते मग त्याला प्रश्न विचारला जातो की तू कोणत्या धर्मावर होता? तो उत्तर देतो मी इस्लामवर होतो. प्रशन विचारला जातो ही कोण व्यक्ति आहे? तो म्हणतो हे मुहम्मद, अल्लाहचे रसूल आहेत. आमच्या जवळ अल्लाहतर्फे दिव्य चिन्हे घेऊन आले तेव्हा आम्ही त्यांचे समर्थन केले. प्रश्न केला जातो, तू अल्लाहला पाहिले आहेस? तो म्हणतो, अल्लाह कोणीहि पाहू शकत नाही मग त्याच्या साठी दोज़खकडे खिडकी उघडली जाते आणि तो तिचे विनाशकारक दृश्य पाहून घेतो. त्याला सांगितले जाते की बघ, अल्लाह ने तुला कोणत्या गोष्टीपासून वाचविले. मग त्याच्यासाठी जन्नतची खिडकी उघडविली जाते आणि तो तिची उज्जवलता व आतले दृश्य पाहतो त्याला सांगितले जाते, हे आहे तुझे ठिकाण, विश्वासावर तू कायम होता. त्यावरच तू मेला आणि अल्लाहने इच्छिल्यास**





**यावरचा तू उठविला जाशील.**

**परंतु जर तो वाईट इसम होता तर तो भय आणि दहशतीच्या अवस्थेत कबरीत उठून बसेल, तू कोणत्या धर्मावर होतास हे त्याला विचारल्या गेल्यावर तो म्हणतो-मला नाही माहित. जेव्हा त्याला प्रश्न विचारला जातो की ही कोण व्यक्ति आहे ? तो म्हणतो की, मी यांच्याविषयी लोकांना जे काही म्हणतांना एकले होते तेच म्हणाला (अर्थात त्यांचा प्रेषित्वास खोटे ठरविल) मग त्याच्यासाठी जन्नतची खिडकी उघडविली जाते व तो तिचे तेज आणि आतील दृश्य पाहतो, त्याला सांगितले जाते, बघ अल्लाह ने तुला यापासून वंचित ठेवले. मग त्याच्यासाठी जहन्नमची खिडकी उघडविली जाते आणि तो हे पाहतो की तिचा एक भाग दुसऱ्या भागाला खात आहे. त्याला सांगितले जाते हे आहे तुझे ठिकाण, तू संशयात राहिलास यावरच तू मरण पावलास आणि सर्वश्रेष्ठ अल्लाहने इच्छिल्यास याच स्थितीत तुला उठविले जाईल.**

(इब्ने माजा जिक्रुल कब्र)

# स्पष्टीकरण

कब्र शी अभिप्रेत आलमे बरज़ख होय जेथे प्रत्येकाचा आत्मा. मेल्यानंतर त्वरीत पोहचतो मग त्यचे प्रेत दफन केलेले असो किंवा पाण्यात बुडाले असो अथवा जाळून टाकलेले असो कारण फक्त शरीर नाश पावते, रुह (आत्मा) नव्हे. आलमे बर्ज़ख जग आणि कियामतीच्या दरम्यानचे विश्व आहे. मृताचा आत्मा आलमे बर्जख मध्ये परिक्षेच्या अवस्थेतून पार पाडतो. फिरिश्ते त्याला पैगंबर आणि धर्मासंबंधी प्रश्न विचारतात, जर त्याने जगात ईमान आणले होते व इस्लामनुसार जीवन व्यतीत केले तर त्याला कबरीत कोणत्याहि क्लेशाशी सामना करावा लागत नाही तो फिरिश्त्यांच्या प्रश्नांची यथायोग्य उत्तके देतो. त्यानंतर त्याला जन्नतची ती जागा दाखविली जाते जी त्याचे जन्नतमधील स्थान असेल व जेथे तो कियामतीच्या दिवशी शरीरासह दाखल होईल तव्दतच आलमे बर्जख मध्ये त्याला मुक्ति व शांती लाभेल.

परंतु जर ती व्यक्ति काफीर (सत्याचा इन्कार करणारी) किंवा मुनाफीक (दांभिक) होती तर ती फिरिश्त्यांच्या प्रश्नांची योग्य उत्तरे देऊ शकत नाही व त्या कसोटीत ती अपयशी ठरते. तेव्हा अशा व्यक्तिस जहन्नमचे ते ठिकाण दाखविले जाते जेथे ती कियामतीच्या दिवशी शरीरासह दाखल होईल. तसेच आलमे बर्जखमध्ये तिला क्लेश व शिक्षा यातानांशी सामना करावा लागतो कबरीत (आलमे बर्जख मध्ये) फिरिश्ते जेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्याविषयी प्रश्न विचारतात तेव्हा एका सच्च्या मुसलमानास त्यांचे उत्तर देण्यात कसलाही त्रास उद्‌भवत नाही. तो त्वरीत म्हणतो ''मुहम्मद अल्लाहचे रसूल'' कारण हे पवित्र वचन खऱ्या मनाने जगात तो अदा करीत राहीला आहे, परंतु जो माणूस पैगंबरांच्या प्रेषितत्वास मान्य करण्यास इन्कार करीत राहीला किंवा आपण मुस्लिम समाजात जन्माला आलो म्हणून परंपरा बाळगावी, केवल

या हेतुने कलिमा पढत राहिला तर तो फिरिश्त्यांच्या प्रश्नांच्या उत्तरात ईमान व दृढविश्वास प्रकट करु शकत नाही. कियामत अगदी जवळ आहे परंतु बर्जखचा मामला तर त्यापेक्षाही लवकर येणार आहे. एकदा का माणसाचे डोळे मिटले. दुसऱ्याच क्षणी तो आलमे-बर्जखमध्य पोहचला. आचारणाची परिपूर्ण परिणिती तर कियामतीच्या दिवशी प्रकट होईल. परंतु त्या परिणितीचा प्रारंभ मृत्यु सोबतच होऊ लागतो. माणसाने या वस्तुस्थितीस डोळे मिटण्यापूर्वीच जाणूत घेतले असते तर त्याच्या किती हिताचे झाले असते !

## حديث

**عَنِ ابْنِ عُمَرَ قَالَ قَالَ النَّبِيُّ ﷺ اِذَا مَاتَ الرَّجُلُ عُرِضَ عَلَيْهِ مَقْعَدُهُ بِالْغَدَاةِ وَ الْعَشِيِّ اِنْ كَانَ مِنْ اَهْلِ الْجَنَّةِ فَالْجَنَّةُ وَاِنْ كَانَ مِنْ اَهْلِ النَّارِ فَالنَّارُ . قَالَ ثُمَّ يُقَالُ هٰذَا مَقْعَدُكَ الَّذِىْ تُبْعَثُ اِلَيْهِ يَوْمَ الْقِيَامَةِ .** (مسلم كتاب التوبہ، بخاری کتاب الزهد)

# आलमे बर्ज़ख

## हदीस

**हज़रत इब्ने उमर यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लल्लाहु अलैहि व सल्लम ) यांनी फर्माविले, माणूस जेव्हा मरण पावतो तेव्हा सकाळ-संध्याकाळ त्याला त्याचे स्थान दाखविले जाते, जर तो जन्नती आहे त्याला जन्नतीची झळक दाखविले जाते मग त्याला म्हटले जाते की क़ियामतीच्या दिवशी हेच तुझे स्थान असेल.** (मुस्लिम किताबुत्तौबा, बुखारी किताबुज-जुहद)

## स्पष्टीकरण

मृत्यु म्हणजे माणसाचा संपूर्णत: विनाश नव्हे आत्मायाचे शरीरापासून विभक्त होणे होय. शरीर नाश पावते परंतु आत्माबाकी राहतो आणि तो वर्तमान विश्व व आखिरत विश्वाच्या दरम्यान असलेल्या आलमे बर्ज़खमध्ये स्थानांतरित होतो. तेथे त्यास कियामतीपर्यंत राहावयाचे आहे. जर त्याने जगात आपल्या आचरणाने स्वत:ला जन्नत पात्र सिद्ध केले होते तर आलमे बर्जखमध्ये तो जन्नतची (स्वर्गाची) झळक पाहत राहतो. आणि जर त्याने आपल्या आचरणाने स्वत:ला जहन्नम पात्र सिद्ध केले होते तो तर तो आलमे बर्जख मध्ये जहन्नमची (नरकाची) झळक पाहत राहतो.

सकाळ संध्याकाळ स्थान दाखविण्याशी अभिप्रेत त्याला दररोज दर्शविले जाते. उघड आहे की आलमे बर्जखच्या स्थळ काळाचे अनुमान आम्ही आपल्या स्थळ काळावरून करू शकत नाही.





## حديث

**عَنْ سَهْلِ بْنِ سَعْدٍ قَالَ سَمِعْتُ النَّبِىَّ ﷺ يَقُولُ يُحْشَرُ النَّاسُ يَوْمَ الْقِيَامَةِ عَلٰى اَرْضٍ بَيْضَاءَ عَفْرَاءَ كَقُرْصَةِ النَّقِيِّ لَيْسَ فِيْهَا مَعْلَمٌ لِأَحَدٍ.** ( بخارى كتاب الرقاق )

# हश्रचे मैदान

## हदीस

**हजरत सुहेल बिन सअ्द यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना हे फर्मावितांना ऐकले की, कियामतीच्या दिवशी लोकांना शुभ्र लालसर जमीनीवर एकत्रित केले जाईल जी मैद्याच्या भाकरीच्या गोळयासारखी असेल. त्यात कोणाच्या घरा वगैराचे कसलेहि चिन्ह नसेल.**

(बुखारी किताबुर रिकाक)

## स्पष्टीकरण

क़ुर्आन व प्रमाणित हदीसांवरुन सिद्ध आहे की क़ियामतीच्या दिवशी हशर (कबरीतून उठविले जाणे व पाप पुण्याच्या हिशेबासाठी एका जागी एकत्रित होणे) यांच ज़मीनीवर होईल तथापि तिच्यात मोठमोठे बदल घडून आलेले असतील वर उल्लेखिलेल्या हदीसमध्ये हश्रच्या मैदानाच्या जमीनीची ही कैफीयत वर्णिली गेली आहे की तिचा रंग शुभ्र पण लालसर असा असेल. दुसरी गोष्ट ही की क़ियामतीच्या दिवशी जमीनीचे स्वरूप गोलाकार असेल जणू भाकरीचा गोळा आणि तिसरी गोष्ट ही की ज़मीन सपाट मैदानासम असेल. घर वगैरेचे चिन्ह देखील बाकी राहणार नाही.

## حديث

**عَنْ عَائِشَةَ (رض) قَالَتْ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : يُحْشَرُوْنَ حُفَاةً عُرَاةً غُرْلًا فَقُلْتُ يَا رَسُولَ اللّٰهِ الرِّجَالُ وَالنِّسَآءُ يَنْظُرُ بَعْضُهُمْ اِلَى بَعْضٍ فَقَالَ الْأَمْرُ اَشَدُّ مِنْ اَنْ يُّهِمَّهُمْ ذَاكَ.** ( بخاری کتاب الرقاق )

# ''हश्र''कशा प्रकारे होईल?

## हदीस

**हज़रत आयशा (रज़ी.) फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले (क़ियामतीच्या दिवशी) हश्र या स्थितीत होइल की लोक अनवाणी, विवस्त्र आणि खत्न:न झालेले आसतील. हज़रत आयशा यांनी (आश्चर्याने) विचारले, या अवस्थेत तर स्त्री पुरुष एकमेकांना पांहतील. फर्माविले, क़ियामतीची भयानकता इतकी भयंकर असेल की माणसाला एखाद्या कडे पाहण्याचे भान राहणार नाही.** (बुखारी किताबुर रिकाक)

## स्पष्टीकरण

कियामतीच्या दिवशी माणसाला दुसऱ्यांदा निर्माण केले जाईल या संबंधी पवित्र क़ुरआनात आहे **كَمَا بَدَاْنَآ اَوَّلَ خَلْقٍ نُّعِيْدُهٗ وَعْدًا عَلَيْنَا اِنَّا كُنَّا فَاعِلِيْنَ ۔(انبياء : ١٠٤)**

''ज्या प्रमाणे आम्ही पहिल्यांदा निर्माण केले होते. आम्ही त्यांची पुनरावृत्ति करू.हा वायदा आहे आमच्या जबाबदारीवर आणि हे काम आम्ही करणारच.''(अल् अंबिया-१०४)

आणि हदीस हे स्पष्टीकरण करते की ज्या प्रकारे बाळ मातेच्या उदारतून अनवाणी. विवस्त्र व खत्न:न झालेल्या स्थितीत जन्मास येते अगदी त्याच प्रकारे मनुष्य कियामतीच्या दिवशी आपल्या मूळ स्थितीत दुसऱ्यांदा निर्माण केला जाईल. या दिवशी कियामतीच्या भयानकतेचे असे स्वरूप असेल की प्रत्येकाला आपल्या मुक्तिची विवेचना लागून राहील. व दुसऱ्याच्या नग्नतेकडे पाहण्याचे कोणाला भान देखील नसेल. हदीसवरून हे हि स्पष्ट आहे की माणसाची दुसऱ्यांदा निर्मिती मानव स्वरूपातच होईल. दुसऱ्या शब्दात इस्लामची हश्र-कल्पना पुनर्जन्म कल्पनेशी अगदी भिन्न आहे व पुनर्जन्म कल्पनेस इस्लाम खोटे ठरवितो. कारण पुनर्जन्म कल्पनेनुसार मनुष्य पशु पक्षी. झाड इ.च्या रुपाने जन्मानंतर जन्म घेत राहतो.





## حديث

**عَنْ اَنَسٍ عَنِ النَّبِيِّ ﷺ قَالَ : اَللّٰهُمَّ لَا عَيْشَ اِلَّا عَيْشُ الآخِرَةِ .**

( بخاری کتاب الرقاق )

# खरे जीवन

## हदीस

**हज़रत अनस (रज़ी.)यांचे निवेदन आहे की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले. हे अल्लाह ! जीवन तर केवळ आखीरतचे जीवन आहे. (बुखारी किताबुर रिकाक)**

## حديث

**عَنْ سَهْلٍ قَالَ سَمِعْتُ النَّبِيِّ ﷺ يَقُوْلُ : مَوْضِعُ سَوْطٍ فِى الْجَنَّةِ خَيْرٌ مِنَ الدُّنْيَا وَمَا فِيْهَا.** ( بخاری کتاب الرقاق )

## हदीस

**हजरत सुहेल (रजी.) कथन करतात की मी, पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांना हे फर्मावितांना ऐकले, जन्नतमध्ये एका चाबुका इतकी जागा देखील जग व जगात जे काही आहे त्याहून श्रेष्ठ आहे.**(बुखारी,किताबुर रिकाक)

## स्पष्टीकरण

खरे जीवन त्या जीवनास म्हटले जाऊ शकते ज्यात माणसाला सदैव शांती लाभेल. ऐहिक जीवन प्रत्येक प्रकारच्या क्लेश यातनांनी व भय दहशतीनी घेरलेले आहे.येथे प्रत्येक आनंद दु:खाची मुहुर्तमेढ आणि प्रत्येक सुख हे क्लेश यातनेची पार्श्वभूमी आहे. मृत्यु प्रत्येक प्रकारच्या सुखशांतीस समाप्त करणार आहे. यास्तव या क्षणिक जीवनावरुन त्या शाश्वत व खऱ्या जीवनाची कल्पना केली जाऊ शकत नाही. म्हणून त्या तुलनेने आखिरतचे जीवन अशा लोकांकरिता ज्यांना याला आपले ध्येय बनविले, शाश्वत सुखाशांतीचे जीवन आहे. या जीवनात ना भय आतंकाचा प्रवेश होऊ शकेल व ना दु:ख यातनांचा प्रवेश होऊ शकेल. आणि कोणत्याहि प्रकारचे त्रास,क्लेश उद्‌भवणार नाही. हे देणग्यांनी युक्त असे जीवन शाश्वतेचे व कधीही न संपणारे जीवन असेल. आणि म्हणूनच आखिरतच्या जीवनालाच ''खरे जीवन'' संबोधिले जाऊ शकते. या वस्तुस्थितीस मनावर बिंबवणे हाच या हदीसचा मुख्य हेतु होय.कारण ज्याने या वस्तुस्थितीस आत्मसात केले त्याचा या जगाविषयीचा दृष्टीकोन मूलत: बदलतो.

१५८

## حديث

**عَنْ اَنَسٍ قَالَ قَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ يُؤْتَى بِاَنْعُمِ اَهْلِ الدُّنْيَا مِنْ اَهْلِ النَّارِ يَوْمَ الْقِيَامَةِ فَيُصْبَغُ فِى النَّارِ صَبْغَةً ثُمَّ يُقَالُ يَا ابْنَ آدَمَ هَلْ رَأَيْتَ خَيْرًا قَطُّ؟ هَلْ مَرَّ بِكَ نَعِيْمُ قَطُّ ؟ فَيَقُوْلُ لَا وَاللّٰهُ يَا رَبِّ! وَيُؤْتَى بِاَشَدِّ النَّاسِ بُؤْساً فِى الدُّنْيَا مِنْ اَهْلِ الْجَنَّةِ فَيُصْبَغُ صَبْغَةً فِى الْجَنَّةِ فَيُقَالُ لَهُ يَا ابْنَ آدَمَ هَلْ رَأَيْتَ بُؤْساً قَطُّ ؟ هَلْ مَرَّ بِكَ شِدَّةٌ قَطُّ؟ فَيَقُوْلُ لَا وَاللّٰهِ يَا رَبِّ ! مَا مَرَّبِىْ بُؤْسٌ قَطُّ وَلَا رَأَيْتُ شِدَّةً قَطُّ.** ( مسلم كتاب صبِغَة القيامة )

# खरे सुख-शांती

## हदीस

**हजरत अनस फर्मावितात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, कियामतीच्या दिवशी जहन्नम पात्र लोकांपैकी अशा माणसाला आणले जाईल जो जगात सर्वाधिक सुखी होता. त्याला जहन्नमच्या आगीत एकदा बुडवून विचारले जाईल, हे आदम पुत्रा ! तू कधी सुस्थिती पाहीलीस काय? अणि तुला कधी सम्पन्नता लाभली होती का ? तो म्हणले, अल्लाह शपथ नव्हे, हे माझ्या पालनकर्त्या ! त्याच प्रमाणे जन्नतपात्र लोकांपैकी अशा माणसाला आणले जाईल ज्याने जगात सर्वाधिक दु:ख—यातना भोगल्या असतील त्याला जन्नतमध्ये एकदा बुडवून विचारले जाईल, हे आदम पुत्रा ! तू कधी दु:स्थिती पाहीली होतीस आणि तुला कधी त्रास भोगावा लागला का? तो म्हणेल, अल्लाह शपथ, नव्हे. हे माझ्या पालनकर्त्या ! मला ना कधी वाईट स्थितीला तोंड द्यावे लागले ना कष्ट यातनांना.** (मुस्लिम किताब सिफतुळ कियामह)

## स्पष्टीकरण

जगातील क्लेश असो वा आराम तात्पूरत्या स्वरूपाची गोष्ट आहे. आखिरत मध्ये जहन्नमची क्लेश यातना पाहून माणसाला हे जाणवेल की जगातील आराम हा आरामच नव्हता आणि हा मोठा धोका झाला की जगातील क्षणभंगुर सुखासाठी जहन्नमच्या क्लेश यातनांना दृष्टीआड केले, वस्तुत: ह्या क्लेश यातना कधीही न संपणाऱ्या आहेत. व त्याच्या तुलनेने जगातील सुख अगदीच निरर्थक होते तव्द्तच जन्नतचा सुख आराम पाहून माणसाला हे जाणवेल की जगातील दु:ख त्रास हा खऱ्या अर्थाने दु:ख त्रास नव्हताच आणि हे फार चांगले झाले की जन्नतच्या या शाश्वत सुख आरामाकरिता मी जगातील क्षणिक दु:ख त्रास सहन केला. आणि त्या तुलनेने जगातील दु:ख त्रास अगदी नगण्य आहे.



१५९

## حديث

**عَنْ اَبِى هُرَيْرَةَ عَنِ النَّبِىِّ ﷺ قَالَ قَالَ اللّٰهُ عَزَّوَجَلَّ: اَعْدَدْتُ لِعِبَادِى الصَّالِحِيْنَ مَالَا عَيْنٌ رَأَتْ ، وَلَا اُذُنٌ سَمِعَتْ وَلَا خَطَرَ عَلٰى قَلْبِ بَشَرٍ. مِصْدَاقُ ذٰلِكَ فِى كِتَابِ اللّٰهِ فَلَا تَعْلَمُ نَفْسٌ مَا اُخْفِىَ لَهُمْ مِنْ قُرَّةِ اَعْيُنٍ جَزَاءً بِمَا كَانُوا يَعْمَلُوْنَ . ( السجدة)** ( مسلم كتاب الجنة )

# जन्नतच्या देणग्या कल्पनेहून उच्चतर

## हदीस

**हजरत अबु हुरैरा कथन करतात की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी असे फर्माविले, सर्वोच्च व सर्वश्रेष्ठ अल्लाह फर्मावितो, मी आपल्या सदाचारी दासांकरिता असे काही तयार करुन ठेवले आहे की ज्यास ना एखाद्या डोळयाने पाहीले ना एखाद्या कानाने एकले तयार करुन ठेवले आहे की ज्यास ना एखाद्या डोळयाने पाहीले ना एखाद्या कानाने ऐकले आणि ना एखाद्या माणसाच्या मनात याचा विचार आला.**

**इश ग्रंथाची ही आयत याचे समर्थन करते** فَلَا تَعْلَمُ نَفْسٌ..........

**कोणताही मनुष्य हे जाणत नाही की (सत्याकर्म करणाऱ्यांचा)आचारणांचा मोबदला म्हणून डोळयांच्या शीतलतेची कोणती सामुग्री यांच्याकरिता लपवून ठेवली गेली आहे.** (मुस्लिम किताबुल जन्नत)

## स्पष्टीकरण

मनुष्य केवळ अशाच गोष्टीची कल्पना करू शकतो ज्या त्याच्या अनुभवात व अवलोकनात येतात.जन्नतच्या देणग्या ज्याअर्थी त्याच्या अनुभवात व अवलोकनात आलेल्या नाहीत. त्याअर्थी तो त्यांच्याविषयी कल्पना करण्यास असमर्थ आहे.परंतु सर्वश्रेष्ठ अल्लाहने आपल्या सदाचारी दासांनी ही शुभवार्ता दिली आहे की त्यांच्याकरिता जन्नतमध्ये सुख विलास आणि मान प्रतिष्ठेची ती सामुग्री तयार केली गेली आहेत जी माणसाच्या कल्पनेहून कितीतरी उच्चतम आहेत.

ज्या भौतिक देणग्यांशी आम्ही परिचित आहोत त्यांच्याखेरीज नव्या व त्याहुन श्रेष्ठ देणग्यांची निर्मिती ही काही अशक्य गोष्ट नव्हे. कारण जो ईश्वर या देणग्यांना निर्माण करतो तो याहून भिन्न व श्रेष्ठ देणग्या देखील निर्माण करू शकतो.त्याच्या परिपूर्ण सामर्थ्या बाहेर कोणतीही गोष्ट नाही. मानवाची दृष्टी अशी संकुचित आहे की तो ईश सामर्थ्यासहि मर्यादित स्वरुपात पाहू इच्छितो. वस्तुत: मनुष्य स्वभावाची मागणी हीच आहे की त्याच्या करिता असे विश्व असावे ज्यात याहून श्रेष्ठ दर्जाच्या देणग्या लाभाव्यात.

# (११)
# इस्लाम स्वीकृतिच्या घटना





## حديث

عَـنْ عَبْدِ اللّٰهِ بْنِ عَبَّاسٍ قَالَ: بَعَثَتْ بَنُوْ سَعْدٍ بن بَكرٍ ضِمَامَ بن ثَعْلُبَةَ وَافِدًا اِلٰیٓ رَسُوْلِ اللّٰـهِ ﷺ فَـقَـدِمَ عَلَيْهِ وَاَنَاخَ بَعِيْرَهُ عَلٰی بَابِ الْمَسْجِدِ، ثُمَّ عَقَلَهُ، ثُمَّ دَخَلَ الْـمَسْـجِـدَ وَ رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ جَالِسٌ فِی اَصْحَابِهٖ، وَكَانَ ضِمَامٌ رَجُلاً جَلْداً اَشْعَرَ ذَا غَـدِيْـرَتَـيْـنِ فَـأَ قْبَـلَ حَتّٰی وَقَفَ عَلٰی رَسُوْلِهِ اللّٰهِ ﷺ فِیْ اَصْحَابِهٖ، فَقَالَ اَيُّكُمْ اِبْنُ عَبْدُ الْـمُـطَّلِبِ ؟ فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ : اَنَا اِبْنُ عَبْدِ الْمُطَّلِبِ، قَالَ: مُحَمَّدٌ؟ قَالَ: نَـعَـمْ، فَـقَـالَ : اِبْنَ عَبْدِ الْمُطَّلِبِ ! اِنِّیْ سَائِلُكَ وَ مُغَلِّظٌ فِیْ الْمَسْئَلَةِ، فَلَا تَجِدَنَّ فِیْ نَـفْسِكَ! قَـالَ : لَا اَجِدُ فِی نَفْسِیْ: فَسَلْ عَمَّا بَدَالَكَ ، قَالَ: اَنْشُدُكَ اللّٰهَ اِلٰهَكَ وَ اِلٰهَ مَـنْ كَـانَ قَبْـلَكَ وَاِلٰهَ مَنْ هُوَكَائِنٌ بَعْدَكَ، اللّٰهُ بَعَثَكَ اِلَيْنَا رَسُوْلًا؟ فَقَالَ اللّٰهُمَّ نَعَمْ، قَالَ: فَـاَنْشُـدُكَ اللّٰـهَ اِلٰهَكَ وَاِلٰـهَ مَـنْ كَـانَ قَبْـلَكَ وَاِلٰـهَ مَنْ هُوَكَائِنٌ بَعْدَكَ: اَللّٰهُ اَمَـرَكَ اَنْ تَـأْمُـرَنَـا اَنْ نَعْبُدَهُ وَحْدَهُ لَا نُشْرِكَ بِهٖ شَيْئًا وَاَنْ نَخْلَعَ هٰذِهِ الْاَنْدَادَ الَّتِیْ كَـانَـتْ آبَـاؤُنَا يَعْبُدُوْنَ مَعَهُ؟ قَالَ: اَللّٰهُمَّ نَعَمْ، قَالَ فَاَنْشُدُكَ اللّٰهَ اِلٰهَكَ وَاِلٰهَ مَنْ هُوَ كَـائِنٌ بَعْدَكَ، اَللّٰهُ اَمَرَكَ اَنْ نُصَلِّیْ هٰذِهِ الصَّلَوَاتِ الْخَمْسِ؟ قَالَ اللّٰهُمَّ نَعَمْ، قَالَ: ثُمَّ جَعَلَ يَذْكُرُ فَرَائِضَ الْاِسْلَامِ فَرِيْضَةً فَرِيْضَةً كَمَا يُنَاشِدُهُ فِی الَّتِیْ قَبْلَهَا، حَتّٰی اِذَا فَـرَغَ قَـالَ: فَاِنِّیْ اَشْهَدُاَنْ لَا اِلٰهَ اِلَّااللّٰهُ، وَ اَشْهَدُ اَنَّ مُحَمَّدًا رَّسُوْلُ اللّٰهِ، وَسَاُ وَدِّیْ هٰـذِهِ الْـفَـرَائِضَ، وَ اَجْتَـنِـبُ مَـانَهَيْتَنِیْ عَنْهُ، ثُمَّ لَا اَزِيْدُ وَلَا اَنْقُصُ، قَالَ ثُمَّ انْصَرَفَ رَاجِـعًـا اِلٰـی بَـعِيْـرِهٖ، فَـقَـالَ رَسُـوْلُ اللّٰـهِ ﷺ حِينَ وَلّٰیَّ : اِنْ يَصْدُقْ ذُوْالْعَقِيْصَتَيْنِ يَـدْخُـلِ الْـجَنَّةَ، قَالَ: فَاَتٰی اِلٰی بَعِيْرِهٖ فَاَطْلَقَ عِقَالَهُ، ثُمَّ خَرَجَ حَتّٰی قَدِمَ عَلٰی قَوْمِهٖ فَـاجْـتَـمَـعُـوْا اِلَيْـهِ، فَـكَانَ اَوَّلَ مَاتَكَلَّمَ بِهٖ اَنْ قَالَ بِئْسَتِ اللَّاتُ وَالْعُزّٰی! قَالُوْا: مَهْ يَا ضِـمَـامُ ، اِتَّـقِ الْـبَـرَصَ وَالْـجُذَامَ، اِتَّقِ الْجُنُوْنَ! قَالَ: وَيْلَكُمْ، اِنَّهُمَا وَ اللّٰهِ لَا يَضُرَّانِ وَلَا يَـنْـفَعَانِ ، اِنَّ اللّٰهِ عَزَّ وَ جَلَّ قَدْ بَعَثَ رَسُوْلًا، وَاَنْزَلَ عَلَيْهِ كِتَابًا، اِسْتَنْقَذَكُمْ بِهٖ مِمَّا كُـنْتُمْ فِيْـهِ، وَاِنِّـی اَشْهَـدُاَنْ لَّااِلٰـهَ اِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ، وَاَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَ رَسُـوْلُـهُ اِنِّـی قَدْ جِئْتُكُمْ مِنْ عِنْدِهٖ بِمَا اَمَرَكُمْ بِهٖ وَنَهَاكُمْ عَنْهُ، قَالَ: فَوَ اللّٰهِ مَا اَمْسَی مِنْ ذٰلِكَ الْيَوْمِ وَفِیْ حَاضِرِهٖ رَجُلٌ وَلَا اِمْرَأَةٌ، اِلَّا مُسْلِمًا. ( احمد ج ١ ص ٢٦٤ )

# एका दिवसात संपूर्ण कबीला मुसलमान

## हदीस

हज़रत बिन अब्बास फर्मावितात की बनू सअद बिन बकर ने ज़िमाम बिन सअलबा यांना आपला प्रतिनिधी बनवून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत पाठविले, जेव्हा ते आले, तेव्हा आपल्या उंटास मस्जिदीच्या दरवाज्याजवळ बसविले मग त्याला बांधले व मस्जिदीच्या दाखल झाले पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आपल्या सहकाऱ्यांसह बसले होते. जिमाम मोठा शक्तिशाली व लांब केसांचा माणूस होता. त्याच्या केसांचे दोन जुडे झाले होते. तो पुढे झाला.आणि पहिले की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) आपल्या सहाबांच्या (सहानुयायीच्या) दरम्यान बसले आहेत.त्याने विचारले अबदुल मुत्तलीबाचा पुत्र कोण आहे ? पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी फर्माविले,मी आहे अब्दुल मुत्तलीबचा पुत्र. त्याने विचारले, मुहम्मद ? पैगंबरानी फर्माविले, होय ! तो म्हणाला, हे अब्दुल मुत्तलीब च्या पुत्रा ! मी आपणास काही विचारू इच्छितो, माझ्या विचारण्याची पद्धत कडक असेल म्हणून आपण मनाला लावून घेऊ नये. पैगंबरांनी फर्माविले, मी कोणत्याही प्रकारे मनाला लावून घेणार नाही, तुम्ही जे काही विचारायचे ते विचारा. तो म्हणाला मी आपणास अल्लाहची शपथ देऊन विचारतो जो आपलाहि ईश्वर आहे आणि जे लोक होऊन गेलेत तसेच जे नंतर जन्माला येतील त्या सर्वांचा ईश्वर आहे.हे की,काय खरोखरच अल्लाहने आपणास रसूल बनवून आमच्याकडे पाठविले आहे?फर्माविले, होय. ईशवर साक्षी आहे. तो म्हणाला, मी आपणास अल्लाहची शपथ देऊन विचारतो जो अपलाहि ईश्वर आहे आणि जे लोक होऊन गेलेत, तसेच जे नंतर जन्माला येतील त्या सर्वांचा ईश्वर आहे.हे की,काय खरोखर अल्लाहने आपणास हा आदेश दिला आहे की आपण आम्हाला या गोष्टीचा आदेश द्यावा की आम्ही त्या एक ईश्वराचीच उपासना करावी व कोणालाहि त्याचा सहभागी ठरवू नये आणि आमचे पूर्वज ज्यांना त्या समान लेखून पूजत आलेत त्यांना सोडावे? फर्माविले, होय !ईश्वर साक्षी आहे. तो म्हणाला, मी आपणास अल्लाहची शपथ देऊन विचारतो जो आपलाहि ईश्वर





आहे आणि जे लोक होऊन गेलेत, तसेच जे नंतर जन्माला येतील त्या सर्वांचा ईश्वर आहे. हे कि, खरोखर अल्लाहने आपणास हा आदेश दिला आहे की आम्ही पाच वेळेची नमाज़ पढावी? फर्माविले, होय. ईश्वर साक्षी आहे.

निवेदनकार म्हणतात की यानंतर त्या माणसाने इस्लामच्या अनिवार्य कर्तव्यापैकी एकेक कर्तव्य, जकात, रोज़ा, हज्ज, तात्पर्य इस्लामच्या सर्व आधारभूत गोष्टींचा अशाचा प्रकारे उल्लेख केला. पैगंबरांना प्रत्येक कर्तव्यासंबंधी शपथ देऊन विचारीत राहीला.येथेपावेतो की जेव्हा त्याने सर्व गोष्टी विचारल्या तेव्हा उत्सफूर्त होऊन म्हणाला, (''अशहदु अन् ला इलाहा इल्लल्लाह व अशहदु अन्न, मुहम्मदन रसूलुल्लाह'') मी साक्ष देतो की अल्लाह खेरीज कोणीही उपास्य नाही व मी साक्ष दोतो की मुहम्मद अल्लाहचे रसूल आहेत) आणि तो म्हाणाला, मी या कर्तव्यांचे पालन करीन व ज्या गोष्टींना आपण न करण्यास फर्माविले आहे त्यांपासून अलिप्त राहीन.

यात ना एखादी गोष्ट वाढविन ना कमी करीन. एवढे बोलून तो आपल्या उंटाकडे गेला तो गेल्यानंतर पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, त्या दोन जुडे असलेल्या माणसाने जर खरे सांगितले आहे तर तो जन्नतमध्ये दाखल होईल.

निवेदनकार म्हणतात, तो माणूस आपल्या उंटाजवळ आला व त्याची दोरी सोडली व जेव्हा आपल्या जातीसमूहाजवळ पोहचला तेव्हा ते सर्व त्याच्या सभोवती जमा झाले त्याने सर्वात प्रथम जी गोष्ट सांगितली ती ही की, लात व उज्जा (मुर्ती) चा नाश असो. लोक म्हणाले, जिमाम थांबा, तुम्हाला कोड व महारोग न व्हावा, किंवा तुम्हाला वेडसर पणा न यावा. त्याने उत्तर दिले, खेद आहे तुम्हाबद्दल अल्लाह शपथ लात व उज्जा नुकसान पोहचवू शकत नाही की नफा पोहचवू शकत नाही. सर्वोच्च व सर्वश्रेष्ठ अल्लाहने एक रसूल पाठविला आहे. त्यावर ग्रंथ उतरविला आहे व त्याद्वारे तुम्हाला त्या (अज्ञाना) पासून मुक्ति प्रदान केली आहे ज्यात तुम्ही ग्रस्त होते. आणि मी साक्ष देतो की एक अल्लाह ज्याचा कोणीही सहभागी नाही त्याच्याशिवाय कोणीही ईश्वर नाही. आणि मुहम्मद त्याचे दास व रसूल आहेत. मी पैगंबरांकडून अशा गोष्टी घेऊन आलो आहे ज्या करण्याविषयी त्यांनी तुम्हा लोकांना आदेश दिला आहे आणि त्या गोष्टीहि ज्यांच्यापासून अलिप्त राहण्याविषयी आदेश फर्माविला आहे. निवेदनकार म्हणतात की त्यादिवशी संध्याकाळ होईपर्यंत कोणतीही व्यक्ति मग ती पुरुष असो वा स्त्री अशी नव्हती जी मुसलमान झाली नसावी.

(अहमद खंड १ पृ.१६४)

१६४

## स्पष्टीकरण

मक्का विजयानंतर अरबच्या विभिन्न टोळयांनी आपली शिष्ट मंडले पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत पाठवावयास सुरवात केली होती. या कारणास्तव की, पैगंबराशी जातीने आपले भेटून आपले समाधान करून घ्यावे व इस्लामच्या आवाहनाशी व त्याच्या शिकवणींशी परिचित व्हावे. ही शिष्टामंडल आपले समाधान करुन घेतल्यानंतर इस्लाम स्वीकारल्याची घोषना करीत. अशा प्रकारे कबिल्या कबिल्यांनी लोक मुसलमान होऊ लागले. व समूहीक रित्या इस्लाम अंगिकारण्याचे आत्मवर्धक दृश्य पैगंबर व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाहिले. बनू सअदच्या ज्या शिष्ट मंडळाचा उपरोक्त कथनात उल्लेख आला आहे. ती याच शिष्टमंडळ संबंधातील एक कडी होय.

ज़िमाम बिन सअलबा बनू सअदचा प्रतिनिधि या नात्याने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचा सेवेत हजर झाला होता. तो बद्दू (ग्रामीण) होता म्हणून शिष्टाचारांशी तो जास्त परिचित नव्हता परंतु मंलग भावनेने प्रेरित होऊन सत्य शोधार्थ आला होता. म्हणून पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी त्याच्या कठोर बोलण्याकडे लक्ष न देला त्याच्या प्रश्नांनी योग्य रित्या उत्तर दिले. पैगंबराच्या उत्तरांनी संतुष्ट होऊन व त्यांच्या व्यक्तिमत्वाने प्रभावित होऊन त्याने त्याच क्षणी कलीमा-ए-शहादत उच्चारले आणि परत जाऊन आपल्या कबिल्याच्या लोकांना इस्लामचे आमंत्रण दिले. हे आवाहन त्याने निर्भयपणे केले. व मूर्तिपूजेचा उघडरित्या विरोध केला. लोकांनी जेव्हा त्याला हे भय दर्शाविले की मुर्तीपूजेच्या विरोधाचा परिणाम म्हणून तुम्ही एखाद्या आपत्तिला बळी न पडावे तेव्हा त्याने ईमान वर्धक उत्तर दिले की मूर्ती कोणालाहि ना लाभ पोहचवू शकतात ना नुकसान, म्हणून त्यांचे भय बाळगणे एक निर्थरक गोष्ट आहे मग त्याने लोकांना हेहि समाजाविले की सर्वश्रेष्ठ अल्लाह ने आपला रसूल पाठवून व आपला ग्रंथ अवतरित करुन तुम्हाला मुर्खतेच्या व अज्ञानाच्या अंध: करातून बाहेर काढू इच्छिले आहे. म्हणून इस्लामचा अंगिकार करा. त्याच्या या आवाहनाचा व सत्य घोषणेचा लोकांवा एवढा जबरदस्त प्रभाव झाला की संध्याकाळ होई पर्यंत कबिल्याची एकही व्यक्ति अशी नव्हती जी मुसलमान झाली नसावी.

ही घटना या गोष्टीचा पुरावा होय की इस्लामी क्रान्ति इस्लामच्या उघड आवाहनाच्या परिणाम स्वरूपी उदयास आली.



१६५

## حديث

عَنْ اَنَسٍ قَالَ كَانَ غُلَامٌ يَهُودِىٌّ يَخْدُمُ النَّبِىَّ صلى الله عليه وسلم فَمَرِضَ فَاَتَاهُ النَّبِىُّ صلى الله عليه وسلم يَعُودُهُ فَقَعَدَ عِنْدَ رَأْسِهِ فَقَالَ لَهُ اَسْلِمْ فَنَظَرَ اِلَى اَبِيْهِ وَهُوَ عِنْدَهُ فَقَالَ لَهُ اَطِعْ اَبَا الْقَاسِمِ صلى الله عليه وسلم فَأَسْلَمَ فَخَرَجَ النَّبِىُّ صلى الله عليه وسلم وَهُوَ يَقُوْلُ اَلْحَمْدُ لِلّٰهِ الَّذِىْ اَنْقَذَهُ مِنَ النَّارِ. (بخارى كتاب الجنائز)

# इस्लाम स्वीकृतिचे सरळरित्या आमंत्रण

## हदीस

**हजरत अनस फर्मावितात की एक यहूदी मुलगा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची सेवा करीत असे तो आजारी पडला तेव्हा पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम)यांनी त्याच्या सेवा शुश्रूषे करीता शुभागमन केले.त्याच्या डोक्याशी बसले व त्याला म्हणाले, इस्लाम कबूल कर.तो आपल्या पित्याकडे पाहू लागला जो ज्याच ठिकाणी हजर होता. पिता म्हणाला, अबूल कासिम (पैगबंराची संज्ञा) सल्लल्लाहु अलैहि वसल्लम यांचे म्हणणे मान्य कर. तेव्हा मुलाने इस्लाम धर्म कबूल केला आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे फर्मावित तेथून निघाले की, अल्लाहचा मोठा आभार आहे ज्याने याला आगीपासून वाचविले.** (बुखारी किताबुल जनाइज़)

## स्पष्टीकरण

आजरपणात मनुष्य ईश्वराचे स्मरण करतो व उपदेश ऐकण्याकरिता प्रवृत्त असतो म्हणून असे प्रसंग सत्य धर्माचे आवाहन सादर करण्याकरिता अत्यंत उपयुक्त ठरतात. रोगी जरी एक यहुदी मुलगा होता. जो पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची सेवा करीत होता तथापि सहानुभूति व दु:ख निवारण व आदर सत्कारादि गुणवैशिष्टये पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या अंगी अत्याधिक प्रमाणात होती म्हणून ते स्वत: जातीने त्याची विचारपूस करण्यासाठी त्याच्याजवळ गेले. व प्रसंगानुकूलतेने इस्लाम स्वीकृति चे आवाहना त्याच्या समोर माडले, त्यावर मुलाने होकार दिला व तो मुसलमान झाला.

मुस्लिमेतरांना इस्लाम स्वीकृतिचे सरळरित्या आमंत्रण देणे ही प्रेषिताची पद्धत आहे. आणि हेच त्यांचे सर्वात मोठे हिताचिंतन आहे. कारण इस्लाम धर्माचा अंगिकार केल्यानेच ते जहन्नमच्या भयंकर शिक्षे पासून सुरक्षित राहू शकतात हीच गोष्ट त्यांना उघडपणे सांगावयाची आहे. यात सारवासारव करणे ना त्यांच्या हिताचे आहे ना आवाहकाच्या हिताचे.

## حديث

عَنْ اَبِىْ رَافِعٍ قَالَ: بَعَثَنِىْ قُرَيْشٌ اِلَى رَسُوْلِ اللّٰهِ ﷺ فَلَمَّا رَأَيْتُ رَسُوْلَ اللّٰهِ ﷺ اُلْقِىَ فِىْ قَلْبِىْ الْاِسْلَامُ فَقُلْتُ يَا رَسُوْلَ اللّٰهِ اِنِّىْ وَاللّٰهِ لَا اَرْجِعُ اِلَيْهِمْ اَبَدًا ، فَقَالَ رَسُوْلُ اللّٰهِ ﷺ اِنِّىْ لَا اَخِيْسُ بِالْعَهْدِ وَلَا اَحْبِسُ الْبُرُدَ وَلَا كِنْ اِرْجِعْ فَاِنْ كَانَ فِىْ نَفْسِكَ الَّذِىْ فِىْ نَفْسِكَ الْآنَ فَارْجِعْ قَالَ فَذَهَبْتُ ثُمَّ اَتَيْتُ النَّبِىَّ ﷺ فَاَسْلَمْتُ. (ابوداؤد كتاب الجهاد)

# पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) पाहता क्षणीच हृदयात इस्लााम अवतरणे

## हदीस

**अबु राफेअ म्हणतात की मला कुरैश ने पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या जवळ पाठविले जेव्हा माझी नजर पैगंबरांवर पडली, तत्क्षणी माझ्या मनात इस्लामचा समावेश झाला. मी म्हणालो, हे अल्लाहचे रसूल, अल्लाह शपथ, मी त्या लीकांजवळ कदापि परत जाणार नाही. पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी फर्माविले, मी ना वचनभंग करतो ना दूतां ना थांबवून ठेवतो. तुम्ही परत जा जर तुमच्या मनात तीच गोष्ट राहीली जी या क्षणी आहे तर परत या अबु राफेअ म्हणतात. मी चालत गेलो आणि नंतर (परत येऊन) पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत उपस्थित झालो. आणि इस्लाम ग्रहण केला.** (अबु दाऊद किताबुल जिहाद)

## स्पष्टीकरण

ही घटना या गोष्टीचा पुरावा होय की पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांचे व्यक्तिमत्व अत्यंत असामान्य होते. यास्तव आपणास पाहताच लोक प्रभावित होऊन जात येथपावेतो की





त्यांचे शत्रु कुरैशचा दूत त्यांच्या सेवेत हजर होतो व शुभ मुखावर नजर पडताच त्याचा कायापालट होतो आणि इस्लाम त्याच्या मनात उतरतो. जणू प्रेषित दाव्यचा खरे पणा पैगंबरांच्या शुभ मुखावरुन अगदी स्पष्ट होता. ही घटना हुदैबिया तहाच्या काळातील आहे. जेव्हा कुरैश जमात आणि पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या दरम्यान करार झाला होता. आणि त्या कराराचा मान राखत पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांनी दूताली थांबविणे पसंत केले नाही. जरी तो स्वत: थांबू इच्छित होता. पैगंबरांनी त्यास परत जाण्याचा सल्ला दिला या कारणास्तव की करार भंग होऊ नये म्हणून दूत मक्केला परत गेला आणि नंतर स्वत: व्यक्तिगत रित्या दुसऱ्यांदा मदीनेस परत आला व पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांच्या सेवेत उपस्थित होऊन इस्लाम धर्म स्वीकारला.

अशी होती पैगंबर (सल्लल्लाहु अलैहि व सल्लम) यांची कार्यपद्धति ज्यात ना करारभंग होता न डिपलोमेसी. राजदौत्य, किंबहुना ती तत्वप्रियता व सत्यशीलतेवर आधारित होती. आणि हीच ती गोष्ट होती जिने हृदयांना जिंकले होते.

زیر اہتمام: محمد صدیق قریشی
**Pixel Arts**
**Mobile : 9820790615**
Printed at: **Fatima Printers**
**Tilak Nagar, Saki Naka Mumbai - 400070**

# इदाऱ्याची मराठी प्राकाशने

## दअवतुल क़ुर्आन

(पवित्र क़ुर्आनाचे अनुवाद व भाष्य)

भाष्य ;

**शम्सपीरज़ादा (रह.)**

मराठी अनुवाद ;

**मुहम्मद यूसुफ अत्तार**

**मुहम्मद शफीअन्सारी**

**संपूर्ण तीन खंडात**

| | |
|---|---|
| खंड १ (पारा १ ते १०) सूरह फातिहा ते सूरह तौबा | १२०/- |
| खंड २ (पारा ११ ते २०) सूरह यूनुस ते सूरह अंकबूत | १२०/- |
| खंड ३ (पारा २१ ते ३०) सूरह रूम ते सूरह नास | १२०/- |
| काय क़ुर्आनास अर्थासह वाचणे आवश्यक नाही | ९/- |
| ऐका आपल्या पालनकर्त्याचे | ९/- |
| जवाहिरुल हदीस | ६५/- |
| पैगंबर मुहम्मद (स.) यांची दिव्य वचने | ७०/- |

वरीळ पुस्तकांची उर्दू , गुजराती, हिन्दी अणि इंग्रेज़ी भाषांतरे उपलब्ध आहेत


## इदारा दअ्वतुल क़ुर्आन

५९-मुहम्मद अली रोड, मुंबई-४०००० ३

फोन ; 23465005